# इस्लाम

लेखक

**सय्यद अबुल आला मौदूदी**

भाषांतर

**शेख अब्दुल हमीद**

* प्रकाशक *

**इस्लामिक मराठी पब्लिकेशन्स ट्रस्ट**

4, हामिद बिल्डिंग, 96, हाफीज अली बहादुर मार्ग, मोमिनपुरा, भायखळा (प.),
मुंबई-400011. फोन : 022-23018387, 23082820
फॅक्स : 2305 2002 मोबाईल : 9699167700
ई-मेल : imp_trust@yahoo.com / imptmumbai@gmail.com
वेबसाइट : www.islamdarshan.org,wwwislamvision.org
www.islamicmarathipublications.com

**RISAL-E-DINYAT** (Hindi)

**ISLAM** (Marathi)

IMP Series No. :- **05**

Written by :- **Syed Abul Ala Maududi**

Translated by :- **Shaikh Abdul Hameed**

Copies :- **3000**

**© All Rights Reserved**

Edition :- **XXIth (July 2017)**

IMPT

Published by :-

**ISLAMIC MARATHI PUBLICATIONS TRUST**

4, Hamid Building, 96, Hafiz Ali Bahadur Marg, Mominpura, Byculla (W),
MUMBAI - 400 011. Tel. : 022-23018387, 23082820
Fax : 2305 2002, Mob.: 9699167700
Email: imp_trust@yahoo.com / imptmumbai@gmail.com
Website : www.islamdarshan.org, www.islamvision.org
www.islamicmarathipublications.com

**ISBN-81-87634-004** **PRICE (MULYA) : 60/-**

## अनुक्रमणिका

प्रस्तावना २०वी आवृत्ती ५
प्रस्तावना ६
**प्रकरण पहिले : इस्लाम** ८
‘इस्लाम’ हे नामकरण ८
‘इस्लाम’ या शब्दाचा अर्थ ८
‘इस्लाम’ची सत्यता ९
‘कुफ्र’ची वास्तवता १२
‘कुफ्र’पासून होणारे नुकसान १२
‘इस्लाम’चे फायदे १६
**प्रकरण दुसरे : ईमान व आज्ञापालन** २२
आज्ञापालनास ज्ञान व दृढविश्वासाची आवश्यकता २२
‘ईमान’चा अर्थ २४
ज्ञानप्राप्तीचे साधन २६
परोक्षावर ईमान २८
**प्रकरण तिसरे : ‘नबुवत’ (पैगंबरत्व)** २९
पैगंबरांची सत्यता २९
पैगंबरांची ओळख ३२
पैगंबरांच्या आज्ञेचे पालन ३३
पैगंबरांवर ईमान धारण करण्याची आवश्यकता ३५
पैगंबरत्व (नबुवत) परंपरेचा संक्षिप्त इतिहास ३७
मुहम्मद (स.) यांचे पैगंबरत्व ४२
मुहम्मद (स.) यांच्या पैगंबरत्वाचे (नबुवत) प्रमाण ४४
अरब एक अंधकारमय भूभाग ४५
मानवता - उपकारकाचा जन्म ४६
क्रांतीचा सूर्योदय ४८
हा सर्व छळ का? ५०
चाळीस वर्षांनंतर हे परिवर्तन का? ५१
व्यापक संदेश ५२
मानवतेवर व्यापक प्रभाव ५४
एक सर्वश्रेष्ठ क्रांतिकारी ५७
सज्जड पुरावा ५९
पैगंबरत्वाची समाप्ती ६१

पैगंबरत्व समाप्तीचा युक्तिवाद ६२
**प्रकरण चौथे : परिपूर्ण ईमान** ६५
अल्लाहवरील श्रद्धा (ईमान) ६७
'ला इलाहा इल्लल्लाह'चा अर्थ ६८
'ला इलाहा इल्लल्लाह'ची वास्तविकता ६९
मानवी जीवनावर एकेश्वरत्वाचा (तौहीद) प्रभाव ७५
ईशदूत (फरिश्ते) वर ईमान ८१
ईशग्रंथांवर ईमान ८३
पैगंबरांवरील ईमान ८८
पारलौकिक जीवनावर ईमान ९१
पारलौकिक जीवनावर ईमान व त्याची गरज ९२
पारलौकिक जीवनावरील ईमानची सत्यता ९६
इष्ट मंगलमय वचन (कल्म-ए-तय्यबा) १००
**प्रकरण पाचवे : उपासना (इबादत)** १०१
उपासने (इबादत) चा अर्थ १०३
नमाज १०५
'रोजा' (उपवास) १०९
जकात १११
हज (पवित्र मक्का यात्रा) ११३
जिहाद : ईमानची कसोटी ११५
**प्रकरण सहावे : 'दीन' (जीवनधर्म) व 'शरियत'(आचारसंहिता)** ११८
'दीन' (जीवनधर्म) व 'शरियत' (आचारसंहिता) ११८
शरियतच्या आज्ञा जाणून घेण्याची साधने ११९
'फिकाह' नियमावली १२०
'तसव्वुफ' (आत्मशुद्धी) १२२
**प्रकरण सातवे : शरियतचे आदेश** १२५
शरियतची तत्त्वे १२५
हक्क व कर्तव्याचे चार प्रकार १२९
अल्लाहसंबंधीची कर्तव्ये १२९
स्वत:च्या देहाचे व आत्म्याचे हक्क १३३
मानवी हक्क १३५
प्राणीमात्राचे व वस्तुमात्राचे हक्क १४३
विश्वव्यापी व अनंत शरियत १४३

# प्रस्तावना २० वी आवृत्ती

अल्लाहच्या कृपेने, मराठी वाचकांसमोर 'इस्लाम' या पुस्तकाची विसावी आवृत्ती प्रस्तुत करताना आम्हाला अत्यानंद होत आहे. मूळ उर्दू भाषेतील 'रिसाल-ए-दिनियात'चे हे मराठी रूपांतर आहे. प्रख्यात दिवंगत इस्लामी विचारवंत सय्यद अबुल आला मौदूदी (रह.) यांनी शंभराहून जास्त पुस्तके लिहिली आहेत. त्यापैकी 'रिसाल-ए-दिनियात' हे त्यांचे सर्वाधिक लोकप्रिय पुस्तक आहे. हैद्राबाद (दक्कन) संस्थानिकाच्या शिक्षण विभागाच्या विनंतीवरून हे पुस्तक लिहिले गेले असून इयत्ता १० वीच्या अभ्यासक्रमात ते समाविष्ट होते. इस्लामची मौलिक शिकवण अत्यंत सुंदर आणि सुबोध शैलीत प्रस्तुत केली आहे. असे हे परिपूर्ण आणि संक्षिप्त पुस्तक असून इस्लामच्या खऱ्या परिचयाच्या दृष्टीनेही ते अत्यंत उपयुक्त आहे.

इ.स. १९६७ पर्यंत २६ आवृत्तीत प्रकाशित होणाऱ्या एकूण पुस्तकांची संख्या ७४ हजार इतकी होती तर जगातील ५ आंतरराष्ट्रीय भाषांमध्ये एक लाखाहून जास्त संख्येत प्रकाशित झाले आहे. इ.स. १९७८ पर्यंत या उपखंडातील आणि जगातील इतर ६४ भाषांमध्ये अनुवाद होऊन हे पुस्तक प्रकाशित झाले आहे.

'रिसाल-ए-दिनियात' भारत आणि पाकिस्तान व्यतिरिक्त इतर अरब राष्ट्रे विशेषकरून जॉर्डन येथील काही शाळांच्या अभ्यासक्रमात समाविष्ट आहे.

**इंजि. तौफीक असलम खान**

अध्यक्ष

इस्लामिक मराठी पब्लिकेशन्स ट्रस्ट,मुंबई.

“अल्लाहच्या नावाने जो असीम दयावंत व परम कृपावंत आहे.”

# प्रस्तावना

हे पुस्तक संक्षिप्त स्वरूपात विशेषकरून हायस्कूलमध्ये वरच्या वर्गात अथवा कॉलेजच्या प्रारंभिक वर्गात शिक्षण घेत असलेल्या युवकांसाठी लिहिले गेले आहे. याशिवाय इतर सर्व लोकही याचा लाभ घेऊ शकतात. इ.स. १९३७ मध्ये प्रकाशित झालेल्या या पुस्तकाच्या पहिल्याच आवृत्तीचा भारतातील बहुतेक इस्लामिक धार्मिक पाठशाळांत (मद्रसा) तसेच पाकिस्तान निर्माण झाल्यानंतर तेथील बहुतेक शाळांनी आपल्या वरच्या वर्गाच्या अभ्यासक्रमात समावेश करून घेतला. हे पुस्तक जगातील पाच आंतरराष्ट्रीय भाषांमध्येही प्रकाशित झाले असून त्याच्या एक लाखाहून अधिक प्रती छापून झाल्या आहेत.

आम्हा मुस्लिमांमध्ये धार्मिक शिक्षणाची सर्वसाधारण रूढी आजवर अशीच चालत आलेली आहे की अशा विद्यार्थ्यांना नमाज, रोजे, स्वच्छता व अशाच स्वरूपाच्या अन्य बाबींचे तपशीलवार ज्ञान व माहिती दिली जावी. इस्लामच्या मूळ धारणेबाबत फार अल्प शिक्षण दिले जाते व तेही परिणामकारक असत नाही.

इस्लाम म्हणजे काय? इस्लामची इच्छा काय आहे व तशी ती का आहे? इस्लामी धर्मश्रद्धेचा माणसाच्या जीवनाशी काय संबंध आहे? या प्रश्नांचे ज्ञान, विद्यार्थ्याला शेवटपर्यंत प्राप्त होत नाही. तसेच या श्रद्धेचा स्वीकार केल्यास त्यापासून हित कोणते आहे व तिचा अस्वीकार केल्यास कोणती हानी आहे? इस्लाम केवळ हुकूम करूनच या श्रद्धेचे लोकांकडून पालन करून घेतो की तिच्या निकोपपणाची व तिच्या सत्यतेबाबतही काही युक्तिवाद इस्लामकडे आहे; या गोष्टींचेही ज्ञान या विद्यार्थ्यांना होत नाही. या सर्व बाबींचे ज्ञान, इस्लाम धर्म नीट समजण्यासाठी व ईमान शुद्ध व निर्दोष राहण्यासाठी अत्यंत आवश्यक आहे. जोवर हे शुद्ध व निर्दोष ईमान माणसाच्या बौद्धिक शक्तीत पूर्णपणे दृढ होत नाही तोवर केवळ नमाज, रोजे, स्वच्छता वगैरे धार्मिक विधीसंबंधीची शिकवण लाभदायक ठरू शकत नाही. याचे कारण असे श्रद्धेविना (ईमानविना) आज्ञांचे पालन केले जाणे शक्य नाही. या सर्व श्रद्धांचे योग्य रितीने आकलन होण्यावरच ‘ईमान’ची दृढता अवलंबून आहे.

त्याचप्रमाणे नमाज, रोजे वगैरे विधीसंबंधीचे आदेश, त्यामागील लाभकारक हेतू व त्यांची उपयुक्तता विद्यार्थ्यांना नीटपणे समजावून दिली जावी, ज्यायोगे ते

अंत:करणपूर्वक त्यांचे पालन करण्यास उद्युक्त होतील. जो मनुष्य नमाज अदा करण्याची इच्छा बाळगतो, अशा माणसालाच नमाज पठणाची पद्धत तपशीलवारपणे उपयुक्त व हितकारक होऊ शकते. उलट ज्या माणसाच्या मनात मुळातच नमाज अदा करण्याची इच्छा नाही, अशा माणसाला नमाज कशी अदा करावयाची याचे शिक्षण देण्याने काय प्राप्त होणार आहे? म्हणूनच नमाजच्या विधीचे विवरण देण्यापूर्वी, नमाज म्हणजे काय, ती तुम्हासाठी अनिवार्य का केली आहे, त्यापासून लाभ कोणता आहे व नमाज टाळल्यास त्यापासून काय हानी होईल, याच पद्धतीने इतर आदेशांबाबतही असाच तर्क करा. हे सर्व आदेश आधी मनावर बिंबवणे अत्यावश्यक आहे व त्यानंतरच त्यांच्या प्रत्यक्ष विधींची तपशीलवार शिकवण हितकारक ठरू शकते.

हीच गरज नजरेसमोर ठेवून मी सदर पुस्तक लिहिले आहे. धार्मिक शिक्षणाच्या जुन्या पद्धतीहून भिन्न व प्रचलित काळास हितकारक ठरेल अशा नव्या पद्धतीचा धार्मिक शिक्षणासाठी मी या पुस्तकाद्वारे अवलंब करण्याचा प्रयत्न केला आहे.

या पुस्तकात मी पवित्र कुरआनच्या शिकवणींचा खुलासा सादर केला आहे. तसेच पवित्र कुरआनमध्ये आढळणाऱ्या युक्तिवाद शैलीचेच मी अनुकरण केले आहे. ज्या उद्दिष्टांसाठी व हेतूसाठी हा प्रयत्न केला गेला आहे, ती सफल व्हावीत व हे पुस्तक अधिक परिणामकारक सिद्ध होऊन अशा एका नवीन शिक्षणपद्धतीची दारे उघडणारे ठरो; अशी अल्लाहकडे प्रार्थना आहे.

**अबुल आला मौदूदी**

एप्रिल १९६०

# प्रकरण पहिले

# इस्लाम

## 'इस्लाम' हे नामकरण

जगात जितके धर्म आहेत, त्यातील प्रत्येक धर्माचे नामकरण एखाद्या विशिष्ट व्यक्तीच्या नावावरून केले गेले आहे, अथवा ज्या जातीत व ज्या राष्ट्रात त्या धर्माचा जन्म झाला त्याच्यावरून केले गेले आहे. उदा. ख्रिश्चन धर्माचे नाव, येशू ख्रिस्तांशी निगडीत असलेल्या कारणाने 'ख्रिश्चन' धर्म असे केले गेले आहे. बौद्ध धम्माचे संस्थापक महात्मा बुद्ध होते, म्हणून त्यांच्या नावावरून त्या धर्माचे नाव 'बौद्ध धम्म' असे ठेवले गेले. झरतुष्ट्र धर्माचे नाव त्याचे संस्थापक 'झरतुष्ट्र' यांच्या नावावरून ठेवले गेले आहे. यहुदी (ज्यू) धर्म हा 'यहुदा' नामक एका विशिष्ट वंशात जन्मला म्हणून त्या धर्माचे नाव यहुदी धर्म असे ठेवले गेले. अशीच अवस्था अन्य धर्माच्या नावासंबंधी आहे, परंतु 'इस्लाम'चे वैशिष्ट्य असे आहे की त्याचे नामकरण कोणत्याही व्यक्तीशी अथवा जाती अगर वंशाशी संबंधित नाही उलट त्याचे नामकरण एक विशिष्ट गुण प्रकट करते. या गुणाचा अविष्कार 'इस्लाम' शब्दाच्या अर्थामध्ये आढळतो. हे नामकरण असे स्पष्ट दर्शविते की ते कोणाही व्यक्तीच्या बुद्धीची निपज नाही. तसेच कोणाही एका विशिष्ट जातीपुरते मर्यादित नाही. त्याचा संपर्क कोणाही एखाद्या व्यक्तीशी, देशाशी, भूभागाशी अथवा जातीशी नाही. जनमानसात 'इस्लाम' चा गुणधर्म निर्माण करणे हाच त्याचा उद्देश आहे. प्रत्येक काळात व प्रत्येक जातीत व वंशात ज्या सज्जन व सद्वर्तनी लोकांमध्ये हा गुण आढळून आला ते सर्व मुस्लिम होते. मुस्लिम आहेत व पुढेही ते मुस्लिम असतील.

## 'इस्लाम' या शब्दाचा अर्थ

'इस्लाम' अरबी शब्द आहे. अरबी भाषेत 'इस्लाम' शब्दाचा अर्थ संपूर्ण आत्मसमर्पण व संपूर्ण शरणागती तसेच आज्ञापालन असा आहे. ('इस्लाम' शब्दाचा दुसरा अर्थ, शांती, कुशलता, संरक्षण, शरण इ. मनुष्याला वास्तविक शांती त्याचवेळेस प्राप्त होते, जेव्हा तो स्वत:ला अल्लाहपुढे समर्पित करून त्याच्याच आदेशानुसार जीवन व्यतीत करतो. अशाच जीवनाने मनशांती प्राप्त होते आणि समाजात खरी शांती नांदू लागते.) अल्लाहच्या आज्ञांचे पालन व त्यानुसार आचरण हाच इस्लाम आहे व म्हणूनच या धर्माचे नाव 'इस्लाम' असे ठेवले गेले आहे.

# ‘इस्लाम’ची सत्यता

तुम्ही पाहता की जगातील प्रत्येक वस्तू नियमाच्या व बंधनाच्या अधीन आहे. चंद्र व तारे हे सर्व एका अटळ नियमात नियमबद्ध असून त्याविरुद्ध ते तसूभरही हालचाल करू शकत नाहीत. पृथ्वी आपल्या विशिष्ट गतीनुसार भ्रमण करीत आहे. त्यासाठी जो काळ, वेग व मार्गक्रम निहित केला गेला आहे त्यामध्ये किंचितही फरक होत नाही. वायू व पाणी, उष्णता व प्रकाश सर्व एका नियमात व प्रबंधात बांधलेले आहेत. चराचर वस्तू, वनस्पती व प्राणीमात्र हे सर्व प्रत्येकासाठी जो नियम निहित आहे, त्यानुसारच त्यांची उत्पत्ती व त्यांचा क्षय होत असतो. त्यानुसारच ते जगतात व मृत्यू पावतात. खुद्द मनुष्याच्या अवस्थेवर चिंतन केल्यास असे आढळून येते की तोसुद्धा निसर्गनियमांच्या अधीन आहे. जो नियम त्याच्या उत्पत्तीसाठी निहित केला गेला आहे, त्यानुसारच श्वासोच्छवास करतो, अन्नपाणी, उष्णता व प्रकाश ग्रहण करतो. त्याच्या हृदयाची हालचाल, त्याचे रक्ताभिसरण, त्याच्या स्नायू व पेशी, त्याचे हात, पाय, जीभ, डोळे, कान, नाक व त्याच्या शरीराचा प्रत्येक भाग व अवयव त्याच्यासाठी निश्चित केलेले कार्य करीत आहे आणि ते कार्य तो त्याला ठरवून दिलेल्या पद्धतीनेच करीत आहे.

मोठमोठ्या ग्रहापासून ते पृथ्वीवरील अतिसूक्ष्म अणूरेणूपर्यंत सर्वांना नियमबद्ध करणारा हा भक्कम व अटळ नियम एका महान शासकाने निर्माण केलेला आहे. सर्व ब्रह्मांड व त्यातील प्रत्येक वस्तू त्याच शासकाच्या अधीन आहेत कारण त्याने निर्माण केलेल्या नियमांचे ते पालन करीत आहेत. या अर्थाने सर्व चराचर सृष्टीचा धर्म ‘इस्लाम’ आहे. कारण आम्ही वर दर्शविल्याप्रमाणे अल्लाहला संपूर्ण आत्मसमर्पण, त्याची संपूर्ण शरणागती पत्करून त्याचे आज्ञापालन करणे, यालाच इस्लाम असे म्हणतात. चंद्र, सूर्य व तारे हे सर्व मुस्लिम आहेत, पृथ्वीही मुस्लिम आहे. वायू, पाणी व प्रकाशही मुस्लिमच आहेत. वृक्ष, पाषाण व जनावरेसुद्धा मुस्लिम आहेत आणि जो मनुष्य अल्लाहला जाणत नाही किंवा त्याचे अस्तित्व नाकारतो, जो अल्लाहखेरीज इतरांची उपासना करतो, जो अल्लाहशी इतरांना सहभागी करतो, तोसुद्धा आपल्या प्राकृतिक व स्वाभाविक नियमानुसार मुस्लिम आहे. याचे कारण असे की त्याचा जन्म, जिवंत राहणे-मरणे सर्वकाही ईशनियमाच्या अधीन आहेत. त्याच्या शरीरातील रोमरोमाचा धर्म इस्लामच आहे, कारण ते सर्व ईशनियमानुसार निर्माण होतात, विकास पावतात, कार्यशील असतात. इतकेच नव्हे तर ज्या जिभेने अज्ञानापोटी तो शिर्क (अनेकेश्वरत्व) व कुफ्र (अधर्म) संबंधी आपल्या भावना व विचार प्रकट करतो, ती जीभदेखील वस्तुतः मुस्लिम

आहे. त्याचे मस्तक जे अल्लाहखेरीज इतरापुढे तो जबरदस्तीने झुकवितो ते मस्तकसुद्धा उपजत मुस्लिम आहे. अज्ञानापोटी अल्लाहखेरीज इतरांचा आदर व प्रेम ज्या हृदयात तो बाळगतो ते हृदयही स्वभावत: मुस्लिम आहे कारण या सर्व वस्तू ईशआज्ञेचे पालन करीत असतात व त्यांची प्रत्येक हालचाल ईशनियमानुसार होत असते. आता एका दुसऱ्या पैलूतून पाहा.

मनुष्याची एक अवस्था अशी आहे की, सृष्टीतील अन्य वस्तूंप्रमाणेच तोही प्रकृतीच्या प्रबल नियमांत बद्ध असून त्या नियमांचे पालन करण्यास बांधिल आहे.

त्याची दुसरी अवस्था अशी आहे की त्याला बुद्धी असते, तो विचारशक्ती आकलनशक्ती व निर्णयशक्ती बाळगतो आणि त्याच्या मर्जीनुसार एका गोष्टीला पसंत करतो तर दुसरी गोष्ट नाकारतो. एका पद्धतीला पसंत करतो तर दुसरीला नापसंत करतो. जीवनव्यवहारात त्याच्या इच्छेनुसार स्वत:च नियम ठरवतो, किंवा इतरांनी बनविलेल्या नियमांचा अंगीकार करतो. अशा अवस्थेमध्ये तो इतर वस्तूंप्रमाणे कोणत्याही निहित नियमांचे पालन करण्यास बाद्ध केला गेलेला नाही. उलट त्याला त्याच्या विचारांची, निर्णयाची व आचारांची मोकळीक दिली गेली आहे.

माणसाच्या जीवनात या दोन अवस्था वेगवेगळ्या आढळतात.

पहिल्या अवस्थेमध्ये तो सृष्टीतील अन्य वस्तूंप्रमाणे उपजत मुस्लिम आहे आणि मुस्लिम असण्यावर विवश आहे; हे नुकतेच आपण पाहिले आहे.

दुसऱ्या अवस्थेमध्ये मुस्लिम राहणे अथवा न राहणे सर्वस्वी त्याच्या मर्जीवर अवलंबून आहे आणि याच आधारावर माणसे दोन गटांत विभागली जातात.

एक मनुष्य असा आहे जो त्याच्या निर्मात्याला ओळखतो, त्याला त्याचा स्वामी व धनी मानतो व त्याच्या जीवनातील ऐच्छिक कार्यातसुद्धा अल्लाहच्या नियमांचे पालन करतो, तो परिपूर्णत: मुस्लिम आहे. त्याचा इस्लाम पूर्णत्वास पोहोचला आहे कारण त्याचे संपूर्ण जीवन प्रत्यक्षपणे पूर्ण इस्लाम आहे. ज्याचे आज्ञापालन तो न समजता करीत होता, आता समजून उमजून तो त्याचा आज्ञाधारक बनला. आता तो स्वेच्छेने त्याच अल्लाहचा आज्ञाधारक आहे ज्याचा तो अनैच्छिकपणे आज्ञाधारक होता. आता त्याचे ज्ञान सत्य आहे कारण ज्या अल्लाहने विद्या संपादन करण्याची व ज्ञानार्जनाची क्षमता प्रदान केली, त्याला त्याने जाणले आहे. आता त्याची बुद्धी व त्याची निर्णयशक्ती उचित आहे कारण ज्या अल्लाहने त्याला विचाराची, निर्णयाची व आकलनाची क्षमता प्रदान केली, त्या

अल्लाहचे आज्ञापालन करण्याचा त्याने विचारपूर्वक व स्वेच्छेने निर्णय घेतला. आता त्याची जीभ सत्यावर आहे कारण ज्या अल्लाहने तिला बोलण्याची क्षमता प्रदान केली, त्याचीच ती स्वीकृती देत आहे. आता त्याचे संपूर्ण जीवन हे केवळ सत्यमय आहे कारण ऐच्छिक तसेच अनैच्छिक या दोन्ही अवस्थेत तो अल्लाहच्या नियमांचे पालन करणारा आहे. आता संपूर्ण विश्वाशी तो एकरूप झाला आहे कारण संपूर्ण चराचर सृष्टी ज्याचे दासत्व करीत आहे त्याचीच तोही उपासना करीत आहे. आता तो पृथ्वीतलावर अल्लाहचा प्रतिनिधी (खलीफा) आहे. संपूर्ण विश्व त्याचे आहे व तो अल्लाहचा आहे.

## ‘कुफ्र’ची वास्तवता

याच्या तुलनेत दुसरा मनुष्य असा आहे जो उपजत मुस्लिम आहे आणि संपूर्ण आयुष्यभर अजाणतेपणे मुस्लिम राहिला. परंतु त्याच्या ज्ञानशक्ती व बुद्धीचे साहाय्य घेऊन त्याने अल्लाहला ओळखले नाही आणि त्याच्या ऐच्छिक कार्यक्षेत्रात त्याने अल्लाहच्या आज्ञा झुगारुन दिल्या. हा मनुष्य काफीर (अश्रद्धे, श्रद्धाहीन, सत्याचा इन्कार करणारा) आहे. ‘कुफ्र’चा खरा अर्थ लपविणे, झाकणे असा आहे. अशा माणसाला विद्रोही (काफिर) अशासाठी म्हटले जाते की त्याने त्याच्या प्राकृतिक स्वभावावर नादानीचे पांघरूण घातले आहे. तो इस्लामी प्रकृतीवर जन्माला आला आहे. त्याचा संपूर्ण देह व देहाचे सर्व अवयव इस्लामी प्रकृतीनुसार कार्यरत आहेत. त्याच्या सभोवार सर्व सृष्टी इस्लामवरच कार्यान्वित आहे. परंतु त्याच्या बुद्धीवर पडदा पडलेला आहे. सर्व सृष्टीचा तसेच त्याचा स्वत:चा प्राकृतिक स्वभाव त्याच्यापासून दडलेला आहे. त्याची विचारधारणा त्याच्या उलट आहे आणि त्याविरुद्ध आचरण करण्यास तो प्रवृत्त होतो. जो मनुष्य ‘सत्य नाकारणारा (काफिर)’ आहे तो किती मोठ्या प्रमाणात पथभ्रष्ट झाला आहे, हे तुम्ही पाहू शकता.

## ‘कुफ्र’पासून होणारे नुकसान

‘कुफ्र’ एक घोर अज्ञान आहे, किंबहुना खरे अज्ञान ‘कुफ्र’च होय. मनुष्य अल्लाहशी अनभिज्ञ असणे यापेक्षा मोठे अज्ञान आणखी कोणते असू शकते? एक मनुष्य विश्वाच्या या प्रचंड व्यापार प्रबंधाला अहोरात्र कार्यान्वित असलेला डोळ्यांनी पाहतो परंतु या प्रचंड व्यवस्थेचा निर्माता व चालक कोण आहे, हे तो जाणत नाही. ज्याने कोळसा, लोह, कॅल्शियम, सोडियम इत्यादी काही घटकांच्या मिश्रणाने अनुपम मानवनिर्मिती केली तो निर्माता कोण आहे? हेही तो जाणत नाही.

एक मनुष्य सृष्टीमध्ये चहूकडे अशा वस्तू व असे कार्य होत असताना पाहातो ज्यामध्ये अप्रतिम कौशल्य व कारागिरी आहे. गणिती ज्ञान व रसायन शास्त्रज्ञान परिपूर्णपणे भरलेले आहे. तसेच सर्व परमकोटीची निपुणता व चमत्कार त्यामध्ये दृष्टीस पडतात परंतु ते सर्वज्ञ व निपुणता असणारे व ज्याने विश्वामध्ये हे सर्व कार्य निर्माण केले आहे ते अस्तित्व कोणते आहे? हे तो जाणत नाही! विचार करा. ज्याला ज्ञानरूपी साखळीची पहिली कडीच सापडली नाही, अशा माणसासाठी खऱ्याखुऱ्या ज्ञानाची कवाडे कशी उघडली जाऊ शकतात? तो कितीही विचार व चिंतन करो किंवा कितीही संशोधन

करो, त्याला कोणत्याही क्षेत्रात ज्ञानाचा सरळ व उचित मार्ग आढळणार नाही कारण सुरूवातीलाच अज्ञानरूपी अंधकारच त्याच्या दृष्टीस पडेल आणि शेवटीही अंधारातच तो चाचपडत असेल.

'कुफ्र' एक अत्याचार आहे. किंबहुना सर्वांत मोठा अत्याचार 'कुफ्र'च होय. अत्याचार कशाला म्हणतात हे तुम्हाला ठाऊक आहे? कोणत्याही वस्तूचा वापर तिच्या प्राकृतिक व नैसर्गिक स्वभावधर्माविरुद्ध करणे हाच अत्याचार होय. आता तुम्हाला हे कळून चुकले आहे की सृष्टीतील सर्व चराचर वस्तू अल्लाहच्या आदेशाच्या अधीन आहेत व त्यांची प्रकृतीच 'इस्लाम' आहे. म्हणजेच ईशनियमांचे आज्ञापालन होय. खुद्द माणसाचा देह व त्याचा प्रत्येक अवयव, याच प्रकृतीनुसार उत्पत्ती पावलेला आहे. अल्लाहने या अवयवावर तसेच वस्तूवर अधिकार बाळगण्याचे थोडेसे स्वातंत्र्य माणसाला अवश्य दिले आहे. परंतु प्रत्येक वस्तूची प्रकृती असे इच्छिते की तिचा वापर ईशइच्छेनुसार केला जावा. परंतु जो मनुष्य 'कुफ्र' करतो, तो या सर्व वस्तूंचा वापर त्यांच्या प्रकृतीविरुद्ध करीत असतो. तो आपल्या हृदयात इतरांचा आदर, प्रेम व भयरूपी मूर्तीची प्रतिस्थापना करतो.

वास्तविकपणे हृदयाची प्राकृतिक हाक अशी आहे की त्यामध्ये केवळ अल्लाहची महानता, प्रेम व भय यांनाच स्थान असावे. मनुष्य आपल्या शरीराच्या सर्व अवयवांचा व सृष्टीतील त्याच्या अधिकारा खालील सर्व वस्तूंचा वापर व उपयोग मात्र ईशइच्छेविरुद्ध करतो. खरेतर प्रत्येक वस्तूची प्राकृतिक धारणा अशी आहे की तिचा वापर केवळ ईशनियमानुसार केला जावा. तुम्हीच सांगा की अशा माणसापेक्षा अधिक अत्याचारी कोण असेल जो आपल्या जीवनात प्रत्येक प्रसंगी व प्रत्येक वस्तूवर येथपर्यंत की खुद्द आपल्या अस्तित्वावरही अत्याचार करीत असतो?

'कुफ्र' केवळ अत्याचारच नसून तो विद्रोह, कृतघ्नपणा व नमकहरामीपणासुद्धा आहे. थोडासा विचार करा की मनुष्यापाशी त्याच्या स्वत:ची अशी कोणती वस्तू आहे? त्याचा मेंदू त्याने स्वत: निर्माण केला आहे की अल्लाहने? त्याचे हृदय, डोळे, जीभ, हातपाय व सर्व अवयवांची निर्मिती त्याने स्वत: केली आहे की अल्लाहने? त्याच्या सभोवताली जितक्या वस्तू आहेत त्यांचा निर्माता तो स्वत: आहे की अल्लाह? या सर्व वस्तूंना माणसासाठी उपयुक्त बनविणे व कार्यान्वित करण्याची कृती त्याची स्वत:ची आहे की अल्लाहची? तुमचे उत्तर हेच असेल की या सर्व वस्तू अल्लाहच्याच आहेत. त्यानेच त्यांना निर्माण केले. अल्लाहच त्यांचा स्वामी आहे व अल्लाहच्याच देणगीने या सर्व वस्तू

माणसाला प्राप्त झाल्या आहेत. खरी वस्तुस्थिती ही आहे तरी मनुष्य, अल्लाहने प्रदान केलेल्या बुद्धीचा वापर ईशइच्छेविरुद्ध विचार करण्यासाठी करतो. अल्लाहने प्रदान केलेल्या हृदयात अल्लाहविरुद्ध धारणा बाळगतो. अल्लाहने जे डोळे, जीभ, हात व पाय व इतर वस्तू प्रदान केलेल्या आहेत त्यांचा वापर ईशइच्छेविरुद्ध करतो. अशा माणसापेक्षा बंडखोर कोण असेल? एखाद्या सेवकाने आपल्या धन्याचे मीठ खाऊन जर त्याच्याशी बेईमानी केली, तर त्याला तुम्ही नमकहराम म्हणता.

एखाद्या शासकीय अधिकाऱ्याने त्याला शासनाने दिलेल्या अधिकाराचा वापर जर शासनाविरुद्ध केला तर तुम्ही त्याला द्रोही म्हणता, एखाद्या उपकारकर्त्याशी जो दगाबाजी करतो तर त्याला तुम्ही कृतघ्न म्हणता. परंतु माणसाविरुद्ध माणसाची नमकहरामी, द्रोह व कृतघ्नपणाची वास्तवता काय आहे? मनुष्य दुसऱ्या माणसाला कोठून उपजीविका देतो? ती अल्लाहने प्रदान केलेली उपजीविका होय. शासन आपल्या कर्मचाऱ्यांना जे अधिकार देते ते कोठून आलेले आहेत? अल्लाहनेच शासनाला ही सत्ता प्रदान केलेली आहे. कोणीही उपकारकर्ता दुसऱ्या व्यक्तीवर कसा उपकार करू शकतो? ते सर्वकाही अल्लाहनेच तर दिलेले आहेत. माणसावर सर्वांत जास्त हक्क त्याच्या मातापित्याचा आहे. परंतु मातापित्याच्या हृदयात त्यांच्या अपत्याबद्दलचे प्रेम कोणी निर्माण केले? मातेच्या वक्षस्थळात दुधाची निर्मिती कोणी केली? पित्याच्या मनात अशी भावना कोणी प्रविष्ट केली की त्याच्या श्रमाच्या घामाने मिळविलेली संपत्ती मांसाच्या एका निरूपयोगी गोळ्यासाठी आनंदाने उधळावी व त्याच्या संगोपनासाठी, शिक्षणासाठी व संस्कारासाठी स्वत:चा वेळ, पैसा व सर्व सुखसमाधान अर्पण करावे. आता तुम्ही सांगा जो अल्लाह माणसाचा खराखुरा उपकारकर्ता आहे, वास्तविक स्वामी आहे, सर्वांत मोठा पालनकर्ता आहे, त्याच्याशीच माणसाने जर 'कुफ्र' केले, त्याला ईश्वर मानले नाही. त्याची बंदगी करण्यास नकार दिला व त्याचे आज्ञापालन करण्यापासून तोंड फिरविले तर हे किती मोठे बंड व द्रोह आहे! किती मोठा कृतघ्नपणा व नमकहरामीपणा आहे!!

कोणी असा समज करून घेऊ नये की 'कुफ्र' करून मनुष्य अल्लाहचे काही वाकडे करतो. त्या सम्राटाचे राज्य इतके विशाल आहे की मोठ्यात मोठी दुर्बिण लावून आम्ही पाहिले तरी अद्यापपर्यंत आम्ही हे जाणू शकलो नाही की त्याच्या राज्याचा आरंभ कोठून होतो व त्याचा शेवट कोठे आहे. ज्या सम्राटाची शक्ती इतकी जबरदस्त व प्रचंड आहे की आपली पृथ्वी, सूर्य, मंगळ व अशाच प्रकारचे कोट्यवधी ग्रह त्याच्या इशाऱ्यावर चेंडूप्रमाणे भ्रमण करीत आहेत. त्या सम्राटाची संपत्ती इतकी अगणित आहे

की समस्त विश्वामध्ये जे काही आहे ते सर्व त्याचेच आहे आणि त्यामध्ये अन्य कोणीही त्याचा वाटेकरी नाही. तो सम्राट असा निरिच्छ व निरपेक्ष आहे की सर्व चराचर सृष्टी त्याचीच गरजू व कृपाभिलाषी आहे. बरे तर, माणसाची अवस्था व त्याचा दर्जा तरी असा काय आहे की त्याच्या स्वीकृतीने किंवा अस्वीकृतीने अशा सम्राटाचे काही नुकसान व्हावे? त्याच्याशी 'कुफ्र' व अवज्ञा करून मनुष्य त्याची काहीही हानि करीत नाही तर उलट मनुष्य स्वत: आपल्या विनाशाची तरतूद करतो.

'कुफ्र' व अवज्ञा करण्याचा अपरिहार्य परिणाम असा आहे की, मनुष्य स्वत: नेहमीसाठी अयशस्वी व विफल होतो. अशा माणसाला ज्ञानाचा सरळमार्ग कधीही सापडणार नाही कारण जे ज्ञान त्याच्या निर्मात्यालाच जाणत नाही ते कोणत्या वस्तूला खऱ्या अर्थाने जाणू शकते? त्याची मति सतत कुमार्गानेच जाईल कारण जी बुद्धी तिच्या निर्माणकर्त्यालाच ओळखण्यात चूक करते ती दुसऱ्या कोणत्या वस्तूला खरे जाणून घेऊ शकते? तो आपल्या जीवनातील सर्व व्यवहारामध्ये सतत ठेचा खात राहील. त्याचे चारित्र्य बिघडेल, त्याची संस्कृती व संस्कार बिघडेल, त्याचा समाज बिघडेल, त्याची उपजीविकेची अर्थव्यवस्था भ्रष्ट व विकृत होईल, त्याचे शासन व राजकारण वाईट व दोषपूर्ण असेल. तो जगात अशांतता पसरविल, रक्तपात करील, इतरांचे हक्क ओरबडून व हिसकावून घेईल, जुलूम व अत्याचार करील व स्वत:च्या कुविचारामुळे, खोडसाळपणामुळे व दुष्कृत्यामुळे तो स्वत:चे जीवन स्वत:साठीच कटू व अप्रिय करून घेईल. नंतर जेव्हा तो या जगातून परलोकात जाऊन पोहचेल तेव्हा आयुष्यभर त्याने ज्या ज्या वस्तूंवर अत्याचार केला त्या सर्व वस्तू त्याच्या विरुद्ध तक्रार करतील. त्याचा मेंदू, त्याचे हृदय, त्याचे नेत्र, त्याचे हात-पाय किंबहुना त्याच्या शरीरातील प्रत्येक रोम न रोम अल्लाहच्या न्यायालयात त्याच्याविरुद्ध असा दावा करतील की या अत्याचारी मनुष्याने तुझ्याविरुद्ध बंड व द्रोह केला व त्या द्रोहात त्याने आमच्याकडून जबरदस्तीने काम करून घेतले. ज्या भूमीवर तो अवज्ञा करीत फिरला, राहिला, जी संपत्ती त्याने अनुचित तऱ्हेने मिळविली, जे धन त्याने निषिद्ध साधनाद्वारे मिळविले व निषिद्ध हेतूसाठी खर्च केले, बंडखोर होऊन त्याने ज्या ज्या वस्तूवर कबजा केला व त्याचा गैरवापर केला, ती सर्व साधने व उपकरणे ज्यांचा त्याने त्याच्या बंडखोरीत वापर केला; हे सर्व त्याच्याविरुद्ध फिर्यादी रूपात उभे ठाकतील. 'अल्लाह' जो वास्तविक न्याय देणारा आहे तो या पीडितांची कैफियत ऐकून घेईल व त्या बंडखोराला अपमानजनक शिक्षा ठोठावील.

# ‘इस्लाम’चे फायदे

कुफ्रचे तोटे असे आहेत तर इस्लामी जीवनपद्धती स्वीकारण्याचे कोणते फायदे आहेत? ते आता आपण पाहू या.

वर आपणास हे कळून चुकले आहे की या जगात चहूकडे ईशप्रभुत्वाच्या निशाण्या पसरलेल्या आहेत. विश्वाच्या एका परिपूर्ण व्यवस्थेनुसार व एका अनिवार्य नियमानुसार चालणारा हा विराट कारखाना खुद्द याच गोष्टीचा साक्षात पुरावा आहे की त्याच्या निर्माणकर्ता व त्याला कार्यान्वित करणारा एक अमर्याद शक्तिमान शासक आहे. त्याच्या शासनाविरुद्ध कोणतीही वस्तू डोके वर करू शकत नाही. संपूर्ण विश्वाप्रमाणेच मनुष्याची प्राकृतिक अवस्थाही अशीच आहे की अल्लाहच्या आज्ञेचे पालन व्हावे. तद्नुसार नकळत ते रात्रंदिवस त्याचे आज्ञापालन करीतच आहे कारण त्याच्या प्राकृतिक नियमांचे उल्लंघन करून तो जिवंत राहूच शकत नाही.

परंतु अल्लाहने मनुष्याला ज्ञानाची क्षमता, विचार व आकलन शक्ती व चांगले वाईट यांची पारख देऊन इच्छा,योजना व अधिकार याबाबतीत थोडेसे स्वातंत्र्यसुद्धा बहाल केले आहे. या स्वातंत्र्यातच खरे तर मनुष्याची परीक्षा आहे, त्याच्या ज्ञानाची, विचार-विवेकाची कसोटी आहे. तसेच त्याला जे स्वातंत्र्य दिले गेले आहे त्याचा तो कशा रितीने वापर करतो, या गोष्टीचीही परीक्षा आहे. या परीक्षेकरिता कुठलाही एक मार्ग स्वीकारण्यासाठी त्याला विवश केले गेलेले नाही. कारण विवश केल्याने परीक्षेचे मूळ उद्दिष्ट नष्ट होते. एखाद्या परीक्षेत प्रश्नपत्रिका वाटल्यानंतर तुम्हाला एक विशिष्ट उत्तर देण्यास विवश केले गेले तर अशा परीक्षेपासून कोणताही लाभ होणार नाही, हे तुम्ही जाणू शकता. तुमची खरी क्षमता त्याच वेळी दिसून येईल जेव्हा तुम्हाला कोणत्याही प्रकारचे उत्तर लिहिण्याचा अधिकार व मोकळीक असेल. तुम्ही बरोबर उत्तर दिले तर यशस्वी व्हाल व आगामी प्रगतीचीद्वारे तुमच्यासाठी उघडली जातील. उत्तर बरोबर दिले नाही तर अयशस्वी व्हाल व आपल्या अयोग्यतेमुळे खुद्द स्वत:च्याच प्रगतीचा व उन्नतीचा मार्ग बंद करून घ्याल. ठीक याच तऱ्हेने आपल्या परीक्षापद्धतीमध्ये अल्लाहने मनुष्यालासुद्धा त्याला हवी ती पद्धत अंगीकार करण्याचे स्वातंत्र्य दिलेले आहे.

आता एक मनुष्य असा आहे की तो खुद्द स्वत:ची तसेच या विश्वाच्या नैसर्गिक प्रकृतीशी अनभिज्ञ आहे. सृष्टीनिर्मात्याचे अस्तित्व व त्याची महान गुणवता ओळखण्यात तो चूक करतो आणि परिणामत: त्याला दिलेल्या स्वातंत्र्याचा अनुचित फायदा घेऊन तो अवज्ञा व बंडखोरीचा मार्ग अवलंबतो. असा मनुष्य ज्ञान, बुद्धी, विवेक व

कर्तव्यनिष्ठेच्या कसोटीत नापास झाला.

प्रत्येक बाबतीत तो एक हलक्या दर्जाचा आहे असे त्याने स्वत:च सिद्ध केले. म्हणून वरीलप्रमाणेच त्याला परिणामाचे फळ मिळावयास हवे.

त्याच्या तुलनेत दुसरा एक मनुष्य या परीक्षेत सफल ठरला आहे. त्याने स्वत:च्या ज्ञान व बुद्धीचा उचित वापर करून अल्लाहस जाणले व त्याचा स्वीकार केला. वास्तविकपणे असे करण्यास तो बांधलेला नव्हता. त्याने चांगले व वाईट यांची पारख करण्यात कसलीही चूक केली नाही. स्वत:च्या स्वतंत्र निवडीने त्याने भलेपणा व चांगुलपणासच आपलेसे केले. खरे तर कुमार्गाकडे व वाईटपणाकडेही वळण्याचे त्याला अधिकार व स्वातंत्र्य होते. त्याने स्वत:च्या प्रकृतीला जाणले. त्याने अल्लाहस ओळखले व अवज्ञेचे स्वातंत्र्य असतानाही त्याने अल्लाहचे आज्ञाधारकत्वच पत्करले. अशा माणसाला परीक्षेमध्ये सफलतेचे भाग्य अशासाठीच लाभले की त्याने स्वत:च्या बुद्धीकडून योग्य कार्य करून घेतले. डोळ्यांनी नीट पाहिले, कानांनी नीट ऐकले, बुद्धीने योग्य निर्णय घेतला व अंत:कारणाने योग्य असलेल्या गोष्टीचे अनुकरण करण्याचे ठरविले. सत्याला जाणून व ओळखून त्याने असेही सिद्ध करून दाखविले की तो सत्य ओळखणारा आहे. सत्यापुढे नतमस्तक होऊन त्याने असे दाखवून दिले की तो सत्याचा उपासक आहे.

अशा तऱ्हेचे गुण असणारा माणूस, या जगात तसेच पारलौकिक जीवनात सफल झालाच पाहिजे हे उघड आहे.

तो ज्ञानाच्या तसेच आचरणाच्या प्रत्येक बाबतीत योग्य मार्गाचाच स्वीकार करतो. कारण तो मनुष्य अल्लाहचे अस्तित्व ओळखतो व त्याची महान गुणवत्ता जाणतो, तो खऱ्या अर्थाने ज्ञानाचा आरंभही जाणतो व त्याचा शेवटसुद्धा जाणतो. असा मनुष्य कधीही वाट चुकणार नाही. त्याचे पहिले पाऊलही उचित तऱ्हेने पडले आहे. शेवटी ज्या इष्ट स्थानाप्रत त्याला जाणे आहे, त्याचीही त्याला विश्वासपूर्वक जाणीव आहे. आता तो तात्त्विक रितीने चिंतन व अभ्यास करून विश्वातील दडलेली रहस्ये जाणून घेण्याचा प्रयत्न करतो. परंतु एखाद्या सत्य नाकारणाऱ्या (काफिर) प्रमाणे तो कधी संदेह व शंकाकुशंकांच्या कोड्यात पडत नाही. तो विज्ञानाद्वारा निसर्गाचे नियम जाणून घेण्याचा प्रयत्न करतो. ब्रह्मांडात दडलेल्या अपरंपार खजिन्याचा शोध घेतो. ज्या शक्ती पृथ्वीमध्ये व खुद्द माणसाच्या अस्तित्वामध्ये अल्लाहने ठेवलेल्या आहेत त्या सर्वांचा जातीने शोध

घेतो व ते जाणून घेतो. पृथ्वी व आकाशांत ज्या ज्या वस्तू आहेत त्या सर्वांचा वापर व उपयोग करण्यासाठी उत्तमोत्तम पद्धती शोधून काढतो. परंतु ईशपरिचय (ईशपरायणता) त्याला प्रत्येक वेळी विज्ञानाच्या दुरूपयोग करण्यापासून परावृत्त करतो. सर्व साधनांचा मीच धनी आहे असा गैरसमज त्याच्यात कधीही होत नाही.

मी निसर्गावर विजय मिळविला आहे, मी माझ्या फायद्यासाठी विज्ञानाचे साहाय्य घेईन, जगाला उद्‌ध्वस्त करून टाकीन आणि रक्तपात व लूटमार करून सबंध जगावर आपल्या सामर्थ्याचा दरारा निर्माण करीन, असे कृत्य एका सत्य नाकारणाऱ्या (काफिर) वैज्ञानिकाचे आहे.[१] मुस्लिम वैज्ञानिक जितक्या जास्त प्रमाणात विज्ञानावर प्रभुत्व प्राप्त करतो तितक्याच जास्त प्रमाणात अल्लाहवर त्याचा विश्वास व श्रद्धा वृद्धिंगत करतो आणि त्याच प्रमाणात तो अल्लाहचा अधिकाधिक आभारी दास बनतो. त्याची धारणा व श्रद्धा अशी होते की माझ्या प्रभूने माझ्या सामर्थ्यांमध्ये व माझ्या ज्ञानामध्ये जी भर घातली आहे, तिच्यापासून मी स्वत:च्या व सर्व मानवजातीच्या कल्याणासाठी प्रयत्न करीत राहील. हेच त्याचे खरे आभार प्रदर्शन अल्लाहप्रति आहे.

याचप्रमाणे इतिहास, अर्थशास्त्र, राजनीती, विधी व अन्य सर्व विद्या व कला यामध्ये आपल्या संशोधन व प्रयत्नांच्या दृष्टीने एक मुस्लिम कोणाही सत्य

---

१) (काहीशी अशीच आजची परिस्थिती आहे ज्याचा सामना आज मनुष्य करीत आहे. डॉ. जोड (Dr. Joad) यांनी स्पष्टपणे सत्य सांगितले आहे,- ''विज्ञानाने आम्हाला अशा शक्ती प्रदान केलेल्या आहेत ज्या देवतांना प्राप्त होणे योग्य आहेत आणि आम्ही त्यांच्या उपयोगात शाळकरी विद्यार्थी आणि अयोग्य व्यक्तीप्रमाणे मनोवृत्ती व बुद्धीने काम घेत आहोत.'' विश्वविख्यात तत्त्वज्ञ बरट्रान्द रसेल (Bertrand Russel) लिहितो, ''ढोबळमानाने म्हटले तर आम्ही एक अशा शर्यतीच्या मध्यभागी आहोत जिचे साधन तर मानवी कौशल्य व बुद्धी आहे आणि जिचा अंत मानवी मूर्खतेवर होतो. त्यास प्राप्त करण्याची इच्छित कुशाग्रतेतील प्रत्येक वृद्धी वाईट परिणामाकडे नेत आहे. मानवजातीच्या या शर्यतीने अज्ञानता व अनिपुणतेच्या विरोधात जगात जगण्यासाठी संघर्ष केला आहे. परंतु मूर्खतामिश्रित प्राप्त ज्ञान व कुशलतेमुळे मानवी जीवनाला अविश्वासी बनविले आहे. ज्ञान शक्ती आहे परंतु ही शक्ती वाईटासाठीसुद्धा तितकीच खर्च केली जाऊ शकते जितकी चांगल्यासाठी व मानवी कल्याणासाठी केली जाते. यावरून निष्कर्ष निघतो की मनुष्याने जर तत्त्वदर्शितेत तितकीशी उन्नती केली नाही जितकी तो ज्ञान वृद्धीत करतो तर ती ज्ञानवृद्धी खरेतर दु:खात वृद्धी सिद्ध होते.'' (40 Impact of Science on Society - P. P. 120-121) दुसऱ्या एका तत्त्वज्ञाचे कथन आहे, ''आम्ही आकाशात पक्षाप्रमाणे उडणे आणि समुद्रात माशाप्रमाणे संचार करणे अवगत केले आहे, परंतु आम्हाला हे माहीत नाही की पृथ्वीवर कशा प्रकारे जीवन जगावे.'' (Quoted by Joad in Counter Attack from the East. page - 28)

नाकारणाऱ्याच्या तुलनेत कमी पडणार नाही. तरीसुद्धा या दोहोंच्या दृष्टिकोनात मोठे अंतर आहे. मुस्लिम प्रत्येक विद्येचा अभ्यास उचित दृष्टीने करतो. उचित उद्दिष्टांसाठी करतो व यथार्थ निष्कर्षाप्रत जाऊन पोहोचतो. इतिहासापासून तो माणवांच्या गतानुभवाचा उचित व योग्य धडा व बोध घेतो. गतकाळातील भिन्न भिन्न जातीवंशाच्या उन्नतीची तसेच त्यांच्या अवनतीची कारणे जाणून घेतो. त्यांच्या संस्कार संस्कृतीमधील लाभकारक गोष्टी शोधून त्यांच्यापासून लाभ प्राप्त करतो. त्यांच्यातील सज्जन लोकांच्या स्थितीचा लाभ घेतो व गतकाळातील जातीवंशाचा ज्या ज्या गोष्टीमुळे नाश झाला, त्या सर्व गोष्टींपासून दूर राहतो. अर्थव्यवस्थेमध्ये संपत्ती मिळविण्याच्या तसेच तिचा विनियोग करण्याच्या अशा पद्धती शोधून काढतो की ज्यापासून सर्व मानवजातीचे कल्याण होईल. एकाचाच लाभ होईल व अनेकांचे नुकसान होईल अशा पद्धतीचा अंगीकार करणार नाही. राजकारण करण्यात त्याचे संपूर्ण लक्ष याच गोष्टीवर केंद्रित असते व कार्यरत होते की सर्व जगात शांतता, न्याय, सदाचार व सभ्यपणा यांचेच अधिपत्य व्हावे. कोणाही व्यक्तीने किंवा समूहाने अल्लाहच्या दासांना आपला दास बनवू नये. शासन व तिच्या सर्व सामर्थ्याला, ईशअनामत (ठेव) मानली जावी व तिचा वापर अल्लाहच्या दासांच्या कल्याणासाठी केला जावा. कायदा करताना तो अशा दृष्टीने विचार करील की, काटेकोर न्यायनिष्ठतेने लोकांचे हक्क ठरविले जावेत व कोणाही व्यक्तीवर अन्याय होणार नाही.

एका मुस्लिमाच्या आचरणांत, ईशभय, सत्यनिष्ठा व सरळपणा असतो. जगात तो अशी जाणीव बाळगून राहतो की सर्व वस्तूंचा धनी अल्लाहच आहे. माझ्याजवळ व सर्व मानवाजवळ जे काही आहे, ते सर्व अल्लाहचे दिलेले आहे. कोणत्याही वस्तूंचा किंबहुना माझ्या स्वत:च्या देहाचा व त्यातील शारीरिक सामर्थ्याचाही मी मालक नाही. हे सर्व काही अल्लाहची अनामत असून या अनामतीचा वापर करण्याचे जे अधिकार मला आहेत त्यांचा वापर ईशइच्छेनुसारच केला जाईल. एके दिवशी अल्लाह माझ्याकडून ही अनामत परत घेईल त्यावेळी मला प्रत्येक वस्तूचा हिशेब द्यावा लागेल.

ही जाणीव बाळगून जी व्यक्ती जगात राहील तिच्या सदाचरणाची जरा कल्पना करा! तो आपले अंत:करण कुविचारापासून निर्मळ राखील. ती तिच्या बुद्धीला वाईट गोष्टीच्या चिंतनापासून दूर ठेवील. ती तिच्या नेत्रांना वाईट दृष्टीपासून रोखून धरील, ती तिच्या कानांना कुश्रवणापासून परावृत्त करील. ती तिच्या जिभेचे अशा रितीने रक्षण करील की तिच्याद्वारा सत्याविरुद्ध कसलाही शब्द निघणार नाही. ती निषिद्ध मार्गाने आपले पोट भरण्याऐवजी उपाशीपोटी राहणे पसंत करील. अत्याचारासाठी ती तिच्या हातांचा कधीही

उपयोग करणार नाही. कुमार्गावर तिचे पाय कधीही जाणार नाहीत. तिचा शिरच्छेद जरी केला तरी असत्यासमोर ती कधीही नतमस्तक होणार नाही. तिची कसलीही इच्छा व गरजेची पूर्तता ती अन्याय व अत्याचारांद्वारा करणार नाही. ती साक्षात सत्य व सदाचार असेल. सत्यनिष्ठेपेक्षा इतर कोणतीही गोष्ट तिला अधिक प्रिय असणार नाही. त्यासाठी स्वत:च्या प्रत्येक हिताचे, प्रत्येक इच्छा आकांक्षेचे किंबहुना स्वत:चेही ती बलिदान करील. इतर कोणत्याही गोष्टीपेक्षा जुलूम व अन्याय यांचा ती अधिक तिरस्कार करील. कसल्याही लाभाच्या आमिषाने व लालसेने अगर कसल्याही हानीच्या भयाने ती असत्याच्या पाठीशी राहणार नाही. या जगातील यशाचा वाटाही तिलाच लाभेल.

सर्व जगात तिच्याइतका कोणीही सदाचारी व आदरणीय असणार नाही, कारण की तिचे मस्तक अल्लाहखेरीज इतरांपुढे कधीही वाकणार नाही, तिचे हात अल्लाहशिवाय अन्य कोणापुढे पसरणार नाही. अशा व्यक्तीजवळ अवमान कसा फिरकू शकेल?

या जगात तिच्याइतका अन्य कोणीही सामर्थ्यवानही असणार नाही, कारण तिच्या अंत:करणात अल्लाहखेरीज कोणाचेही भय असणार नाही, तसेच अल्लाहखेरीज अन्य कोणाकडून तिला देणगी अथवा बक्षिसाची लालसाही असणार नाही. अशा व्यक्तीला सत्य व न्यायाच्या मार्गापासून पथभ्रष्ट करू शकणारी अशी कोणती शक्ती आहे? आणि कोणती अशी धलदौलत आहे जी अशा व्यक्तीचे ईमान विकत घेऊ शकते?

तिच्यापेक्षा या जगात अन्य कोणीही धनसंपन्न व उदार असणार नाही कारण ती विलासप्रिय नाही. स्वत:च्या इच्छा व वासनांची ती गुलाम नाही, ती लोभी नाही. स्वत:च्या श्रमाच्या घामाने जे धन मिळविते, त्यातच ती समाधानी असते. निषिद्ध मार्गाने मिळणाऱ्या धनाच्या राशी जरी तिच्यासमोर मांडल्या तरी ती तुच्छतेने त्यांना लाथाडून टाकते. हे संतोषाचे धन असून त्यापेक्षा मोठे कसलेच धन असू शकत नाही.

तिच्याइतका लोकप्रिय व आवडताही अन्य कोणी असणार नाही. कारण ती प्रत्येक माणसाचा न्याय हक्क त्याला देईल. कोणाचाही हक्क ती हिरावून घेणार नाही. प्रत्येकाशी ती सत्व्यवहार करील व कोणाशीही ती कुव्यवहार करणार नाही. प्रत्येकाच्या कल्याणासाठी व भल्यासाठी ती झटेल व त्या मोबदल्यात ती निरपेक्ष असेल. अशा माणसाकडे लोकांची मने आपोआपच आकर्षित होतील व प्रत्येकजण तिला प्रेम व आदर देण्यास विवश होईल.

तिच्याइतका अन्य कोणीही विश्वसनीय असणार नाही, कारण ती कोणाच्याही

अनामत (ठेवी) चा अपहार करणार नाही. सत्यापासून ती कधीही तोंड फिरविणार नाही. आश्वासनपूर्ती करण्यात ती कधीही चुकणार नाही. तसेच व्यवहारात ती सचोटीने वागणारी असेल व प्रत्यक्ष डोळ्यांनी पाहाणारी साक्षीदार असली किंवा नसली तरी अल्लाह तर सर्वज्ञ व सर्वसाक्षी आहे; ही जाणीव मनात बाळगूनच ती प्रत्येक व्यवहार प्रामाणिकपणे व सचोटीने करील. अशा माणसाची पत, विश्वसनियता याबद्दल काय बोलावे! त्याच्यावर विश्वास ठेवणार नाही असा कोण असेल?

एका मुस्लिमाचे चारित्र्य तुम्ही जर नीट जाणून घेतले तर तुमची अशी खात्री होईल की मुस्लिम जगामध्ये अवमानित, पराजित, शासित तसेच पराधीन होऊन कधीही राहणार नाही. तो सतत प्रभावशाली व शासकच होऊन राहील. कारण त्याच्यामध्ये इस्लाम जी वैशिष्ट्ये निर्माण करतो त्याच्यावर कोणतीही शक्ती प्रभाव पाडू शकत नाही.

जगामध्ये अशा तऱ्हेने आदरयुक्त व गौरवपूर्ण जीवन व्यतीत केल्यानंतर तो जेव्हा अल्लाहसमोर हजर होईल तेव्हा अल्लाह त्याच्यावर आपल्या कृपाप्रसादाचा व इनामांचा वर्षाव करील. कारण जी अमानत जगात त्याच्या स्वाधीन केली गेली होती तिचा त्याने यथायोग्य वापर केला. उज्वल यश मिळवून सफल झाला. ही अशी एक शाश्वत सफलता आहे जी या जगापासून पारलौकिक जीवनापर्यंत सतत गतिशील असते व तिची परंपरा कोठेही खंडित होत नाही.

हा इस्लाम आहे. असा हा इस्लामच मनुष्याचा प्राकृतिक व स्वाभाविक धर्म आहे. तो कोणत्याही एखाद्या जातीवंशापुरता अगर एखाद्या राष्ट्रापुरता मर्यादित नाही. प्रत्येक युगात व प्रत्येक जातीवंशात व राष्ट्रात जे काही अल्लाहची जाण असणारे व सत्यप्रिय लोक होऊन गेले ते सर्व मुस्लिमच होते. मग त्यांच्या भाषेत या धर्माचे नाव इस्लाम असो वा अन्य काही.

## प्रकरण दुसरे

# ईमान व आज्ञापालन

## आज्ञापालनास ज्ञान व दृढविश्वासाची आवश्यकता

मागील प्रकरणात हे कळून चुकले आहे की 'इस्लाम' वस्तुत: ईशआज्ञा-पालनाचेच नाव आहे. आता आम्ही हे दाखवू इच्छितो की मनुष्य अल्लाहच्या आज्ञेचे पालन करू शकत नाही जोवर त्याला काही गोष्टींचे ज्ञान प्राप्त होत नाही आणि जोपर्यंत ते ज्ञान दृढविश्वासाच्या दर्जाप्रत वृद्धिंगत होत नाही.

सर्वप्रथम माणसाला अल्लाहच्या सत्तासामर्थ्यावर परिपूर्ण विश्वास असावयास हवा, त्याच्या अस्तित्वावरच जर विश्वास नसेल तर त्याच्या आज्ञांचे पालन तो कसा करू शकेल? त्याचबरोबर अल्लाहच्या गुणवैशिष्ट्यांचे संपूर्ण ज्ञान असावयास हवे. अल्लाह एकच आहे आणि ईशत्वामध्ये त्याचा कोणीही सहभागी नाही, हेच ज्याला माहीत नाही तो इतरासमोर मान झुकविण्यापासून व हात पसरविण्यापासून दूर कसा राहू शकतो? अल्लाह सर्व काही पाहणारा आहे, सर्व ऐकणारा आहे व सर्वज्ञ आहे, या गोष्टीवर ज्याचा विश्वास नाही; तो अल्लाहची अवज्ञा करण्यापासून स्वत:ला कसा रोखू शकतो? या बाबीवर जेव्हा तुम्ही चिंतन कराल तेव्हा तुम्हाला असे आढळून येईल की विचारधारणा, आचार व कर्म या बाबतीत इस्लामच्या मार्गाने जाण्यासाठी माणसामध्ये काही गुणवैशिष्ठ्ये असणे आवश्यक आहेत; ती सर्व गुणवैशिष्ट्ये त्याच्यामध्ये निर्माण होऊ शकत नाहीत, जोपर्यंत त्याला ईशगुणवत्तेचे व त्याच्या वैशिष्ठ्यांचे नीट ज्ञान प्राप्त होत नाही. हे ज्ञान केवळ कळण्यापुरतेच मर्यादित असून चालत नाही तर त्याची रुजवणूक दृढविश्वासपूर्वक अंत:करणात व्हावयास हवी. त्यामुळे माणसाचे मन त्याविरुद्ध विचार करण्यापासून व त्याचे जीवन त्याच्या ज्ञानाविरुद्ध कृती करण्यापासून सुरक्षित होते.

त्यानंतर मनुष्याला हेही कळणे आवश्यक आहे की ईशइच्छेनुसार जीवन व्यतीत करण्याचा योग्य मार्ग कोणता आहे? अल्लाहला काय आवडते ज्याचा आम्ही अंगीकार करावा? त्याला काय नापसंत आहे की ज्याचे आम्ही पथ्य पाळावे. या गरजेपोटी माणसाला ईशनियमांचे व विधीचे पुरेपूर ज्ञान असते. जे ईशनियम व विधी आहेत यावर त्याचा पुरेपूर विश्वास असतो. त्याचे पालन केल्यानेच अल्लाहची प्रसन्नता लाभू शकते, त्याचे कारण असे की ज्याला मुळातच त्याचे ज्ञान नसेल तर तो आज्ञापालन कशाचे

करेल? ज्ञान आहे परंतु त्यावर पूर्ण विश्वास नसेल किंवा हे नियम व विधींबरोबरच अन्य नियमही यथोचित व योग्य आहेत असा समज असेल तर तो मनुष्य ईशनियमांचे काटेकोर पालन कसा करू शकेल?

तसेच माणसाला या गोष्टीचेही ज्ञान असणे अत्यंत जरुरीचे आहे की, ईशइच्छेनुसार आचरण न केल्यास तसेच ईश्वराच्या विधी व नियमांचे पालन न केल्यास कोणते परिणाम होतात आणि त्याच्या आज्ञापालनाचे इनाम काय आहे? यासाठी अत्यावश्यक आहे, की आखिरत (परलोक) च्या जीवनावर, ईशन्यायालयात हजर होण्यावर, अवज्ञांबद्दल शिक्षा मिळण्यावर व आज्ञापालनाचा पुरेपूर मोबदला मिळण्यावर अढळ विश्वास, ईमान व त्याचे ज्ञान असणे अगत्याचे आहे. जो मनुष्य 'आखिरत' (पारलौकिक जीवन) च्या जीवनाशी अपरिचित आहे, तो आज्ञापालन व अवज्ञा या दोहोंना निरर्थक समजत असते. त्याची समजूत तर अशी असते की आज्ञापालन करणारा व आज्ञापालन न करणारा, या दोघांची अवस्था शेवटी सारखीच असेल कारण दोघेही मातीत मिसळून जातील. या जगात ज्या पापांपासून व दुष्कृत्यापासून कसलीही हानी होण्याचे त्याला भय नाही त्यापासून तो कसा वाचेल व आज्ञापालनांची बंधने व त्रास सहन करण्याचा तो कसा स्वीकार करील? अशी आशा त्याच्याकडून कशी केली जाऊ शकते? असे ईमान व विश्वास असल्यास, मनुष्य ईशआज्ञेचे पालन करणारा कधी होऊच शकत नाही. त्याचप्रमाणे, आज्ञापालन करण्यात, असा माणूसही अढळ राहू शकत नाही ज्याला आखिरतचे जीवन व ईशन्यायालयात हजर होण्याचे ज्ञान तर आहे, परंतु त्यावर अढळ ईमान व विश्वास नाही. याचे कारण असे की शंका व द्विधा मन:स्थितीच्या अवस्थेत मनुष्य एखाद्या गोष्टीवर ठामपणे राहू शकत नाही. एखादे कृत्य लाभकारक आहे अशी तुमची मनोमन खात्री व विश्वास असला तरच ते काम तुम्ही मन:पूर्वक करू शकता. तसेच एखादे कृत्य हानिकारक आहे असा तुमचा ठाम विश्वास असेल तेव्हाच त्यापासून पथ्य पाळणे तुम्ही अविचलपणे करू शकता. म्हणून यावरून असा निष्कर्ष निघतो की एखाद्या पद्धतीचे आज्ञापालन व अनुकरण करण्यासाठी तिच्या परिणामाचे ज्ञान असणे अत्यंत आवश्यक आहे. ते ज्ञान दृढ विश्वासाच्या, नितान्त ईमानच्या स्वरूपाचे असणेही आवश्यक आहे.

# ‘ईमान’चा अर्थ

वरील वर्णनांत ज्याला आम्ही ज्ञान, दृढविश्वास म्हटले आहे त्याचेच नाव ‘ईमान’ आहे. ईमानचा अर्थ जाणणे व मानणे असा आहे. ईश्वर एकच आहे आणि त्याची वास्तविक गुणवत्ता, त्याचे नियम व त्याची शिक्षा, तसेच त्याच्या देणग्या जो मनुष्य जाणतो व त्यावर अंत:करणापासून दृढविश्वास बाळगतो; त्याला ‘मोमिन’ (ईमानधारक) असे म्हणतात. ईमानचा अनिवार्य परिणाम असा आहे की मनुष्य ‘मुस्लिम’ अर्थात अल्लाहचा आज्ञाधारक दास बनतो.

‘ईमान’च्या वरील व्याख्येवरून कोणीही मनुष्य ईमानखेरीज ‘मुस्लिम’ होऊ शकत नाही, हे तुम्ही स्वत:च समजू शकता. बीज व वृक्ष यांचे जे नाते आहे तसेच नाते ईमान व इस्लाम यांचे आहे. बीजाशिवाय वृक्ष उगवूच शकत नाही. असे होऊ शकते की बीज जमिनीत पेरले जावे परंतु जमीन खराब असल्या कारणाने किंवा हवा व पाणी योग्य रितीने न मिळाल्यामुळे वृक्ष निस्तेज व खुरटलेला होईल. अगदी याच तऱ्हेने जो मनुष्य मुळातच ईमान बाळगत नसेल तर तो मुस्लिम होणे कोणत्याही प्रकारे शक्य नाही. असे मात्र जरूर शक्य आहे की एखाद्या व्यक्तीच्या अंत:करणात ईमान आहे, परंतु आपल्या इच्छाशक्तीच्या कमकुवतपणामुळे अथवा कमी प्रतीच्या शिक्षण-संस्कारामुळे व कुसंगतीमुळे तो परिपूर्ण व पक्का मुस्लिम असणार नाही.

ईमान व इस्लामच्या दृष्टीने मनुष्यांचे चार प्रकार आहेत.

(१) जे ईमानधारक आहेत. त्यांचा ईमान त्यांना संपूर्णपणे ईशआज्ञांचे पालन करणारे बनवितो. अल्लाहस अप्रिय असलेल्या गोष्टींपासून ते स्वत:ला अशा प्रकारे वाचवितात जसे विस्तवाला हात लावण्यापासून मनुष्य स्वत:ला वाचवितो. अल्लाहस प्रिय जे आहे ते अशा तन्मयतेने व मन:पूर्वक करतात, जसे मनुष्य आनंदाने धनद्रव्य प्राप्त करतो. असा मनुष्य खराखुरा मुस्लिम आहे.

(२) मनुष्य ईमान तर बाळगतो, परंतु त्याचा ईमान दृढ व मजबूत नसतो आणि तो परिपूर्णपणे अल्लाहचे आज्ञापालन करणारा नसतो. हे जरी खालच्या श्रेणीचे लोक असले तरीही ते मुस्लिमच आहेत. हे लोक अल्लाहच्या आज्ञेची अवहेलना व अवज्ञा करीत आहेत तेव्हा त्यांच्या अपराधाच्या दृष्टीने ते शिक्षेस पात्र आहेत, परंतु त्यांची अवस्था अपराध्यांची आहे, बंडखोर व नाकारणाऱ्या माणसाची नाही. याचे कारण असे आहे की ते सर्वसत्ताधीशाला सम्राट मानतात व त्याच्या

नियमविधींचा नियमविधी म्हणून स्वीकार करतात.

(३) जे लोक ईमान तर बाळगत नाहीत परंतु ते अशी कृत्ये करीत असतात जी ईशनियमांशी अनुकूल व सुसंगत असे वाटतात, हे लोक वास्तविकपणे नाकारणारे (काफिर) आहेत. त्यांची बाह्यत्कारी सत्कृत्ये वास्तविकपणे अल्लाहच्या आज्ञापालनातील आचरण नव्हे, म्हणून ती कृत्ये मूल्यहीन आहेत. सम्राटाला सम्राट न मानणाऱ्या व त्याच्या नियमविधींना नियमविधी न मानणाऱ्या माणसाप्रमाणे त्यांचे उदाहरण आहे. अशी व्यक्ती, ईशनियमाविरुद्ध नसणारे एखादे असे कृत्य करताना दिसत असेल तर तो सम्राटासमीप आपल्या कर्तव्याचे पालन करणारा व त्याचे नियम व विधींचे पालन करणारा आहे, असे तुम्ही म्हणू शकत नाही. कोणत्याही अवस्थेत त्याची गणना नाकारणाऱ्या (काफिर) लोकांतच होईल.

(४) जे लोक ईमान तर बाळगत नाहीतच परंतु आचरणाच्या दृष्टीनेसुद्धा दुष्ट व दुराचारी आहेत, असे लोक सर्वांत वाईट दर्जाचे आहेत. कारण ते नाकारणारे आहेत, तसेच ते विघ्न निर्माण करणारे आहेत. ते अत्याचारी आणि उपद्रवी आहेत.

मानवसमूहाच्या या विभाजनाने हे स्पष्ट होते की ईमानावरच वास्तविकपणे मनुष्याच्या यशाचे श्रेय अवलंबून आहे. इस्लाम मग तो परिपूर्ण असो अथवा अपूर्ण असो, तो केवळ ईमानरूपी बीजानेच निर्माण होतो. जेथे ईमान नसेल तेथे त्याच्या जागी 'कुफ्र'च असेल व कुफ्रचा अर्थ अल्लाहस नाकारणे असा आहे, मग ते नाकारणे अल्पप्रमाणात असो की फार मोठ्या प्रमाणात असो.

# ज्ञानप्राप्तीचे साधन

ईशआज्ञापालनासाठी ईमानची आवश्यकता आता तुम्हास माहीत झाली आहे. आता प्रश्न असा आहे की, ईशगुण व त्याला प्रिय असणारे नियम व आखिरतच्या जीवनाबद्दल (पारलौकिक जीवन) अचूक व खरे ज्ञान कोणत्या मार्गाने प्राप्त होऊ शकते?

याआधी आम्ही हे वर्णन केलेलेच आहे की विश्वामध्ये सर्वत्र अल्लाहच्या कारगिरीची, कौशल्याची चिन्हे व निशाण्या पसरलेल्या आहेत. ते सर्व या सत्यतेचा पुरावा सादर करतात की या प्रचंड विश्वरूपी कारखान्याचा निर्माता व नियंता एकच एक अल्लाह आहे. तोच त्याचा चालकही आहे. या सर्व चिन्हात व पुराव्यात समस्त ईशगुणांची छबी दृष्टीस पडते. त्याची तत्त्वदर्शिता त्याचे ज्ञान, त्याचे सामर्थ्य, त्याचा दयाळूपणा, त्याची पालनक्रिया, त्याचा प्रकोप या सर्व गोष्टी दृष्टीस पडतात. अशी कोणती गुणवत्ता राहते जिची शान या पुराव्यांतच स्पष्ट होत नाही? माणसाची बुद्धी व त्याची पात्रता या गोष्टींना पाहण्यात व समजण्यात बहुधा चूक करीत आली आहे. हे सर्व पुरावे डोळ्यांसमोर आहेत. असे असतानासुद्धा कोणी म्हणतो की ईश्वर दोन आहेत. अन्य कोणीतरी म्हटले की  तीन आहेत, तर काहींनी अगणित ईश्वर मानले आहेत, काहींनी ईशत्वाचेच विभाजन केले आणि असे म्हटले की एक पर्जन्याचा देव आहे, एक वायूचा देव आहे व एक अग्निदेव आहे. तात्पर्य हे की प्रत्येक गुणवत्तेचा व शक्ती-सामर्थ्याचा वेगवेगळा देव आहे आणि एक ईश्वर या सर्वांचा प्रमुख (महादेव) आहे. अशा तऱ्हेने अल्लाहची सत्ता व त्याची गुणवत्ता समजून घेण्यास माणसाची बुद्धी व मती अनेकदा फसली आहे ज्याचे सविस्तर विवरण करण्याची ही वेळ नाही.

आखिरत अर्थात पारलौकिक जीवनासंबंधी मनुष्याने, पुष्कळसे गैरसमज व विचार दृढ करून घेतले आहेत. कोण म्हणतो की मेल्यानंतर मनुष्य मातीत मिसळून जाईल व तद्नंतर कोणतेही जीवन नाही. कोण म्हणतो की मनुष्य पुन्हा पुन्हा अनेकदा या जगात जन्म घेईल व आपल्या कर्मांनुसार शिक्षा किंवा पुरस्कार प्राप्त करील.

ईशइच्छेनुसार जीवन व्यतीत करण्यासाठी ज्या नियमांचे पालन आवश्यक आहे ते नियम स्वयंबुद्धीने निर्धारित करणे तर आणखी अधिक बिकट काम आहे.

मनुष्याजवळ अत्यंत उचित बुद्धी असली व त्याची ज्ञानक्षमता ही उच्चकोटीतील असली तरी वर्षानुवर्षाचे अनुभव व विचार-चिंतन केल्याने तो एका विशिष्ट मर्यादेपर्यंत

स्वत:चे मत बनवू शकतो. त्याने सत्य पूर्णपणे जाणले आहे असा पुरेपूर विश्वास त्याला त्या वेळीसुद्धा नसतो. ज्ञान व बुद्धीची खरी परीक्षा तर अशा रितीने होऊ शकत होती की, माणसाला कसल्याही मार्गदर्शनाखेरीज मोकळे सोडून दिले असते. मग जो स्वत:च्या प्रयत्नामुळे व योग्यतेमुळे सत्य व वास्तवाप्रत पोहोचेल तोच सफल होईल. जो पोहोचू शकला नाही तो असफल राहील. परंतु अल्लाहने त्याच्या दासांना अशा कठीण परीक्षेत टाकलेले नाही. त्याने दयाळूपणाने खुद्द माणसातूनच अशी माणसे जन्माला घातली ज्यांना त्याने आपल्या सर्व गुणवत्तेचे यथार्थ ज्ञान दिले. ती जीवनपद्धतीसुद्धा दिली ज्याद्वारा मनुष्य या जगात अल्लाहच्या इच्छेनुसार जीवनयापन करू शकतो. पारलौकिक जीवनासंबंधीसुद्धा यथार्थ ज्ञान दिले, तसेच जीवनाच्या बाबतीतही खरेखुरे ज्ञान त्यांना प्रदान केले व त्यांना आदेश दिला की सर्व मानवांना हे ज्ञान व आदेश पोहोचवावे. हेच ते अल्लाहचे पैगंबर आहेत. ज्या साधनाद्वारा अल्लाहने त्यांना ज्ञान प्रदान केले त्याला ‘वही’ (दिव्य प्रकटन) म्हणतात. ज्या ग्रंथाद्वारा त्यांना हे ज्ञान दिले त्याला ईशग्रंथ-ईशवाणी असे म्हणतात. आता मनुष्याच्या बुद्धीची व त्याच्या क्षमतेची कसोटी येथे आहे की, जो पैगंबरांचे सोज्वळ व पवित्र जीवन व त्यांच्या उच्च शिकवणीवर विचार-चिंतन केल्यावर त्यांच्यावर ईमान-दृढविश्वास व श्रद्धा धारण करतो किंवा नाही ही खरी कसोटी आहे. जो न्यायनिष्ठ व सत्यप्रिय असेल तर सत्य गोष्ट व सत्यनिष्ठ माणसांच्या शिकवणुकीचा स्वीकार करील व या कसोटीत सफल ठरेल. जर त्याने हे मान्य केले नाही तर त्याचा नकाराचा अर्थ असा होईल की तो सत्य व सत्यतेला जाणण्याची व त्याचा स्वीकार करण्याची क्षमता व पात्रता गमावून बसला आहे. असा नकार त्याला कसोटीत असफल होण्यास कारणीभूत ठरेल. अल्लाह व त्याचे नियम तसेच पारलौकिक जीवनासंबंधी तो कदापिही खरे ज्ञान प्राप्त करू शकणार नाही.

# परोक्षावर ईमान

तुम्हाला जेव्हा एखाद्या गोष्टीचे ज्ञान नसते तेव्हा ते ज्ञान असणाऱ्यांचा तुम्ही शोध घेता आणि त्याच्या सांगण्यानुसार आचरण करता. जेव्हा तुम्ही आजारी पडता तेव्हा स्वत:च औषधोपचार न करता डॉक्टरकडे जाता. यासाठी डॉक्टराचे प्रामाणिक असणे, अनुभवी असणे व त्याच्या औषधोपचाराने अनेकांना गुण येणे या सर्व बाबी अशा आहेत की ज्यामुळे तुमच्या उपचारासाठीची योग्यता व क्षमता सर्व त्या डॉक्टराच्या ठायी आहे, अशी तुमची श्रद्धा बनते. या श्रद्धेपोटीच तो जे औषध देतो व ज्या पद्धतीने घ्यावयाला सांगतो त्यानुसारच तुम्ही करीत असता आणि ज्या गोष्टीचे पथ्य पाळावयास सांगतो तसे तुम्ही वागता. याचप्रमाणे कायदाविषयक बाबतीत तुम्ही वकिलावर श्रद्धा बाळगता व त्यांच्या म्हणण्यानुसार वागता. शिक्षणाच्या बाबतीत तुमची श्रद्धा गुरुजनांवर असते. प्रवासात मार्ग ठाऊक नसेल तेव्हा जाणकाराच्या सांगण्यानुसार तुम्ही मार्गक्रमण करता. तात्पर्य की या जगातील प्रत्येक व्यवहारात तुम्हाला माहिती व ज्ञान मिळविण्यासाठी एखाद्या जाणकारावर श्रद्धा ठेवावी लागते आणि त्याच्या म्हणण्यानुसार वागणे तुम्हाला भाग पडते. यालाच 'परोक्षावरील श्रद्धा' असे म्हणतात.

'परोक्षावरील ईमान'चा अर्थ असा आहे की जे काही तुम्हास माहीत नाही ते माहीत असणाऱ्याकडून जाणून घेणे व त्यावर विश्वास ठेवणे. ईशसत्तेशी व ईशगुणांशी तुम्ही परिचित नाही, तुम्हाला हेही ठाऊक नाही की त्याचे फरिश्ते (दूत) त्याच्या आदेशाबरहुकूम समस्त विश्वाची कामे करीत असून तुम्हाला चोहोबाजूने त्यांनी वेढलेले आहे. तुम्हास हेही माहीत नाही की, ईशइच्छेनुसार जीवन व्यतीत करण्याची पद्धत कोणती आहे? तुम्हाला पारलौकिक जीवनासंबंधीचा खरा वृत्तान्त ठाऊक नाही. हे सर्व ज्ञान तुम्हाला अशा माणसाकडून प्राप्त होते जो सत्यनिष्ठ, सत्यतावादी, ईशपरायण, अत्यंत पवित्र जीवन व बुद्धियुक्त आहे. त्याचे ऐकून तुम्हाला असे पटते की तो जे काही सांगत आहे, ते सर्व सत्य असून त्याच्या सर्व गोष्टी विश्वास ठेवण्यासारख्या आहेत. यालाच 'परोक्षावरील ईमान' (ईमान-बिल-गैब) म्हणतात. अल्लाहचे आज्ञापालन करण्यासाठी व त्याच्या इच्छेनुसार आचरण करण्यासाठी परोक्षावरील श्रद्धा अत्यंत आवश्यक आहे. कारण असे की, पैगंबराखेरीज अन्य कोणाकडूनही तुम्हाला उचित ज्ञान प्राप्त होऊच शकत नाही व उचित ज्ञानाखेरीज तुम्ही इस्लामच्या जीवनपद्धतीवर नीटपणे आचरण करू शकत नाही.

## प्रकरण तिसरे

# ‘नबुवत’ (पैगंबरत्व)

मागील प्रकरणात तुम्हाला तीन गोष्टी स्पष्ट झाल्या आहेत.

१) अल्लाहचे आज्ञापालन करण्यासाठी अल्लाहाच्या सत्तेचे व त्याच्या गुणवत्तेचे व त्याच्या पसंतीच्या पद्धतीचे आणि पारलौकिक जीवनातील शिक्षा तसेच पुरस्कारासंबंधी उचित व खऱ्या ज्ञानाची आवश्यकता आहे. हे ज्ञान असे असावयास पाहिजे की, ज्यावर तुमचा दृढविश्वास (ईमान) आहे.

२) अल्लाहने माणसाला अशा कठीण परीक्षेत तथा कसोटीत टाकलेले नाही की, त्याने स्वत:च्या प्रयत्नाने हे सर्व ज्ञान प्राप्त करावे. उलट त्याने मानवातूनच काही महान व्यक्तींना (पैगंबर) ‘वही’ (दिव्यप्रकटन) द्वारा हे ज्ञान दिले आणि ते सर्व ज्ञान मानवापर्यंत पोहोचविण्याचा त्यांना आदेश दिला.

३) सर्वसामान्य माणसांची जबाबदारी केवळ एवढीच आहे की त्यांनी अल्लाहच्या खऱ्या पैगंबरांना ओळखावे. जेव्हा त्यांना हे कळून चुकते की अमुक एक व्यक्ती अल्लाहचा वास्तविक पैगंबर आहे तेव्हा तो जी काही शिकवण देतो त्याचा स्वीकार करावा. तो जे काही आदेश देतो त्याचे पालन करावे व त्याचे अनुकरण करावे हे त्याचे कर्तव्य ठरते.

आता सर्वप्रथम आम्ही तुम्हाला हे दाखवू इच्छितो की पैगंबरांना ओळखण्याचे पुरावे कोणते आहेत व पैगंबरत्वाची वास्तवता काय आहे.

## पैगंबरांची सत्यता

तुम्ही हे पाहता की जगात माणसाला ज्या ज्या वस्तूंची गरज असते, अल्लाहने त्या सर्वांची व्यवस्था स्वत:च केलेली आहे. मूल जेव्हा जन्माला येते तेव्हा त्याला किती साधनसामग्री देऊन जगात धाडण्यात येते. बघण्यासाठी डोळे, ऐकण्यासाठी कान, वास घेण्यासाठी तसेच श्वासोच्छवासासाठी नाक, स्पर्शज्ञानासाठी शरीराच्या त्वचेतील स्पर्शाची संवेदना, चालण्यासाठी पाय, काम करण्यासाठी हात, विचारचिंतन करण्यासाठी मेंदू आणि अशाच प्रकारच्या इतर अगणित बाबी, पूर्वयोजनेनुसार त्याच्या सर्व गरजांचा साकल्याने विचार करून त्या चिमुकल्या देहात समाविष्ट केलेल्या असतात. नंतर जेव्हा तो जगात येतो तेव्हा त्याच्या जीवनास आवश्यक असलेल्या गोष्टी इतक्या विपुल

प्रमाणात त्याला उपलब्ध होतात, ज्यांची मोजदादही तुम्ही करू शकत नाही. हवा, पाणी, प्रकाश, उष्णता, जमीन आणि मातेच्या वक्षस्थळात आधीच निर्माण झालेले दूध, मातापित्यांच्या नातेवाईकांच्या व इतरांच्या अंत:करणातही त्याच्याबद्दल उत्पन्न होणारी माया व प्रेम निर्माण केले जाते, ज्यांच्याद्वारा त्याचे पालनपोषण व संगोपन केले जाते. मग जसजसा तो वाढत जातो तसतसे त्याच्या गरजांच्या पूर्ततेसाठी हरप्रकारच्या वस्तू त्याला प्राप्त होत जातात. असे वाटते की जणूकाय पृथ्वीवरच्या व आकाशातील सर्व शक्ती त्याच्या संगोपनासाठी व सेवेसाठी कार्यरत आहेत.

यानंतर आणखी पुढे चला. जगात कार्य करण्यासाठी ज्या क्षमता आवश्यक असतात त्या सर्व माणसाला दिल्या आहेत. शारीरिक शक्ती, बुद्धी व आकलनशक्ती, वाक्शक्ती व अशाच प्रकारच्या इतर अनेक क्षमता प्रत्येक माणसात कमीजास्त प्रमाणात असतात. परंतु या बाबतीत अल्लाहची व्यवस्था एक अजब प्रकारची आढळते. त्याने सर्व प्रकारच्या क्षमता सर्व माणसांना सारख्या प्रमाणात दिलेल्या नाहीत. जर असे झाले असते तर कोणीही कोणाचा गरजू राहिला नसता आणि कोणीही कोणाची पर्वा केली नसती. म्हणून अल्लाहने सर्व माणसांच्या एकूण गरजांसाठी सर्व क्षमता माणसामध्येच निर्माण केल्या असल्या तरी अशा रीतीने एका माणसाला एक विशिष्ट क्षमता अधिक प्रमाणात दिली तर दुसऱ्या माणसाला वेगळी क्षमता अधिक प्रमाणात दिली. तुम्ही हे पाहता की काही माणसांमध्ये शारीरिक श्रम करण्याची क्षमता इतरांपेक्षा अधिक असते. काही माणसात एखाद्या विशिष्ट कलेची अथवा विशिष्ट व्यवसायाची उपजत क्षमता असते व बाकीचे त्यापासून वंचित असतात. काही माणसे इतरांपेक्षा अधिक बुद्धिमान असतात. काही माणसे उपजत सेनापती असतात. काही माणसांत विशिष्ट शासकीय योग्यता असते. काही माणसे असामान्य वक्तृत्वक्षमता घेऊन जन्माला येतात. काही माणसांमध्ये लेखनकलेचे अचाट सामर्थ्य स्वाभाविकत:च असते. एखादा मनुष्य असा जन्मतो की त्याची बुद्धी गणितशास्त्रात अत्यंत तीक्ष्ण असते ती इतकी की या शास्त्रातील अत्यंत कठीण प्रश्न व समस्यांची तो अशी चुटकीसारखी सोडवणूक करतो जी इतरांच्या आवाक्याबाहेर असते. दुसरा एखादा मनुष्य असा होऊन जातो जो अद्‌भूत वस्तु निर्माण करतो व त्यांना पाहून सर्व जग आश्चर्याने थक्क होऊन जाते. आणखी एखादा मनुष्य अशी अपूर्व कायदेविषयक निपुणता बाळगतो की वर्षानुवर्षे कायद्यातील एखाद्या समस्येवर चिंतन केल्यानेही ती सुटू शकत नाही, अशा समस्येवर त्याची दृष्टी आपोआपच पडते. या सर्व ईशदेणग्याच होत. कोणीही स्वत:मध्ये अशा प्रकारच्या क्षमता स्वत: निर्माण करू शकत नाही. शिक्षण व संस्काराने या गोष्टी उत्पन्न होऊ शकत नाहीत. खरे तर या सर्व उपजत क्षमता असून अल्लाह आपल्या चातुर्यानेच त्याला हव्या

असणाऱ्या व्यक्तीलाच त्या प्रदान करतो.

अल्लाहच्या या देणग्यांवरही विचार व चिंतन केल्यास असे आढळून येते की, मानवी संस्कृतीसाठी ज्या योग्यता व क्षमतांची गरज जास्त प्रमाणात असते, त्या जास्त माणसात निर्माण होतात आणि ज्या क्षमतेची गरज कमी प्रमाणात असते त्या क्षमता कमी लोकांत आढळून येतात. शिपाई जास्त तयार होतात. शेतकरी, सुतार, लोहार व अशाच प्रकारची इतर कामे करणारी माणसे बहुसंख्येने तयार होतात. परंतु विद्वान व बौद्धिक सामर्थ्य असणारे कमी असतात. तसेच सेनापतित्व व राजकीय थोर योग्यता असणारे थोड्या प्रमाणांत जन्माला येतात. जे एखाद्या कलेत व शास्त्रात अत्यंत व असामान्य ज्ञान व क्षमता बाळगतात ते अत्यंत दुर्लभ असतात. कारण त्यांच्या कर्तृत्वाने मानवजातीला शतकानुशतकापर्यंत त्यांच्यासारख्या विद्वानांची गरज उरत नाही.

जनमानसांतून इंजिनीयर, गणितज्ञ, वैज्ञानिक, कायदेपंडित, राजनीतिज्ञ, अर्थशास्त्रज्ञ व भिन्न भिन्न व्यवस्थांची क्षमता बाळगणारे लोकच जन्माला यावेत; केवळ हीच एक गरज मानवजातीला या जगात यशस्वी व सफल होण्यासाठी नाही, याचाही विचार व्हायला हवा. या सर्वांहून मोठी आणखी एक गरज आहे व ती अशी की माणसांना अल्लाहचा मार्ग दाखविणाराही कोणीतरी हवा. इतर लोक तर केवळ इतकेच दाखविणारे आहेत की, जगात मनुष्यासाठी काय काय आहे व त्यांचा कशा रितीने वापर व उपयोग केला जाऊ शकतो. परंतु खुद्द माणसाचे अस्तित्व जगात कशासाठी आहे, हे सांगणारा व दाखवून देणाराही कोणीतरी पाहिजेच. तसेच मनुष्याला विश्वातून ही सर्व साधनसामग्री कोणी प्रदान केली? त्या प्रदान करणाऱ्याची इच्छा काय आहे? हे ही सांगणारा पाहिजेच, जेणेकरून मनुष्याने त्यानुसार आचरण करून निश्चित व शाश्वत सफलता प्राप्त करावी. ही मनुष्याची वास्तविक व सर्वांत मोठी गरज आहे. ही गोष्ट मान्य करण्यास बुद्धी नकार देते की ज्या अल्लाहने आमची लहानसहान गरज पुरी होण्याची परिपूर्ण व्यवस्था करून ठेवली आहे, तो अल्लाह इतक्या महत्त्वपूर्ण गरजेची पूर्तता करण्याबाबत बेसावध असेल. ज्याप्रकारे अल्लाहने प्रत्येक विद्येची प्रत्येक कलेची व विज्ञानाची योग्यता व क्षमता बाळगणारी माणसे जन्माला घातली त्याचप्रमाणे अशा माणसांनाही जन्माला घातले ज्यांच्यात खुद्द अल्लाहलाच ओळखण्याची सर्वोच्च पात्रता होती. अल्लाहने त्यांना 'दीन' (जीवनधर्म), नैतिकता व आचारशास्त्र (शरियत) चे ज्ञान दिले आणि इतरांना त्यांनी ही शिकवणूक द्यावी, या सेवाकार्यासाठी त्यांना नियुक्त केले. हेच ते लोक होत ज्यांना आमच्या भाषेत 'नबी' अथवा 'रसूल' किंवा 'पैगंबर' (ईशदूत, संदेष्टा, प्रेषित) असे म्हटले जाते.

# पैगंबरांची ओळख

ज्याप्रमाणे अन्य विद्या व कलांमध्ये नैपुण्य व कौशल्य असणाऱ्या व्यक्तीमध्ये विशेष प्रकारची बुद्धी व विशिष्ट प्रकारची मनोवृत्ती उपजतच असते, अगदी त्याचप्रमाणे पैगंबरसुद्धा एक विशिष्ट मनोवृत्ती घेऊन जन्माला येतात.

एखाद्या जन्मजात कवीचे काव्य ऐकल्यावर आमच्या चटकन लक्षात येते की त्याच्यामध्ये उपजतच काव्यप्रतिभा आहे, कारण इतरांनी हवा तितका प्रयत्न करूनही तशी काव्यरचना त्यांना साधत नाही. त्याचप्रमाणे एखादा जन्मजात वक्ता, एखादा जन्मजात प्रतिभासंपन्न लेखक, एखादा जन्मजात संशोधक, एखादा उपजत नेतृत्वगुण असणाऱ्याची ओळख त्याच्या कर्तृत्वामुळे स्पष्टपणे पटते. कारण हे सर्व त्याच्या अंगी असलेल्या अनन्यसाधारण योग्यतेची चमक प्रकट करतात जी इतर लोकांत नसते, ठीक अशीच स्थिती पैगंबरांचीही असते. त्यांची बुद्धिमत्ता अशा गोष्टींची उकल करते जी इतरांच्या कल्पना-विचारातही नसते. तो अशा विषयांचे विवरण करतो ज्याचे विवरण व विश्लेषण त्यांच्याखेरीज अन्य कोणीही करू शकत नाही. त्यांची दृष्टी अशा सूक्ष्म बाबीपर्यंत खोलवर जाते जेथे इतरांची दृष्टी वर्षानुवर्षाच्या चिंतनानंतरही पोहोचू शकत नाही. तो जे काही सांगतो त्याचा बुद्धी स्वीकार करते आणि मन अशी ग्वाही देते, की अवश्य हेच सत्य आहे. जगातील अनुभवावरून व ब्रह्मांडातील निरीक्षणावरून त्यांची प्रत्येक गोष्ट खरी असल्याचे सिद्ध होते. परंतु आम्ही स्वत:च तशा गोष्टी सांगण्याची इच्छा करू लागलो तर ते सांगू शकत नाही. यानंतर त्याची मनोवृत्ती इतकी सोज्वळ, सात्विक व पवित्र असते की तो प्रत्येक व्यवहारात सचोटीचा सद्वर्तनी व सालसपणाचा मार्ग अंगीकार करणारा असतो आणि तो कधीही चुकीची गोष्ट उच्चारत नाही, कसलेही दुष्कर्म करीत नाही आणि सतत चांगुलपणा व सत्यनिष्ठेची शिकवण देत असतो. इतरांना तो जे काही सांगतो त्यावर स्वत: आचरण करून दाखवितो. त्याच्या जीवनात असे एकही उदाहरण आढळून येत नाही की त्याच्या उक्तीविरुद्ध त्याची कृती आहे. त्याच्या कथनात व कृतीत कसलेही स्वहित आढळत नाही. तो इतरांच्या भल्यासाठी स्वत: हानी पत्करतो आणि स्वत:च्या भल्यासाठी इतरांचे नुकसान कदापिही करीत नाही. त्याचे संपूर्ण जीवन सचोटी, सभ्यपणा, पावित्र्य, उच्च व उदात्त विचारसरणी तसेच पराकोटीच्या उच्च माणुसकीचा एक आदर्श असतो. त्यामध्ये शोधूनही कसला दोष आढळत नाही. हे सर्व माहीत झाल्यानेच स्पष्टपणे ओळखता येते की हा मनुष्य अल्लाहचा खराखुरा पैगंबर आहे.

# पैगंबरांच्या आज्ञेचे पालन

जेव्हा हे कळून चुकते की अमुक एक मनुष्य अल्लाहचा खराखुरा पैगंबर आहे तेव्हा त्याचे म्हणणे स्वीकार करणे, त्याच्या आज्ञांचे पालन करणे व त्याच्या पद्धतीचे अनुकरण करणे आवश्यक ठरते. एखाद्या माणसाला पैगंबर तर मानायचे व त्याचे म्हणणे मात्र ऐकावयाचे नाही, हे बुद्धीला पटत नाही. कारण त्याला पैगंबर मानण्याचा अर्थ असा की, तो जे काही सांगत आहे ते सर्व तो अल्लाहच्या वतीने सांगत आहे व जी काही कृती करीत आहे ती ईशइच्छेनुसारच करीत आहे. आता त्याच्याविरुद्ध तुमची उक्ती व कृती ही अल्लाहविरुद्ध ठरेल व जी गोष्ट अल्लाहविरुद्ध असेल ती कदापि सत्यावर व न्यायावर अधिनिष्ठित असू शकत नाही. म्हणून एखाद्याला पैगंबर मानल्यानंतर ही गोष्ट अनिवार्य ठरते की, त्याचे म्हणणे कसलीही शंकाकुशंका न बाळगता स्वीकारण्यात यावे व त्याच्या आदेशापुढे नतमस्तक व्हावे. मग उद्देश व त्यामागील होणारा लाभ, तुम्हाला कळो वा न कळो. जे पैगंबराकडून सांगितले गेले ते पैगंबरांकडून असणे हीच बाब सत्य असण्याचा पुरावा आहे. त्यात सर्व तत्त्वदर्शिता व हितकारक उपदेश सामावलेले असते. एखाद्या गोष्टीचे तुम्हाला आकलन होत नसेल तर दोष त्या गोष्टीचा नसून तुमच्या आकलनशक्तीचा आहे.

जो मनुष्य एखाद्या कलेत अथवा विद्येत पारंगत नाही, तो त्या कलेतील बारकावे जाणू शकत नाही, ही गोष्ट उघड आहे. जर असा मनुष्य त्या कलेत पारंगत असलेल्या व्यक्तीचे म्हणणे केवळ एवढ्यासाठीच मान्य करीत नसेल, की त्याला आकलन होत नाही तर असा मनुष्य किती मूर्ख असेल? जगातील प्रत्येक कार्यक्षेत्रात विशेषज्ञांची गरज असते आणि विशेषज्ञांकडे रुजू झाल्यावर त्याच्यावर श्रद्धा ठेवली जाते व त्याच्या कार्यात कसलीही ढवळाढवळ केली जात नाही. कारण सर्व माणसे सर्व प्रकारच्या कार्यात तज्ज्ञ असू शकत नाहीत व सर्वकाही ते जाणू शकत नाहीत. तुम्हाला तुमच्या बुद्धीचा व चातुर्याचा वापर एक सर्वोत्तमासाठीच करावयास हवा. एक सर्वोत्तम तज्ज्ञ शोधून काढा. एखाद्या व्यक्तीसंबंधी तुम्हास खात्री झाली की तो विशेषज्ञ आहे, तर त्यावर तुम्हास संपूर्ण विश्वास टाकावा लागेल. मग त्याच्या कर्मात हस्तक्षेप करणे व प्रत्येक बाबीसंबंधी असे म्हणणे की आधी आम्हाला ते समजून सांगा नाहीतर आम्ही मान्य करणार नाही, असे वागणे हा शहाणपणा नसून शुद्ध मूर्खपणा आहे. एखाद्या वकिलास तुमचा खटला सुपूर्द केल्यावर त्याच्याशी एखाद्या मुद्यावर वाद घातल्यास तुम्हाला त्याच्या कार्यालयातून तो बाहेर घालवून देईल. तसेच एखाद्या डॉक्टरला त्याने दिलेल्या औषधातील प्रत्येक

घटकाबद्दल खुलासा विचारला तर तो तुमचा औषधोपचार बंद करील. असाच प्रकार धर्माबाबतही आहे. तुम्हाला ईशज्ञान प्राप्त करण्याची आवश्यकता आहे. ईशइच्छेनुसार जीवन व्यतीत करण्याची पद्धत कोणती आहे, हे तुम्ही जाणू इच्छिता. स्वत: तुमच्याकडे या सर्व गोष्टी जाणून घेण्याचे साधन नाही. तेव्हा आता तुमचे हे कर्तव्य ठरते, की तुम्ही अल्लाहच्या खऱ्या पैगंबराचा शोध घ्यावा. या शोधकार्यात तुम्हाला अत्यंत चातुर्याने व समंजसपणे वागावे लागेल, कारण जर तुम्ही एखाद्या चुकीच्या माणसाची निवड केलीत तर तो तुम्हाला चुकीच्या वाटेने नेईल. परंतु सर्व प्रकारचा शोध केल्यावर तुमची अशी खात्री झाली की, अमुक मनुष्य अल्लाहचा खराखुरा पैगंबर आहे तर त्याच्यावर तुम्हास संपूर्ण विश्वास टाकावयास हवा व त्याच्या प्रत्येक आज्ञेचे पालन करावयास हवे.

# पैगंबरांवर ईमान धारण करण्याची आवश्यकता

अल्लाहतर्फे पैगंबर जो मार्ग दाखवितो. तोच इस्लामचा सत्य व सरळमार्ग आहे, हे तुम्हाला कळले आहे. आता तुम्ही स्वत:च हे समजू शकता की पैगंबरांवर ईमान धारण करणे व त्यांच्या आज्ञेचे पालन व अनुकरण करणे सर्व मानवजातीला अनिवार्य आहे. जो मनुष्य पैगंबराचा मार्ग सोडून स्वत:च्या बुद्धीनुसार मार्ग अनुसरतो, तो निश्चितपणे मार्गभ्रष्टच आहे.

याबाबतीत लोक अनेक प्रकारच्या विचित्र चुका करतात. काही लोक असे आहेत, की ते पैगंबरांची सत्यनिष्ठा मानतात, परंतु त्यावर ते ईमान धारण करीत नाहीत. तसेच त्यांचे आज्ञापालन करीत नाहीत. हे नुसते ‘नाकारणारे’ (काफिर) नसून मूर्खही आहेत. कारण की पैगंबराला खरा मानल्यानंतर त्यांची अवज्ञा करणे याचाच अर्थ असा होतो की असा मनुष्य जाणूनबुजून असत्याचा मार्ग अनुसरतो. यापेक्षा मोठी घोडचूक असू शकत नाही, हे उघड आहे.

काही लोकांचे असे म्हणणे आहे की आम्हास पैगंबरांचे अनुकरण करण्याची आवश्यकताच नाही. आम्ही आपल्या स्वयंबुद्धीने सत्याचा मार्ग जाणून घेऊ. हीसुद्धा एक मोठी चूक आहे. तुम्ही भूमितीचा अभ्यास केलेला आहे. तुम्हास हे माहीत आहे की एका बिंदूपासून दुसऱ्या बिंदूपर्यंत एकच सरळ रेषा असू शकते. तिच्याव्यतिरिक्त जितक्या रेषा असतील त्या एकतर वाकड्या असतील किंवा त्या दोन्ही बिंदूंशी मिळणाऱ्या नसतील. अशीच वास्तवता सत्यमार्गाचीही आहे, ज्याला इस्लामच्या भाषेत ‘सिराते-मुस्तकीम’ म्हणजे सरळमार्ग असे म्हटले जाते. हाच मार्ग मनुष्यापासून प्रारंभ पावून अल्लाहप्रत जातो व भूमितीच्या या सिद्धान्ताप्रमाणे तोसुद्धा एकच मार्ग असू शकतो. त्याच्याखेरीज जितके मार्ग असतील ते एकतर वेडेवाकडे असतील किंवा ते अल्लाहपर्यंत न पोहचणारे असतील. आता विचार करा की जो सरळमार्ग आहे तो तर पैगंबरांनी दाखवून दिला आहे व त्याशिवाय अन्य कोणताही सरळमार्ग होऊच शकत नाही. हा मार्ग सोडून जो मनुष्य स्वत:च दुसरा मार्ग शोधील त्याला खालील दोन अवस्थांपैकी एक अवस्था अनिवार्यपणे प्राप्त होईल. एकतर त्याला अल्लाहपर्यंत पोहोचण्याचा मार्गच सापडणार नाही. दुसरा जर सापडलाच तर तो अतिशय लांब व वक्र असा असेल. ती सरळरेषा असणार नाही तर ती अतिवक्र रेषा असेल. पहिल्या अवस्थेत तर त्याचा सर्वनाश उघड आहे. उरली दुसरी अवस्था तर तीसुद्धा निस्संशयपणे मूर्खपणाची असेल. निर्बुद्ध जनावरसुद्धा एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाण्यासाठी वक्र मार्ग सोडून सरळमार्गानेच जातो. मग अशा माणसाला तुम्ही काय म्हणाल ज्याला अल्लाहचा एक सदाचरणी दास सरळमार्ग

दाखवित असताना तो म्हणतो, ''मी तुम्ही दाखविलेल्या मार्गाने जाणार नाही व स्वत:च वेड्यावाकड्या मार्गाने भरकटत जाऊन मी माझ्या इच्छित स्थानापर्यंत पोहोचेन.''

तुम्ही विचार केल्यास कळून चुकेल की जो कोणी पैगंबरांवर ईमान धारण करण्याचे नाकारतो त्याला अल्लाहप्रत पोहचण्यास कोणताही मार्ग सापडू शकत नाही, सरळमार्गही नाही व वाकडाही नाही. कारण असे की, जो मनुष्य सत्यनिष्ठ व सदाचारी मनुष्याचे म्हणणे स्वीकारण्याचे व मान्य करण्याचे नाकारतो त्याच्या मस्तकात काही दोष नक्कीच असतो ज्या कारणाने तो सत्यापासून तोंड फिरवतो. त्याची बुद्धी व समंजसपणा दोषयुक्त असेल किंवा त्याच्या मनात अहंकार भरलेला असेल वा त्याचा स्वभावधर्म इतका वक्र असेल की तो सत्य व सदाचाराच्या गोष्टी स्वीकारण्यास तयारच होणार नाही. तो पूर्वजांच्या रूढीचे अंधानुकरण करणारा असेल व ज्या काही असत्य गोष्टी रूढींच्या स्वरूपात पूर्वापार चालत येत असतात त्याविरुद्ध कसलेही ऐकून घ्यायला तयार नसेल. तो आपल्या इच्छा वासनांचा दास असेल आणि पैगंबरांच्या शिकवणुकीचा स्वीकार करण्यास यासाठीच नकार देत असेल की स्वीकार केल्यानंतर बेकायदेशीर गोष्टी व पापकर्म करण्याचे स्वातंत्र्य शिल्लक उरणार नाही. वर उल्लेखलेल्या सर्व बाबींपैकी एखादा जरी दुर्गुण कोणा माणसात असेल तर त्याला ईशमार्ग सापडणे केवळ अशक्यप्राय आहे. एक खरा सदाचरणी व तटस्थ वृत्तीचा भला मनुष्य एका सच्चा पैगंबराच्या शिकवणुकीचा स्वीकार करण्यास नकार देईल, हे अशक्य आहे.

पैगंबर अल्लाहने पाठविलेले असतात व अल्लाहचाच असा आदेश आहे की, त्यांच्यावर ईमान धारण करा व त्यांच्या आज्ञा पाळा. असे असताना जर कोणी पैगंबरावर ईमान धारण केले नाही तर ते अल्लाहविरुद्ध बंड ठरते. तुम्ही ज्या राज्यातील प्रजा असाल त्यातील राजाने नियुक्त केलेल्या शासकांनाही तुम्हास मान्य करावे लागेल. जर तुम्ही त्याला शासक मानावयास नकार दिला तर त्याचा अर्थ असा होईल की, तुम्ही खुद्द राजाज्ञेविरुद्ध बंड पुकारले. राजाला मानायचे व राजाने नियुक्त केलेल्या शासकास मानायचे नाही, या दोन्ही परस्पर विरोधी व विसंगत गोष्टी आहेत. अल्लाह व त्याने पाठविलेल्या पैगंबराचेही उदाहरण याच प्रकारचे आहे. अल्लाह सर्व मानवजातीचा वास्तविक बादशाह आहे. ज्या माणसाला त्याने मानवजातीच्या उपदेशार्थ व मार्गदर्शनार्थ पाठविले व ज्याच्या आज्ञापालनाचा आदेश दिला, त्याला पैगंबर मानणे प्रत्येक माणसाचे कर्तव्य ठरते. इतर सर्व गोष्टींचे अनुकरण व आज्ञा पाळण्याचे सोडून देऊन केवळ त्याचीच आज्ञा पाळावयास हवी. त्याच्यापासून तोंड फिरवणारा मग तो अल्लाहस मानणारा असो की न मानणारा कोणत्याही अवस्थेत तो 'नाकारणाराच' (काफिर) आहे.

# पैगंबरत्व (नबुवत) परंपरेचा संक्षिप्त इतिहास

पैगंबर परंपरेचा मानवजातीत कसा प्रारंभ झाला व विकसित व उन्नत होत होत एका शेवटच्या महान पैगंबरावर तिचा कसा शेवट झाला; हे आपण आता पाहू या.

आपण हे ऐकलेच असेल की अल्लाहने सर्वांआधी एका मानवाला निर्माण केले. नंतर त्या माणसापासून त्याचे युगल बनविले व त्यापासून पुढे मानवी वंशवृद्धी केली आणि अगणित शतकानुशतकांपासून ती संपूर्ण भूमीवर पसरलेली आहे. जगात जितकी माणसे जन्मली ते सर्व त्या प्राथमिक युगलचीच संतान होत. सर्व जातीधर्माचा धार्मिक व ऐतिहासिक उल्लेख या गोष्टीशी सहमत आहे की मानवजातीचा आरंभ एकाच मनुष्यापासून झाला आहे. विज्ञानाच्या संशोधनाद्वाराही हे सिद्ध झालेले नाही की भूमंडलावर निरनिराळया भागांत वेगवेगळी माणसे निर्माण केली गेली. उलट अधिकतर वैज्ञानिक विद्वानांचे असे अनुमान व मत आहे की सर्वाआधी एकच मनुष्य निर्माण झाला असेल. जेथे मानववंश आढळतो, तो त्याच एका पहिल्या मानवाची संतान आहे.[१]

या पहिल्या मानवाला 'आदम' असे म्हणतात. त्यापासूनच 'आदमी' शब्दाची उत्पत्ती झाली व त्याचा अर्थ मानव असा आहे. अल्लाहने सर्वांत पहिला पैगंबर आदरणीय आदम (अ.) यांनाच केले. ते प्रथममानव आहेत. त्यांना असा आदेश दिला की त्यांनी त्यांच्या वंशजांना इस्लामी जीवनपद्धतीचे शिक्षण द्यावे. अर्थात त्यांना हे दाखवावे की तुमचा व संपूर्ण विश्वाचा निर्माता एकच अल्लाह आहे. त्याचीच तुम्ही उपासना करा. त्याच्या समोर आपले मस्तक टेका. त्याच्याशीच सहाय्याची करूणा भाका आणि त्याच्या इच्छेनुसार जगात सदाचरणाने व न्यायाने आपले जीवन व्यतीत करा. तुम्ही अशा प्रकारे आचरण केले तर तुम्हाला योग्य ईनाम (मोबदला) मिळेल. जर तुम्ही त्याची अवज्ञा कराल तर कठोर शिक्षा मिळेल.

आदरणीय आदम (अ.) यांच्या संततीपैकी जे लोक भले होते ते आपल्या पित्याने दाखविलेल्या सरळमार्गाने चालत राहिले. परंतु जे लोक दुष्ट व वाईट होते त्यांनी तो मार्ग सोडून दिला. हळूहळू हरप्रकारची दुष्कृत्ये व कुश्रद्धा पसरत गेली. कोणी चंद्र, सूर्य, तारे कोणी वृक्षाची, पशूची व नद्यांची उपासना सुरू केली. काहींनी असा विचार केला की,

१) हे वास्तव की संपूर्ण मानवजात एकाच मातापित्याची संतान आहे, जात पात, उच्चनीचसंबंधी भेदभावाचे समूळ उच्चाटन करते आणि सर्व एक दुसऱ्यांचे बंधु आहेत, हे सिद्ध होते. जातीयतेमुळे मानवसमाजात बिघाड निर्माण झाला आहे आणि त्याने रौद्ररूप धारण केले आहे, या समस्येचे निराकरण मानवी विश्व-व्यापकतेत आहे.

वायू, जल, अग्नि, रोगराई तसेच आरोग्य व निसर्गाच्या इतर सत्तेचे व सामर्थ्यांचे ईश्वर वेगवेगळे आहेत. त्यापैकी प्रत्येकाची उपासना करावयास हवी ज्यायोगे ते सर्व प्रसन्न होऊन आमच्याशी दयाळू होतील. अशा तऱ्हेने अज्ञानापोटी ‘शिर्क’ (अनेकेश्वरत्व) व मूर्तिपूजेची अनेक रूपे प्रकटली आणि त्यापासून अनेक धर्म निर्माण झाले. हा तो काळ होता जेव्हा आदरणीय आदम (अ.) यांची वंशवेल जगाच्या विभिन्न भागांत पसरली होती. भिन्नभिन्न जाती बनल्या होत्या. प्रत्येक जातीने स्वत:चा एक नवीन धर्म बनविला होता आणि प्रत्येकाच्या रूढीपरंपरा वेगळ्या होत्या. अल्लाहच्या विस्मरणाबरोबरच लोकांना त्या नियमांचेही विस्मरण झाले जे आदरणीय आदम (अ.) यांनी त्यांच्या संततीला शिकविले होते. लोकांनी केवळ स्वत:च्या तुच्छ इच्छावासनांचेच पालन आरंभिले. हरप्रकारच्या वाईट रूढी व प्रथा निर्माण झाल्या. सर्व प्रकारच्या अज्ञानपूर्ण विचारांचा प्रसार झाला. चांगले व वाईट जाणण्यासाठी चुका करण्यात आल्या. अनेक वाईट गोष्टींना चांगले मानण्यात आले व कित्येक चांगल्या गोष्टी वाईट ठरविल्या गेल्या.[१]

आता अल्लाहने प्रत्येक जातीत व वंशात, पैगंबर पाठविण्यास आरंभ केला आणि ते लोकांना त्याच इस्लामची शिकवण देऊ लागले जी शिकवण पैगंबर आदम (अ.) यांनी सर्वप्रथम माणसांना दिली होती. या पैगंबरांनी आपापल्या जातीवंशांना विसर पडलेल्या शिकवणीची आठवण करून दिली. एकाच ईश्वराची उपासना करण्याची त्यांना शिकवण दिली. ‘शिर्क’ (अनेकेश्वरत्व) व मूर्तिपूजा करण्यापासून लोकांना परावृत्त केले. अज्ञानापोटी आलेल्या रूढींचे उच्चाटन केले. ईशइच्छेनुसार जीवन व्यतीत करण्याची पद्धत दाखविली. उचित नियम व आदेश दाखवून देऊन त्यांचे पालन करण्याचा आदेश दिला. भारत, चीन, इराण, इराक, इजिप्त, आफ्रिका, यूरोप थोडक्यात असे की जगात कोणताही देश असा नाही जेथे अल्लाहकडून त्याच्या सच्चा पैगंबरांचे आगमन झाले नाही. त्या सर्वांचा धर्म एकच होता तो हाच धर्म होता ज्याला ‘इस्लाम’ असे म्हणतात.

---

१) त्याने हे सत्य ज्ञान झाले की हा विचार चुकीचा आहे की, मनुष्य सुरूवातीला निसर्गातील प्रत्येक वस्तूला पूजत होता आणि अनेकेश्वरत्वापासून उन्नती करून तो एकेश्वरत्वापर्यंत पोहचला आहे. असे नसून मनुष्य तर सुरूवातीपासूनच एकेश्वरत्वाला मानणारा होता. अनेकेश्वरत्व (शिर्क) तर मानवी समाजात त्या वेळी प्रवेशित झाला होता जेव्हा लोकांमध्ये बिघाड निर्माण झाला होता आणि ते त्यांच्या वास्तविक धर्मापासून (एकेश्वरत्व) दूर गेले. आधुनिक संशोधनाद्वारासुद्धा हेच सिद्ध होते की अल्लाहची उपासनाच आरंभिक उपासनेचे रूप आहे. उपासनेची इतर अनेक रूपे तर वास्तविक धर्माचे विकृत रूप आहे. पाहा, (The Origin & Growth of Religion, by W. Schmidt)

इतके[१] जरूर होते की त्यांच्या शिकवणीची पद्धत आणि जीवनाचे नियम व कायदे थोडेसे भिन्न होते. ज्या तऱ्हेचे अज्ञान प्रत्येक जातीत पसरले होते, तेच दूर करण्यावर अधिक भर दिला गेला. ज्या प्रकारचे असत्य विचार प्रचलित होते त्यांच्यात सुधारणा घडवून आणण्यावरच अधिक भर दिला गेला. संस्कृती, सभ्यता, ज्ञान व बुद्धीच्या दृष्टीने सर्व जाती प्राथमिक अवस्थेतच होत्या म्हणून त्यांना सरळ व सोपी शिकवण व साधे धर्म-नियम व विधान दिले गेले. जसजशी प्रगती व उन्नती होत गेली तसतसे शिकवणीला व धर्म-विधानांनाही विकसित रूप दिले गेले. परंतु हा फरक केवळ बाह्यात्कारीच होता. सर्वांचा आत्मा एकच होता. श्रद्धेत 'तौहीद' (एकेश्वरत्व), व्यवहारात भलेपणा व सदाचार आणि आखिरत (पारलौकिक जीवन) च्या शिक्षा व मोबदल्यावर सर्वांची श्रद्धा व दृढ विश्वास होता.

पैगंबरांशी माणसांनी विचित्र असा दुर्व्यवहार केला. पहिल्यांदा त्यांचा छळ करण्यात आला, त्यांच्या आज्ञा पाळण्यास नकार देण्यात आला. काहींना स्वतःच्या मायभूमीतून हुसकून लावण्यात आले. काहींचा वध करण्यात आला. काहींना आयुष्यभर शिकवण व उपदेश करूनसुद्धा मोठ्या मुष्किलीने केवळ दहापाच अनुयायी प्राप्त होऊ शकले. परंतु अल्लाहचे हे निवडक दास त्यांचे कर्तव्य ठामपणे करीत राहिले. शेवटी त्यांच्या शिकवणुकीचा परिणाम घडला. मोठमोठ्या जाती-वंशाचे समूह त्यांचे अनुयायी बनले. त्यानंतर मार्गभ्रष्टतेने वेगळे रूप धारण केले. जगातून पैगंबरांचे प्रयाण होताच त्यांच्या अनुयायांनी त्यांना मिळालेल्या शिकवणुकीत हळूहळू बदल केला. त्यांच्यावर अवतरलेल्या ईशग्रंथात आपले विचार व मत मिसळले आणि उपासनांच्या निरनिराळ्या प्रकारांचा अंगीकार केला.

काहींनी तर खुद्द पैगंबरांचीच उपासना व आराधना सुरू केली. कोणी पैगंबराला अल्लाहचा अवतारच मानले (म्हणजे खुद्द ईश्वरच मानवी रूपात प्रकटला), कोणी पैगंबराला ईश्वराचा पुत्र मानले तर आणखी कोणी पैगंबराला ईशत्वात सहभागी मानले.

---

१) सर्वसाधारणपणे लोकांचा एक मोठा असा गैरसमज आहे की, इस्लामचा उदय पैगंबर मुहम्मद (स.) कडून झाला आहे. हा गैरसमज येथपर्यंत झालेला आहे की पैगंबर मुहम्मद (स.) यांना इस्लामचे संस्थापक मानण्यात येते. वास्तविकपणे ही एक अत्यंत मोठी चूक असून प्रत्येक अभ्यासकाच्या मनातून ती पूर्णपणे दूर केली गेली पाहिजे. प्रत्येक अभ्यासकाने ही गोष्ट चांगली समजून घेतली पाहिजे की अगदी आरंभापासून मानवजातीचा इस्लाम हाच एकमेव व खराखुरा धर्म आहे. पृथ्वीवर ज्या काळी व ज्या स्थळी अल्लाहकडून पैगंबर आले, त्या सर्वांनी याच एका धर्माची लोकांना शिकवण दिली.

अशा रितीने माणसांनी एक अद्भूत आत्मवंचनेचे कृत्य सुरू केले. ज्या व्यक्तींनी एकेश्वरत्वाची शिकवण दिली होती आणि मूर्तिपूजेचे खंडन केले होते, मनुष्याने त्यांच्याच मूर्ती बनवून त्यांचीच उपासना सुरू केली. या पैगंबरांनी जी काही आचारसंहिता व जे काही नियम आपल्या अनुयायांना दिले होते तेही तऱ्हेतऱ्हेने विकृत करण्यात आले. त्यामध्ये सर्व प्रकारच्या अज्ञानयुक्त व अडाणीपणाच्या रूढींचा समावेश करण्यात आला. मानवनिर्मित नियमांची त्यामध्ये सरमिसळ करण्यात आली, ती इतकी की काही शतके लोटल्यानंतर हे जाणून घेण्याचे कसलेही साधनच शिल्लक उरले नाही की पैगंबरांनी दिलेली खरी शिकवण व खरी आचारसंहिता कोणती आहे व नंतर लोकांनी त्यामध्ये कोणकोणत्या गोष्टींची मिसळ व भेसळ केली.(१)

खुद्द पैगंबरांची जीवनचरित्रेसुद्धा आख्यायिका व दंतकथामध्ये अशा रितीने मिश्रित झालेली आहेत की त्या बाबतीत कोणतीही गोष्ट विश्वासार्ह उरली नाही. तरीसुद्धा पैगंबरांनी केलेले प्रयत्न अगदीच व्यर्थ व वाया गेले नाहीत. मिसळ व भेसळ झाली असूनही काहीतरी मूळ सत्य अनेक धर्मांत अल्पशा प्रमाणात शिल्लक उरले आहे. अल्लाहची जाणीव व पारलौकिक जीवनाची जाणीव कोणत्या ना कोणत्या स्वरूपात सर्व धर्मांत आढळते. चांगुलपणा, सदाचार यांची काही तत्त्वे सर्व जगात मान्य केली गेली. सर्व जातीवंशाच्या पैगंबरांनी वेगवेगळ्या तऱ्हेने अनेक जातीवंशाला इतपत तयार करून सोडले की जगात अशा एका धर्माची शिकवण प्रसारित केली जावी की जो धर्म निस्संशयपणे व एकमुखाने सर्व मानवजातीचा धर्म असेल.

आम्ही वर म्हटल्याप्रमाणे आरंभी प्रत्येक जातीवंशात वेगवेगळे पैगंबर येत असत आणि त्यांची शिकवण त्यांच्या जातीवंशापर्यंतच मर्यादित असे. याचे कारण असे की त्याकाळी सर्वच जातीवंश एकमेकांपासून वेगळे होते. एकमेकांत मिसळत नसत. जणूकाय प्रत्येक जात व वंश आपल्या देशाच्या सीमेच्या अंतर्गत मर्यादित होती. अशा काळी कोणतीही सर्वसाधारण व एकत्रित शिक्षण, शिकवण यांचा सर्व जातीवंशात प्रसार करणे अत्यंत कठीण होते. शिवाय भिन्न भिन्न जातीवंशाची अवस्था एकमेकांपासून खूपच

---

१) येथे ही गोष्ट वाचकाच्या लक्षात आणून द्यावयास हवी की पैगंबरांच्या अनुयायांनी आपापल्या मूळ धर्माला (म्हणजे मूळ इस्लामला) विकृत रूपे देऊन टाकली आहेत, ती रूपे आज जगात विविध नावांनी आढळत आहेत. उदाहरणार्थ, आदरणीय इसा (अ.) यांनी ज्या धर्माची शिकवण दिली होती, तो तर इस्लामच होता, परंतु त्यांच्या पश्चात त्यांच्या अनुयायांनी खुद्द इसा (अ.) यांनाच ईश्वर बनून सोडले व त्यांनी दिलेल्या शिकवणीत, इतर अनेक गोष्टींची सरमिसळ करून असा एक धर्म शोधून काढला जो आज ख्रिश्चन धर्माच्या नावाने ओळखला जातो.

वेगळी होती. अज्ञानरूपी अंधकार चहूकडे मोठ्या प्रमाणात होता. अशा अज्ञानापोटी, श्रद्धा व आचार यात जी विकृती निर्माण झाली होती, ती प्रत्येक ठिकाणी वेगवेगळ्या रूपात आढळत असे. म्हणूनच अल्लाहच्या पैगंबरांनी प्रत्येक जातीवंशाला वेगळी शिकवण व उपदेश दिला. असत्य विचारांचे हळूहळू उच्चाटन करून सद्‌विचारांना प्रसारित केले आणि उच्चप्रतीच्या नियम व विधानाचे पालन करण्याची शिकवण दिली जाई. अशा तऱ्हेने या जातीवंशाला शिकवण देण्यात किती हजार वर्षे लोटली ते अल्लाहलाच ठाऊक. प्रगती करता करता अखेरीस ती वेळ आली जेव्हा मानवजात बाल्यावस्थेतून निघून तारुण्यावस्थेत पोहोचू लागली होती. व्यापार, कलाकौशल्य यांच्या प्रगतीबरोबरच जातीजातींत परस्पर संबंध निर्माण झाले. चीन व जपानपासून ते यूरोप व आफ्रिकेतील दूरवरच्या देशांमध्ये जलमार्गाने तसेच खुष्कीच्या मार्गाने दळणवळण सुरू झाले. बहुतेक जातीवंशांत लेखनकलेचा प्रसार व प्रचार सुरू झाला. विद्या व कला यांचा प्रसार झाला. विभिन्न जातीवंशांत ज्ञानाची देवाणघेवाण होऊ लागली. मोठमोठ्या राज्यांची स्थापना करून अनेक देशांना तसेच अनेक जातीवंशांना एकाच राजनैतिक व्यवस्थेमध्ये जोडून टाकले. अशा रितीने त्यापूर्वी मानवजातीत आढळून येणारा दुरावा व परकेपणा हळूहळू कमी होऊ लागला. त्यामुळे इस्लामची एक शिकवण व एक धर्मविधान संपूर्ण जगासाठी पाठविणे शक्य झाले. आजपासून अडीच हजार वर्षांपूर्वी मानवाची अवस्था इतकी प्रगत झाली होती की जणू तो स्वतःच एका सामान्य धर्माची मागणी करू लागला होता. बौद्धमत हा काही परिपूर्ण धर्म झालेला नव्हता व त्यात केवळ काही नैतिक नियमच होते. परंतु तो भारताबाहेर जपान व मंगोलियापर्यंत व दुसरीकडे अफगाणिस्थान व बुखारापर्यंत पसरला. त्याचे प्रचारक दूरदूरच्या देशांपर्यंत जाऊन पोचले. याच्या काही शतकांनंतरच ख्रिश्चन धर्माचा उदय झाला. आदरणीय इसा (त्यांच्यावर अल्लाहची कृपा असो) इस्लामचीच शिकवण घेऊन आले होते, परंतु त्यांच्या पश्चात ख्रिश्चन धर्माच्या नावाने एक अपूर्ण व दोषयुक्त धर्म रचण्यात आला. ख्रिश्चनांनी या धर्माचा प्रसार इराणपासून आफ्रिका व यूरोपमधील दूरदूरच्या देशांत केला. या घटना आम्हाला हे दर्शवितात की जग त्या काळी एक सामान्य मानवी धर्माची मागणी करीत होते. तसे करण्यात त्याची इतकी तयारी झाली होती की जेव्हा एक परिपूर्ण व सत्यधर्म त्याला मिळाला नाही तेव्हा त्याने अपक्व आणि अपूर्ण धर्माचाच मानवजातीत प्रसार करण्यास प्रारंभ केला.

# मुहम्मद (स.) यांचे पैगंबरत्व

हा तो काळ होता जेव्हा या जगातील समस्त मानवजातीकरिता एक पैगंबर अर्थात आदरणीय मुहम्मद (स.) यांना अरबस्थानातील भूमीवर जन्माला घालण्यात आले. त्यांना इस्लामची परिपूर्ण शिकवण व परिपूर्ण विधान देऊन त्याचा प्रसार सर्व जगभरात करण्याच्या सेवाकार्यासाठी त्यांची नियुक्ती करण्यात आली.

जगाच्या भूगोलाकडे पाहा, आपणास हे कळून चुकेल की साऱ्या जगाच्या पैगंबरत्वासाठी पृथ्वीवर अरब भूमीपेक्षा अधिक उपयुक्त स्थान दुसरे कोणतेही असू शकत नाही. हा देश आशिया व आफ्रिका खंडापासून अगदी मध्यवर्ती असून यूरोपही येथून नजीकच आहे. युरोपातील सुसंस्कृत जाती त्या वेळी विशेष करून यूरोपच्या दक्षिण भागात स्थायिक होत्या. अरबस्थानापासून त्या स्थानाचे अंतर अरबस्थान व भारत त्यांच्या दरम्यान असलेल्या अंतराइतकेच आहे.

त्या काळाचा इतिहास वाचा, तुम्हास हे कळून चुकेल की त्या काळी अरबवंशापेक्षा उचित दुसरा कोणताही वंश व जात पैगंबरत्वासाठी योग्य नव्हती. इतर मोठमोठे वंश आपले सामर्थ्य दाखवून क्षीण झाले होते. अरब वंश त्या वेळी ताज्या दमाचे होते. सामाजिक प्रगतीने इतर जातीवंशात वाईट सवयी जडल्या होत्या आणि अरब वंशात अशी कसलीही प्रगत सामाजिक व्यवस्था नव्हती ज्यामुळे तेथील लोक ऐषआरामात व विलासात मग्न होतील व हीन अभिरुचीचे बनतील. इसवी सन सहाव्या शतकातील अरब इतर प्रगत जातीवंशांना जडलेल्या अनिष्ट सवयीपासून मुक्त होते. ज्यांना दोषयुक्त सभ्यतेचे वारे लागले नाही अशा माणसांमध्ये आढळणारी मानवी गुणवैशिष्ट्ये त्यांच्यात उपलब्ध होती. ते शूर व निर्भय होते, दिलदार व औदार्यपूर्ण होते. वचनाचे पालन करणारे आणि स्वातंत्र्य व स्वतंत्र विचार प्रिय होते आणि कोणत्याही जातीवंशाचे ते गुलाम नव्हते. आपल्या अब्रूसाठी प्राणार्पण करणे त्यांना अगदी सोपे वाटत असे. त्यांची राहणी अत्यंत साधी होती. ऐषआराम व विलास याच्याशी ते अपरिचित होते. त्यांच्यात अनेक दोषही होते, यात काही संशय नाही, कारण अडीच हजार वर्षांपासून तेथे कोणत्याही पैगंबरांचे आगमन झाले नव्हते.[१] कोणी मार्गदर्शक झाला नव्हता जो त्यांचे चारित्र्य सुधारू शकेल व त्यांना सभ्यता शिकवील. शतकानुशतके वाळवंटात स्वतंत्र व निर्बंध

१) पैगंबर मुहम्मद (स.) यांच्यापूर्वी सुमारे अडीच हजार वर्षे अरबस्थानात आदरणीय इब्राहीम (अ.) व आदरणीय इस्माईल (अ.) हे दोन पैगंबर होऊन गेलेले आहेत व या मधल्या प्रदीर्घ कालावधीत एकही पैगंबर अरबस्थानात जन्मलेला नाही.

जीवन जगल्यामुळे त्यांच्यात घोर अज्ञान निर्माण झाले होते. आपल्या अज्ञानात ते इतके निर्ढावलेले होते की त्यांना माणसांत आणणे हे कोणाही सामान्य माणसाच्या आवाक्यातील काम नव्हते. परंतु त्याचबरोबरच त्यांच्यात ही पात्रता खचितच होती की जर एखाद्या महान व्यक्तीने त्यांच्यात सुधारणा घडवून आणली व त्याच्या शिकवणीच्या प्रभावाने ते एखाद्या उच्च ध्येयासाठी उभे ठाकले तर ते संपूर्ण जगावर प्रभावशाली व्हावेत. जगाच्या पाठीवर पैगंबराच्या शिकवणुकीचा प्रसार करण्यासाठी अशा तरुण व सामर्थ्यवान वंशाचीच गरज होती.

यानंतर तुम्ही अरबी भाषेकडे जरा दृष्टी टाका. ही भाषा जेव्हा वाचाल व तिच्यात असलेल्या साहित्याचा व ज्ञानाशयाचा जेव्हा अभ्यास कराल तेव्हा तुम्हास हे समजून येईल की उदात्त व उच्च विचार व्यक्त करण्यासाठी व ईशज्ञानासंबंधीच्या अत्यंत नाजूक व संवेदनशील सूक्ष्म गोष्टी व्यक्त करण्यासाठी व जनमाणसाच्या मनावर परिणामाचा ठसा उमटविण्यासाठी अरबी भाषेपेक्षा अधिक उचित व योग्य अशी दुसरी कोणतीही भाषा नाही. या भाषेत मोजक्या काही वाक्यांत मोठमोठ्या गहन विषयांचे विवरण होत असते. त्यातही परिणामकारक प्रभाव इतका असतो, की त्यातील विचार मनपटलावर कोरले जातात. त्यामध्ये अशी काही गोडी असते, की कानात नाद-माधुर्य घोळत असते. त्यातील काव्य असे असते की मनुष्य अगतिकपणे डोलू लागतो. कुरआनसारख्या ग्रंथासाठी अशीच भाषा आवश्यक होती.

तात्पर्य असे की अल्लाहचे महान चातुर्य या गोष्टीत ओतप्रोत भरलेले आढळते. सबंध विश्वाच्या पैगंबरासाठी (वैश्विक पैगंबरत्वासाठी) अल्लाहने अरब भूमीची निवड केली. जे उज्ज्वल व महान व्यक्तिमत्त्व या कार्यासाठी निवडले गेले होते ते किती अपूर्व व अद्वितीय होते ते आता आपण पाहू या.

# मुहम्मद (स.) यांच्या पैगंबरत्वाचे (नबुवत) प्रमाण

थोडावेळ आपले डोळे मिटून आपल्या कल्पनाशक्तीच्या भरारीने एक हजार चारशे वर्षापूर्वीचे जग कसे होते ते पाहू या. माणसामाणसांतील विचारांची देवाणघेवाण करण्याची साधने अल्पशी होती, देशादेशांमधील तसेच वंशावंशातील संपर्काची साधने मर्यादित होती, मनुष्याचे ज्ञान अल्प होते, त्यांचे विचार संकुचित होते आणि त्यांच्या वर भ्रम व रानटीपणाचा फार मोठा प्रभाव होता. अज्ञानरूपी घोर अंधकारात ज्ञान ज्योत धूसर झाली होती व तिचा प्रकाश त्या घनघोर काळोखाला अति प्रयासाने बाजूला सारीत पुढे जात होता. त्या काळी जगात तार नव्हती, टेलिफोन नव्हता, रेडिओ नव्हता, रेल्वे व विमाने नव्हती, मुद्रणालये, प्रकाशनगृहे नव्हती. शाळा व कॉलेज यांचे आधिक्य नव्हते. वर्तमानपत्रे प्रकाशित होत नव्हती, पुस्तकेही जास्त प्रमाणात लिहिली जात नव्हती. तसेच त्यांचे मोठ्या प्रमाणात प्रकाशनही होत नव्हते. त्या काळात विद्वान समजल्या गेलेल्या माणसांचे ज्ञानसुद्धा काही बाबतीत आधुनिक युगातील सामान्य माणसाच्या ज्ञानापेक्षा कमी होते. त्या काळातील समाजाच्या उच्चस्तरीय माणसांतही आजच्या मजूरवर्गातील माणसापेक्षा शिष्टता कमी होती. त्या काळचा उदारमतवादी माणूस आजच्या अनुदार व्यक्तीपेक्षासुद्धा अनुदार होता.

जे ज्ञान आज सर्वसामान्य आहे त्याकाळी वर्षानुवर्षे परिश्रम करून, संशोधन करून कष्टाने प्राप्त होत असे. आज माहितीचा स्फोट घरबसल्या क्षणार्धात उपलब्ध होतो ज्यास प्राप्त करण्यासाठी त्या काळी शेकडो, हजारो मैल प्रवास करावा लागत असे आणि त्यात आयुष्य खपविले जात असे. ज्यांना आज आपण अंधविश्वास म्हणतो ते त्या काळचे ‘सत्य’ होते. ज्यास आज असभ्य समजले जाते, ते त्या काळचे दैनंदिन कामे होती. ज्या पद्धतींचे मानवी मन आज तिरस्कार करते त्या पद्धती त्या काळी उच्च कोटीची नैतिकता समजली जात आणि कोणीही असा विचार त्या काळी करू शकत नव्हता की या पद्धतींविरुद्ध दुसरी पद्धत असू शकते. त्या काळी मनुष्य अति विलक्षण प्रिय होता. तो एखाद्या गोष्टीला तोपर्यंत सत्य, महान व पवित्र मान्य करीत नसे जोपर्यंत ती गोष्ट अप्राकृतिक, अलौकिक, अस्वाभाविक व असाधारण असत नाही. त्या काळी मनुष्य स्वत:ला इतके हीन समजून होता की एखाद्याची अल्लाहपर्यंत पोच असणे आणि अल्लाहपर्यंत पोच असलेली व्यक्ती मनुष्य असणे त्याच्या कल्पनेपलीकडे होते.

# अरब एक अंधकारमय भूभाग

अशा परिस्थितीत अरबस्थान देश जगात एकाकी पडला होता. त्याच्या सभोवताली इराण, रोम व इजिप्त हे देश होते. या देशात बऱ्याच विद्या व कलांची रेलचेल होती, परंतु त्यांच्या दरम्यान पसरलेल्या वाळवंटरूपी अथांग महासागरामुळे अरबस्थान या सर्वांहून तुटलेला व एकटा पडलेला होता. अरब व्यापारी उंटावर माल लादून महिनोनमहिने प्रवास करून त्या देशात व्यापारासाठी जात असत. परंतु हा संपर्क केवळ मालाच्या खरेदीविक्रीपर्यंतच सीमित होता. ज्ञान व सभ्यतेचा प्रकाश त्यांच्याबरोबर येत नसे. खुद्द अरबस्थान अप्रगत होता. त्यात शाळा नव्हत्या. लोकांत शिक्षणाची आवडही नव्हती. सबंध देशात बोटावर मोजण्याइतके लिहितावाचता येणारे लोक होते व त्यांनाही इतके लिहितावाचता येत नव्हते की त्या काळातील सर्व विद्या व कला त्यांना ज्ञात व्हाव्यात. त्यांच्याजवळ उच्चकोटीची एक भाषा होती, ज्यात उच्च विचार प्रकट करण्याची असाधारण शक्ती होती. अरबांत उत्तम साहित्य अभिरूची होती. परंतु अंधविश्वास, अज्ञानता, बर्बरता त्यांचा स्वभावगुण होता.

तेथे कसलेही पद्धतशीर शासन अस्तित्वात नव्हते. कसलाही कायदा अंमलात नव्हता. प्रत्येक अरब टोळी स्वत: सार्वभौम होती. अनिर्बंधपणे लूटमार होत असे. दररोज रक्तरंजित लढाया होत असत. मानवी प्राणास कसलेही मूल्य नव्हते व जो ज्यावर मात करी त्याचा वध करून त्याच्या संपत्तीवर कबजा करीत असे. सदाचार व शिष्टाचार याचे वारेसुद्धा त्यांना लागले नव्हते. मदिरापान, व्यभिचार व जुगार, हिंसा व रक्तपात या गोष्टी सर्रास होत्या. एकमेकांसमोर अगदी नि:संकोचपणे माणसे नग्न होत असत. स्त्रियांसुद्धा काबागृहात नग्न होऊनच प्रदक्षिणा घालीत असत. पवित्र व अपवित्र, शिष्ट व अशिष्ट, निषिद्ध व हलाल यामध्ये त्यांना फरक ठाऊक नव्हता. अरबांचे स्वातंत्र्य इतके अनिर्बंध झाले होते की कोणीही मनुष्य कसल्याही कायद्यांचे व नियमांचे पालन करण्यास तयार नव्हता. त्याचे जीवन अत्यंत मलीन होते. ते स्वत:च्या मुलींना स्वत:च्या हातांनी जिवंत गाडत असत केवळ यासाठी की त्यांचा कोणी जावई बनू नये. ते त्यांचे बाप मृत्यू पावल्यास सावत्र आईशी विवाह करत असत. त्यांना भोजन, वस्त्र व स्वच्छतेच्या साधारण नियमांचे ज्ञानसुद्धा नव्हते. मूर्तिपूजा, प्रेतपूजा, नक्षत्रपूजा, तात्पर्य एक ईश्वरपूजेऐवजी जगात ज्या पूजा होत होत्या, त्या सर्व त्यांच्यामध्ये प्रचलित होत्या. प्राचीन पैगंबर आणि त्यांच्या शिकवणींविषयी सत्यज्ञान त्यांच्याजवळ नव्हते. त्यांचा कोणता धर्म होता, हेसुद्धा त्यांना माहीत नव्हते. तसेच कोणत्याही शासकाचे आज्ञापालन करणे मनुष्य

मान्यही करीत नव्हता. यावर कळस हा होता की सर्व अरबवंश दगडाच्या मूर्तीची पूजा करीत असे. चालता चालता वाटेत एखादा गुळगुळीत दगड दृष्टीस पडला की लगेच त्याला पुढे मांडून त्याची पूजा केली जात असे. जी मस्तके कोणापुढेही नमत नसत ती दगडापुढे झुकू लागली होती. असे मानले जात असे की हे दगड त्यांच्या इच्छा-आकांक्षांची पूर्तता करतील.

## मानवता-उपकारकाचा जन्म

अशा देशात व अशा परिस्थितीत एक व्यक्ती जन्माला येते. लहानपणीच मातापित्यांचे तसेच आजोबांचे छत्र डोक्यावरून नाहीसे झालेल्या अशा विपन्नावस्थेत कसलेही सक्षम संस्कार प्राप्त होत नाहीत. बालपणात तो अरब गुरख्यांबरोबर शेळ्या राखतो. तारूण्यात व्यापारउदिमात व्यग्र होतो. त्याचे बसणे-उठणे व जनमाणसांत मिसळणे सर्व अशा अरब लोकांशीच असे ज्यांची अवस्था वरीलप्रमाणे होती. शिक्षणाचा मागमूसही नव्हता, किंबहुना अक्षरओळखही नव्हती. त्यास एखाद्या विद्वानाची संगतीसुद्धा प्राप्त झाली नाही कारण त्या काळी 'विद्वाना'चे अस्तित्व संपूर्ण अरबस्थानातच नव्हते. त्यास अरबच्या बाहेर जाण्याच्या संधी अवश्य मिळाल्या होत्या. या व्यापारी यात्रा केवळ सीरियापर्यंतच सीमित होत्या. हे मान्य जरी केले की त्या यात्रांदरम्यान त्यांना विद्या व सभ्यतेचे काही निरीक्षण करण्याच्या संधी प्राप्त झाल्या असतील आणि विद्वानांच्या भेटीगाठीसुद्धा झाल्या असतील, परंतु अशा वरवरच्या भेटीगाठींनी व निरीक्षणाने एखाद्याचे चारित्र्य निर्माण होणारच नाही. यापासून एका अरब खेडुताला जो निरक्षर होता, त्याला असे ज्ञान प्राप्त होणे अशक्य आहे ज्यामुळे एका देशाचाच नव्हे तर संपूर्ण जगाचा तसेच एका विशिष्ट काळासाठीच नव्हे तर सार्वकालिक नेता बनविले. धर्म, नैतिकता, सभ्यता व संस्कृती तसेच नागरिकतेचे सिद्धान्त व संकल्पना त्या काळी जगात कुठेच अस्तित्वात नव्हते. मानवी चारित्र्याचे आदर्श त्या काळी कुठेही सापडणे अशक्य होते आणि त्यांना प्राप्त करण्याचा कोणताच मार्ग उपलब्ध नव्हता. फक्त अरबस्थान नव्हे तर संपूर्ण जगाची ही स्थिती होती.

ही व्यक्ती ज्या लोकांमध्ये जन्मली, ज्यांच्यात बालपण घालवले, ज्यांच्यासोबत राहून तारूण्यावस्थेत आली आणि अशा लोकांमध्ये मिळून मिसळून व्यवहार करीत राहिली. परंतु तरीही त्याच्या सवयी, त्याचे आचारविचार, इतरांपेक्षा अगदी भिन्न आहेत.

तो कधीही खोटे बोलत नाही, कधीही अपशब्द उच्चारत नाही. त्याच्या वाणीत कठोरता नव्हती तर असा गोडवा होता की ज्यामुळे माणसे त्याच्यावर लुब्ध होत असत. तो कोणाकडूनही अनुचित मार्गाने एक पैसाही घेत नव्हता. त्याचा प्रामाणिकपणा इतका उच्च होता की सर्वजण आपली धनसंपत्ती व मौल्यवान वस्तू त्याच्यापाशी सुरक्षित राहावी म्हणून आणून ठेवीत असत. तो आपल्या प्राणाच्या मोलाने सर्वांच्या धनसंपत्तीचे व वस्तूंचे रक्षण करीत असे. सर्व अरबवंश त्याच्या प्रामाणिकपणावर संपूर्णपणे विश्वास बाळगत असे व त्याला 'अमीन' (प्रामाणिक) असे संबोधित असे. त्याचा लज्जाशीलपणा असा होता की बालपणातसुद्धा त्याला कोणीही विवस्त्र पाहिला नाही. त्याचा सभ्यपणा व शिष्टाचार असा होता की सर्व प्रकारच्या असभ्यता व अमंगलपणाच्या वातावरणात संगोपन होऊनही सर्व प्रकारच्या असभ्यतेचा व अमंगलपणाचा तो तिरस्कार करीत असे. त्याच्या प्रत्येक कृतीत स्वच्छता व पावित्र्य होते. त्याचे विचार इतके निर्मळ होते की स्वत:चा अरबवंश, रक्तपात व लूटमार करताना पाहून त्याचे अंत:करण कष्टी होत असे. तो युद्धप्रसंगी तडजोडीचे प्रयत्न करीत असे. त्याचे हृदय इतके मृदु असे, की सर्वांच्या दु:खात व कष्टात तो सहभागी होत असे. अनाथ मुलांना व विधवांना साहाय्य करी व भुकेलेल्यांना जेवू घालीत असे. वाटसरूंचा पाहुणचार व आदरातिथ्य करीत असे. त्याच्यापासून कोणालाही त्रास होत नाही व इतरांखातर तो स्वत: त्रास सहन करीत असे. त्याच्या बुद्धीचा रोख असा उचित होता की मूर्तिपूजकांमध्ये राहूनही तो मूर्तीचा तिरस्कार करीत असे. कोणत्याही निर्मित वस्तूपुढे तो नतमस्तक होत नसे. त्याच्या अंतरंगातून असा ध्वनी उमटत असे की पृथ्वीवर व आकाशाखाली जे काही दृष्टीस पडते त्यापैकी काहीही उपासनापात्र नाही. त्याचे मन स्वत:च अशी ग्वाही देत असे, की ईश्वर तर एकच असू शकतो व तो एकच आहे. या अडाणी लोकांमध्ये हे व्यक्तिमत्त्व इतके आगळेवेगळे दिसते की जणू दगडधोंड्यांच्या राशीत तळपणारा हिराच आहे अथवा घनदाट काळोखात तेवणारा एक दीप आहे.

# क्रांतीचा सूर्योदय

अशा प्रकारे उच्चदर्जाचे सोज्वळ व पवित्र जीवन सुमारे चाळीस वर्षे व्यतीत केल्यानंतर त्यांच्या जीवनात एका क्रांतीचा आरंभ होतो. ही व्यक्ती त्यांच्या सभोवताली पसरलेल्या अंधकाराला भयभीत होऊन ते अज्ञान, दुराचार, कुव्यवस्था, मूर्तिपूजा व अनेकेश्वरत्वरूपी चोहोकडून उसळणाऱ्या सागराच्या लाटांतून बाहेर पडण्याची शिकस्त करीत होती. तेथील कोणतीही वस्तू त्यांच्या प्रकृतीला अनुकूल नव्हती. सरतेशेवटी वस्तीपासून दूर अंतरावरील पर्वताच्या एका गुफेत जाऊन, एकांत व शांत वातावरणात कित्येक दिवस घालविले. उपवास करून त्या व्यक्तीने आत्म्याची, मनाची व बुद्धीची अधिक शुद्धी करून घेतली. ती विचारचिंतन करीत असे, चोहोकडे पसरलेला काळोख दूर करण्यासाठी प्रकाशाचा शोध घेत असे. ती व्यक्ती अशा एखाद्या दृष्टांतप्राप्तीसाठी अविरत प्रयत्नशील होती ज्यामुळे या विस्कटलेल्या व बिघाड निर्माण झालेल्या जगाची घडी पुन्हा नीट बसेल.

अशा अवस्थेत अकस्मात एक महान स्थित्यंतर घडून येते. जो प्रकाश तत्पूर्वी त्यांच्या हृदयात नव्हता तो एकाएकी येतो, त्यांच्यात अचानकपणे असे सामर्थ्य निर्माण होते जे तत्पूर्वी त्यानी कधीच अनुभवले नव्हते. ते गुफेतील एकांतातून बाहेर पडून आपल्या जातबांधवासमीप येतात. त्यांना असे सांगतात की ज्यांच्यासमोर तुम्ही नतमस्तक होता त्या सर्व मूर्ती तथ्यहीन वस्तू असल्याने त्यांचा त्याग करा. कोणताही माणूस, वृक्ष, पाषाण, आत्मा अथवा कोणतेही नक्षत्र यास पात्र नाही की तुम्ही त्यांच्यापुढे आपले मस्तक झुकवावे, त्यांचे दास्यत्व पत्करावे व त्यांची उपासना करावी आणि त्यांच्या आज्ञांचे पालन करावे. पृथ्वी, चंद्र, सूर्य, नक्षत्रे, भूमंडलावरील व आकाशाखालील एकूण एक सर्व वस्तू, एकाच अल्लाहने निर्माण केल्या आहेत, तोच तुमचा तसेच या सर्व वस्तूंचा निर्माणकर्ता आहे, तोच सर्वांचा पालक आहे व तोच मृत्यू व जीवनदाता आहे, इतर सर्वांचा त्याग करून त्याचेच दास्यत्व पत्करा, सर्वांचा त्याग करून त्याच्याच आज्ञांचे पालन करा व त्याच्यासमोरच आपले शीर झुकवा. तुम्ही करीत असलेली कुकर्मे-चोऱ्या, लूटमार, रक्तपात व हत्याकांड, अन्याय व अत्याचार, ही सर्व पापे असून ती सर्व कृत्ये सोडून द्या, अल्लाहला ती अप्रिय आहेत. खरे बोला, न्याय करा, कोणाचीही हत्या करू नका, कोणाचीही मालमत्ता बळकावू नका, देवाणघेवाण न्यायाने करा, तुम्ही सर्व माणसे आहात, सर्व माणसे समान आहेत, श्रेष्ठत्व व सभ्यपणा हा माणसाच्या वंशकुलावर किंवा

त्याच्या वर्णरूपावर व धनसंपत्तीवर आधारित नसून ते केवळ ईशोपासनेत, सदाचार व पावित्र्य यामध्ये सामावलेले आहे. जो मनुष्य अल्लाहचे भय बाळगतो तोच सदाचारी व निर्मळ असून तोच उच्चप्रतीचा मनुष्य आहे. जो कोणी असा नाही तो निरर्थक आहे, मृत्यूपश्चात तुम्हा सर्वांना अल्लाहसमोर हजर व्हायचे आहे, तुमच्यापैकी प्रत्येकजन अल्लाहपुढे आपल्या कर्मासाठी उत्तरदायी आहे, तो सर्वकाही पाहणारा व जाणणारा आहे, तुम्ही काहीही त्याच्यापासून लपवू शकत नाही. तुमच्या जीवनाचे कर्मपत्र जसे की तसे त्याच्यासमोर हजर होणार आहे आणि त्या कर्मपत्रानुसार अल्लाह तुमच्या परिणामाचा फैसला करील.

त्या खऱ्याखुऱ्या न्यायदात्यापुढे कसलीही शिफारस उपयोगी पडणार नाही की कसलीही लाच-लुचपत उपयुक्त ठरणार नाही, कोणाच्या वंशकुळाचीही चौकशी होणार नाही. तेथे केवळ ईमान व सत्कृत्याची चौकशी होईल. ज्याच्याकडे ही सामग्री असेल तो 'जन्नत' (स्वर्ग) मध्ये दाखल होईल व ज्याच्याकडे यांपैकी काहीही नसेल असा करंटा मनुष्य नरकात झोकून दिला जाईल. हा तो संदेश होता ज्याला घेऊन ती व्यक्ती गुहेबाहेर आली.

अडाणी व ज्ञानहीन वंशाच्या लोकांनी त्या भल्या माणसाला म्हणजेच पैगंबर मुहम्मद (स.) यांना केवळ एवढ्याच अपराधाखातर त्रास द्यायला आरंभ केला की ते पूर्वापार व वंशपरंपरेने होत आलेल्या गोष्टींना नावे ठेवत होते. पूर्वजांच्या रूढी व प्रथांविरुद्ध शिकवण देत होते. याच एका कृत्याखातर लोकांनी त्यांना शिव्याशाप व अपशब्द दिले, धोंडे मारले. त्यांना जगणे मुष्किल करून सोडले, त्यांना ठार मारण्याचे कट रचले गेले. हे सर्व चार-दोन दिवसांपुरतेच होते असे नाही तर तब्बल तेरा वर्षांच्या कालावधीमध्ये त्यांच्यावर अनन्वित जुलूम व अत्याचार केले गेले. शेवटी त्यांना आपल्या जन्मभूमीचा त्याग करण्यास विवश केले गेले. मायभूमीतून बाहेर काढूनही ते स्वस्थ्य बसले नाहीत तर जेथे त्यांनी आश्रय घेतला होता तेथेही कित्येक वर्षे त्यांना छळत राहिले.

# हा सर्व छळ का?

हा सर्व छळ त्या सन्मार्गी माणसाने म्हणजेच पैगंबर मुहम्मद (स.) यांनी कशासाठी सहन केला? केवळ एवढ्यासाठी की ते आपल्या समाजाच्या लोकांना सरळमार्ग दाखवू इच्छित होते. त्यांच्या समाजाचे लोक त्यांना सार्वभौमत्व देऊन बादशहा मानण्यास तयार होते. त्यांच्यापुढे धनराशी ओतण्यास तयार होते, परंतु त्यासाठी एकच अट होती की, लोकांना देत असलेली शिकवण त्यांनी सोडून द्यावी. परंतु त्यांनी या सर्व आमिषांना लाथाडून आपल्या कर्तव्यात अढळ राहिले.

एखादा मनुष्य स्वहितासाठी त्रास व हालअपेष्टा सोसण्याऐवजी केवळ इतरांच्या कल्याणासाठी, परहितासाठी त्या आनंदाने सहन करतो यापेक्षा अधिक सन्मती व सत्यप्रियता याची तुम्ही कल्पना करू शकाल काय? ज्यांच्या भल्यासाठी व कल्याणासाठी पैगंबर झटले, तेच लोक त्यांना दगड मारतात व ते त्यांच्या कल्याणासाठी अल्लाहची करूणा भाकतात. त्यांच्या सदाचरणावर माणसेच काय परंतु 'फरिश्ते' (ईशदूतही) स्वत:ला ओवाळून टाकतात.

पाहा, एखादा खोटारडा मनुष्य कसल्यातरी मूल्यहीन गोष्टींमागे लागून अशा प्रकारची दु:खे व हाल सहन करू शकतो काय? एखादा थातूरमातूर मनुष्य निव्वळ अटकळ व अनुमान यांच्या आधारावर, एखादे विधान करून त्यावर इतका दृढपणाने व ठामपणाने टिकून राहू शकतो काय? त्याच्यावर संकटाचे डोंगर जरी कोसळले, धरणी जरी अपुरी भासू लागली, संपूर्ण देश त्याच्याविरुद्ध उभा राहिला, मोठमोठी सैन्ये त्यावर चालून आली तरी तो आपल्या भूमिकेपासून तिळभरसुद्धा हटण्यास तयार होत नाही. असे संभवनीय आहे काय? इतका भक्कमपणा व निश्चयशक्ती याच गोष्टीचा पुरावा आहे की आपल्या सत्यतेवर त्यांचा (पैगंबर मुहम्मद (स.) यांचा) पुरेपूर विश्वास होता. जर त्याबद्दल तिळमात्रही त्यांच्या मनात शंका असती तर अखंड तेवीस वर्षाच्या कालावधीमध्ये अनेक संकटांच्या व कष्टांच्या झंझावाताशी व वादळाशी झुंझताना ते भक्कमपणे टिकू शकले नसते. त्या व्यक्तीमध्ये झालेल्या क्रांतीची ही तर एक बाजू होती. तिची दुसरी बाजू याहीपेक्षा अधिक विस्मयजनक आहे.

# चाळीस वर्षांनंतर हे परिवर्तन का?

वयाच्या चाळीस वर्षांपर्यंत ते (पैगंबर मुहम्मद (स.)) एक सर्वसाधारण अरब होते. त्या काळात या व्यक्तीला जगाने आश्चर्यकारक भाषणकर्ता म्हणून पाहिले नाही. कोणीही त्यांना ज्ञानी, बुद्धिमत्तापूर्ण व तत्त्वदर्शितेच्या गोष्टी करताना ऐकले नव्हते. अध्यात्म, राजनीती, नैतिकता, अर्थकारण, समाजकारण व कायदेकानूविषयी बोलताना त्यांना कोणीही ऐकले नव्हते. अल्लाह, देवदूत (फरिश्ते) ईशग्रंथ, प्राचीन जाती व पैगंबर, पारलौकिक जीवन, जन्नत व जहन्नमविषयी एक शब्दसुद्धा उच्चारताना ऐकले नव्हते.

उत्तम चरित्र, पवित्र आचरण व सदाचार त्यांना अवश्य प्राप्त होता, परंतु वयाच्या चाळीस वर्षांपर्यंत त्या व्यक्तीमध्ये असाधारण असे काहीही नव्हते, ज्यामुळे लोकांना वाटावे की पुढे ते एक असामान्य व्यक्ती बनणार आहेत. वयाच्या चाळीस वर्षांपर्यंत लोक त्यांना एक मौनप्रिय, शांतिप्रिय व अति सज्जन व्यक्तीच्या रूपाने ओळखत होते. परंतु चाळीस वर्षानंतर जेव्हा ते गुफेतून एक नवीन संदेश प्राप्त करून बाहेर पडले तेव्हा त्यांचा कायापालट झाला होता.

आता ते एक आश्चर्यकारक वाणी ऐकवित होते, जी ऐकून संपूर्ण अरब देश आश्चर्यचकित झाला. त्या वाणीच्या प्रभाव इतका होता की त्यांचे कट्टर शत्रूसुद्धा त्या वाणीला ऐकण्यास भीत होते कारण ती वाणी एखाद्यावेळेस मनात घर करून बसू नये. वाणीची उत्तमता, समरसता व वर्णनशैली अशा प्रकारे प्रभावशाली व शक्तिशाली असल्याने संपूर्ण अरब देशाला ज्यात मोठमोठे कवि, वाक्‌पटू होते, त्या सर्वांना त्या वाणीने आव्हान दिले. सर्वांनी मिळून एक सूरह यासारखा रचून दाखवावा, परंतु कोणीही अशा प्रकारचे धाडस केले नाही. ही एक अनुपम अशी वाणी अरब लोकांनी कधीही ऐकली नव्हती.

# व्यापक संदेश

आता ते अचानक अपूर्व तत्त्वदर्शी, नैतिकता, सभ्यता व संस्कृतीचा एक अद्वितीय सुधारक, एक आश्चर्यजनक राजनीतिज्ञ, एक महान कायदेतज्ज्ञ, एक उच्चश्रेणी न्यायाधीश तसेच एक अद्वितीय सेनापती बनून जगासमोर प्रकटले. त्या अशिक्षित, मरुस्थलवासी व्यक्तीने तत्त्वदर्शिता व बुद्धिमत्तेविषयी असे सांगण्यास प्रारंभ केले की तत्पूर्वी कोणीही सांगितले नव्हते आणि तद्नंतर कोणी सांगितले नाहीत. त्या निरक्षर व्यक्तीने अध्यात्म व अलौकिकतेच्या महान प्रसंगावर निश्चयात्मक भाषण देणे सुरू केले. जनसमूहाच्या इतिहासापासून ते देशाच्या उन्नती व अवनतीच्या मूळ सिद्धान्तांवर व्याख्यान देऊ लागले. प्राचीन सुधारकांच्या कार्याचे समालोचन करून जगातील धर्मातील सत्य व असत्य तत्त्वांवर स्वत:चे विचार प्रकट करू लागले. तसेच विभिन्न जनसमूहांच्या परस्परातील भेदनीतीवर निर्णय देऊ लागले. ते नैतिकता व सभ्यतेची शिकवण देऊ लागले.

ते सामाजिक, आर्थिक तसेच आंतरराष्ट्रीय संबंधांविषयीचे नियम व कायदे बनवू लागले आणि अशी कायदेप्रणाली निर्माण केली की मोठमोठे विद्वान व बुद्धिवंत विचारचिंतन करून व जीवनभराचे अनुभवांती त्यात अंतर्भूत असणाऱ्या बुद्धीविवेकाचा उलगडा त्यांना होतो. जगाच्या अनुभवात जसजशी वृद्धी होत आहे, तसतशी त्या नियमात सामावलेले विवेक अधिकाधिक दृगोच्चर होत असतात.

हे मौनधारी शांतिप्रिय ज्यांनी जीवनात कधी तलवारबाजी केली नाही, कधीही सैनिक प्रशिक्षण घेतले नव्हते, ते जीवनात एकदाच दर्शक म्हणून लढाईत सामील झाले होते, पाहता पाहता ते एक धीरोदात्त वीर योद्धा बनले. असे महान सेनापती बनले ज्याने नऊ वर्षात संपूर्ण अरब देशावर विजय प्राप्त केला. ते असे अद्भूत सैनिक सेनापती बनले की त्यांनी निर्माण केलेल्या सैनिकप्रबंध व युद्धनीतीच्या प्रभावाखाली सामुग्रीविहीन अरबांनी अल्पावधित तत्कालिन जगातील महान शक्ती रोम व ईराण यांना परास्त केले.

ही एकान्तप्रिय व शांतिप्रिय व्यक्ती ज्यांनी चाळीस वर्षांपर्यंत राजनैतिक रूचिचा गंधसुद्धा अनुभवला नव्हता, ते अचानक महान समाजसुधारक आणि महान नीतीज्ञ बनून प्रकट झाले आणि तेवीस वर्षांच्या अल्पावधित बारा लाख चौ.कि.मी. क्षेत्रफळाच्या वाळवंटी प्रदेशातील असंघटित, भांडखोर, अज्ञानी, उदंड, असभ्य टोळ्यांना रेल, रेडिओ व प्रेसच्या साहय्यतेविना एक धर्म, एक सभ्यता, एक विधान व एक शासनप्रणालीच्या अधीन बनविले. त्यांनी लोकांच्या भावना व स्वभाव बदलून टाकले,

त्यांचे आचरण बदलून टाकले. त्यांच्या अशिष्टतेला उच्चश्रेणीच्या शिष्टाचारात परिवर्तित केले. त्यांच्या बर्बरतेला उत्तम नागरिकतेत, त्यांच्या कुचरित्र व अनैतिकतेला सुचरित्र, ईशभक्ती, संयम व श्रेष्टनैतिकतेत आणि त्यांच्या उदंडतेला व निरंकुशतेला अत्यंत नियमबद्धतेत आणि आज्ञापालनात परिवर्तीत केले. त्या वांझोट्या लोकसमूहात शतकानुशतके कोणी सत्चरित्र माणसाने जन्म घेतला नव्हता, त्यांनी त्या लोकसमूहास असे सत्पुरुषोत्पादक बनविले ज्यात हजारो महान मानव जन्माला आले आणि ज्यांनी जगाला धर्म, नैतिकता व सभ्यतेचे धडे शिकविण्यासाठी जगातील कानाकोपऱ्यात संचार केला.

हे कार्य त्यांनी अत्याचार, धोकाधडी, बळपूर्वक व छळकपटाने केले नाही तर मनमोहक स्वभाव, आत्म्यांवर राज्य करणारी सज्जनता आणि मस्तिष्कावर अधिकार गाजविणाऱ्या शिकवणीद्वारा केले. त्यांनी स्वत:च्या स्वभावाने त्यांच्या शत्रूंना मित्र बनविले, दया व अनुकंपेने मने मऊ बनविली. न्याय व न्यायनिष्ठ शासन केले. सत्यतेपासून तसूभरसुद्धा दूर गेले नाही. युद्धासमयीसुद्धा कुणाशीही विश्वासघात केला नाही, की प्रतिज्ञाभंग केला नाही. कट्टर शत्रूंशीसुद्धा त्यांनी कधीही अत्याचारपूर्ण व्यवहार केला नाही. जे त्यांच्या रक्ताचे तहानलेले होते, त्याच शत्रुंनी त्यांच्यावर दगडमार केली, देशत्याग करण्यास विवश केले. पूर्ण अरब देशाला त्यांच्याविरुद्ध उभे केले आणि शत्रुत्वात आंधळे बनून त्यांच्या चुलत्याचे काळीज काढून चावले होते. अशा शत्रुंना विजयप्राप्ती झाल्यानंतर त्यांनी क्षमादान केले. त्यांनी कधीही स्वत:साठी दुसऱ्याशी बदला घेतला नाही.

याशिवाय त्यांच्या आत्मसंयमी व निस्वार्थीपणाचा कळस तेव्हा झाला जेव्हा ते अरब देशाचे शासक बनले. त्या वेळी ते तसेच फकीर बनून राहिले जसे पूर्वी होते. झोपडीत राहत, चटईवर झोपत, जाडेभरडे कपडे परिधान करीत आणि गरिबांप्रमाणे जेवण घेत असत. कधीकधी उपाशी झोपत आणि गरिबांची सतत सेवा करीत असे. ते रात्र अल्लाहच्या उपासनेत घालवित, मजुराप्रमाणे काम करीत असत. शेवटपर्यंत त्यांच्यात राजकीय दंभ व श्रीमंतीचा रूबाब व अहंकार निर्माण झाला नाही. ते सर्वसामान्यप्रमाणे लोकांना भेटत व त्यांच्यात मिसळत असत, त्यांच्या सुखदु:खात सामील होत असत. लोकांसमवेत बैठकीत बसण्याची ढब अशी होती की जर कोणी तिऱ्हाईत मनुष्य तिथे आला तर अरब जातीचा नायक व देशाचा शासक नेमका कोणता हे ओळखणे त्याला कठीण जात असे. इतके महान व्यक्तिमत्त्व असूनही एखाद्या क्षुल्लक

माणसाशीसुद्धा अगदी बरोबरीचा व्यवहार करीत असे. जीवनभर खडतर परिश्रम व प्रयत्नांची पराकाष्ठा करण्यात कसलीही कुचराई ती व्यक्ती करीत नाही. इतके करूनही स्वत:साठी काही शिल्लक ठेवीत नाही. आपली सर्व मालमत्ता समाजाला दान करतात. अनुयायींवर स्वत:च्या संततीचे कसलेही हक्क ठेवले नाहीत. स्वत:च्या संततीला जकात स्वीकारण्याच्या हक्कापासून केवळ यासाठीच वंचित ठेवले, की न जाणो भविष्यात जकातची सर्व रक्कम त्यांच्या संततीलाच दिली जाऊ लागेल.

## मानवतेवर व्यापक प्रभाव

अशा या महान व्यक्तीने घडविलेले चमत्कार अद्याप संपलेले नाहीत. त्यांच्या महानतेचा नीटपणे अंदाज येण्यासाठी संपूर्ण जगाच्या इतिहासावर एक नजर टाकू या. तुम्हाला असे दिसून येईल की चौदाशे वर्षापूर्वीच्या काळोखमय युगात अरबस्थानातील रूक्ष वाळवंटी प्रदेशात जन्मलेले ते निरक्षर वाळवंटनिवासी; वास्तविकपणे नवयुगप्रवर्तक व संपूर्ण जगाचेच नेते आहेत. त्यांचे नेतृत्व त्यांना नेता मानणाऱ्यांपुरतेच मर्यादित नसून न मानणाऱ्यांनाही ते लागू आहे. ज्यांना हे ज्ञान नाही, की ज्यांच्याविरुद्ध ते बोलतात, त्यांचे मार्गदर्शन कशा प्रकारे त्यांच्या विचारसरणीत व भावना विश्वात आणि त्यांच्या जीवन सिद्धान्तात, आचारसंहितेत आणि त्यांच्या आधुनिक युगाच्या आत्म्यामध्ये विलीन झालेले आहेत.

याच व्यक्तीने जगातील संकल्पना, धारणा व विचार प्रवाहाला भ्रम, अंधविश्वास, विलक्षणप्रियता व वैराग्यापासून मुक्ती देऊन बुद्धिवाद, यथार्थप्रियता व पवित्र भौतिक जीवनाकडे वळविले आहे. डोळ्यांनी दिसणाऱ्या चमत्कारांची मागणी करणाऱ्या या जगाला त्यांनीच बौद्धिक चमत्कारास समजणे व त्यास सत्याची कसोटी मान्य करण्याची अभिरूची निर्माण केली. त्यांनीच अनैसर्गिक गोष्टीत ईश्वराच्या ईशत्वाची चिन्हे शोधणाऱ्यांचे डोळे उघडले आणि त्यांना निसर्गात ईशचिन्ह (Natural Phenomena) पाहण्यास शिकविले. अनुमान व कल्पनाविलासी वृत्तीला त्यागून बुद्धी, विचार, निरीक्षण व संशोधनाचा मार्ग दाखविला. त्यांनीच बुद्धी, अनुभव व अंतर्ज्ञानाच्या विशिष्ट सीमा मनुष्याला दाखवून दिल्या. भौतिकवाद व अध्यात्मवादामध्ये ताळमेळ बसविला आणि ज्ञान व कर्माशी धर्माचा संबंध स्थापित केला. धर्मशक्तीपासून जगात 'सायंटिफिक स्पीरिट' आणि 'सायंटिफिक स्पीरिट'पासून शुध्द धर्मवाद निर्माण केला. त्यांनीच अनेकेश्वरत्व

(शिर्क) व मूर्तीपूजेचा पाया उखडून टाकला आणि ज्ञानशक्तीने एकेश्वरत्वाचा (तौहीद) विश्वास असा मजबूतपणे स्थापित केला, ज्यामुळे अनेकेश्वरवादी (मुशरिक) व मूर्तीपूजकांचा धर्मसुद्धा एकेश्वरत्वाचा रंग ग्रहण करण्यास विवश बनला. त्यांनीच नैतिकता व आध्यात्मिकतेच्या मौलिक धारणा बदलून टाकल्या. जे लोक वैराग्य (संन्यास) व इच्छादमन कार्यास विशुद्ध नैतिकता समजून होते; ज्यांच्या दृष्टिकोनातून मन व शरीराचा हक्क देण्यात व सांसारिक जीवनात भाग घेतल्याने आध्यात्मिक उन्नती तसेच मुक्ती प्राप्त होणे अशक्यप्राय आहे; अशांना त्यांनीच नागरिकता, समाज व भौतिकतेच्या-मध्ये नैतिकतेची श्रेष्ठता, आध्यात्मिक विकास, मुक्ती प्राप्तीचा मार्ग दाखविला. मग तेच आहेत ज्यांनी मनुष्याला त्याच्या वास्तविक मूल्याचे ज्ञान करून दिले. जे लोक भगवान, अवतार व ईश्वर पुत्राशिवाय कोणालाही मार्गदर्शक आणि नेता मान्य करण्यास तयार नव्हते, त्या लोकांना त्यांनीच दाखवून दिले की मनुष्य आणि तुमच्याचसारखा मनुष्य स्वर्ग राज्याचा प्रतिनिधी आणि अल्लाहचा प्रतिनिधी (खलीफा) होऊ शकतो. जे लोक प्रत्येक सामर्थ्यवानास ईश्वर बनवून टाकीत होते, त्या लोकांना त्यांनीच समजाविले की मनुष्य हा मनुष्यच आहे, इतर काहीही नाही. कोणीच पवित्र शासक व पालक बनून जन्माला आला नाही आणि कुणीही अपवित्रता, पराधीनता व दासतेने जन्मतःच डागाळलेला नाही. या शिकवणीमुळे जगात मानवी एकता, समानता, स्वाधिनता तसेच जनतंत्राच्या विचारप्रणालीचा मार्ग प्रशस्त झाला.

कल्पनाविश्वातून बाहेर पडून तुम्हाला या निरक्षर व्यक्तीच्या नेतृत्वाची व्यावहारिक फलनिष्पत्ती जगाच्या जीवनव्यवहारात, विधी-नियमांत अतिप्रमाणात दिसून येते. नैतिकता, सभ्यता, शिष्टाचार, स्वच्छता, पावित्र्याचे अनेक असे नियम आहेत जे त्यांच्या शिकवणीत उगम पावून जगभर फैलावले आहेत. सामाजिक नियम जे त्यांनी बनविले, त्यांचा लाभ जगाने पुरेपूर घेतला आहे आणि आजसुद्धा घेत आहे. अर्थनीतीविषयीच्या ज्या सिद्धान्ताची शिकवण त्यांनी दिली, त्यापासून जगात अनेक आंदोलनांनी जन्म घेतला आणि आजसुद्धा होत आहेत. शासनाविषयी ज्या पद्धतींचा त्यांनी स्वीकार केला त्यापासून जगात राजकीय दृष्टिकोनात क्रांती घडून आली आणि होत आहे. न्याय-विधीचे जे सिद्धान्त त्यांनी बनविले होते, त्याद्वारा जगातील न्याय-विधी क्षेत्र अतिप्रभावित झाले आहे. युद्ध, करार व आंतरराष्ट्रीय संबंधाविषयीची सभ्यता ज्या व्यक्तीने व्यवहारात जगात स्थापित केली, ते तर अरबचे एक निरक्षर व्यक्ती आहेत. जगाला पूर्वी हे तर माहीतच

नव्हते की युद्धाची एक सभ्यता असते आणि देशादेशांमध्ये मानवी आधारावर (Common Humanity) संबंध दृढ होणे शक्य आहे.

मानवी इतिहासाच्या पार्श्वभूमीत या आश्चर्यकारक व्यक्तीचे उच्च व महान व्यक्तिमत्त्व उच्चतर दिसून येते की सुरवातीपासून आजपर्यंत जितके महान नेते होऊन गेलेत, त्या सर्वांचे व्यक्तिमत्त्व या व्यक्तित्वासमोर खुजे पडते. जगातील कोणताच नेता असा नाही ज्याच्या पूर्णत्वाचा प्रकाश मानवी जीवनाच्या सर्वांगावर पडलेला आहे. कोणी धारणा व सिद्धान्ताविषयीचा सम्राट आहे तर त्याला व्यावहारिक सामर्थ्य प्राप्त नाही. कोणी कर्मांचा पुतळा आहे, मात्र विचारसरणीत तो कोरा आहे. कोणाचे चमत्कार राजनीतीपर्यंत मर्यादित आहेत तर कोणी फक्त सामरिक प्रतीक आहे. एखाद्याची नजर सामाजिक जीवनाच्या एका क्षेत्रावर प्रभाव ठेवून असते तर दुसरी क्षेत्रे मात्र दुर्लक्षित असतात. कोणी नैतिकता व आध्यात्मिकतेलाच घेऊन बसले आणि राजनैतिक व आर्थिक क्षेत्राला विसरून बसले. कोणी याउलट राजनैतिक आर्थिक विषयाला घेतले आणि आध्यात्मिक व नैतिक क्षेत्राची उपेक्षा केली. सारांश, इतिहासात प्रत्येक ठिकाणी अपूर्ण हिरो (नेता) दिसून येतो, परंतु मानवी इतिहासात हे एकमेव व्यक्तिमत्त्व असे आहे जे सर्वगुणसंपन्न आहे. ते स्वत: एक तत्त्वज्ञानी आहेत आणि स्वत:च्या तत्त्वज्ञानाला व्यावहारिक जीवनात प्रत्यक्षात आणणारेसुद्धा आहेत. ते सेनानायक, राजनीतिज्ञ, कायदे बनविणारा, नैतिकतेची शिकवण देणारा आणि धार्मिक व आध्यात्मिक नेतासुद्धा आहेत. त्यांची दृष्टी मानवी जीवनाच्या सर्वांगावर पडते आणि सूक्ष्म गोष्टीपर्यंत जाते. खाण्यापिण्याचे नियम आणि शारीरिक स्वच्छेतेपासून ते आंतरराष्ट्रीय विषयापर्यंत त्यांचे आदेश लागू होतात. ते स्थायी सभ्यतेचे निर्माते आहेत आणि जीवनाच्या सर्व क्षेत्रांमध्ये असे वास्तविक संतुलन निर्माण करतात ज्यामुळे कुठेच अधिकता, अपूर्णता, न्युनता दिसून येत नाही. जगात कोणी दुसरा मनुष्य अशा व्यापक गुणवैशिष्ट्यांचा तुमच्या नजरेत आहे काय?

# एक सर्वश्रेष्ठ क्रांतिकारी

मानवी इतिहासातील प्रत्येक महान व्यक्तिमत्त्व हे तात्कालीन सामाजिक वातावरणाने व परिस्थितीने प्रभावित झालेले असतात. परंतु या व्यक्तीची शान काही औरच आहे. त्याना घडविण्यात तात्कालीन परिस्थितीचा काहीच वाटा नाही. कोणत्याही ऐतिहासिक पुराव्याने हे सिद्ध होऊ शकत नाही की अरबाची तात्कालीन स्थिती त्या वेळी ऐतिहासिक रूपात अशा व्यक्तीच्या जन्माची मागणी करीत होती. ओढून ताणून तुम्ही असे म्हणू शकता की ऐतिहासिक कारण अशा नेत्याची मागणी करीत होते ज्याद्वारा तात्कालीन अव्यवस्था व भिन्नता नष्ट करून एक राष्ट्र बनवून इतर देशांना पराजित करून अरबांना समृद्ध करील. असा राष्ट्रवादी अरबी वैशिष्ट्याने परिपूर्ण नेता अन्याय, निर्दयता, रक्तपात, धोकाधडी करून अरब देशाला संपन्न करून साम्राज्याची निर्मिती करील आणि उत्तराधिकाऱ्यांसाठी हा वारसा सोडून जाईल. याशिवाय त्याकाळची अरबी इतिहासाची दुसरी मागणी तुम्ही सिद्ध करू शकत नाही. हेगेल (Hegel) व मार्क्स (Marx) यांच्या इतिहासाच्या भौतिक व्याख्येनुसार तिथे एक राष्ट्र आणि एक साम्राज्य बनविणारा निर्माण होणे काळाची गरज होती. परंतु हेगेल व मार्क्सचे तत्त्वज्ञान या घटनेची व्याख्या करूच शकत नाही की त्या वेळी त्या स्थितीत एक असा मनुष्य जन्माला आला जो उत्तम नैतिक शिकवण देणारा, मानवतेला सावरणारा, आत्म्यांना शुद्ध करून त्यांना विकसित करणारा आणि अज्ञानाच्या अंधविश्वासांना व पक्षपातीपणाला नष्ट करणारा होता. अशा महात्म्याची दृष्टी जातीपाती, वंश, देशाच्या सीमा तोडून संपूर्ण मानवतेवर फैलावली, ज्याने आपल्या समाजासाठीच फक्त नव्हे तर मानवतेसाठी एक नैतिक, आध्यात्मिक, सांस्कृतिक व राजनैतिक व्यवस्थेचा पाया घातला. ज्याने आर्थिक व्यवहार, लोक प्रशासन,राजकीय व आंतरराष्ट्रीय संबंधांना कल्पनाविश्वात नव्हे तर प्रत्यक्षात नैतिक आधारावर स्थापित करून दाखविले आणि आध्यात्मिकता व नैतिकतेचा संतुलित समावेश केला जे आजसुद्धा ज्ञान, तत्त्वज्ञान व बुद्धीची तशीच मुख्य कृती आहे जशी त्या वेळी होती. काय अशा व्यक्तीला अरब अज्ञानाच्या वातावरणाची उपज म्हणू शकाल?

असेच फक्त नाही की ही व्यक्ती तात्कालीन परिस्थितीची निर्मिती नाही तर जेव्हा आम्ही त्यांच्या किर्तीवर विचार करतो तर माहीत होते की काळ व स्थानाच्या बंधनांनी मुक्त आहे. त्यांची नजर स्थान व काळाच्या बंधनांना तोडत हजारो वर्षांच्या पडद्यांना चिरून पुढे जाते. ते मनुष्याला प्रत्येक युगात व वातावरणात पाहतात आणि मनुष्याच्या

जीवनासाठी असे नैतिक व व्यावहारिक मार्गदर्शन करतात जे प्रत्येक स्थितीत योग्य ठरते. ते त्या विभुतिंपैकी नाही ज्यांना इतिहासाने गतकालीन करून ठेवले आहे. ते त्यांच्या काळातील एक चांगले नेता होते असेच आपण इतरांसाठी म्हणू शकतो. परंतु हा विश्वनेता असा आहे जो संपूर्ण मानवतेचा मार्गदर्शक आहे, जो काळाबरोबर प्रगती करत जातो आणि प्रत्येक युगात आधुनिक सिद्ध होतो जसा मागील युगात होता.

लोक ज्यांना उदारतेने 'इतिहास घडविणारे' अशी पदवी देतात ते खरे तर इतिहासाने घडविलेले असतात. खरे तर इतिहास घडविणारे संपूर्ण मानवी इतिहासात हेच एकमेव व्यक्तित्व आहे. या जगातील जेवढ्या नेत्यांनी इतिहासात क्रांती घडविली, त्यांच्या वृत्तांतावर विवेचनात्मक दृष्टी टाकल्यास कळून येते की पूर्वीपासून तिथे क्रांतीची कारणे उत्पन्न होत होती आणि ती कारणे स्वत: त्या क्रांतीची दिशा व मार्ग निश्चित करीत होती, ज्याच्या येण्याची ते मागणी करीत होते. क्रांतिकारी नेत्याने फक्त इतकेच केले की स्थितीच्या मागणीच्या शक्तीला कार्यान्वित करण्यासाठी त्या अभिनेत्याची भूमिका पार पाडली ज्यासाठी स्टेज व कर्म पूर्वीपासून निश्चित होते.

परंतु इतिहास घडविणारे व क्रांती करणाऱ्यांपैकी हेच एक असे व्यक्तिमत्त्व आहे की जिथे क्रांतीची कारणे नव्हती. तिथे त्यांनी स्वत: क्रांतीची कारणे निर्माण केली. जिथे त्या क्रांतीचे 'बी' (स्पिरीट) व व्यावहारिक योग्यता लोकांमध्ये नव्हती तिथे त्यानी स्वत: उद्देशानुसार मनुष्य घडविले. स्वत:च्या व्यक्तित्वाला विरघळवून हजारो लोकांच्या मनात उतरविले आणि त्यांना तसेच बनविले जसे ते बनवू इच्छित होते. त्यांच्या संकल्प सामर्थ्याने व बळाने स्वत:च क्रांतीची सामुग्री निर्माण केली, तिला आकार दिला आणि समयगतीला त्या मार्गावर चालविले ज्या मार्गावर ते चालवू इच्छित होते. वैभवशाली इतिहास घडविणारा आणि असा महान क्रांतिकारी मानवी इतिहासात तुम्हाला कुठे सापडतो?

# सज्जड पुरावा

आता आपण या प्रश्नावर विचार करू या की, चौदाशे वर्षांपूर्वीच्या अंधकारमय जगात अरबसारख्या घोर अंधकारमय देशाच्या एका कोपऱ्यात एक मेंढपाळ, निरक्षर मरुस्थळवासी व्यक्तीच्या अंतरंगात इतके ज्ञान, इतके प्रकाश, बळ, इतके चमत्कार, इतकी प्रबळ व परिपूर्ण शक्ती-सामर्थ्य उत्पन्न होण्याचे कोणते साधन होते? लोक म्हणतात की ते सर्व त्यांच्या मन व मस्तिष्काची उपज होती. माझे असे म्हणणे आहे की जर हे त्यांच्या मन व मस्तिष्काची निर्मिती होती तर त्यांना ईश्वर होण्याचा दावा करावयास हवा होता. त्यांनी जर असा दावा केला असता तर ते जग ज्याने रामाला ईश्वर बनवून टाकले, ज्या जगाने कृष्णाला भगवान म्हणण्यात संकोच केला नाही, ज्याने बुद्धाला पूज्य बनविले आणि ज्या जगाने इसा मसीह (अ.) यांना स्वेच्छेने ईश्वराचा पुत्र बनविले, तसेच ज्या जगाने हवा, पाणी, अग्निचीसुद्धा पूजा केली, त्या जगाने अशा महान कीर्तिमान व्यक्तीला ईश्वर मान्यच केले असते. परंतु पाहा ते स्वत: काय सांगत आहेत? ते आपल्या कीर्ती व चमत्कारांपैकी एकाचेसुद्धा श्रेय स्वत: घेत नाहीत. ते (पैगंबर मुहम्मद (स.)) म्हणतात,

''मी एक मनुष्य आहे, तुमच्याचसारखा मनुष्य, माझ्याजवळ माझ्या स्वत:चे काहीच नाही, सर्वकाही अल्लाहचे आहे आणि अल्लाहकडूनच आहे. या वाणीसारखी दुसरी वाणी निर्माण करण्यात मानव असमर्थ आहे, ही माझी वाणी नाही आणि माझ्या बुद्धीची उपज नाही. या वाणीचा शब्दन्‌शब्द अल्लाहकडून माझ्याकडे आला आहे. यासाठीची सर्व प्रशंसा अल्लाहसाठीच आहे. हे कार्य जे मी स्वत: केले, जे कायदेकानू मी बनविले आणि हे सिद्धान्त जे मी तुम्हाला शिकविले यापैकी काहीएक मी स्वत: घडवलेले नाही. मी स्वत:च्या योग्यतेने काहीसुद्धा निर्मित करण्याचे सामर्थ्य ठेवत नाही. मी प्रत्येक गोष्टीत अल्लाहच्या मार्गदर्शनाचा आश्रित आहे. अल्लाहकडून जे अवतरित होते तेच मी सांगतो व करतो.''

पाहा, हे कशा प्रकारचे आश्चर्यजनक सत्य आहे! कशा प्रकारची सत्यता व सत्यवादिता आहे! खोटारडी व्यक्ती मोठी बनण्यासाठी दुसऱ्यांच्या कीर्तिचे श्रेयसुद्धा घेण्यात संकोच करीत नाही आणि त्याविषयी सहज माहीत होते की हे तिने कोठून घेतले आहे. परंतु त्या कीर्तिचा संबंधसुद्धा स्वत:शी जोडत नाही, ज्याला त्यांनी स्वत:ची कीर्ति (महानता) घोषित केली असती तर कोणी तिला खोटे म्हटले नसते, कारण कोणाजवळ

तिच्या वास्तविक उगमस्त्रोतापर्यंत पोहचण्याचे साधनमात्र नव्हते. सत्यतेचा यापेक्षा अधिक स्पष्ट पुरावा आणखीन कोणता असू शकतो? त्या व्यक्ती (पैगंबर मुहम्मद (स.)) पेक्षा अधिक सच्चा आणखीन कोण असू शकतो जिला एका अत्यंत गुप्त साधनाद्वारा (दिव्यप्रकटन) असे अनुपम चमत्कार प्राप्त होतात आणि ते नि:संकोचपणे सांगतात की हे चमत्कार त्यांना कोठून प्राप्त झाले? आता सांगा, का म्हणून आम्ही त्या व्यक्तीला सच्चा म्हणू नये?

पाहा, हे आहेत आम्हा सर्वांचे नायक, संपूर्ण जगाचे पैगंबर मुहम्मद (स.)! त्यांच्या पैगंबरत्वाचे उघड प्रमाण त्यांची सत्यता आहे. त्यांचे महान कार्य, त्यांचा स्वभाव, त्यांचा पवित्र जीवनवृत्तान्त, सर्वकाही इतिहाससिद्ध आहे. जी व्यक्ती शुद्धहृदयी, सत्यप्रियता आणि न्यायसंगत त्यांच्या जीवनाचे अध्ययन करील, तिचा आत्मा साक्ष देईल की हेच अल्लाहचे पैगंबर आहेत. तुम्ही अध्ययन करीत असलेला कुरआन हीच त्यांनी सादर केलेली वाणी आहे. या अनुपम ग्रंथाचे खुल्या मनाने अध्ययन करणाऱ्याला मान्यच करावे लागेल की हा निश्चितच ईशग्रंथ आहे. कोणीही अशा प्रकारच्या ग्रंथाची निर्मिती करू शकणार नाही.

# पैगंबरत्वाची समाप्ती

आता तुम्हाला हे कळायला हवे की, वर्तमानकाळात इस्लामचा सत्यनिष्ठ व सरळमार्ग जाणून घेण्यासाठी पैगंबर मुहम्मद (स.) यांची शिकवण व पवित्र 'कुरआन' या दोहोंखेरीज अन्य कुठलेही साधन नाही. आदरणीय मुहम्मद (स.) हे अखिल मानवजातीसाठी अल्लाहचे पैगंबर आहेत. त्यांच्यानंतर पैगंबर धाडण्याची परंपरा व क्रम याची सांगता झाली.[१] मानवाला ज्या प्रमाणात आदेश देण्याचा व मार्गदर्शन करण्याचा अल्लाहचा मानस होता, तो पूर्णतः त्याने आपल्या शेवटच्या पैगंबराकरवी पूर्ण केला. आता ज्या कोणाला सत्याची आवड असेल व अल्लाहचा आज्ञाधारक दास (मुस्लिम) होण्याची त्याच्या मनाची इच्छा असेल, त्याला अल्लाहच्या या शेवटच्या पैगंबराशी ईमान व दृढश्रद्धा बाळगणे आवश्यक आहे. त्यांच्या शिकवणुकीचा स्वीकार करून त्यांनी दाखवून दिलेल्या पद्धतीनुसार त्यावर आचरण करणे अनिवार्य आहे.

१) पाहा, दिव्य कुरआन- सूरह ३३, आयत ४०.

# पैगंबरत्व समाप्तीचा युक्तिवाद

पैगंबरात्वासंबंधी सविस्तर हकीकत यापूर्वी सांगितली गेली आहेच. ती नीटपणे समजून घेतल्यास व तिच्यावर विचार-चिंतन केल्यास स्वत:ची खात्री होईल की, पैगंबर प्रतिदिन जन्माला येत नसतात. तसेच प्रत्येक जाती-वंशासाठी प्रत्येक काळी एक पैगंबर असणे हेही आवश्यक नाही. पैगंबराचे जीवन खरेतर त्याने दिलेल्या शिकवणुकीच्या व मार्गदर्शनाच्या जिवंत अस्तित्वाचाच काळ आहे. जोपर्यंत त्यांची शिकवण व उपदेश जिवंत आहेत तोवर जणू पैगंबर स्वत:च जिवंत आहेत. मागील पैगंबर या दृष्टीने जिवंत नाहीत कारण त्यांनी दिलेल्या शिकवणुकीत लोकांनी नंतर फेरबदल करून टाकले आहेत. त्यांनी आणलेल्या ग्रंथांपैकी एकसुद्धा त्याच्या मूळरूपात आज उपलब्ध नाही. पैगंबरांनी दिलेल्या ग्रंथाची मूळप्रत आमच्याकडे आहे असा दावा खुद्द त्यांचे अनुयायीसुद्धा करू शकत नाही. त्यांना त्यांच्या पैगंबराच्या जीवनचरित्राचासुद्धा विसर पडला आहे. या अगोदरच्या पैगंबरांपैकी एकाचेही खरेखुरे व विश्वसनीय असे जीवनचरित्र आज कोठेही उपलब्ध नाही. त्यांचा जन्म कोणत्या काळात झाला, कोठे झाला, त्यांनी कोणकोणती कर्तृत्वे केली, त्यांनी कशा प्रकारचे जीवन व्यतीत केले, कोणती शिकवण दिली व लोकांना कोणत्या गोष्टीपासून परावृत्त केले, हेही निश्चितपणे व विश्वसनीय रितीने सांगितले जाऊ शकत नाही.

पैगंबर मुहम्मद (स.) यांची शिकवण व मार्गदर्शन जिवंत आहे. जे कुरआन त्यांच्याकरवी अवतरले ते आपल्या मूळ शब्दांनिशी आजसुद्धा उपलब्ध आहे व त्यात एक अक्षराचा व कानामात्राचाही फेरबदल झालेला नाही. त्यांच्या जीवनातील घटना, त्यांची उक्ती, त्यांच्या कृती, हे सर्वच्या सर्व सुरक्षित आहेत. चौदाशे वर्षांचा प्रदीर्घ काळ लोटला असतानाही इतिहासात त्यांचे प्रतिबिंब इतके स्वच्छ व स्पष्ट दिसते की जणू आम्ही प्रत्यक्ष डोळ्यांनीच खुद्द पैगंबर मुहम्मद (स.) यांना पाहात आहोत. जगातील कोणाही व्यक्तीचे जीवनचरित्र इतके सुरक्षित नाही जितके ते पैगंबर मुहम्मद (स.) यांचे आहे. जीवनातील प्रत्येक बाबतीत आम्ही पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या जीवनचरित्रापासून प्रत्येक प्रसंगी बोध घेऊ शकतो. हे याचे प्रमाण आहे, की पैगंबर मुहम्मद (स.) यांच्यानंतर अन्य पैगंबराची आवश्यकता उरली नाही.

एका पैगंबरानंतर पुन्हा दुसरा पैगंबर येण्यासाठी केवळ खाली दिलेली तीन कारणेच असू शकतात.

(१) पूर्वीच्या पैगंबराने दिलेली शिकवण पूर्णपणे नष्ट झालेली असणे व ती शिकवण पुन्हा लोकांसमोर प्रस्तुत करण्याची गरज निर्माण होणे.

(२) पूर्वी होऊन गेलेल्या पैगंबरांनी दिलेली शिकवण ही परिपूर्ण नसणे व तिच्यात सुधारणा व वृद्धी करण्याची गरज असणे.

(३) पूर्वीच्या पैगंबरांनी दिलेली शिकवण एका विशिष्ट देशापुरतीच मर्यादित असणे व शेष जगासाठी पैगंबराची गरज असणे.[१]

वर सांगितलेली तिन्हीही कारणे आता उरलेली नाहीत. त्याबद्दल स्पष्टीकरण खालीलप्रमाणे आहे.

१) अंतिम पैगंबर मुहम्मद (स.) यांनी मानवजातीला दिलेली शिकवण जिवंत आहे. त्यांनी पुरस्कारलेला धर्म कोणता होता, त्यांनी कशाचे मार्गदर्शन व उपदेश

---

१) काही लोकांच्या मनात शंका येते की इस्लामने मानवी जीवनासाठी जे कायदेकानू व नियम दिले आहेत ते परिस्थितीनुरूप व काळानुरूप मनुष्याची साथ कशी देतील. काळानुरूप व परिस्थितीनुरुप नियम बदलत असणे उचित आहे. अशा प्रकारच्या गोष्टी चिंतनमनन न करताच सांगितल्या जातात. यासंदर्भात खालील काही मूलभूत गोष्टी डोळ्यांसमोर असल्यास मनात अशा प्रकारची शंका येत नाही.

(१) इस्लाम अल्लाहने अवतरित धर्म आहे. अल्लाहचे ज्ञान पूर्ण आहे. अल्लाहला काळाची सुरूवात व अंत माहीत आहे. त्याला माहीत आहे की मनुष्याला कोणकोणत्या परिस्थितींना तोंड द्यावे लागेल.

(२) इस्लामचे सिद्धान्त व नियम खरेतर मानवी प्रकृतीनुसार आहेत. समयपरिवर्तनाने मानवी प्रकृतीत परिवर्तन होत नाही.

(३) हे समजून घेणे आहे की जीवनाचे मूलभूत सिद्धान्त व मूलभूत मान्यतांमध्ये फरक पडत नाही. समयाच्या प्रगती व परिवर्तनामुळे समाज व जीवनाचे केवळ बाह्यरूपातच परिवर्तन घडते. जीवनाच्या मौलिक व स्थायिक तत्त्वांमध्ये कोणतेच परिवर्तन येत नाही. इस्लामने मानवी जीवनासाठी जे सिद्धान्त व नियम दिले आहेत ते असे आहेत जे सदैव काम येणारे आहेत. ते नियम व सिद्धान्त शाश्वत आहेत. मनुष्याने 'इज्तेहाद' द्वारा म्हणजे आपल्या विवेकबुद्धीने काम घेऊन त्यांना एखाद्या काळात अथवा विकसित किंवा अविकसित समाजात लागू करू शकतो. इस्लामने दिलेले मौलिक सिद्धान्त आणि त्याने निश्चित केलेल्या जीवनाच्या मान्यता मनुष्याला नेहमी सरळ व सत्य मार्गावर मार्गस्थ करतील. इस्लाम मनुष्याच्या बुद्धीविवेकाचा आदर करतो. मनुष्याच्या मानसिक विकासासाठी हे आवश्यक होते की मनुष्याला त्याच्या बुद्धीविवेकाने काम करण्याची संधी प्राप्त होत जावी. मनुष्य आपल्या बुद्धीविवेकाने काम घेऊन अल्लाहने अवतरित प्रकाशात प्रत्येक युगात व समाजात स्वत:साठी मार्ग काढू शकतो.

दिले, कोणती जीवनपद्धत रूढ केली, कोणती जीवनपद्धत संपविण्याचे व तिच्यापासून जनसमूहाला परावृत्त करण्याचे प्रयत्न केले, हे सर्व जाणून घेण्यासाठी सुरक्षित व आवश्यक असणारी सर्व ऐतिहासिक साधने आज उपलब्ध आहेत. म्हणून जेव्हा पैगंबर मुहम्मद (स.) यांनी दिलेली शिकवण जर नष्ट झालेलीच नाही तर त्या शिकवणीचे पुनरुज्जीवन करण्यासाठी कोणाही पैगंबराच्या आगमनाची आवश्यकता उरलेली नाही.

२) अंतिम पैगंबर मुहम्मद (स.) यांच्याकरवी संपूर्ण जगाला इस्लामची परिपूर्ण शिकवण दिली गेली असून त्यात काहीही कमी-अधिक करण्याची गरज उरलेली नाही. तिच्यात कसलीही उणीव राहिलेली नाही की जी दूर करण्यासाठी कोणा दुसऱ्या पैगंबराच्या आगमनाची गरज भासावी. असे दुसरे कारणही उरले नाही.

३) अंतिम पैगंबर मुहम्मद (स.) यांना पैगंबरत्व देऊन पाठविले गेले, ते कोणत्या एका विशिष्ठ जातीवंशापुरतेच व एखाद्या देशापुरतेच मर्यादित नसून जगातील सर्व मानवजातीसाठी आहे. त्यांनी दिलेली शिकवण सर्व मानवजातीसाठी पुरेशी आहे. म्हणूनच कोणाही विशिष्ट जातीवंशासाठी आता वेगळा पैगंबर येण्याचीही गरज उरली नाही. अशा रीतीने तिसरे कारणही दूर झाले.

याच आधारावर पैगंबर मुहम्मद (स.) यांना 'खातिमुन नबीय्यीन' (अंतिम पैगंबर) म्हणजेच दुसऱ्या शब्दांत पैगंबरत्वाच्या क्रमाची सांगता करणारा असे संबोधले गेले आहे. आज जगात अन्य कोणत्याही पैगंबराच्या आगमनाची गरज उरलेली नसून केवळ स्वतः पैगंबर मुहम्मद (स.) यांनी दाखविलेल्या पद्धतीचे अनुकरण करणाऱ्या आणि इतरांना तसे करण्यास उद्युक्त करणाऱ्या लोकांचीच आता आवश्यकता आहे. त्यांची शिकवण नीट समजून घ्यावी आणि त्यानुसार आचरण करावे. जे नियम घेऊन पैगंबर मुहम्मद (स.) यांचे आगमन झाले होते ते नियम संपूर्ण जगात रूढ होऊन त्या नियमावर अधिष्ठित शासन व सत्ता या भूमंडलावर प्रस्थापित व्हावी केवळ याचीच आता गरज आहे.[१]

---

१) चौथे कारण असेही असू शकते की यात असलेल्या एका पैगंबराला साहाय्य करण्यासाठी दुसरा पैगंबर पाठविण्यात यावा, परंतु याचा उल्लेख आम्ही केवळ याच कारणासाठी केला नाही की पवित्र कुरआनमध्ये अशी दोनच उदाहरणे दिलेली आहेत. अशा या अपवादात्मक उदाहरणांवरून साहाय्यक पैगंबर पाठविण्याचा अल्लाहचा सर्वसाधारण नियम आहे असा निष्कर्ष काढता येत नाही.

## प्रकरण चौथे

# परिपूर्ण ईमान

पुढे जाण्याआधी मागील प्रकरणांत प्राप्त झालेल्या एकंदर माहितीचा पुन्हा एकदा आढावा आपण घेऊ या.

(१) अल्लाहच्या आज्ञांचे पालन करणारा व ते आचरणात आणणारा, असा अर्थ 'मुस्लिम' या शब्दाचा आहे. पण अल्लाहचे अस्तित्व व त्याची सत्ता, गुणवत्ता तसेच त्याच्या इच्छेनुसारची जीवनपद्धत व पारलौकिक जीवनामधील पुरस्कार व शिक्षा याविषयीचे यथार्थ ज्ञान केवळ अल्लाहच्या पैगंबराद्वाराच कळू शकते. म्हणून इस्लाम धर्माची अचूक व्याख्या ही आहे की, पैगंबरांनी दिलेल्या शिकवणींशी दृढ श्रद्धा व निष्ठा बाळगणे व त्यांनी दाखविलेल्या पद्धतीने अल्लाहची बंदगी (उपासना) व त्याचे दास्यत्व करणे. जी व्यक्ती पैगंबरांचे माध्यम सोडून देऊन अल्लाहशी आज्ञाधारकतेचे व आज्ञापालनाचे थेट नाते जोडल्याचा दावा करते ती कदापिही मुस्लिम नाही.

(२) प्राचीन काळी वेगवेगळ्या जाती-वंशासाठी वेगवेगळ्या पैगंबरांचे आगमन होत असे. तसेच एकाच जाती-वंशात एका पाठोपाठ असे अनेक पैगंबर येत असत. त्याकाळी इस्लाम म्हणजे प्रत्येक जाती-वंशांना, त्यांच्या पैगंबरांनी दिलेला विशिष्ट धर्म व दिलेली शिकवण असा असे. प्रत्येक देशात व प्रत्येक काळात इस्लामचा मूळ गाभा व त्याची वास्तवता जरी एकमेवच होती तरी त्यांच्या उपासनांच्या पद्धती, त्यांचे नियम व आचारसंहिता किंचित विविध प्रकारच्या होत्या. याचसाठी एका जाती-वंशास दुसऱ्या जाती-वंशाच्या पैगंबराचे अनुयायित्व आवश्यक नव्हते, तरीसुद्धा त्यांच्याशी दृढ श्रद्धा (ईमान) मनात बाळगणे हे सर्वांना अनिवार्य होते.

(३) पैगंबर मुहम्मद (स.) यांना जेव्हा पैगंबरत्व देण्यात आले तेव्हा त्यांच्याकरवी इस्लामी शिकवणीची परिपूर्णता केली गेली. संपूर्ण जगासाठी एक नियमावली व आचारसंहिता अवतरित झाली. आता हे पैगंबरत्व कोणाही एका विशिष्ट देशापुरते अगर एखाद्या जाती-वंशापुरतेच मर्यादित राहिलेले नसून ते समस्त मानवजातीसाठी आहे व ते चिरकालीन आहे.

पूर्वीच्या पैगंबरांनी इस्लामची जी शरियत (नियम व आचारसंहिता) सादर केली

होती ती सर्वच्या सर्व पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या आगमनानंतर रद्दबातल केली गेली. आता 'कयामत' (प्रलयकाळ) पर्यंत अन्य कोणत्याही पैगंबराचे आगमन होणार नाही, तसेच अल्लाहकडून दुसरी एखादी शरियतही अवतरणार नाही. तात्पर्य हे की इस्लाम म्हणजेच पैगंबर मुहम्मद (स.) यांचे अनुयायित्व करणे व त्यांचे आज्ञापालन करणे होय. त्याचप्रमाणे त्यांचे पैगंबरत्व श्रद्धापूर्वक मानणे व ज्या बाबीवर श्रद्धा बाळगण्याची शिकवण त्यांनी दिली त्या सर्व बाबींवर विश्वासपूर्वक दृढ श्रद्धा बाळगणे व त्यांनी दिलेल्या सर्व आज्ञा व आदेश यांना ईशआज्ञा व आदेश मानून त्यांचे पालन करणे, हाच इस्लाम आहे. आता अल्लाहतर्फे अशा कोणाही व्यक्तीचे आगमन होणार नाही ज्याच्याशी निष्ठापूर्वक श्रद्धा बाळगणे आवश्यक होईल आणि मुस्लिम होण्यासाठी ते आवश्यक व तसे न केल्याने मनुष्य काफिर (नाकारणारा) ठरेल.

अंतिम पैगंबर मुहम्मद (स.) यांनी कोणकोणत्या गोष्टीवर 'ईमान' (दृढ श्रद्धा) बाळगण्याची शिकवण दिली त्या गोष्टी कशा खऱ्या आहेत व त्यांच्याशी दृढ श्रद्धा बाळगण्याने माणसाचा दर्जा किती उंचावतो हे आता आपण पाहू या.

# अल्लाहवरील श्रद्धा (ईमान)

अंतिम पैगंबर मुहम्मद (स.) यांनी दिलेल्या शिकवणीतील सर्वप्रथम महत्त्वाची शिकवण आहे 'ला इलाहा इल्लल्लाह' (अल्लाहखेरीज कोणीही ईश्वर नाही) हे इष्टवचन म्हणजे इस्लामचा इष्ट आधारस्तंभ आहे. एका काफिर (अश्रद्ध), (सत्याचा इन्कार करणारा) पासून एका अनेकेश्वरवाद्यापासून (मुशरिक) तसेच एका नास्तिकापासून एका मुस्लिमास वेगळे करून फरक दर्शविणारे हेच 'इष्टवचन' आहे. याच वचनाचा स्वीकार करण्याने व अस्वीकार करण्याने माणसामाणसांत एक मोठा फरक निर्माण होतो. त्याचा स्वीकार करण्याऱ्यांचा एक समुदाय होतो व त्याचा इन्कार करणाऱ्यांचा दुसरा समुदाय होतो. त्याचा स्वीकार करणाऱ्यांना या जगापासून ते पारलौकिक जीवनापर्यंत प्रगती, सफलता व प्रतिष्ठा प्राप्त होते तर त्यास नकार देणाऱ्यांना नैराश्य, तिरस्कार व अवमान मिळतो.

माणसामाणसांत जो इतका प्रचंड फरक घडून येतो तो या छोट्याशा वचनाचा तोंडाने केवळ उच्चार करण्यानेच होत नाही. जिभेने 'क्रोसिन'चाच फक्त घोष केल्याने तुमचा ज्वर कमी होणार नाही. त्याचप्रमाणे तोंडाने 'ला इलाहा इल्लल्लाह' म्हणून त्याचा अर्थ काय निघतो हे समजून न घेता तसेच उच्चारत राहाणे आहे. किती महान गोष्टीची कबुली दिली आहे व त्या कबुलीनुसार तुमच्यावर किती मोठी जबाबदारी येऊन पडते, हे जाणून न घेतल्याने व अर्थ न जाणता केवळ अशा उच्चारानेच काहीही लाभ होणार नाही. खरेतर वर नमूद केलेला फरक तेव्हाच दृष्टीस पडेल जेव्हा 'ला इलाहा इल्लल्लाह'चा अर्थ तुमच्या मनात खोलवर रुजेल, त्याच्या अर्थावर तुमची गाढ श्रद्धा व दृढ विश्वास बसेल आणि त्याविरुद्ध जितक्या विचारधारणा व श्रद्धा आहेत त्यापासून तुमचे मन निर्मळ होईल. अग्नी जाळणारा आहे, विष ही मृत्युदायक वस्तू आहे. या विधानाच्या परिणामाचा जितका खोलवर ठसा तुमच्या मनावर उमटतो, कमीतकमी तेवढाच खोलवर ठसा या इष्टवचनाचाही तुमच्या मनावर उमटलेला दिसेल. अग्नीच्या गुणधर्मावरील विश्वास तुम्हाला निखाऱ्यास स्पर्श करण्यापासून परावृत्त करतो. तसेच विषाच्या गुणधर्मावरील विश्वसनीय ज्ञान तुम्हाला विषापासून दूर ठेवते. अगदी त्याचप्रमाणे 'ला इलाहा इल्लल्लाह' वरील ईमान, श्रद्धेच्या व आचरणाच्या बाबतीत सत्याच्या इन्काराचा (कुफ्र) अनेकेश्वरत्वाचा (शिर्क) व नास्तिकपणाच्या लवलेशाचासुद्धा शिरकाव करण्यापासून तुम्हाला परावृत्त करणारा होईल.

# ‘ला इलाहा इल्लल्लाह’चा अर्थ

सर्वप्रथम आपण ‘इलाह’ म्हणजे काय? हे समजून घेऊ या. अरबी भाषेत ‘इलाह’चा अर्थ ‘उपासना करण्यास पात्र’ व ‘भक्ती करण्यास पात्र’ असा आहे. म्हणजे अशा एका महासत्तेचे अस्तित्व जे त्याच्या सर्वश्रेष्ठतेमुळे, वैभवामुळे व त्याच्या महाप्रकोपामुळे त्याची योग्यता व पात्रता अशी आहे की ज्याची उपासना केली जावी. त्याची उपासना करताना व त्याचे दास्यत्व पत्करताना मनुष्याने त्याच्यापुढे नतमस्तक व्हावे. ती सत्ता अमर्याद शक्तिशाली असून तिची भव्यता समजून घेताना मानवी बुद्धी थक्क होऊन जाते, असा अर्थही ‘इलाह’ शब्दात अंतर्भूत आहे.

तसेच ‘इलाह’चा एक अर्थ असाही होतो की, ती सत्ता कोणावरही विसंबून व अवलंबून नाही व उलट सर्व चराचर सृष्टी आपल्या जीवनातील सर्व बाबतीत तिच्या दयाकृपेवर अवलंबून आहे व सहाय्यार्थ तिची करूणा भाकित असते. ‘इलाह’ या शब्दात ‘गूढता’ असाही अर्थ समाविष्ट असलेला आढळतो, म्हणजे जी शक्ती गूढ व रहस्यमय आहे तिला ‘इलाह’ म्हणतात. पर्शियन भाषेतील ‘खुदा’, हिंदी भाषेतील ‘देवता’, इंग्रजीतील ‘गॉड’ मराठी भाषेतील ‘ईश्वर’ या शब्दांचे अर्थसुद्धा ‘इलाह’ शब्दाच्या अर्थाशी जुळणारे असेच आहेत. जगातील अन्य विविध भाषेमध्येही या अर्थाचे काही विशिष्ट शब्द आढळतात.[१]

‘अल्लाह’ हा शब्द वास्तवात ईश्वराचे व्यक्तीवाचक नाव आहे. ‘ला इलाह इल्लल्लाह’ चा शाब्दिक अर्थ असा आहे की, कोणी दुसरा ‘इलाह’ (पूज्य) नाही शिवाय त्या विशेष सत्ताधीशाच्या ज्याचे नाव ‘अल्लाह’ आहे. ‘अल्लाह’ हा शब्द एका अशा अस्तित्वाचे नाव आहे की, जे एकमेव असून त्याचा कोणीही सहभागी नाही. ‘ला इलाहा इल्लल्लाह’ चे शब्दशः भाषांतर असे की ‘अल्लाह’च्या एकमेव व वैशिष्ट्यपूर्ण अस्तित्वाखेरीज अन्य कोणीही ‘इलाह’ (ईश्वर) नाही. दुसऱ्या शब्दांत समस्त, ब्रह्मांडामध्ये ‘अल्लाह’खेरीज कसलेही असे अस्तित्व नाही जे उपासनेस पात्र असावे. ‘अल्लाह’खेरीज अन्य कोणीही अशी पात्रता धारण करणारा नाही की ज्याच्यासमोर उपासनेत, दास्यत्वात व आज्ञापालनात, मनुष्याने नतमस्तक व्हावे. केवळ तोच एकमेव सत्ताधीश सर्व ब्रह्मांडाचा धनी व शासक आहे. सर्व चराचर सृष्टी त्याच्या कृपेवर विसंबून असून त्याचीच करूणा भाकण्यास व सहाय्याची याचना करण्यास विवश आहेत. तो ज्ञानेंद्रियांच्या कार्यमर्यादेपलीकडे असून त्याचे अस्तित्व जाणून घेताना बुद्धी दंग होते.

---

१) उदा - ग्रीकमध्ये ‘डेओस’ (Deo's), लॅटिनमध्ये ‘डेऊस’ (Deus), गोथिक (Gothic) मध्ये ‘गुथ’ (Guth), डॅनिशमध्ये ‘गुड’ (Gud) जर्मनमध्ये ‘गाट’(Gott).

# ‘ला इलाहा इल्लल्लाह’ची वास्तविकता

‘ला इलाहा इल्लल्लाह’चा केवळ शाब्दिक अर्थ आपण पाहिला. आता त्याची वास्तविकता समजून घेण्याचा प्रयत्न करू या. आम्हास ज्ञात असलेला अतिप्राचीन मानवी इतिहास व अतिप्राचीन मानवी संस्कृतीचे अवशेष स्पष्टपणे दर्शवितात की मनुष्य प्रत्येक युगात कोणत्या न कोणत्या शक्तीची उपासना व भक्ती करीत आला आहे. आजसुद्धा जगात जितके जाती-वंश आहेत मग ते अतिमागासलेले व रानटी असोत व अतिप्रगत असोत, ते कशालातरी ईश्वर मानतात व त्याची उपासना करतात. यावरून हे स्पष्ट होते की, माणसाच्या स्वभावधर्मातच ईश्वरासंबंधीची कल्पना समाविष्ट आहे. मनुष्याच्या अंत:करणात अशी कसलीतरी प्रेरणा उपजतच असते जी त्याला अगतिक व विवश बनविते की त्याने कोणालातरी ईश्वर मानून त्याची उपासना (इबादत) करावी.

प्रश्न असा उद्‌भवतो की ती शक्ती व प्रेरणा काय आहे? तुम्ही स्वत:वर व समस्त मानवजातीच्या अवस्थेवर दृष्टीक्षेप टाकून या प्रश्नाचे उत्तर जाणू शकता.

वास्तविकपणे मनुष्य दास्यत्व घेऊनच जन्माला आला आहे आणि तो नैसर्गिकपणे लाचार व दुर्बल तसेच निर्धन आहे. ज्या अगणित वस्तू त्याचे अस्तित्व टिकविण्यासाठी आवश्यक आहेत त्या सर्व त्याच्या नियंत्रणाबाहेर आहेत. त्या वस्तू त्याला आपोआप प्राप्तही होत असतात व त्याच्याकडून त्या हिरावून घेतल्याही जातात.

अनेक वस्तू मानवाला हितकारक आहेत. त्या सर्व वस्तू तो प्राप्त करू इच्छितो. काही वेळा त्या प्राप्त होतात तर कधी त्या मिळत नाहीत कारण त्या प्राप्त करणे बिलकुल त्याच्या आवाक्याबाहेर असते.

अनेक वस्तू मानवाला हानिकारक असतात. त्याच्या उभ्या आयुष्याचे श्रम काही क्षणात ते नष्ट करून टाकतात. त्याच्या आकांक्षाना धुळीस मिळवून टाकतात, त्याला रोगराईत व मृत्यूशय्येवर आणून टाकतात. तो त्यांचे निवारण करू इच्छितो. निवारण कधी होते तर कधी होत नाही. त्यावरून त्याला कळून चुकते की या घटना घडणे व न घडणे, तसेच संकटाचे निवारण होणे अगर न होणे, हे त्याच्या नियंत्रणात व आवाक्यात नाही.

अनेक वस्तू अशा आहेत की ज्यांचे वैभव, शान व भव्यता पाहून मानव प्रभावित होतो. तो पर्वत पाहतो, महासागर पाहतो, भयप्रद आक्राळविक्राळ प्राणी पाहतो. तसेच वादळे, महापूर व धरणीकंप पाहतो, काळेकुट्ट मेघ पाहतो. मेघगर्जना ऐकतो, विजांचा

कडकडाट व लखलखाट तसेच मुसळधार पावसाचा वर्षाव पाहतो. चंद्र, सूर्य, तारे यांचे भ्रमण पाहतो. या सर्व गोष्टी किती भव्य किती शक्तिशाली व किती शानदार आहेत आणि त्यांच्या तुलनेत तो किती दुर्बल व क्षुल्लक आहे, याची त्याला अनुभूती होते.

ही सर्व दृश्ये पाहून व आपली स्वत:ची अगतिक व विवश अवस्था पाहून, त्याच्या मनात आपोआपच अगतिकतेची, दुर्बलतेची, लाचारीची व दास्यत्वाची भावना निर्माण होते. जेव्हा अशी भावना अंत:करणात उत्पन्न होते तेव्हा ईश्वरासंबंधीची कल्पनाही आपोआपच अंकुरते. अपार शक्ती असलेल्या त्या महान अस्तित्वाचा तो विचार करतो. त्यांची भव्यता माणसाला त्यांच्यासमोर नतमस्तक होण्यास व त्यांची उपासना करण्यास विवश करते. त्यांच्या सामर्थ्याची जाणीव माणसाला त्यांच्यासमोर लीन-दीन करून सोडते. त्याला हितकर असणाऱ्या शक्तीची जाणीव, माणसाला त्यांची याचना करण्यास भाग पाडते. त्याचप्रमाणे हानिकारक शक्तींची जाणीव व त्याचे भय बाळगून त्यांचा प्रकोप टाळण्यास त्याला विवश करते.

अशा प्रकारे अज्ञानी माणसाला ज्या वस्तू शक्तिशाली व वैभवशाली दिसतात अथवा हितकारक अथवा हानिकारक वाटतात त्याच देव आहेत, अशी माणसाची समजूत असते. म्हणूनच तो पशुंची, नद्यांची, पर्वतांची त्याचप्रमाणे भूमीची, अग्नीची, पावसाची, वायूची व चंद्र, सूर्याची पूजा व उपासना करू लागतो.

हे अज्ञान जेव्हा थोडेसे कमी होत जाते व थोडासा ज्ञानरूपी प्रकाश पडू लागतो तेव्हा त्याला असे कळून चुकते की या सर्व गोष्टीसुद्धा त्याच्या स्वत:प्रमाणेच परावलंबी, दुर्बल व लाचार आहेत. एखादा अजस्त्र प्राणीसुद्धा क्षुल्लक चिलटासारखा मृत्यू पावतो. मोठमोठ्या नद्या सुकून जातात, त्यांची पात्रे लहान मोठी होतात. पर्वतराजींना तोडून फोडून माणूसच भंग करतो. पीक कमी जास्त प्रमाणात येणे, हे खुद्द जमिनीच्या मर्जीवर असत नाही तर जेव्हा तिला पाण्याची साथ लाभत नाही तेव्हा ती सुकून जाते. पाऊससुद्धा स्वतंत्र नसून तो वाऱ्यावर विसंबून असतो, त्याचप्रमाणे हवासुद्धा स्वतंत्र नाही. ती हितकारक असणे वा हानिकारक असणे, हे अन्य काही बाबींवर अवलंबून असते. चंद्र, सूर्य ग्रह व तारेसुद्धा विशिष्ट नियमांच्या नियंत्रणाखाली असून त्या नियमांविरुद्ध ते किंचितही हालचाल करू शकत नाहीत. आता मनुष्याची जिज्ञासा व त्याचे लक्ष, गूढ व रहस्यमय शक्तीकडे वळते. त्याला असे वाटते की त्या सर्व दृश्य वस्तूंच्या मागे काही अदृश्य व गूढ शक्तीचे नियंत्रण आहे. त्याच शक्तीचा त्यांच्यावर शासन व अधिकार आहे. येथूनच माणसाची देवीदेवतांबद्दलची श्रद्धा जन्म घेते. हवा, पाणी, प्रकाश, आरोग्य,

रोगराई व विविध इतर गोष्टींचे वेगवेगळे देव मानले जातात आणि त्यांची काल्पनिक रूपे निर्माण करून त्यांची भक्ती व उपासना केली जाते.

त्यानंतर ज्ञानप्रकाश जेव्हा आणखी वाढतो तेव्हा एकूण सृष्टीव्यवस्था एका भक्कम नियमाखाली चाकोरीबद्ध रीतीने कार्यान्वित असलेली माणसाला दिसून येते. वाऱ्यांचा रोख, पावसाचे आगमन, ग्रहांचे भ्रमण, ऋतुंचा क्रम या सर्वांच्या बाबतीत किती नियमबद्ध काटेकोरपणा असतो. अगणित शक्ती कशा एकमेकाबरोबर कार्य करीत असतात. ज्या कार्यासाठी जो काळ निश्चित केला गेला आहे नेमके त्याच वेळी ब्रह्मांडातील सर्व पंचमहाभूते एकत्र येऊन एकमेकांशी मिसळून कार्य करतात. सृष्टिक्रमातील विविध पंचमहाभूतांचे असे सहकार्य पाहून अनेकेश्वरवादी मनुष्य अशी श्रद्धा बाळगण्यास व मानण्यास विवश होतो की या सर्व लहानसहान देवांवर एका सर्वश्रेष्ठ ईश्वराचे अधिपत्य आहे. तसे जर नसते व प्रत्येक देव स्वतंत्र व वेगळा असता तर ब्रह्मांडाच्या या कार्यशाळेचे तीन तेरा वाजले असते. त्या सर्वश्रेष्ठ ईश्वराला तो 'परमेश्वर', 'अल्लाह', 'देवाधिदेव' (महादेव) वगैरे नावाने संबोधितो. परंतु भक्ती व उपासना करताना तो या सर्वश्रेष्ठ ईश्वराबरोबरच अन्य लहान देवीदेवतांनाही सहभागी व समाविष्ठ करतो. त्याची अशी समजूत असते की ईशसत्तासुद्धा जगातील राज्यसत्तेप्रमाणेच आहे. जगात जसे राजे त्यांचे प्रधानमंत्री व शासकीय अधिकारी असतात त्याचप्रमाणे ब्रह्मांडातही एक सर्वश्रेष्ठ ईश्वर असून त्याच्या नियंत्रणाखाली अनेक लहानमोठे देव आहेत. जोपर्यंत छोट्या देवांची प्रसन्नता प्राप्त केली जात नाही तोपर्यंत ईश्वरापर्यंत मनुष्य पोहोचू शकत नाही, असे त्याला वाटत असते. म्हणून त्यांची भक्ती व उपासना करावी, त्यांची करूणा भाकावी व याचना करावी. त्यांच्या कोपाचे भय बाळगावे, ईश्वरापर्यंत पोहोचण्यास त्यांना माध्यम बनवावे, त्यांना नैवेद्य व देणग्या अर्पण करून प्रसन्न करून घ्यावे, असे त्याला वाटत असते.

मानवी ज्ञानामध्ये जेव्हा आणखी अधिक भर पडली तेव्हा या देवीदेवतांच्या संख्येत घट होऊ लागली. अज्ञानी मानवांनी काल्पनिक देव केलेले आहेत. त्यांतील प्रत्येकाबद्दल विचार-चिंतन केले असता ते देव असूच शकत नाहीत अशी जाण माणसाला होत जाते. आपल्याप्रमाणेच ते ईश्वराचे दास असून आपल्यापेक्षाही ते जास्त अगतिक व असहाय आहेत हे त्याला उमगते. अशा तऱ्हेने तो एक एक देव वगळत राहातो व सरतेशेवटी एकच एक ईश्वर उरतो. परंतु त्या एकमेव ईश्वरासंबंधीही बरेचसे अज्ञान त्याच्या कल्पनाविचारांत राहिलेले असते. काहींना असे वाटते की ईश्वराला मानवासारखा देह व आकार असून तो एका स्थानावर बसून आपली अधिसत्ता गाजवीत

आहे. अन्य काहींची अशी समजूत आहे की, माणसासारखेच ईश्वराचीही बायकामुले असून माणसासारखीच त्याची वंशावळ आहे. इतर काही जणांचा असा समज असतो की ईश्वर माणसाचे रूप धारण करून पृथ्वीवर अवतरतो. काही लोक असे म्हणतात की ईश्वराने त्याच्या ब्रह्मांडाची निर्मिती करून व ते कार्यान्वित करून आता तो विश्रांती घेत आहे. काहींना असे वाटते की ईश्वराच्या दरबारात अन्य मातब्बर आत्म्यांचा व महापुरूषांचा वशिला असणे व त्यांच्याद्वारा शिफारस केली जाणे अगत्याचे आहे. काही लोक भक्तीसाठी ईश्वराचे एक रूप कल्पितात व तशी प्रतिकृती बनवून ती समोर ठेवणे आवश्यक मानतात. अशा रीतीने एकेश्वरत्वावर श्रद्धा बाळगूनसुद्धा अनेक प्रकारचे गैरसमज व अपसमज त्यांच्या मनात वसलेले असतात व त्यांच्यामुळेच ते अनेकेश्वरत्वात व सत्याचा इन्कार करण्यात गुरफटले जातात. हा सर्व अज्ञानाचाच परिणाम आहे.

'ला इलाह इल्लल्लाह' चा दर्जा सर्वांत वरचा आहे. हे असे ज्ञान आहे जे खुद्द अल्लाहने आपल्या पैगंबरांद्वारा सर्व युगात माणसांना पोहोचविले आहे. हेच ज्ञान देऊन सर्वप्रथम पैगंबर व मानव आदरणीय आदम (अ.) यांना पृथ्वीवर पाठविण्यात आले होते. आदरणीय आदम (अ.) यांच्या पश्चात हेच ज्ञान आदरणीय नूह (अ.), आदरणीय इब्राहीम (अ.), आदरणीय मूसा (अ.) व अन्य सर्व पैगंबरांना दिले गेले होते. सर्वांत शेवटी हेच ज्ञान प्राप्त करून पैगंबर मुहम्मद (स.) यांचे आगमन झाले. हे शुद्ध ज्ञान असून त्यामध्ये अज्ञानाचा लवलेशही नाही. वर आम्ही अनेकेश्वरत्वाचे, मूर्तिपूजेचे व 'कुफ्र'च्या प्रकारांचे विवरण केले आहे. त्या सर्वामध्ये मानव याच कारणामुळे गुरफटला गेला, की त्याने पैगंबरांच्या शिकवणींना अमान्य करून स्वतःच्या बौद्धिक क्षमतेवर, अनुभव तसेच त्याच्या ज्ञानावर तो विसंबून राहिला.

'ला इलाहा इल्लल्लाह' (अल्लाहशिवाय दुसरा ईश्वर नाही.) या इष्टवचनात किती अथांग वास्तविकता वर्णिली गेली आहे, ते आता आपण पाहू या.

(१) यामध्ये सर्वात अग्रेसर ईशत्वाची कल्पना आहे. हे अति विशाल ब्रह्मांड ज्याच्या प्रारंभाविषयी, ज्याच्या विस्ताराविषयी व ज्याच्या भवितव्याविषयी विचार करून आपली बुद्धी शिणते. हे ब्रह्मांड अज्ञातकाळापासून अस्तित्वात आहे व ते अनभिज्ञ काळापर्यंत अस्तित्वात राहणार आहे. त्यामध्ये अगणित चराचर वस्तू व जीव निर्माण झाले आहेत व निर्माण होत आहेत. त्यामध्ये अशा प्रकारचे विस्मयकारक व अद्भूत चमत्कार घडत आहेत ज्यांना पाहून माणसाची मति गुंग होते. जो स्वतः अमर्याद सत्ताधीश असेल केवळ तोच या विशाल ब्रह्मांडावर

अधिपत्य करू शकतो. तो चिरकालपासून असलेला व चिरकालापर्यंत अस्तित्वात राहणारा असावा, तो कोणाचाही लाचार नसावा व तो निरक्षेप असावा. तो सर्वशक्तिमान जगनियंता असावा. सर्वज्ञानी व चातुर्यपूर्ण असावा. तो प्रत्येक वस्तूसंबंधी जाण व ज्ञान बाळगणारा असून कोणतीही गोष्ट त्याच्यापासून दडलेली नसावी. त्याचे सर्व चराचर सृष्टीवर प्रभुत्व असून कोणीही त्याच्याशी शिरजोरी करू शकणारा नसावा. तो अमर्याद शक्तीचा स्वामी असावा व सर्व चराचर सृष्टीला त्याच्याकडूनच जीवनपोषणाच्या सर्व वस्तू अव्याहतपणे पुरविल्या जाव्यात. कोणताही दोष, कसलीही उणीव व कमतरता व सर्व त्रुटींपासून तो निर्मळ असावा व त्याच्या कार्यात कोणाचाही हस्तक्षेप नसावा.

(२) ईशत्वाची वरील वर्णन केलेली वैशिष्ट्ये एकमेव शक्तीमध्येच एकवटलेली असणे अगत्याचे आहे. दोन भिन्न शक्ती व वैशिष्ट्ये समसमान धारण करीत असतील हे केवळ अशक्यप्राय आहे. याचे कारण असे की, सर्वांवर प्रभुत्व करणारी व प्रभावशालीपणे अधिपत्य करणारी तर एकच शक्ती असू शकते. या वैशिष्ट्यांची विभागणी होऊन तिचे अनेक देवीदेवतांमध्ये वाटप व्हावे ही गोष्टसुद्धा अशक्य आहे. कारण जर शासनकर्ता एक असेल, ज्ञान व जाण धारण करणारा दुसरा असेल, अन्नदाता व पोषण करणारा आणखी वेगळा असेल तर प्रत्येक देव इतर देवांवर अवलंबून व विसंबून राहील. तसेच जर त्यांनी एकमेकांशी सहकार्य केले नाही तर एकाच क्षणी संपूर्ण सृष्टी नष्ट होईल. त्याचप्रमाणे या वैशिष्ठ्यांचे एकापासून दुसऱ्याकडे येणेसुद्धा शक्य नाही. कधी ती एका देवात आढळून येतील तर कधी दुसऱ्यात कारण असे की स्वत: चिरकाल राहण्याची क्षमता ज्या ईश्वरात नसेल तो सर्व ब्रह्मांडाला जीवन प्रदान करू शकत नाही. तसेच जो ईश्वर आपल्या ईशत्वाचे रक्षण करू शकत नाही तो इतक्या विशाल ब्रह्मांडावर अधिपत्य कसे करू शकणार? तात्पर्य, ज्ञानरूपी प्रकाश तुम्हाला जितक्या अधिक प्रमाणात प्राप्त होईल तितक्याच प्रमाणात तुमची खात्री अधिकाधिक दृढ होत जाईल की ही सर्व वैशिष्ठ्ये व गुणवत्ता एकाच शक्तीत सामावलेली व एकवटलेली असणे आवश्यक आहे.

(३) ईशत्वाच्या स्वयंपूर्णतेची व यथार्थपणाची जाणीव नीट लक्षात ठेवून नंतर संपूर्ण विश्वावर दृष्टी टाका. जितक्या वस्तू तुम्ही पाहता व ज्ञानेंद्रियाद्वारा जितक्या गोष्टींची अनुभूती प्राप्त करता तसेच जितक्या वस्तू तुमच्या ज्ञानमर्यादेत आहेत

या सर्व वस्तूंपैकी एकसुद्धा अशा वैशिष्ट्यांनी व गुणवत्तेने युक्त नाही. चराचर सृष्टीतील प्रत्येक वस्तू परावलंबी, पराधीन व लाचार आहे. ती निर्माण होत असते व नष्ट होत असते. जगत असते व मरण पावते. कोणाही वस्तूची एकच शाश्वत स्थिरतेची अवस्था नसते. कोणालाही स्वेच्छेनुसार काहीही अघटित घडवून आणण्याची कुवत नसते. सर्वोच्च व सर्वंकश नियमाविरुद्ध किंचितही हालचाल करण्याचा वाव नाही. या वस्तूंची अवस्थाच अशी असते की, त्यापैकी कोणीही ईशत्व धारण करणारे नाही. कोणातही ईशत्वाची किंचित छटासुद्धा आढळत नाही. कोणाचाही ईशत्वामध्ये अगदी कणभरसुद्धा हस्तक्षेप नाही. 'ला इलाह' चा (नाही कोणी ईश्वर) हाच अर्थ आहे.

(४) ब्रह्मांडातील सर्व वस्तूंमधून ईशत्व हिरावून घेतल्यानंतर तुम्हाला ही गोष्ट मान्य करणे भाग पडते की या सर्व वस्तूंव्यतिरिक्त एका सर्वोच्च शक्तीचे अस्तित्व आहे. तीच शक्ती ईशत्वाची सर्व वैशिष्ट्ये व गुणवत्ता बाळगते. त्या शक्तीखेरीज कोणीही ईश्वर नाही 'इल्लल्लाह'चा (फक्त अल्लाह) हाच अर्थ आहे.

हेच सत्य ज्ञान आहे. जितक्या प्रमाणात तुम्ही शोध घ्याल व प्रयत्न कराल तर तुम्हास हेच कळून येईल की ज्ञानाचा हाच आरंभ असून तेच ज्ञानाचे अंतिम टोक आहे. भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, खगोलशास्त्र, भूगर्भशास्त्र, जीवशास्त्र, जंतूशास्त्र, प्राणीशास्त्र, वंशशास्त्र इ. ब्रह्मांडातील गूढ सत्याचा शोध घेणाऱ्या विद्या व शास्त्रे आहेत, त्यापैकी कोणत्याही शास्त्राचे अध्ययन जितके खोलवर कराल तितक्याच जास्त प्रमाणात 'ला इलाहा इल्लल्लाह'ची वास्तवता व सत्य तुमच्यासमोर प्रकट होईल. त्यावरील तुमचा विश्वास अधिकाधिक दृढ होत जाईल. ज्ञानप्राप्तीच्या व शास्त्रांच्या व्यासंग करण्याच्या क्षेत्रात तुम्हाला पावलोपावली अशी प्रचिती येत राहील की या सर्वांत मोठ्या सत्याचा इन्कार केल्याने ब्रह्मांडातील प्रत्येक वस्तू अर्थहीन ठरते.

# मानवी जीवनावर एकेश्वरत्वाचा (तौहीद) प्रभाव

आता आपण हे पाहू या की ‘ला इलाहा इल्लल्लाह’ (अल्लाहखेरीज कोणीही ईश्वर नाही) चा स्वीकार केल्याने मानवी जीवनावर त्याचे कोणते परिणाम घडून येतात. तसेच त्याचा स्वीकार करण्यास नकार देणारे या जगात व पारलौकिक जीवनात कसे असफल होतात व त्यांचे मनोरथ कसे धुळीला मिळतात, हे आता आपण पाहू या.

(१) या इष्टवचनावर ईमान (गाढ श्रद्धा) बाळगणारा मनुष्य संकुचित दृष्टीचा कधीही असू शकत नाही. तो अशा अल्लाहवर दृढ श्रद्धा बाळगतो जो सर्व चराचरसृष्टीचा निर्माता व नियंता आहे. तो सर्वसत्ताधीश आहे. तो सर्व सृष्टीचा पालनकर्ता व मालक आहे. ही श्रद्धा धारण केल्यावर संपूर्ण विश्वात त्याला कोणतीही वस्तू परकी वाटत नाही. स्वत:प्रमाणे तो सर्वांना एकाच स्वामीची मालमत्ता व एकाच सम्राटाची प्रजा मानतो. त्याची सहानुभूती, प्रेम व सेवाभाव हे कसल्याही मर्यादिपुरते सीमित नसतात. ज्याप्रमाणे अल्लाहची अधिसत्ता असीम व अमर्यादित आहे, त्याचप्रमाणे त्याची दृष्टीही असीम व विशाल बनते. जो कोणी अनेकविध लहानसहान देवीदेवतांना मानतो अथवा मुळातच अल्लाहचे अस्तित्व न मानणारा आहे तर अशा माणसांत अशा प्रकारची गुणवैशिष्ट्ये निर्माण होऊ शकत नाहीत.

(२) हे इष्टवचन माणसात पराकोटीचा स्वाभिमान तसेच आत्मगौरव निर्माण करते. त्यावर श्रद्धा बाळगणारा जाणून असतो की केवळ एकमेव अल्लाह सर्व शक्ती बाळगतो. त्याच्याखेरीज कोणीही हानी-लाभ देणारा नाही. कोणीही मृत्यू देणारा किंवा जीवन देणारा नाही. त्याचप्रमाणे कोणीही परिणामकारक अधिकारांचा स्वामी नाही. अशी ज्ञानधारणा व गाढ श्रद्धा त्याला अल्लाहखेरीज अन्य शक्तीपासून निडर, निरिच्छ व निरपेक्ष बनवते. त्याचे मस्तक अल्लाहखेरीज कोणाही पुढे झुकत नाही, तो अल्लाहखेरीज कोणाचीही याचना व करूणा भाकित नाही. अन्य कोणाचेही श्रेष्ठत्व त्याच्या मनावर बिंबत नाही. ही सर्व गुणवैशिष्ट्ये एकेश्वरत्वावरील दृढ श्रद्धेविना अन्य कसल्याही श्रद्धेमुळे निर्माण होऊ शकत नाहीत. अनेकेश्वरत्व, कुफ्र (ईशद्रोह), तसेच नास्तिकता यांची अनिवार्य वैशिष्ट्ये अशी आहेत की, मानवाने चराचर सृष्टीतील अन्य प्राणीमात्रापुढे व वस्तुमात्रापुढे नतमस्तक होऊन त्यांनाच हितकर्ता व हानी देणारा मानावे, त्यांचेच भय बाळगावे व त्यांच्याकडून इच्छापूर्तीची लालसा बाळगावी.

(३) स्वाभिमानाबरोबरच हे इष्टवचन माणसात विनम्रता व विनय हे गुणही निर्माण करते. इष्टवचन मानणारा कधीही गर्विष्ठ, अहंकारी, स्वत:लाच इतरापेक्षा श्रेष्ठ समजणारा असू शकत नाही. निजशक्तीचा, धनाचा व योग्यतेबद्दलचा अहंकार त्याच्या मनात शिरकाव करू शकत नाही कारण तो हे जाणत असतो की जे काही त्याला प्राप्त आहे ते सर्व अल्लाहनेच दिलेले आहे आणि अल्लाह ज्याप्रमाणे प्रदान करण्याची शक्ती बाळगतो त्याचप्रमाणे तो हिरावून घेण्याचीही कुवत बाळगतो. याउलट एखाद्या नास्तिक माणसाला जेव्हा टोकाची यशप्राप्ती होते तेव्हा तो गर्विष्ठ व अहंकारी बनतो कारण तो असे साफल्य आपल्या स्वत:च्या योग्यतेमुळे प्राप्त झाले असे मानत असतो. अगदी त्याचप्रमाणे अनेकेश्वरत्व व कुफ्र (द्रोह) बाळगल्याने गर्व निर्माण होणे अनिवार्य आहे कारण अनेकेश्वरवादी व श्रद्धाहीन (काफिर) असे समजून असतो की देवीदेवतांशी त्याचे विशिष्ट संबंध असून इतरांना तसे भाग्य लाभलेले नाही.

(४) या इष्टवचनावर दृढ श्रद्धा बाळगणारा मनुष्य हे चांगले जाणून असतो की आत्मशुद्धी व सदाचरणाखेरीज त्याला मुक्ती प्राप्त करण्याचे व सफल होण्याचे अन्य कसलेही साधन नाही. त्याची श्रद्धा अशा अल्लाहवर असते जो स्वयंनिरपेक्ष व परम स्वतंत्र आहे. कोणाशीही त्याचे नाते नाही, तो अत्यंत न्यायी आहे व त्याच्या अधिसत्तेत कोणाचाही हस्तक्षेप व कोणाचाही प्रभाव नाही. याउलट, अनेकेश्वरवादी व अधर्मी (काफिर) सतत एका असत्य आशेवर जीवन व्यतीत करीत असतात. त्यापैकी काहींची अशी समजूत झालेली असते की ईश्वराच्या पुत्राने स्वत: यातना भोगून आमची सुटका केलेली आहे. काहींना असे वाटते की आम्ही ईश्वरास अतिप्रिय असलेले निवडक लोक असून आम्हास कसल्याही प्रकारची शिक्षा होऊच शकत नाही. काहींची अशी धारणा आहे की आम्ही सत्पुरूषांच्या शिफारशीने ईशन्यायालयात सुटका करून घेऊ. देवीदेवतांना नैवेद्य तसेच विविध वस्तूंची भेट अर्पण करून काही लोक अशी समजूत करून घेतात की आता त्याला जगात काय वाटेल ते करण्याचा परवानाच मिळाला आहे. अशा असत्य श्रद्धा अशा माणसांना सतत पापांच्या व दुराचाराच्या दुष्टचक्रातच गुरफटतात. अशा श्रद्धांवर विसंबून माणसे आपली आत्मशुद्धी व सदाचार यापासून गाफील असतात. उरले नास्तिकवादी लोक तर कसल्याही कृतीचा जाब विचारणारी एखादी परमोच्च शक्ती अस्तित्वात आहे हे ते मुळातच

मानत नाहीत. म्हणून ते जगात स्वत:ला स्वैर व अनिर्बंध समजतात. त्यांची इच्छा-वासना हाच त्यांचा ईश्वर असतो व ते त्यांचेच दास असतात.

(५) हे इष्टवचन निष्ठेपूर्वक मानणारा मनुष्य कधीही वैफल्यग्रस्त होत नाही आणि त्याचे मनोधैर्य कधीही खचत नाही. तो पृथ्वी व आकाशातील सर्व धनसंपत्तीचा धनी असणाऱ्या अशा अल्लाहवर श्रद्धा बाळगतो ज्याची दयाकृपा अमर्याद तसेच शक्तीसामर्थ्य अनंत आहे. ही श्रद्धा त्याच्या मनात असाधारण संतोष निर्माण करते आणि त्याला सतत समाधानी व आशावादी ठेवते.

त्याला जगात दारोदारी जरी धुडकावण्यात आले, सर्वांशी जरी त्याचे संबंध नष्ट झाले व सर्व साधनसामग्री जरी एका पाठोपाठ त्याच्या हातून निसटून गेली तरीदेखील अल्लाहचे सहाय्य त्याची साथ सोडीत नाही. याच आधारावर तो नव्या आशा-आकांक्षा बाळगून प्रयत्नांची पराकाष्ठा करीत असतो. अशा प्रकारचा आत्मसंतोष व आत्मदृढता एकेश्वरत्वावर दृढ श्रद्धा असल्याखेरीज अन्य कोणत्याही श्रद्धेद्वारा प्राप्त होऊच शकत नाही. अनेकेश्वरवादी, नाकारणारे (श्रद्धाहीन) व नास्तिक संकुचित मनाचे असतात. मर्यादित व सीमित सामर्थ्यावर ते विसंबून असतात. म्हणून संकटकाळात ते फार लवकर वैफल्यग्रस्त व निराश होतात व बहुधा अशा अवस्थेत ते आत्महत्याही करण्यास उद्दीप्त होतात.

(६) या वचनावरील श्रद्धा माणसात धैर्य व साहस, सहनशीलता व खंबीरपणा निर्माण करते. तसेच ईशसाहाय्यावर अवलंबून असण्याची विचारधारणा याचे मोठे बळ, निर्माण करते. अल्लाहची प्रसन्नता प्राप्त करण्यासाठी जेव्हा तो महान कृत्ये करण्यासाठी तयार होतो तेव्हा आपल्या पाठीशी जगन्नियंत्याचे पाठबळ आहे असा त्याचा दृढ विश्वास असतो. अशी धारणा त्याच्यात डोंगरासारखा भक्कमपणा निर्माण करते. जगातील सर्व संकटे व हालअपेष्टांना तोंड देण्यास तो समर्थ बनतो. विरोधी शक्ती एकत्रपणेही त्याचे मनोधैर्य व साहस नष्ट करू शकत नाहीत. अनेकेश्वरवादी, अधर्मी (काफिर) व नास्तिक लोकांमध्ये हे सामर्थ्य कोठे असणार?

(७) हे वचन माणसाला शूर बनवते. लक्षात ठेवा माणसाला भ्याड व भित्रा करणाऱ्या दोन गोष्टी असतात. एक म्हणजे प्राण, वित्त तसेच अपत्यप्रेम व दुसरी म्हणजे अल्लाहखेरीज अन्यही कोणी मृत्युदाता आहे, तसेच मनुष्य स्वप्रयत्नाने मृत्यू टाळू शकतो अशी श्रद्धा बाळगणे आहे. 'ला इलाहा इल्लल्लाह' (अल्लाहखेरीज

कोणी ईश्वर नाही) वरील दृढ श्रद्धा या दोन्हीही गोष्टीं मनातून काढून टाकते. या वचनावर श्रद्धा बाळगणारा, अल्लाहला फक्त आपल्या प्राणाचा, धनसंपत्तीचा व प्रत्येक गोष्टीचा स्वामी मानत असतो. त्याच्या प्रसन्नतेसाठी सर्व काही बळी देण्यास तो तयार असतो. म्हणून पहिले कारण नष्ट होते. दुसरेही कारण यासाठी शिल्लक उरत नाही की या इष्टवचनांवर श्रद्धा बाळगणारा मनुष्य कोणत्याही मानवास अथवा पशूस, तसेच तोफ, तलवार किंवा लाठीकाठीस व दगडधोंड्यास प्राण घेण्याचे सामर्थ्य असल्याचे मानत नाही. तो अधिकार केवळ अल्लाहचाच आहे. त्याने मृत्यूची जी वेळ निश्चित केलेली आहे तत्पूर्वी जगातील सर्व शक्ती एकत्रितपणेही एखाद्याचा प्राण घेऊ शकत नाही. म्हणूनच अल्लाहवर ईमान धारण करणाऱ्यापेक्षा अधिक शूर जगात कोणीही नसतो. असंख्य तलवारी, तोफगोळ्यांचा वर्षाव, सैनिकांचे प्रखर हल्ले या सर्व गोष्टी त्याच्यासमोर कुचकामी ठरतात. अशा प्रकारे त्याच्या विरोधात असत्याचे सर्व शक्ती सामर्थ्य विफल ठरते. ईशमार्गात युद्ध करताना तो जेव्हा पुढे सरसावतो तेव्हा आपल्यापेक्षा दसपट शक्ती असलेल्या सैन्याचीही दाणादाण करून टाकतो. अनेकेश्वरवादी (मुशरिक), अधर्मी (काफिर) व नास्तिक, असे बळ कोठून प्राप्त करतील? त्यांना तर प्राणच सर्वांहून प्रिय असतो. शत्रूच्या कृतीने मृत्यू येतो व निसटून जाण्याने तो टळू शकतो असा त्यांचा समज असतो.

(८) 'ला इलाहा इल्लल्लाह' (अल्लाहखेरीज कोणी ईश्वर नाही) वरील दृढ विश्वास माणसामध्ये संतोष व समाधान तसेच निरपेक्षपणा निर्माण करतो. लोभ व मोह, संशयीपणा व मत्सर यासारख्या हीन भावना माणसाच्या मनातून घालवून देतो. यशप्राप्तीसाठी अनुचित मार्ग अवलंबण्याच्या व अनुचित साधनांचा वापर करण्याचा विचारही त्याच्या मनात येत नाही. तो असे मानत असतो की उपजीविका अल्लाहच्या हाती आहे. तो जसे इच्छितो तसे कोणास कमी तर कोणास अधिक प्रमाणात देतो. प्रतिष्ठा, सामर्थ्य, नावलौकिक तसेच शासन व अधिकार हे सर्व काही अल्लाहच्या स्वाधीन आहेत. तो ज्याला जितके देऊ इच्छितो तितकेच देत असतो. आपले कर्तव्य इतकेच आहे, की उचित मार्गाने प्रयत्नांची पराकाष्ठा करीत राहावे. यश व अपयश हे सर्व अल्लाहच्या उपकारावर आधारित असते. त्याची देण्याची इच्छा झाल्यास जगातील कोणतीही शक्ती आड येऊ शकत नाही. तसेच त्याची इच्छा नसल्यास जगातील कोणतीही शक्ती ते

मिळवून देऊ शकत नाही. याउलट अनेकेश्वरवादी, अधर्मी व नास्तिक लोक आपले यशापयश सफलता-असफलता हे आपल्या प्रयत्नांवर तसेच जगातील अन्य शक्तींच्या साहाय्यावर अथवा विरोधावर अवलंबून असल्याचे मानत असतात. म्हणूनच त्यांच्यावर लोभ, मोह तसेच ईर्षा, लालसा यांचा पगडा असतो. साफल्यप्राप्तीसाठी लाचलुचपत, लांगुलचालन व खुशामत, कारस्थाने व सर्व प्रकारचे अनुचित मार्ग अनुसरण्यात त्यांना कसलीही खंत वाटत नाही. इतरांच्या यशाचा व सफलतेचा ते अत्यंत तिरस्कार व मत्सर करत असतात. म्हणून दुसऱ्यांना कमी लेखण्यासाठी ते कोणत्याही कुमार्गाचा वापर करण्यास मागेपुढे पाहात नाहीत.

(९) 'ला इलाहा इल्लल्लाह' (अल्लाहखेरीज कोणी ईश्वर नाही) वरील दृढ विश्वास माणसाला ईशनियमांच्या बंधनात व मर्यादेत ठेवतो. त्यानुसार जीवन व्यतीत करण्यास शिकवितो. या इष्टवचनावर दृढ विश्वास बाळगणाऱ्या माणसाची अशी खात्री असते की सर्व प्रकट तसेच अप्रकट गोष्टी अल्लाहला चांगल्या प्रकारे ज्ञात आहेत. तो मनुष्याच्या मानेतील शिरेपेक्षाही अधिक जवळ आहे. रात्रीच्या काळोखात किंवा एकांतातही एखादे पापकृत्य केले तर सर्वज्ञ अल्लाहस ते कळते. आमच्या मनात खोलवर पापकृत्याचा विचार जरी डोकावला तरी ते अल्लाहस ज्ञात होते. आम्ही अन्य सर्वांशी लपवाछपवी करू शकतो, परंतु अल्लाहपासून काहीही लपवू शकत नाही. सगळ्यांपासून निसटू शकतो, परंतु अल्लाहच्या अधिसत्तेपासून निसटू शकत नाही. सर्वांपासून वाचू शकतो, परंतु ईशपकडीतून वाचणे अशक्यप्राय आहे. हा विश्वास जसजसा दृढ होत जाईल तसतसाच मनुष्य अल्लाहचा अधिकाधिक आज्ञाधारक बनतो. अल्लाहने जे अवैध (हराम) ठरविले आहे त्याच्या जवळपासही तो फिरकणार नाही. तसेच जे कर्तव्य करण्याची त्याने आज्ञा केली आहे ते एकांतात व काळोखातही तो पार पाडतो. कारण त्याच्या समवेत सतत वार्ताहर-दूत संलग्न असतात आणि त्याला अशा एका न्यायालयाचा सतत मनात धसका वाटत असतो ज्याचे वॉरंट तो टाळू शकत नाही. मुस्लिम (आज्ञाधारक) होण्यासाठी सर्वांत पहिली अट 'ला इलाहा इल्लल्लाह' (अल्लाहखेरीज कोणी ईश्वर नाही) वर 'ईमान' (दृढ श्रद्धा) धारण करणे ही आहे. मुस्लिम शब्दाचा अर्थ, 'अल्लाहचा आज्ञाधारक दास' (सेवक) असा आहे. अल्लाहचा आज्ञाधारक दास (मुस्लिम) होणे शक्य नाही, जोपर्यंत

‘अल्लाहखेरीज अन्य कोणीही उपासनेत पात्र नाही’ याची त्याच्या मनात खात्री होत नाही.

पैगंबर मुहम्मद (स.) यांनी दिलेल्या शिकवणीत अल्लाहवरील दृढ विश्वास व दृढ श्रद्धा सर्वांत जास्त महत्त्वाची व मूलभूत बाब होय. हाच इस्लामचा केंद्रबिंदू आहे, त्याचा गाभा व मूळ आहे, तसेच इस्लामच्या शक्तीचा झरा आहे. इस्लामच्या अन्य जितक्या उपासना, कर्तव्ये व नियम आहेत ते सर्व याच केंद्राभोवती फिरत असतात. त्या सर्वांना याच केंद्रबिंदूपासून बलप्राप्ती होते. हे इष्टवचन उणे केल्यास इस्लामचा अर्थ शून्य होतो.

# ईशदूत (फरिश्ते) वर ईमान

अल्लाहवर ईमान धारण केल्यानंतर (दृढ श्रद्धेनंतर) पैगंबर मुहम्मद (स.) यांनी ईमान धारण करण्यासाठी शिकवण दिलेली दुसरी अट म्हणजे ईशदूतांचे अस्तित्व आहे. या श्रद्धेचा मोठा लाभ हा आहे की अनेकेश्वरत्वाच्या सर्व धोक्यांपासून मनुष्य दूर राहतो.

आपणास हे माहीत आहेच की अनेकेश्वरवाद्यांनी ईशत्वामध्ये दोन प्रकारच्या निर्मित वस्तूंचा समावेश केला आहे. त्या निर्मित वस्तूंचा एक प्रकार म्हणजे रूप व आकार तसेच देह असणाऱ्या वस्तू-प्राणी होत. उदा. चंद्र, सूर्य, तारे, अग्नी, जल तसेच महान सत्पुरुष वगैरे. दुसरा प्रकार म्हणजे ज्यांना रूप व आकार नाही अशा शक्ती, त्या शक्ती माणसाला दिसू शकत नाही पण अदृश्यपणे विश्वातील घडामोडीत कार्यरत असतात. उदा. वारे वाहवणारी शक्ती, पर्जन्य वर्षाव करणारी शक्ती, प्रकाश देणारी शक्ती वगैरे वगैरे. या गोष्टीपैकी पहिला प्रकार तर माणसांच्या डोळ्यांना दिसत असतो. म्हणून ते ईश्वर असण्याचा समज खुद्द 'ला इलाहा इल्लल्लाह' (अल्लाहखेरीज कोणी ईश्वर नाही) च्या शब्दांनीच निषेधार्ह व रद्दबातल ठरतो. परंतु दुसरा प्रकार अदृश्य व गूढमय आहे. अनेकेश्वरवादी लोक अधिकांश त्यांच्यावरच श्रद्धा बाळगत असतात. त्यांनाच देवी-देवता व देवांची संतती मानत असतात. त्यांच्याच काल्पनिक रूपांची मूर्ती घडवून त्यांनाच नैवेद्य व भेटवस्तू अर्पण करतात. म्हणूनच एकेश्वरत्वास या अनेकेश्वरत्वाच्या दुसऱ्या प्रकारापासून निर्मळ व स्वच्छ करण्यासाठी एक स्थिर व अढळ तत्त्व वर्णिले गेले आहे.

पैगंबर मुहम्मद (स.) यांनी आम्हाला हे दाखवून दिले आहे की ज्या अदृश्य व तेजस्वी शक्तींना तुम्ही ईश्वर किंवा ईश्वराची संतती समजता, त्या वास्तविकपणे अल्लाहचे दूत (फरिश्ते) आहेत. ईशत्वात त्यांचा कसलाही सहभाग वा हस्तक्षेप नाही. ते सर्व अल्लाहच्या अधीन आहेत व ते इतके आज्ञाधारक आहेत की ईशआदेशांची किंचितही अवज्ञा करू शकत नाहीत. अल्लाह त्यांच्याद्वारा आपल्या साम्राज्याचा प्रबंध करीत आहे आणि ते फरिश्ते अल्लाहची आज्ञा तंतोतंत पाळत असतात. स्वेच्छेने काहीही करण्याचा त्यांना अधिकार नाही. ते स्वबळाने अल्लाहच्या सेवेत कसलाही प्रस्ताव सादर करू शकत नाही. अल्लाहपुढे कोणाच्याही वतीने शिफारस करण्याची त्यांची हिंमत नाही. त्यांची उपासना करणे व त्यांची करूणा भाकणे ही गोष्ट तर मानवाला लांच्छनीय आहे. कारण प्रथमदिनी अल्लाहने त्या सर्वांकडून प्रथममानव आदम (अ.) यांना सजदा करावयास (नतमस्तक होण्यास) लावले होते. त्यांच्याहून अधिक जाण व ज्ञान आदम

(अ.) यांना प्रदान केले होते. त्या सर्वांना (दूतांना) वगळून आदम (अ.) यांना पृथ्वीवरील खिलाफत (प्रतिनिधित्व) बहाल केले होते. म्हणून दूतांसाठी जो मानव वंदनीय केला गेला होता, खुद्द त्यानेच उलट दूतांची करूणा भाकणे व साहाय्यार्थ याचना करणे यापेक्षा अधिक लांच्छनीय व अवमानकारक बाब आणखी कोणती असू शकते?

पैगंबर मुहम्मद (स.) यांनी एकीकडे तर ईशदूतांची उपासना करण्यापासून व त्यांना ईशत्वामध्ये सहभागी ठरविण्यापासून आम्हाला रोखले; पण दुसरीकडे त्यांनी आम्हाला असे दाखवून दिले की ईशदूत हे अल्लाहची श्रेष्ठ निर्मिती असून ते पूर्णपणे पापविरहित आहेत. त्यांचा प्राकृतिक गुणधर्मच असा आहे की ते अल्लाहची अवज्ञा करूच शकत नाहीत. ते सतत ईशदास्यत्व करण्यात व त्याची उपासना करण्यात मग्न असतात. या ईशदूतांपैकी एक महान ईशदूताकरवीच ज्यांचे नाव जिब्रिल (अ.) असे आहे; अल्लाहने पैगंबर मुहम्मद (स.) यांच्यावर कुरआनमधील वचनांचे अवतरण केले. या ईशदूतांपैकीच असेही ईशदूत आहेत जे अहर्निश तुमच्या समवेत हजर असतात व सतत आपली सत्कृत्ये व दुष्कृत्ये पाहात असतात. तुमच्या मुखातून बाहेर पडणारे चांगले तसेच वाईट शब्द ऐकत असतात व त्याची नोंद करीत असतात. प्रत्येक माणसाच्या जीवनातील कृत्यांचा अभिलेख त्यांच्यापाशी सुरक्षित राखला जातो. पारलौकिक जीवनात जेव्हा तुम्हाला अल्लाहसमोर हजर केले जाईल त्यासमयी तुमचे हे दप्तर तेथे सादर केले जाईल. संपूर्ण आयुष्यात तुम्ही उघड उघड वा गुप्तपणे जी काही सत्कृत्ये व दुष्कृत्ये केली असतील त्या सर्वांच्या नोंदी त्या दप्तरात असतील, हे तुम्हाला दिसून येईल.

ईशदूतांची वास्तविक अवस्था आम्हाला दाखविण्यात आलेली नाही. केवळ त्यांचे गुणधर्म आम्हाला दाखविण्यात आले आहेत. त्यांच्या अस्तित्वावर दृढ श्रद्धा बाळगण्याचा आदेश दिला गेला आहे. फरिश्ते कसे आहेत व कसे नाहीत हे जाणून घेण्याचे साधन आमच्याकडे नाही. म्हणून स्वतःच्या बुद्धीने त्यांच्यासंबंधी एखादे मत वा धारणा करून घेणे हा घोर अज्ञानीपणा आहे. तसेच त्यांचे अस्तित्वच नाकारणे म्हणजे अधर्म आहे. कारण तसा इन्कार करण्यास कोणाकडे कसलाही युक्तिवाद नाही. अशा इन्काराचा अर्थ पैगंबर मुहम्मद (स.) यांना खोटे ठरविणे असा होतो. आम्ही ईशदूतांच्या अस्तित्वाची श्रद्धा केवळ याचसाठी बाळगतो की अल्लाहचे सच्चे व सत्यनिष्ठ पैगंबर मुहम्मद (स.) यांनी आम्हाला त्यांची माहिती दिली आहे.

# ईशग्रंथांवर ईमान

पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या शिकवणीनुसार तिसरे महत्त्वाचे तत्त्व म्हणजे ईश्वराने त्याच्या पैगंबरांवर वेळोवेळी अवतरित ग्रंथावर ईमान (दृढ श्रद्धा) धारण करण्यास सांगितले आहे.

सर्वश्रेष्ठ अल्लाहने ज्याप्रमाणे पैगंबर मुहम्मद (स.) यांच्यावर कुरआन अवतरित केला त्याचप्रमाणे त्यांच्यापूर्वी होऊन गेलेल्या पैगंबरांवरही आपले ग्रंथ अवतरले होते. त्या ग्रंथांपैकी काहींची नावे आम्हाला सांगण्यात आली आहेत. उदा. 'सुहुफे इब्राहीम' म्हणजे आदरणीय इब्राहीम (अ.) यांच्यावर अवतरलेला ग्रंथ, 'तौरात' म्हणजे पैगंबर मूसा (अ.) वर अवतरलेला ग्रंथ, 'जबूर' म्हणजे आदरणीय दाऊद (अ.) यांच्यावर अवतरलेला ग्रंथ, 'इंजिल' म्हणजे आदरणीय इसा (अ.) यांच्यावर अवतरलेला ग्रंथ, याशिवाय पैगंबरांकडे जे अन्य ग्रंथ पाठविले गेले होते त्यांच्या नावाची माहिती आम्हाला दिली गेली नाही. म्हणूनच अन्य कोणत्याही धर्मग्रंथाबाबत ते ईशधर्मग्रंथ आहेत अथवा नाहीत हे आम्ही विश्वासपूर्वक सांगू शकत नाही. अर्थातच आम्ही विश्वासपूर्वक मानतो की, अल्लाहकडून जे काही ग्रंथ अवतरले होते ते सर्व सत्य व वास्तव होते.

ईशग्रंथांची जी नावे आम्हाला सांगण्यात आली त्यापैकी 'सुहुफे इब्राहीम' तर आता पृथ्वीवर अस्तित्वात नाही. उरलेले 'तौरात', 'इंजिल' व 'जबूर' हे ग्रंथ आज रोजी ज्यू लोकांजवळ आणि ख्रिश्चन लोकांजवळ उपलब्ध आहेत. परंतु पवित्र कुरआनमध्ये आम्हाला असे दाखवून दिले गेले आहे की त्या सर्व ग्रंथांतील ईशवचनांत लोकांनी फेरबदल करून टाकले आहेत. आपल्यातर्फे त्यांत अनेक गोष्टी समाविष्ट करून टाकल्या आहेत. खुद्द ख्रिश्चन लोक व यहुदी लोकसुद्धा मान्य करतात की मूळ ग्रंथ त्यांच्याजवळ उपलब्ध नाही; केवळ त्यांच्या भाषांतरित प्रतीच उपलब्ध आहेत. त्या प्रतीमध्ये शतकानुशतकांपासून फेरबदल होत आले आहेत. आजसुद्धा तसे फेरबदल होत आहेत. आणखी ते ग्रंथ वाचल्यानंतर त्यामध्ये काही स्पष्टपणे आढळून येते ज्यावरून ते सर्व अल्लाहकडून असूच शकत नाही याबद्दल खात्री पटते. यासाठीच जे ग्रंथ उपलब्ध आहेत ते तंतोतंत व परिपूर्ण ईशग्रंथ नाहीत. त्यामध्ये ईशवाणी व मानवी वचने यांची सरमिसळ झालेली आहे. त्यामधील ईशवाणी नेमकी कोणती आहे व मानवी वचने कोणती आहेत हे जाणण्याचे साधनही उपलब्ध नाही. तात्पर्य असे की पूर्वीच्या ग्रंथावर ईमान बाळगण्याचा जो आदेश आम्हाला दिला गेला आहे त्याची वास्तवता केवळ इतकीच की, अल्लाहने कुरआन अवतरित करण्यापूर्वीसुद्धा प्रत्येक जाती-वंशासाठी आपले आदेश,

त्याच्या पैगंबरांद्वारा दिले होते. ते सर्व आदेश केवळ त्या एकमेव अल्लाहकडून देण्यात आले होते ज्याच्याकडून पवित्र कुरआन अवतरित करण्यात आले आहे. तसेच कुरआन काही एखादा नवीन व अद्भूत ग्रंथ नाही. त्याची शिकवण पूर्वीच्या काळातील लोकांना दिली गेली होती व नंतरच्या काळात त्यांना त्या शिकवणीचे विस्मरण झाले होते. तिच्यात त्यांनी फेरबदल घडवून आणले होते. ईशवाणीत मानवी वचनांची सरमिसळ करून टाकली होती. त्या सर्व चुकांची दुरूस्ती करून मूळ शिकवणीची उजळणी करण्यासाठीच हा पवित्र ग्रंथ 'कुरआन' अवतरित करण्यात आला आहे.

पवित्र कुरआन हा अल्लाहने अवतरित केलेला शेवटचा ग्रंथ असून त्याच्यात व त्या अगोदरच्या ईशग्रंथांत अनेक दृष्टीने फरक आहे.

(१) कुरआनच्या आधी जे ग्रंथ अवतरित झाले होते त्यांपैकी बहुतेकांच्या मूळ प्रती नाहीशा झालेल्या असून केवळ त्यांच्या अनुवादित प्रतीच आज उपलब्ध आहेत. परंतु पवित्र कुरआन ज्या ज्या शब्दानिशी अवतरले त्या सर्वच्या सर्व वचनांनिशी तंतोतंतपणे आजही उपलब्ध आहे. त्याच्यात एका अक्षराचा किंबहुना एखाद्या विरामचिन्हाचाही फेरबदल झालेला नाही.

(२) आधीच्या ईशग्रंथांमध्ये माणसांनी ईशवाणीत मानवी वचनाची सरमिसळ करून सोडली आहे. एकाच ग्रंथात ईशवाणीही आढळते व त्याचबरोबर राष्ट्राचा इतिहास, महापुरूषांचे वृत्तान्त, टीका व समीक्षण तसेच धर्ममार्तंडांनी सांगितलेल्या समस्या व त्यांच्या सोडवणुकीचे मार्गसुद्धा आहेत. त्यात असे काही प्रदूषण व सरमिसळ झाली आहे, की केवळ ईशवाणी त्यातून वेगळी करणे अशक्य आहे. परंतु पवित्र कुरआनमध्ये शुद्ध ईशवाणीच आम्हाला आढळते. त्यामध्ये अन्य कसल्याही वचनांचा लवलेशही आढळत नाही. टीकाग्रंथ विवरण व विश्लेषण पैगंबर मुहम्मद (स.) यांची उक्ती व कृती दर्शविणारे त्यांचे जीवनचरित्र, धर्मशास्त्र, त्यांच्या सोबत्यांची जीवनचरित्रे, तसेच इस्लामी इतिहास इ. विषयांवर स्वतंत्र लिखाण झाले आहे. या सर्व विषयांवर मुस्लिम लोकांनी जे काही लिखाण केले आहे ते सर्व कुरआनहून अगदी वेगळ्या अशा इतर पुस्तकांत लिहिलेले असून प्रत्यक्ष कुरआनमध्ये त्यातील एक अक्षरही आढळत नाही.

(३) जगातील विविध जातींमध्ये जितके धर्मग्रंथ आज उपलब्ध आहेत, त्यातील एखाद्याच्याही बाबतीत ऐतिहासिक पुराव्यानिशी हे सिद्ध होऊ शकत नाही की, ज्या पैगंबरांकडे तो ग्रंथ पाठविला गेला होता तोच तो मूळग्रंथ आहे. या विपरित

काही असेही धर्मग्रंथ आढळतात की ते कोणत्या काळात अवतरले व कोणत्या पैगंबरांवर ते अवतरले हेसुद्धा अनभिज्ञ आहे. परंतु पवित्र कुरआनच्या संदर्भात इतका भक्कम ऐतिहासिक पुरावा व आधार उपलब्ध आहे की त्याचा संबंध व संपर्क पैगंबर मुहम्मद (स.) यांच्याशी नाही, अशी शंकाही कोणी घेऊ शकत नाही. त्यातील कोणत्या आयती (वचने) केव्हा व कोणत्या स्थळी अवतरित झाल्या याचीही अगदी स्पष्ट माहिती उपलब्ध आहे.

(४) यापूर्वीचे धर्मग्रंथ ज्या भाषांमध्ये अवतरले होते, त्या सर्व भाषा बऱ्याच काळापासून मृत झालेल्या आहेत. जगभर आज त्या भाषा बोलणारे कोठेही आढळत नाहीत. तसेच त्या भाषा जाणणारेही क्वचितच आढळतात. असे ग्रंथ त्यांच्या खऱ्या मूळ अवस्थेत उपलब्धही झाले तरी त्यातील आदेश नीट समजणे व त्यांचे पालन करणे हे अशक्य आहे. परंतु ज्या भाषेत कुरआन उपलब्ध आहे ती एक जिवंत भाषा असून जगातील कोट्यवधी लोकांत ती बोलली व समजली जात आहे. तिच्या शिक्षणाची तरतूद जगात सर्वत्र आढळते. प्रत्येक मनुष्य ती भाषा शिकू शकतो. ज्याला ती शिकता येत नसेल त्याला पृथ्वीवर चहूकडे अशी माणसे भेटतील ज्यांच्यामध्ये कुरआनच्या वचनांच्या अर्थाचे स्पष्टीकरण करून सांगण्याची पात्रता आहे.

(५) जगात निरनिराळ्या मानवजातींजवळ जितके धर्मग्रंथ आज उपलब्ध आहेत, त्यातील प्रत्येक ग्रंथात त्यापैकी कोणा एकाच विशिष्ट जातीवंशाला संबोधित केले गेले आहे. त्यातील प्रत्येक ग्रंथात अशा आज्ञा व आदेश आढळतात जे त्या ठराविक काळापुरते व त्याकाळच्या विशिष्ट गरजांपुरतेच मर्यादित होते, हे आम्हाला कळून चुकते. परंतु आता तशी अवस्था व आवश्यकताही उरली नाही, तसेच ते आदेश आता अनुसरलेही जाऊ शकत नाहीत. यावरून ही गोष्ट स्फटिकासारखी स्वच्छ व स्पष्ट आहे, की ते सर्व ग्रंथ वेगवेगळ्या जातीवंशापुरतेच मर्यादित होते. त्यापैकी एकही ग्रंथ संपूर्ण जगासाठी अवतरला नव्हता. तसेच ज्या जातीवंशासाठी जे ग्रंथ अवतरले होते त्यांच्यासाठीसुद्धा ते कायमचे म्हणून नव्हते तर ते एका ठराविक काळापुरतेच होते.

आता कुरआनवर दृष्टिक्षेप टाकू या. या ग्रंथात प्रत्येक ठिकाणी अखिल मानवजातीला संबोधित केले गेले आहे. त्यातील एका ओळीनेही अशी शंका निघत नाही की तो ग्रंथ कोणा एका विशिष्ट जातीसाठीच अवतरला आहे. म्हणून

या ग्रंथात जे काही आदेश दिले गेले आहेत ते सर्व असे आहेत की प्रत्येक काळी व प्रत्येक स्थळी ते आचरणात आणले जाऊ शकतात. यावरून हे सिद्ध होते, की पवित्र कुरआन हे संपूर्ण जगासाठी चिरकालीन आहे.

(६) आधीच्या प्रत्येक ग्रंथात सत्यनिष्ठा व सदाचाराच्या गोष्टींचे वर्णन केले गेले होते. चारित्र्य व न्यायीपणाची शिकवण दिली गेली होती. ईशइच्छेनुसार जीवनक्रम आचरण्याच्या पद्धती दर्शविण्यात आल्या होत्या. परंतु त्यापैकी एकही ग्रंथ असा नव्हता की त्यात वरील सर्व गोष्टी एकवटल्या असून त्यात कसलीही उणीव राहिलेली नाही. केवळ कुरआनचेच हे वैशिष्ट्य आहे की ज्या काही चांगल्या बाबी पूर्वीच्या ग्रंथात वेगवेगळ्या होत्या त्या सर्व यामध्ये एकवटल्या गेल्या आहेत. तसेच जी गुणवैशिष्ट्ये आधीच्या ग्रंथात राहून गेली होती ती सर्व कुरआनमध्ये समाविष्ट केली गेली आहेत.

(७) सर्व धार्मिक ग्रंथांमध्ये मानवी हस्तक्षेपामुळेच अशा गोष्टींची भेसळ झाली आहे जे वास्तविकतेच्या अगदी विरुद्ध आहे, तसेच बुद्धिविरुद्ध आहेत आणि अन्यायावर आधारित आहेत. मानवांची श्रद्धा व त्यांची कर्मे दोन्हीही गोष्टी या कारणाने दूषित होतात. इतकेच नव्हे तर कित्येक ग्रंथात अश्लील व लैंगिक गोष्टी तसेच व्यभिचाराच्या गोष्टीसुद्धा आढळतात. पवित्र कुरआन अशा सर्व गोष्टींपासून स्वच्छ व निर्मळ आहे. बुद्धीविरुद्ध एकही उल्लेख त्यात आढळत नाही. युक्तिवादाने वा अनुभवाने खोटी ठरविली जाऊ शकते असा एकही उल्लेख नाही. त्यातील कोणताही आदेश अन्यायपूर्ण नाही, त्यातील कोणतीही गोष्ट माणसाला पथभ्रष्ट करणारी नाही. त्यात अश्लीलतेचा व व्यभिचाराचा लवलेशही नाही. आरंभापासून शेवटपर्यंत संपूर्ण कुरआन म्हणजे उच्चकोटीचे ज्ञान, न्यायाची शिकवण, सरळ मार्गदर्शन, सर्वोत्तम नियम व आदेश यांचा समूह आहे.

हीच ती वैशिष्ट्ये होत ज्यांच्या आधारे जगातील समस्त जातीवंशांना असा उपदेश केला गेला आहे की त्यांनी कुरआनवर ईमान धारण करावे व अन्य सर्व ग्रंथांचा त्याग करून या एकमेव ग्रंथानुसारच आचरण व अनुकरण करावे. माणसाला ईशइच्छेनुसार जीवन व्यतीत करण्यासाठी उपदेश व मार्गदर्शनाची जेवढी आवश्यकता आहे ती सर्व या ग्रंथात उपलब्ध आहे. या ग्रंथाचे पृथ्वीवर आगमन झाल्यानंतर अन्य कोणत्याही ग्रंथाची गरजच उरलेली नाही.

कुरआन व इतर धर्मग्रंथ यामध्ये काय फरक आहे हे आता वाचकास कळून

चुकले आहे तर आता वाचक स्वत:च हे समजू शकतो की अन्य ग्रंथांवरील ईमान (श्रद्धा) व कुरआनवरील ईमान यामध्ये काय फरक आहे. आधीच्या ग्रंथांवरील ईमान ते ईशग्रंथ होते व सत्य होते आणि ज्या हेतूसाठी कुरआन अवतरले आहे त्याच हेतूच्या सिद्धीसाठी ते ग्रंथही अवतरले होते; हे सत्य आहे. कुरआनवरील ईमानची वास्तवता व दर्जा असा आहे की ती शुद्ध ईशवाणी आहे, निखालस सत्य आहे, त्यातील प्रत्येक शब्दन् शब्द सुरक्षित आहे, त्यातील प्रत्येक वचन खरे आहे, त्यातील प्रत्येक आदेशाचे पालन अनिवार्य आहे व त्याच्याविरुद्ध असणारी कोणतीही गोष्ट खंडनीय व रद्दबातल ठरण्यास पात्र आहे.

# पैगंबरांवरील ईमान

धर्मग्रंथानंतर आम्हाला अल्लाहच्या सर्व पैगंबरांवरही ईमान (दृढ श्रद्धा) धारण करण्याचा आदेश दिला गेला आहे.

मागील प्रकरणात आपण पाहिले आहे की अल्लाहने आपले पैगंबर जगातील सर्व जातीवंशांमध्ये पाठविले होते. त्या सर्वांनी त्याच इस्लामची शिकवण दिली होती जी अखिल मानवजातीला देण्यासाठी सरतेशेवटी पैगंबर मुहम्मद (स.) यांचे आगमन पृथ्वीवर झाले. या अर्थाने पाहिल्यास अल्लाहने पाठविलेले एकूण एक सर्व पैगंबरांचे एकच ध्येय होते. त्यापैकी एकालाही खोटे ठरविण्याचा कोणी प्रयत्न केला तर त्याने सर्व पैगंबरांना खोटे ठरविण्यासारखे आहे. पैगंबरांपैकी एकाची वास्तवता जर कोणी स्वीकारली तर एकूण सर्व पैगंबरांची वास्तवता स्वीकारणे त्याच्यावर आपोआपच अनिवार्य होते. अशी कल्पना करा की, दहाजणांनी एकच विधान केलेले आहे. त्यापैकी एकाला जर तुम्ही सत्य मानले तर आपोआपच उरलेल्या नऊ जणांनाही सत्य मानल्यासारखेच आहे. याउलट जर एकाला तुम्ही खोटे म्हटले तर त्याचा अर्थ असा निघतो की, त्याने केलेले विधानच खोटे आहे. त्या अनुषंगाने सर्व दहाजणही खोटे ठरतील. इस्लाममध्ये ज्यासाठी सर्व पैगंबरांवर ईमान धारण करणे अनिवार्य व आवश्यक आहे, त्याचे हेच कारण आहे. एखादी व्यक्ती कोणा एका पैगंबरावरही ईमान धारण करीत नाही, तर बाकीच्या पैगंबरांवर ईमान धारण करीत असली तरी ती 'अधर्मी' (श्रद्धाहीन) काफिरच ठरते.

काही उल्लेखांनुसार जगातील विविध जातीवंशांमध्ये जे पैगंबर पाठविले गेले आहेत त्यांची एकूण संख्या एक लक्ष चोवीस हजार आहे. जगात मानव कधी काळापासून आहे व किती जातीवंश आजपर्यंत होऊन गेले आहेत, याचा जर तुम्ही विचार केलात, तर ती संख्या फार मोठी असल्याचे वाटणार नाही. या सव्वा लाख पैगंबरांपैकी ज्यांच्या नावांचा कुरआनमध्ये उल्लेख आहे त्यांच्यावर तर स्पष्टपणे ईमान धारण करणे अगत्याचे आहे. उरलेल्या इतर पैगंबरांबाबत आम्हास केवळ अशी श्रद्धा बाळगण्याची शिकवण दिली गेली आहे की जे कोणी अल्लाहकडून त्याच्या दासांच्या मार्गदर्शनार्थ व उपदेश करण्यासाठी पाठविले गेले होते, ते सर्व सत्य होते. भारत, चीन, इराण, इजिप्त, आफ्रिका, युरोप व जगातील अन्य देशांमध्ये ज्या पैगंबरांचे आगमन झाले असेल, त्या सर्वांवर आम्ही ईमान (दृढ श्रद्धा) बाळगतो, परंतु एखाद्या विशिष्ठ व्यक्तीसंबंधी ती पैगंबर होती असे आम्ही म्हणू शकत नाही. तसेच ते पैगंबर नव्हते असेही आम्ही म्हणू

शकत नाही. कारण त्यासंबंधी आम्हाला काहीही सांगितले गेलेले नाही. खरेतर निरनिराळ्या धर्मांचे अनुयायी ज्यांना आपले पैगंबर व मार्गदर्शक मानतात, त्यांच्याविरुद्ध काही सांगणे आम्हाला उचित व इष्ट नाही. वास्तविकपणे ते पैगंबरच असावेत अशी दाट शक्यता आहे व त्यांच्या अनुयायांनी नंतरच्या काळात त्यांच्या शिकवणीत अनेक दोष निर्माण केले असतील. जसा आदरणीय मूसा (अ.) यांच्या व आदरणीय इसा (अ.) यांच्या अनुयायांनी बिघाड निर्माण केला. म्हणून आम्ही जे काही मतप्रदर्शन करू ते त्यांच्या धर्मासंबंधी त्यांच्या रूढीपरंपरासंबंधीच करू. परंतु पैगंबरांबद्दल आम्ही काहीही बोलणार नाही, जेणेकरून न जाणता, न समजता, एखाद्या पैगंबराचा अनादर व अवमान आमच्या हातून घडू नये.

या अर्थाने तर पूर्वीच्या पैगंबरांमध्ये व पैगंबर मुहम्मद (स.) मध्ये कसलाही फरक नसून त्यांच्याइतकेच पूर्वीचे पैगंबरसुद्धा वास्तवच होते. अल्लाहकडूनच पाठविले गेलेले होते; ते सर्व इस्लामचा सरळमार्ग दाखविणारेच होते आणि त्या सर्वांवर दृढ श्रद्धा (ईमान) धारण करण्याचा आम्हाला आदेश दिला गेला आहे. परंतु या सर्व बाबतीत सारखेपणा असूनसुद्धा पैगंबर मुहम्मद (स.) मध्ये व अन्य पैगंबरांमध्ये तीन गोष्टींचा स्पष्ट फरकही आहे, तो खालीलप्रमाणे :

(१) आधीचे सर्व पैगंबर विशिष्ट काळासाठी व विशिष्ट जातीवंशापुरतेच होते, परंतु पैगंबर मुहम्मद (स.) हे संपूर्ण जगासाठी सार्वकालिक तसेच अखिल मानवजातीसाठी पैगंबर बनवून पाठविले गेले आहेत. मागच्या प्रकरणात आम्ही विवरणासहित याविषयी वर्णन केले आहे.

(२) आधीच्या पैगंबरांनी दिलेली शिकवण जगातून पूर्णत: नष्ट झालेली आहे अथवा थोड्याफार प्रमाणात शिल्लक असली तरी तिचे निर्भेळ स्वरूप मुळीच उरलेले नाही. त्याचप्रमाणे त्यांच्या जीवनासंबंधी खरीखुरी माहितीसुद्धा आज जगात कोठेच सापडत नाही. उलट त्या माहितीवर कथानकांचे थरांवर थर चढले आहेत. या स्थितीत जर एखाद्याने त्यांचे अनुकरण करण्याचे ठरविले तरीही त्याला तसे करणे आज शक्य नाही. याउलट पैगंबर मुहम्मद (स.) यांनी दिलेली शिकवण, त्यांचे पवित्र जीवनचरित्र, त्यांचे तोंडी आदेश व उपदेश, त्यांच्या आचारांच्या पद्धती, त्यांचे संस्कार, सवयी व गुणवैशिष्ट्ये किंबहुना त्यांच्यासंबंधीची सर्व माहितीची साधने आज जगामध्ये सुरक्षित आहेत. म्हणूनच वास्तविकपणे सर्व पैगंबरांमध्ये पैगंबर मुहम्मद (स.) आपल्या शिकवणुकीच्या रूपाने अमर आहेत.

केवळ त्यांचेच अनुयायित्व व अनुकरण करणे शक्य आहे.

(३) आधीच्या पैगंबरांकरवी इस्लामची जी शिकवण दिली गेली होती, ती काही परिपूर्ण नव्हती. प्रत्येक पैगंबरानंतर दुसरा पैगंबर येऊन त्याने आधीच्या आदेश, उपदेशात, नियमात फेरबदल व कमीजास्तपणा केला आणि अशा प्रकारे प्रगती व सुधारणेचे कार्य सतत पुढे चालू राहिले होते. म्हणूनच तो काळ निघून गेल्यानंतर त्या पैगंबरांची शिकवण अल्लाहने सुरक्षितपणे टिकवून ठेवली नाही. कारण प्रत्येक परिपूर्ण शिकवणीनंतर त्याआधीच्या अपूर्ण व अर्धवट शिकवणीची गरज उरलेली नव्हती. शेवटी पैगंबर मुहम्मद (स.) यांच्याद्वारा इस्लामची अशी शिकवण देण्यात आली जी सर्वच दृष्टीने परिपूर्ण होती. त्यानंतर आधीच्या सर्व पैगंबरांच्या शिकवणी आपोआपच रद्दबातल झाल्या. कारण परिपूर्ण शिकवण सोडून देऊन अपूर्ण शिकवणीनुसार आचरण करणे हे बुद्धिविरुद्ध ठरते. ज्याने पैगंबर मुहम्मद (स.) यांचे अनुयायित्व पत्करले त्याने आधीच्या सर्व पैगंबरांचे अनुयायीत्व केल्यासारखेच आहे. कारण त्या सर्व पैगंबरांच्या शिकवणीत जो काही चांगुलपणा होता तो पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या शिकवणीत एकवटलेला आहे. तसेच जो कोणी पैगंबर मुहम्मद (स.) यांची शिकवण सोडून आधीच्या एखाद्या पैगंबराचे अनुयायीत्व करील तर तो पुष्कळशा चांगुलपणापासून वंचित राहतो, कारण नंतरच्या शिकवणीत समाविष्ट असलेला भलेपणा (कल्याणकारकता) आधीच्या शिकवणुकीत नव्हता.

या सर्व कारणांमुळे जगातील समस्त मानवजातीला पैगंबर मुहम्मद (स.) यांचे अनुयायीत्व पत्करणे अगत्याचे ठरते. मुस्लिम (आज्ञाधारक) होण्यासाठी, पैगंबर मुहम्मद (स.) यांच्यावर तीन दृष्टीने ईमान (दृढ श्रद्धा) धारण करणे आवश्यक आहे.

(१) ते अल्लाहचे सच्चे पैगंबर आहेत.

(२) त्यांनी दिलेली शिकवण परिपूर्ण आहे, कोणताही दोष वा उणीव यापासून ती निर्मळ आहे.

(३) ते अल्लाहचे शेवटचे पैगंबर आहेत. त्यांच्यानंतर कोणाही पैगंबरांचे कोणत्याही जातीवंशासाठी कयामत (निवाड्याचा दिवस) पर्यंत आता पृथ्वीवर आगमन होणार नाही. तसेच मुस्लिम (आज्ञाधारक) होण्यासाठी ज्याच्यावर ईमान धारण करणे आवश्यक असेल; अशा एखाद्या व्यक्तीचेही आता आगमन होणार नाही की त्याला न मानल्याने एखादा मनुष्य अधर्मी (काफिर) ठरेल.

# पारलौकिक जीवनावर ईमान

पैगंबर मुहम्मद (स.) यांनी ईमान धारण करण्यासाठी शिकवण दिली, त्यापैकी पाचवी शिकवण म्हणजे पारलौकिक जीवना (आखिरत) वरील दृढ श्रद्धा होय. पारलौकिक जीवनासंबंधी ज्या गोष्टीवर श्रद्धा बाळगणे अगत्याचे आहे, त्या खालीलप्रमाणे,

(१) एके दिवशी अल्लाह सर्व सृष्टीला, त्याने निर्मिलेल्या एकूण प्राणिमात्राला व वस्तूमात्राला नष्ट करून टाकील. त्या दिवसाला 'कयामत' (प्रलयकाळ) असे नाव आहे.

(२) नंतर तो सर्वांना पुन्हा जिवंत करून दुसरे जीवन प्रदान करील. सर्वजण एके ठिकाणी अल्लाहसमोर आणले जातील. त्या दिवसाला 'हश्र' असे नाव आहे.

(३) प्रत्येक माणसाने या जगातील जीवनात केलेल्या एकूण कर्माची नोंद असलेले दप्तर (अभिलेख) ईशन्यायालयात सादर केले जाईल.

(४) अल्लाह प्रत्येक माणसाच्या पाप-पुण्याचे तंतोतंत मूल्यमापन करील. ईशतराजूत ज्याचे पुण्यकर्माचे पारडे पापकृत्याच्या पारड्यापेक्षा अधिक जड असेल त्याला क्षमा केली जाईल. उलट ज्याचे पापकृत्याचे पारडे, अधिक जड असेल त्याला शिक्षा होईल.

(५) जे क्षमेस पात्र ठरतील, ते जन्नत (स्वर्गलोक) मध्ये प्रवेश करतील व जे शिक्षेस पात्र ठरतील त्यांना 'जहन्नम' (नरकाग्नी) मध्ये झोकून दिले जाईल.

# पारलौकिक जीवनावर ईमान व त्याची गरज

पारलौकिक जीवनावरील ही श्रद्धा जशी पैगंबर मुहम्मद (स.) यांनी सादर केली आहे, तशीच ती आधीच्या सर्व पैगंबरांनीही केली होती. प्रत्येक काळात ती श्रद्धा निष्ठापूर्वक बाळगणे मुस्लिम होण्यासाठी एक आवश्यक अट राहिली आहे. या श्रद्धेचा ज्यांनी इन्कार केला अथवा तिच्याबद्दल संशय बाळगला, त्याला आधीच्या सर्व पैगंबरांनी काफिर (अधर्मी) ठरविले आहे. कारण अशा श्रद्धेविना अल्लाहस, त्याच्या ग्रंथास व त्याच्या पैगंबरांस मानणे अगदी अर्थहीन ठरते आणि माणसाचे संपूर्ण जीवन बिघडून जाते. अंतर्मुख होऊन चिंतन केल्यास ही गोष्ट तुमच्या चटकन लक्षात येईल. एखादे कृत्य करण्यास तुम्हास सांगितले जाते तेव्हा, ते कृत्य केल्याने कोणते हित प्राप्त होईल व ते टाळल्यास काय हानी होईल? असा पहिला प्रश्न तुमच्या मनात का उद्‌भवतो? त्याचे वास्तविक कारण असे आहे की माणसाचा उपजत स्वभावधर्म असा आहे की ज्या कृत्यापासून काहीच निष्पन्न होत नाही, असे कृत्य त्याला निरर्थक वाटते. जे केल्याने कसलाही लाभ वा हित साधणार नाही अशी तुमची खात्री असल्यास, ते कृत्य करण्यास तुम्ही कधीही प्रवृत्त होणार नाही. त्याचप्रमाणे ज्यापासून कसलीही हानी नाही, असे ठामपणे वाटल्यास तशा गोष्टीचे पथ्य पाळण्यासही तुम्ही तयार होणार नाही. अशीच अवस्था संशयाबद्दलही असते. ज्या कृत्याचे फळ प्राप्त होणे अनिश्चित असेल ते करण्यास तुम्हाला स्वारस्य वाटणार नाही. तसेच एखादे कृत्य हानिकारक असण्याबद्दल शंका असेल तर त्यापासून अलिप्त राहाण्यास तुम्ही विशेष प्रयास करणार नाही. लहान मुलांवर नजर टाका. ते विस्तवाला का धरतात? विस्तव जाळणारी, भाजणारी वस्तू आहे या गोष्टीची खात्री त्यांच्या मनावर उमटलेली नसते. एवढ्याचसाठीच ते असे करतात. ते विद्यार्जनाचे कष्ट का चुकवीत असतात? त्यांची वडीलधारी माणसे विद्येची जी महती व तिचे जे काही फायदे त्यांना सांगत असतात, ते सर्व त्यांच्या मनात पटत नाहीत. याचसाठी ते असे वागतात. यावरूनच असा विचार करा की जी व्यक्ती पारलौकिक जीवनावर श्रद्धा बाळगत नसेल तर ती ईशइच्छेला व त्यानुसार आचरणाला निरर्थक व निष्फळ मानते. तिच्या दृष्टीनुसार ईशआज्ञापालनाचा कोणताही लाभ नाही. तसेच अल्लाहची अवज्ञा केल्यास कसलीही हानी होणारी नसते. मग अल्लाहने आपल्या पैगंबरांकरवी व आपल्या ग्रंथाद्वारा दिलेले आदेश व आज्ञा यांचे पालन करणे त्याला कसे शक्य आहे? समजा, त्याने अल्लाहचे अस्तित्व मान्यही केले तरी असे मानणे व्यर्थ असेल कारण तो अल्लाहच्या आज्ञांचे पालन करणार नाही व तो ईशइच्छेनुसार आचरण

करणार नाही.

परंतु ही बाब येथेच संपत नाही. आणखी जरा विचार केलात तर तुम्हाला हे कळून चुकेल की, पारलौकिक जीवनावरील श्रद्धा बाळगणे किंवा न बाळगणे या गोष्टीचा मनुष्य जीवनावर अत्यंत निर्णायक ठसा उमटतो. आम्ही वर सांगितलेच आहे की, मनुष्यस्वभावधर्मच असा आहे की, तो कोणतेही कृत्य करण्याचा किंवा न करण्याचा निर्णय त्या कृत्याच्या लाभ वा हानीच्या दृष्टीने करीत असतो. एक मनुष्य असा आहे की, त्याची दृष्टी केवळ या जगातील लाभावर व हानीवर खिळलेली आहे. तो असे कोणतेही सत्कृत्य व पुण्यकर्म करण्यास प्रवृत्त होणार नाही ज्यापासून या जगात कसलाही लाभ होण्याची आशा नाही. त्याचप्रमाणे असे दुष्कृत्य व पापकर्म करण्यापासूनही परावृत्त होणार नाही ज्यामुळे त्याला या जगात कसलीही हानी होण्याची भीती नाही. आता दुसरा एक असा मनुष्य घ्या, ज्याची दृष्टी आपल्या कृत्यांच्या व कर्माच्या अंतिम परिणामांवर खिळलेली आहे. तो या जगातील लाभ व हानी यांना क्षणिक मानील व पारलौकिक जीवनातील चिरकाल स्वरूपाच्या हितांवर व हानीवर सतत दृष्टी ठेवून सन्मार्गाचा स्वीकार करील व कुमार्गाचा त्याग करील. या नश्वर जगात, सन्मार्ग अनुसरल्याने कितीही मोठे नुकसान झाले अगर कुमार्गाने कितीही मोठा लाभ होणार असेल तरी तो अविचल राहील. या दोन व्यक्तीत किती मोठा फरक पडला ते पाहा. एक मनुष्य सत्कृत्य या गोष्टीला मानतो की, या अल्प जीवनकाळात त्याचे फळ त्याला येथेच मिळते. उदा. धनप्राप्ती, जमीनजुमला मिळणे, हुद्दा व अधिकारप्राप्ती, नावलौकिक मिळणे, जनमाणसात कौतुक व प्रशंसा होणे व त्यामुळे समाधानाचा आस्वाद व आनंद प्राप्त होणे, तसेच इच्छावासनाची तृप्ती, पाशवी प्रवृत्ती तृप्त होणे इ. तसेच असा मनुष्य दुष्कृत्य व कुकर्म अशाच कृत्याला मानील ज्याच्यामुळे कोणतीही हानी अगर दुष्परिणाम याच जीवनात घडून येतील किंवा घडून येण्याचा संभव असेल. उदा. जीवित व वित्त हानी, आरोग्य नष्ट होणे, अपकीर्ति, शासनाकडून होणाऱ्या शिक्षा, कोणत्याही प्रकारचा त्रास, दुःख अगर औदासिन्य प्राप्त होणे वगैरे.

याच्या तुलनेत दुसरा मनुष्य सत्कर्म अशा गोष्टीस मानतो, जे केल्याने अल्लाहची प्रसन्नता प्राप्त होते व दुष्कृत्य म्हणजे जे केल्याने अल्लाहची अप्रसन्नता व कोप होतो. सत्कृत्य केल्याने त्याला या जगात कसलाही लाभ प्राप्त होत नसला व उलट त्याला अधिकाधिक हानीच होत गेली, तरी असा मनुष्य सत्कृत्याला सत्कृत्यच मानतो. तो अशी दृढ श्रद्धा बाळगून असतो की, सरतेशेवटी परमकृपाळू अल्लाह त्याला चिरकाल

टिकणारा लाभ प्रदान करीलच. त्याचप्रमाणे दुष्कृत्य करून या जगात कसलीही हानी अथवा नुकसान होणार नसेल किंवा तसे होण्याचा धोकाही नसला, उलट त्यापासून उघड उघड लाभच दृष्टीस पडत असेल तरी असा मनुष्य दुष्कृत्याला दुष्कृत्यच मानतो. तो अशी दृढश्रद्धा बाळगतो की, मी या क्षणभंगूर जगातील जीवनकाळात कसलीही शिक्षा होण्यापासून वाचलो व काही काळ जरी आनंद भोगला तरी सरतेशेवटी ईशकोपापासून माझी कदापि सुटका होणार नाही.

हे दोन भिन्न विचार असून त्यांच्या प्रभावाने माणसे दोन वेगवेगळे मार्ग अनुसरतात. जी व्यक्ती पारलौकिक जीवनावर दृढ श्रद्धा बाळगत नाही तिला हे कदापिही शक्य होणार नाही की, इस्लामच्या जीवनपद्धतीने ती एक पाऊलही टाकू शकेल.

अशा वेळी इस्लाम सांगतो, ‘‘असहाय व गांजलेल्यांना ईशमार्गात ‘जकात’-दान द्या.’’

या विचारप्रणालीचा विरोधी मनुष्य म्हणतो, ‘‘दान केल्याने माझे धन कमी होईल. मी तर माझ्या पैशाचे पुरेपूर व्याज मिळवीन व व्याजापोटी जप्ती, हुकूमनामे मिळवून गोरगरीबांच्या संसारातील लहानसहान वस्तूंचाही लिलाव करीन.’’

इस्लामचे सांगणे आहे, ‘‘नेहमी खरे बोला व असत्यापासून दूर राहा, मग सत्य बोलल्याने केवढेही नुकसान होवो किंवा असत्य बोलल्याने कितीही मोठा लाभ होवो.’’

या विचारधारणेचा विरोधी मनुष्य उत्तरतो, ‘‘नुसत्या सत्याला घेऊन मी काय करू ज्यामुळे माझा केवळ तोटाच होतो, नफा मात्र काहीच नसतो. तसेच अशा असत्यापासून मी काय म्हणून परावृत्त व्हावे, जे लाभकारक असेल व ज्यात अपकीर्तिचा कोणताही धोका असणार नाही?’’

तो एखाद्या निर्जन मार्गाने जात असतो, तेव्हा एखादी बहुमूल्य वस्तू रस्त्यात पडलेली दृष्टीस पडते.

अशा वेळी इस्लाम म्हणतो, ‘‘ती काही तुझी मालमत्ता नाही, म्हणून ती तू कदापिही घेऊ नये.’’

हा मनुष्य म्हणतो, ‘‘फुकटात मिळत असलेली वस्तू मी काय म्हणून सोडून द्यावी? येथे कोणीही पाहात नाही व पोलिसांना वर्दी देणारा नाही अगर कोर्टात साक्ष देऊन माझी बदनामी करू शकेल असाही कोणी नाही. मग त्या वस्तूचा मी काय म्हणून लाभ घेऊ नये?’’

एखादी व्यक्ती गुप्तपणे अशा माणसाजवळ एखादी रक्कम ठेव म्हणून ठेवते व मरण पावते.

अशा परिस्थितीत इस्लामचे सांगणे आहे, ‘‘कोणाच्याही ठेवींचा अपहार करू नका. ती ठेव त्याच्या संततीला परत करून टाका.’’

हा मनुष्य म्हणतो की, ‘‘काय म्हणून मी असे करावे? निधन पावलेल्या व्यक्तीची ठेव माझ्याजवळ आहे असे सिद्ध करणारा कसलाही पुरावा नाही अथवा कोणी साक्षीदारही नाही, खुद्द त्याच्या मुलाबाळांनाच ती गोष्ट ठाऊक नाही, ती ठेव जर मी विनासायास गिळंकृत करून पचवू शकतो व कसल्याही दाव्याची अथवा बदनामीचाही धोका नाही, तर मी ती ठेव काय म्हणून पचवू नये?’’

तात्पर्य असे की, जीवनमार्गात पावलोपावली इस्लाम त्याला एका जीवनपद्धतीने आचरण करण्याचा आदेश देईल व असा मनुष्य नेमका त्याविरुद्ध मार्ग अनुसरेल. त्याचे कारण असे की इस्लाममध्ये प्रत्येक गोष्टीचे मूल्यमापन पारलौकिक जीवनातील चिरकालच्या लाभहानीच्या परिणामाच्या दृष्टीने होते, परंतु हा मनुष्य प्रत्येक बाबतीत या जगातील क्षणभंगूर जीवनकाळात प्राप्त होणाऱ्या परिणामावर दृष्टी ठेवून असतो.

आता तुमच्या हे लक्षात आलेच असेल की, पारलौकिक जीवनावर दृढ श्रद्धा धारण केल्याविना मनुष्य मुस्लिम का होऊ शकत नाही. मुस्लिम होणे तर फार मोठी गोष्ट आहे. परंतु सत्य तर असे आहे की, पारलौकिक जीवनाचा इन्कार माणसाचे मानवतेपासून अध:पतन करून त्याला पशूपेक्षाही खालच्या दर्जावर नेऊन सोडतो.

# पारलौकिक जीवनावरील ईमानची सत्यता

पारलौकिक जीवनावरील श्रद्धेची आवश्यकता व तिचे फायदे आपणास कळले. आता आपण संक्षिप्तपणे हे पाहू या की, पैगंबर मुहम्मद (स.) यांनी पारलौकिक जीवनावरील श्रद्धेचे जे वर्णन केलेले आहे, तीच गोष्ट बुद्धिप्रामाण्यावरही खरी असल्याचे दिसून येते. खरे तर आमची ही श्रद्धा केवळ पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या विश्वासार्हतेवर आधारलेली असून ती बुद्धिप्रामाण्यावर आधारलेली नाही. तरी आम्ही जेव्हा विचार व चिंतन करतो तेव्हा, पारलौकिक जीवनाच्या संदर्भात अन्य सर्व श्रद्धांपेक्षा हीच श्रद्धा बुद्धीनुसार असल्याचे आढळून येते.

पारलौकिक जीवनासंबंधी आज जगामध्ये तीन वेगवेगळ्या प्रकारच्या विचारप्रणाली व श्रद्धा असल्याचे आढळून येतात.

१) एक समूह असे म्हणतो की, मृत्यूनंतर मनुष्य नाश पावतो. त्यानंतर कसलेही जीवन नाही. अशी विचारधारणा नास्तिकांची आहे व ते स्वत: विज्ञाननिष्ठ असल्याचा दावा करतात.

२) दुसरा समूह असे सांगतो की मनुष्य त्याच्या कर्माची फळे भोगण्यासाठी पुन्हा पुन्हा या जगात जन्म घेत असतो. या जन्मात त्याने कुकर्मे केली तर पुढच्या जन्मात एखाद्या पशूचा जन्म घेतो. उदा. कुत्रा, मांजर. वगैरे अथवा वृक्षाच्या वा एखाद्या शूद्रातिशूद्र माणसाचा जन्म घेतो. याउलट सत्कर्मे केली असतील तर अधिक उच्च व श्रेष्ठ श्रेणीत तो जन्म घेतो. अशी श्रद्धा बहुतेक करून अपरिपक्व धर्मामध्ये असलेली आढळते.

३) तिसरा समूह 'कयामत' (प्रलयकाळ), 'हश्र्' (पुनरुज्जीवन) व ईशन्यायालयात हजेरी, तसेच ईशपुरस्कार व शिक्षा या बाबींवर ईमान बाळगतो. हीच श्रद्धा (भौतिक धारणा) सर्व पैगंबरांची होती व त्याबद्दल त्यांच्यात कसलेही दुमत नव्हते.

आता पहिल्या समूहाच्या श्रद्धेबद्दल थोडा विचार करू या. या लोकांचे असे म्हणणे आहे की, मृत्यूनंतर कोणीही पुन्हा जिवंत झाल्याचे आम्ही पाहिले नाही. जो मृत्यू पावतो तो मातीत मिसळून जाऊन नष्ट होतो, एवढेच आम्हाला दिसते. म्हणून मृत्यूपश्चात कोणतेही जीवन नाही. परंतु जरा विचार करून पाहा. हा काय युक्तिवाद झाला? मृत्यूनंतर कोणी जिवंत झाल्याचे तुम्ही पाहिले नाही तर जास्तीतजास्त तुम्ही असे म्हणू शकता की, ''मरणोत्तर काय होणार ते आम्ही जाणत नाही.'' यापुढे जाऊन तुम्ही जो असा दावा

करता की, ‘‘आम्ही हे जाणतो की मरणोत्तर काहीही होणार नाही.’’ याला तुमच्याजवळ कोणता आधार अथवा पुरावा आहे? एखाद्या अडाणी माणसाने जर विमान पाहिले नसेल तर तो म्हणू शकतो की, ‘‘विमान कसले असते, हे मला ठाऊक नाही.’’ परंतु जेव्हा तो म्हणतो की, ‘‘विमान ही कोणतीही वस्तू मुळातच नाही, हे मी जाणतो.’’ तर कोणताही शहाणा मनुष्य त्याला मूर्ख म्हणेल. याचे कारण असे की त्याने एखादी वस्तू डोळ्यांनी पाहिली नसेल तरी तो असा दावा करू शकत नाही की त्या वस्तूचे मुळातच अस्तित्व नाही अथवा ती असू शकतच नाही.

यानंतर दुसऱ्या श्रद्धेबद्दल चिंतन करू या. या श्रद्धेचा सार असा आहे की आज जी व्यक्ती मनुष्याच्या रूपात दिसते, तिने मनुष्याचे रूप एवढ्यासाठीच प्राप्त केले की जेव्हा तो प्राणीरूपात होता तेव्हा त्याने सदाचार करून पुण्यसंचय केला होता. तसेच आज जो पशूरूपात दिसतो तो त्या पशूरूपात केवळ यासाठीच गेला की, मनुष्यरूपात असताना त्याने दुराचार व दुष्कृत्ये करून पापसंचय केला होता. दुसऱ्या शब्दांत सांगायचे तर मनुष्यजन्म, पशूयोनी किंवा वृक्षजन्म वगैरे सर्व काही पूर्वजन्मातील कर्मांचे फळ होय.

आता प्रश्न असा उद्‌भवतो की सर्वांत आरंभी आत्म्याचे रूप कोणते होते? आरंभी मानवजन्म होता असे म्हटले तर त्या अगोदर पशू अथवा वृक्षरूप होते असे मानावे लागेल. मानवीरूप जे मिळाले ते कोणत्या सत्कर्माचे फळ म्हणून? आरंभीच आत्म्याचे रूप पशूचे अगर वृक्षाचे होते. असे म्हटले तर त्यापूर्वी मानवीरूप होते हे मान्य करावे लागेल. तसे न मानल्यास प्रश्न असा उद्‌भवतो की पशूचा जन्म अथवा वृक्षाचे रूप त्याला कोणत्या दुष्कर्माची शिक्षा म्हणून प्राप्त झाले? तात्पर्य असे की ही श्रद्धा मानणारे लोक ब्रह्मांडातील निर्मित वस्तुच्या उत्पत्तीचा प्रारंभ कोणत्याही रूपातून झाल्याचे ठरवू शकत नाहीत. त्याचे कारण असे की प्रत्येक जन्माआधी पूर्वीचा जन्म असणे आवश्यक ठरते जेणेकरून नंतरचा जन्म म्हणजे पूर्वीच्या जन्मातील कर्मांचे फळ म्हणून ठरविले जावे. ही गोष्ट स्पष्टपणे बुद्धिविरुद्ध आहे.

१) आता तिसऱ्या प्रकारची श्रद्धा पाहा. सर्वप्रथम तिच्यात असे वर्णिले गेले आहे की, ‘‘एके दिवशी ‘कयामत’ येईल व विश्वनिर्माता अल्लाह ही सृष्टी नष्ट करून टाकील आणि मुळापासून एका उच्चश्रेणीची व चिरकाल टिकणारी अशी नवी व्यवस्था प्रस्थापित करील. ही गोष्ट इतकी ठाम आहे की, तिच्या खरेपणाबद्दल यत्किंचितही संशय अथवा शंका बाळगण्यास वाव नाही. विश्वातील व्यवस्थेबद्दल जितके अधिक चिंतन करावे तितकेच जास्त प्रमाणात या गोष्टीचा पुरावा मिळतो

की, ही एकूण व्यवस्था चिरकाल टिकणारी व अनंत नाही. कारण असे की, ज्या काही शक्ती या व्यवस्थेमध्ये कार्यरत आहेत त्या सर्वांनाच मर्यादा असून त्या एके दिवशी संपणे अगदी निश्चित आहे. म्हणूनच सर्व वैज्ञानिकांचे व शास्त्रज्ञांचे असे एकमत झालेले आहे की एके दिवशी सूर्याची उष्णता व प्रकाश पूर्णपणे लोप पावून तो थंड पडेल. ग्रह तसेच तारे एकमेकांवर आदळतील व ही संपूर्ण सृष्टी नष्ट होईल.

२) या श्रद्धेतील दुसरी बाब अशी सांगितली गेली आहे की, ''सर्व मनुष्यांना मरणोत्तर पुन्हा एकदा जिवंत केले जाईल.'' हे एक असे सत्य आहे ज्याचे घडण्यात कसलीही शंका घेण्यास वाव नाही. तरी हे शक्य आहे काय? तशी गोष्ट घडणे जर अशक्य मानले तर मनुष्याला लाभलेले हे प्रस्तुत जीवन कसे शक्य झाले? ज्या अल्लाहने मनुष्याला या जगात जन्म प्रदान केला आहे, तो पारलौकिक जीवनाच्या नवीन व्यवस्थेमध्येही त्याला जन्माला घालू शकतो, हे अगदी उघड आहे.

३) तिसरी बाब अशी की, ''मनुष्याने या जगातील जीवनकाळात जे आचरण केले आहे, जी सत्कर्मे व कुकर्मे केली आहेत त्या सर्वांची इत्यंभूत नोंद केली गेली असून ती जपून ठेवण्यात आली आहे व त्या नोंदीचे दप्तर पुनरुत्थानाच्या दिवशी हजर केले जाईल.'' या गोष्टीचा पुरावा आज या जगातही आम्हाला प्राप्त होत आहे. पूर्वीच्या काळी असा एक समज होता की आपल्या मुखातून जो ध्वनी बाहेर पडतो तो हवेत थोड्याशा लहरी निर्माण करून कायमचा नष्ट होतो. परंतु वैज्ञानिक संशोधनाने आता असे कळून चुकले आहे की प्रत्येक ध्वनी सभोवतालच्या वस्तूंवर त्याचा कायमचा ठसा उमटून मागे सोडतो व तो ठसा पुनर्ध्वनित केला जाऊ शकतो. म्हणून याच तत्त्वावर ग्रामोफोनची तबकडी निर्माण करण्यात आली आहे. यावरूनच हेही कळून चुकते की सभोवताली असलेल्या ज्या चराचर वस्तूंवर ध्वनिलहरी आदळत आहेत, त्या सर्व वस्तूंवर तुमच्या प्रत्येक कृतीचा ठसा उमटत आहे. वस्तुस्थिती जर अशी आहे की तुमच्या सर्व कृत्यांच्या नोंदीचे दप्तर व्यवस्थितपणे जपून ठेवले गेले आहे आणि पुराव्यादाखल ते पुन्हा सादर केले जाऊ शकते. तर ही गोष्ट अगदी खात्रीपूर्वक व निश्चित असल्याचे उमगते.

४) चौथी बाब अशी की, ''अल्लाह पुनरुत्थानाच्या दिवशी काटेकोर न्यायाने तुम्हाला

सत्कर्माची फळे तसेच कुकर्माची शिक्षा देईल.'' हे अशक्य असल्याचे कोण म्हणू शकतो? यातील काय काम बुद्धीविरुद्ध आहे? सारासार बुद्धी व विचारशक्ती तर असेच इच्छिते की, ''एकदा कधीतरी ईशन्यायालय भरायला हवे व काटेकोर न्यायपद्धतीने सर्व कर्मांचा न्यायानिवाडा व्हायला हवा. कोणीतरी एखादी व्यक्ती सत्कर्मे करते व त्याचा कोणताही मोबदला त्या व्यक्तीला या जगात प्राप्त होत नाही, असे आम्ही डोळ्यांनी पाहतो. दुसरी एखादी व्यक्ती अनेक कुकर्मे करीत असते तरी त्यापासून त्या व्यक्तीला कसलीही हानी या जगात भोगावी लागत नाही, हेही आपण डोळ्यांनी पाहात असतो. इतकेच नव्हे तर अशीसुद्धा सहस्त्रावधी उदाहरणे पाहातो की एखाद्याने सत्कर्म करून उलट त्याचा तोटाच होत असतो. त्या उलट दुसरा एखादा कुकर्मे करूनही मौजमजा लुटत जगत असतो. असे प्रकार पाहिल्यानंतर सारासार विचारशक्तीची अशी इच्छा व अपेक्षा असते की सदाचारी माणसाला त्याच्या सत्कर्माची व दुराचारी माणसाला त्याच्या कुकर्माची फळे मिळणे अगदी अगत्याचे व आवश्यक आहे.

५) या श्रद्धेमधील शेवटची बाब स्वर्ग (जन्नत) व नरकाग्नी (जहन्नम) यांच्या अस्तित्वाची सत्यताही अशक्य नाही. विश्वनिर्माता 'अल्लाह' सूर्य, चंद्र, पृथ्वी, मंगळ वगैरे निर्माण करू शकतो तर 'जन्नत' व 'जहन्नम' त्याने निर्माण न करण्याला कोणती कारणे आहेत? तो जर न्यायनिवाडा करणार व मानवांना सत्कर्माची योग्य फळे व कुकर्माची शिक्षा देणार आहे तर बक्षीसाची फळे प्राप्त करण्यासाठी प्रतिष्ठादायक आनंद व आस्वाददायक स्थान असणे क्रमप्राप्त आहे व शिक्षा भोगण्यासाठी अवमानजनक तसेच दु:ख व क्लेशदायक ठिकाणही असणे अगत्याचे आहे.

या सर्व बाबींचा जेव्हा तुम्ही खोल विचार व चिंतन कराल तर तुमची बुद्धीच तुम्हाला अशी ग्वाही देईल की मनुष्यांच्या अंतिम परिणामाच्या संदर्भात जितक्या वेगवेगळ्या श्रद्धा जगात आढळतात, त्यापैकी मनाला पूर्णपणे पटणारी अशी केवळ हीच श्रद्धा असून तिच्यात कोणतीही गोष्ट बुद्धीविरुद्ध किंवा अशक्यप्राय नाही.

जेव्हा पैगंबर मुहम्मद (स.) यांच्यासारख्या सच्चा पैगंबराने हे सांगितले आहे आणि त्यात सर्वस्वी तुमचेच हित व कल्याण आहे, तर त्यावर दृढ विश्वास बाळगणे क्रमप्राप्त ठरते आणि कसल्याही युक्तिवादाविना व आधाराविना तिच्याबद्दल शंका बाळगू नये, यातच शहाणपणा आहे.

# इष्ट मंगलमय वचन (कल्म-ए-तय्यबा)

अशा या पाच[१] श्रद्धा (मौलिक धारणा) आहेत, ज्यांच्यावर इस्लामचा पाया आधारलेला आहे. या पाचही श्रद्धांचे विवरण या एका वचनातच सामावलेले आहे ते वचन म्हणजे,

''ला इलाहा इल्लल्लाह मुहम्मदुर्रसूलुल्लाह'' (अल्लाहखेरीज कोणीही आज्ञापालनास व उपासनेस पात्र नाही. मुहम्मद (स.) हे अल्लाहचे पैगंबर आहेत.)

मुखातून जेव्हा तुम्ही 'ला इलाहा इल्लल्लाह' (अल्लाहखेरीज कोणीही ईश्वर नाही) उच्चारता तेव्हा एकूण सर्व खोट्या उपास्यांचा व नियंत्यांचा त्याग करून केवळ एकाच अल्लाहचे दास्यत्व पत्करल्याचा तुम्ही कबुलीजबाब देत असता. तसेच तुम्ही 'मुहम्मदुर्रसूलुल्लाह' म्हणता तेव्हा पैगंबर मुहम्मद (स.) हे अल्लाहचे पैगंबर आहेत, या गोष्टीच्या सत्यतेबद्दल तुम्ही कबुली देत असता. पैगंबरत्वाची कबुली दिल्यानंतर ही गोष्ट तुम्हांवर आपोआपच अनिवार्य ठरते की, तुम्ही ईशत्वासंबंधी ईशसत्ता व अल्लाहच्या गुणवत्तेसंबंधी, त्याच्या 'फरिश्त्या' (दूता) संबंधी, ईशग्रंथासंबंधी, अल्लाहच्या सर्व पैगंबरांसंबंधी, तसेच 'आखिरत' (पारलौकिक जीवन) संबंधी, जी शिकवण मुहम्मद (स.) यांनी दिलेली आहे, त्यावर अंत:करणापासून व निष्ठापूर्वक श्रद्धा (ईमान) बाळगावी. अल्लाहच्या आज्ञांचे पालन करण्याची व उपासनेची जी पद्धत (पैगंबर (स.) यांनी) दाखवून दिली त्यानुसार आचरण करावे, हे तुम्हावर अनिवार्य ठरते.

---

१) हे सूरह अल् बकरा, आयत २८५, सूरह अन्निसा आयत १३६ वर आधारित आहेत. यात शंका नाही की 'हदीस'मध्ये 'तकदीर'लासुद्धा श्रद्धेत (ईमान) सामील केले आहे आणि अशा प्रकारे मौलिक श्रद्धा पाचऐवजी सहा होतात. खरे तर 'तकदीर'वर ईमान धारण करणे अल्लाहवर ईमान धारण करण्याचाच भाग आहे आणि कुरआनमध्ये याचा उल्लेख याचसाठी आला आहे. म्हणून या धारणेला मी एकेश्वरत्वाच्या व्याख्येतच समाविष्ट केले आहे. याच प्रकारे हदीसमध्ये जन्नत, जहन्नुम, पुलसिरात व मिजानला वेगवेगळ्या धारणा म्हणून उल्लेखले आहे. खरे तर हे सर्व पारलौकिक जीवनावर ईमान धारण करण्याचाच भाग आहे.

# प्रकरण पाचवे

# उपासना (इबादत)

मागील प्रकरणात आपण हे पाहिले आहे की पैगंबर मुहम्मद (स.) यांनी पाच मौलिक धारणांवर ईमान धारण करण्याची शिकवण दिलेली आहे.

(१) एकेश्वरत्वावर दृढ विश्वास.

(२) ईशदूतांवर दृढ विश्वास.

(३) ईशग्रंथांवर विशेषकरून पवित्र कुरआनवर दृढ विश्वास.

(४) अल्लाहच्या सर्व पैगंबरांवर आणि विशेषकरून अंतिम पैगंबर मुहम्मद (स.) यांच्यावर दृढ विश्वास.

(५) पारलौकिक जीवनावर दृढ विश्वास.

हा इस्लामचा मूळाधार आहे. या पाचही मौलिक धारणांवर जेव्हा तुम्ही दृढ विश्वास धारण केला तेव्हा तुम्ही मुस्लिमांच्या समूहात दाखल झालात परंतु अजून परिपूर्ण मुस्लिम बनला नाहीत. मनुष्य परिपूर्ण मुस्लिम तेव्हाच होऊ शकतो जेव्हा तो पैगंबर मुहम्मद (स.) यांनी ईशआदेशांची जी शिकवण दिली तिचे पालन करून त्यानुसार आचरण करतो (आणि त्यानुसार आपले जीवनव्यवहार पार पाडतो) कारण ईमान धारण करण्याबरोबरच आज्ञांचे पालन करणे व त्या आचरणांत आणणे तुमच्यावर अनिवार्य ठरते. आज्ञापालन व त्यानुसार आचरण करण्याचेच नाव इस्लाम आहे.

पाहा, तुम्ही हे मान्य केले आहे की, अल्लाह तुमचा एकमेव ईश्वर आहे. याचा अर्थ असा आहे की तो तुमचा स्वामी असून तुम्ही त्याचे आज्ञापालनकर्ते आहात. आता तुम्ही त्याला स्वामी व आज्ञादाता मानून जर त्याची अवज्ञा केली तर तुमच्या स्वतःच्या कबुलीनुसारच तुम्ही बंडखोर व अपराधी ठराल. तसेच तुम्ही हे मान्य केलेत की पवित्र कुरआन हा ईशग्रंथ आहे. पवित्र कुरआनमध्ये जी वचने आहेत ती ईशवाणी व ईशआदेश आहेत, हे तुम्ही मान्य केलेले आहे असा याचा अर्थ होतो. त्यातील प्रत्येक वचन मानून त्याच्या पुढे नतमस्तक होणे तुम्हाला क्रमप्राप्त ठरते. तसेच तुम्ही हेही मान्य केलेत की आदरणीय मुहम्मद (स.) हे अल्लाहचे पैगंबर आहेत. वास्तविकपणे ही कबुली याच गोष्टींची आहे की पैगंबर मुहम्मद (स.) जे कृत्य करण्याचा आदेश देतात व जे करण्यापासून परावृत्त करतात ते सर्व अल्लाहकडूनच आहे. अशी कबुली दिल्यानंतर

पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या आज्ञांचे पालन व तद्नुसार आचरण करणे तुम्हावर अनिवार्य कर्तव्य ठरते. म्हणूनच तुमचे प्रत्यक्ष आचरण जेव्हा तुमच्या ईमाननुसार होईल आणि तेव्हाच तुम्ही परिपूर्णपणे मुस्लिम व्हाल. तसे झाले नाही तर तुमच्या ईमानमध्ये व तुमच्या प्रत्यक्ष आचरणामध्ये जितकी तफावत असेल तितक्याच प्रमाणांत तुमचे ईमान धारण करण्यात उणीव राहील.

पैगंबर मुहम्मद (स.) यांनी ईशइच्छेनुसार जीवन व्यतीत करण्याची कोणती पद्धत दाखवून दिली आहे ते आता आपण पाहू या. तसेच काय करण्याचा आदेश दिला आहे व काय करण्यापासून मनाई केली आहे, तेही आपण पाहू या. या संदर्भात सर्वप्रथम अनिवार्य कर्तव्य ईशउपासना आहे.

# उपासने (इबादत) चा अर्थ

'इबादत' या शब्दाचा खरा अर्थ 'दास्यत्वाचे कर्तव्य' (उपासना) असा आहे. आता आपण दास आहात. अल्लाह आपला उपास्य आहे. दास आपल्या उपास्याचे आज्ञापालन करताना जी कृत्ये करीत असतो ते सर्व उपासनेत मोडतात. उदा. तुम्ही इतरांशी संभाषण करीत असता. संभाषण करताना तुम्ही असत्याचा, निंदानालस्तीचा, अश्लीलतेचा त्याग केला आणि असे पथ्य केवळ यासाठीच पाळले की अल्लाहने या सर्व गोष्टींना मनाई केली आहे. तुम्ही सतत सत्य, न्याय, भलेपणा व शिष्टाचारयुक्त संभाषण यासाठीच केले की या गोष्टी अल्लाहस प्रिय आहेत तर तुमचे संपूर्ण संभाषण उपासना ठरते. मग ते संभाषण व्यवहारी जीवनातील कोणत्याही बाबीसंबंधी का असेना. तुम्ही इतरांशी देवाणघेवाण करीत असता, बाजारात खरेदी-विक्री करीत असता, तुमच्या घरात आईवडील व भावंडांसमवेत राहात असता, मित्रमंडळींशी व आप्तेष्टांशी गाठीभेटी करीत असता, अशा वेळी तुम्ही जीवनातील वरील सर्व व्यवहार करताना ईशआदेश व त्याचे नियम दृष्टीसमोर ठेवले व अल्लाहने जे आदेश दिलेले आहेत हे समजून घेऊन प्रत्येकाचा हक्क त्याला देऊन टाकला, तसेच कोणाचाही हक्क व हितसंबंध हिरावून घेण्याची अल्लाहने मनाई केली आहे हे जाणून तुम्ही कोणाचाही हक्क हिरावून घेतला नाही तर तुमचा संपूर्ण जीवनकाळ जणू ईशउपासना करण्यातच गेला असे होईल. तुम्ही जर एखाद्या गरीबाला सहाय्य केले, एखाद्या भुकेलेल्याला जेऊ घातले, एखाद्या रोग्याची सेवा-सुश्रुषा केली आणि ही सर्व कृत्ये करताना तुम्ही तुमच्या डोळ्यांसमोर कसलेही स्वहित किंवा आदर, प्रतिष्ठा व नावलौकिक न ठेवता, केवळ ईशप्रसन्नता प्राप्त होण्यासाठीच ती केली तर ती सर्व कृत्ये उपासनाच ठरतात. तुम्ही व्यापार-उदीम केला किंवा उद्योगधंदा अथवा शारीरिक कष्टाचे काम केले व ते करत असताना ईशभय मनात सतत बाळगून अगदी प्रामाणिकपणाने व सचोटीने ते केले, वैध मार्गाने कमाई केली व निषिद्ध ठरविले गेलेल्या वाममार्गापासून दूर राहिलात व ही कृत्ये जरी तुम्ही उपजीविकेसाठीच केली असली तरी अशा कर्माचे कृत्यसुद्धा ईशउपासनेतच गणले जाईल.

तात्पर्य असे की या जगातील जीवनकालात प्रत्येक वेळी व प्रत्येक व्यवहार करताना ईशप्रसन्नता नजरेसमोर ठेवणे, त्याच्या आदेशांचे पालन करणे, त्याची अवज्ञा करून मिळणारे लाभ व फायदे लाथाडून टाकणे आणि त्याच्या आदेशांचे पालन करताना होणारा तोटा किंवा तसा तोटा होण्याचा धोका पत्करणे ही कृत्येही ईशोपासनेतच अंतर्भूत

आहेत. अशा पद्धतीचे जीवन म्हणजे सरळ सरळ भक्ती व उपासनाच आहे. असे (ईशपरायणशील) जीवन जगताना खाणे, पिणे, हिंडणे, फिरणे, झोप घेणे व जागे होणे, बोलणे या सर्व कृती उपासनेतच दाखल आहेत.

उपासनेचा असा खरा अर्थ आहे व मुस्लिमांना अशा तऱ्हेने उपासना करणारा दास बनविणे हेच इस्लामचे खरे उद्दिष्ट आहे. या गरजेपोटी इस्लाममध्ये अशा काही उपासना अनिवार्य व आवश्यक ठरविल्या गेल्या आहेत ज्यांची पूर्तता केल्याने मनुष्य एका विशाल उपासनेस सिद्ध होतो. असे समजा की वरील सर्व उपासना जणू त्या विशाल उपासनेसाठी असणारे प्रशिक्षणच आहे. हे प्रशिक्षण जी व्यक्ती उत्तम तऱ्हेने प्राप्त करील तीच नंतरची विशाल व अस्सल उपासना योग्य तऱ्हेने पार पाडू शकेल. म्हणूनच या विशिष्ट उपासनांना अनिवार्य कर्तव्य ठरविण्यात आले आहे व त्यांना 'अरकाने दीन' म्हणजे इस्लामचे आधारस्तंभ असे म्हटले गेले आहे. जशी एखादी इमारत त्याच्या स्तंभावर आधारलेली असते, त्याचप्रमाणे इस्लामी जीवनरूपी इमारतसुद्धा या स्तंभांवरच आधारलेली आहे. हे स्तंभ पाडाल तर इस्लामी इमारत ढासळून टाकाल.

# नमाज

अनिवार्य उपासनांमध्ये प्रथम क्रमांक नमाजला दिला गेला आहे. ही नमाज काय आहे? ज्या गोष्टीवर तुम्ही ईमान (श्रद्धा) धारण केले आहे त्या गोष्टींचा कृतीने तसेच मुखातून दिवसातून पाच वेळा पुनरुच्चार व उजळणी करणे याचेच नाव नमाज आहे. तुम्ही उठला व ईमान ताजे करून पुन्हा जगरहाटीत गुंतून गेला. सकाळच्याप्रहरी उठून आधी शुचिर्भूत होऊन तुम्ही अल्लाहसमोर हजर झालात. त्याच्यापुढे उभे राहून वाकून, जमिनीवर कपाळ टेकवून आपले दास्यत्व मान्य केले, त्याच्याकडून मदतीची याचना केली व मार्गदर्शनासाठी त्याचीच करूणा भाकली. त्याच्या आज्ञापालनाचे वचन पुन्हा एकदा उच्चारले. त्याची प्रसन्नता प्राप्त करण्याचा व त्याच्या कोपापासून दूर राहण्याचा विचार मनात पुन्हा पुन्हा जागृत केला. त्याच्या ग्रंथातील धडा पुन्हा गिरविला. त्याच्या पैगंबराच्या सत्यतेबद्दल ग्वाही दिली व ज्या दिवशी तुम्ही त्याच्या न्यायालयात तुमच्या कृत्यांचा जाब देण्यासाठी हजर होणार आहात त्या दिवसाचेही स्मरण केले. अशा तऱ्हेने तुमच्या दिनक्रमाचा आरंभ झाला. काही तास तुम्ही तुमच्या कामात गढून गेलात. मग पुन्हा 'जुह्र' (दुपारची नमाज) च्या वेळी 'अजान' देणाऱ्याने 'अजान' (बांग) देऊन तुम्हाला आठवण करून दिली की या व पुन्हा एकदा काही मिनिटे तो धडा गिरवा. असे होता कामा नये की एखादे वेळी तुम्हाला त्याचा विसर पडून तुम्ही अल्लाहपासून गाफील होऊन जावे. दिवसभरात काही तास गेल्यानंतर 'अस्र' (तिसऱ्या प्रहरची नमाज) च्या वेळी तुम्हाला पुकारण्यात आले व तुम्ही ईमान ताजा करून घेतला. नंतर सूर्यास्त झाला व सायंकाळ सुरवात झाली. जी उपासना करून तुम्ही आपल्या दिनचर्येचा आरंभ केला होता, तीच उपासना करून तुम्ही तुमच्या दिनचर्येची सांगताही केली. असे केल्याने रात्र झाल्यावरही तुम्हास त्याच्या धड्याचा विसर पडू नये व तुम्ही त्याला विसरून भरकटू नये. पुन्हा काही वेळाने 'इशा' (रात्रीची नमाज) ची वेळ झाली व झोपण्याचीही वेळ झाली. आता शेवटी पुन्हा एकदा तुम्हाला ईमानची सारी शिकवण व त्याचे स्मरण केले गेले, कारण ती वेळ शांत असते. दिवसभराच्या धावपळीत जर तुम्हाला पूर्णपणे एकाग्र होण्यास उसंत मिळाली नसेल तर या शांत वेळी पूर्ण समाधान व एकाग्रता आणू शकता.

नमाज रोज पाच वेळा इस्लामच्या आधारस्तंभाला बळकटी आणीत असते. ती वारंवार तुम्हाला त्या विशाल उपासनेसाठी तयार करीत असते जिच्या स्वरूपाचे विवरण आम्ही या अगोदरच्या काही ओळीत केलेले आहे. तुमच्या मनाचे पावित्र्य, आत्म्याची प्रगल्भता, चारित्र्यसुधारणा व आचारशुचिता ज्यावर अवलंबून असते त्या सर्व श्रद्धांना

ती ताजेपणाची टवटवी आणीत असते. 'वुजू' (नमाजपूर्वी हात, पाय, तोंड, नाक धुऊन स्वच्छ करण्याची क्रिया) करताना पैगंबर मुहम्मद (स.) यांनी दाखवून दिलेल्या पद्धतीचेच तुम्ही अनुकरण का करीत असता व नमाजमध्ये त्यांनी शिकवण दिलेल्या त्या सर्व वचनांचे पठन तुम्ही का करीत असता? पैगंबर मुहम्मद (स.) यांनी दिलेल्या शिकवणुकीचे पालन करणे तुम्ही अनिवार्य मानता एवढ्यासाठीच ना? कुरआनचे पठन तुम्ही जाणूनबुजून चुकीचे का करीत नाही? एवढ्यासाठीच ना की ती ईशवाणी आहे याची तुमच्या मनाची खात्री आहे? नमाजमध्ये जी वचने स्तब्धपणे मनातच स्मरण करावयाची असतात, ती जर तुम्ही मनात म्हटली नाही किंवा त्यांच्याऐवजी अन्य वचने म्हटलीत तर त्याकरिता तुम्हाला कोणाचे भय असते? ते ऐकणारा कोणी मनुष्य तर असत नाही. यावरून हे उघड आहे की स्तब्धपणे जे काही पठण मनातल्या मनात तुम्ही करीत असता तेसुद्धा अल्लाह ऐकतो, असे तुम्ही समजत असता व तुमच्या गुप्त हालचालीसुद्धा त्याला अनभिज्ञ नसतात. जेथे पाहणारा कोणी नसतो तेथे तुम्हाला नमाजसाठी उभी करणारी कोणती प्रेरणा असते? अल्लाह तुम्हाला पाहात आहे. या श्रद्धेचीच ती प्रेरणा असते ना? नमाजची वेळ आली म्हणजे तुम्ही तुमच्या हातातील अत्यंत निकडीचे काम सोडून देऊन नमाजकडे तुम्हाला वळण्यास लावणारी कोणती शक्ती असते? नमाज अल्लाहने अनिवार्य व सक्तीचे ठरविलेले कर्तव्य आहे. हीच ती जाणीव असते ना? कडक थंडी पडली असताना सूर्योदयापूर्वी, कडक उन्हाळ्यात भर दुपारच्या वेळी, तसेच सायंकाळच्या फिरावयास जाण्याच्या चित्ताकर्षक समयी तुम्हाला नमाज अदा करण्यास भाग पाडणारी कोणती शक्ती असते? ती कर्तव्यतत्परता नाही तर दुसरे काय आहे? तसेच नमाज अदा करताना अथवा नमाजमध्ये जाणूनबुजून एखादी चूक करण्यापासून तुम्हाला कोणाचे भय वाटत असते? तुमच्या मनात ईशभय असते व तुम्हाला हे ठाऊक असते की, एके दिवशी ईशन्यायालयात तुम्हाला हजर होणे क्रमप्राप्त आहे एवढ्यासाठीच ना? तुम्हाला परिपूर्ण व सच्चा मुस्लिम बनवून सोडणारे नमाजपेक्षा अधिक चांगले असे कोणते प्रशिक्षण असू शकते? मुस्लिमासाठी यापेक्षा अधिक चांगली शिकवण व संस्कार कोणते असू शकतात की त्याने दिवसातून कित्येक वेळा अल्लाहचे स्मरण, त्याचे भय, तो सर्वसाक्षी असण्याबद्दल दृढ विश्वास आणि ईशन्यायालयात हजर केले जाण्याची श्रद्धा यांना तजेला द्यावी, अनिवार्यपणे पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या आज्ञांचे पालन करावे, सकाळपासून रात्रीपर्यंत काही तासांच्या अवधीने त्याला कर्तव्यपूर्तीचा सराव करावयास लावला जातो. अशा व्यक्तीपासून अशी अपेक्षा केली जाऊ शकते की जेव्हा तो नमाज

अदा करून मोकळा होतो व जगातील व्यवहारात गढून जातो तेव्हा तेथेही त्याच्या मनात ईशभय असते व त्याच्या कायद्याचे तो पालन करतो. प्रत्येक दुष्कृत्याच्या समयी त्याला आठवण होते की, ''अल्लाह मला पाहात आहे.'' अशी उच्चदर्जाची शिकवण प्राप्त करूनही ईशभय बाळगत नसेल, त्याची अवज्ञा करण्याचे सोडत नसेल तर हा दोष नमाजचा नसून त्या व्यक्तीचा आत्मदोष आहे.

आणखी असे की, महान अल्लाहने नमाज सामुदायिकपणे अदा करण्याची सक्त ताकीद दिलेली आहे. विशेषकरून आठवड्यात एकदा 'जुमआ'ची नमाज (शुक्रवारची दुपारची सामुदायिक नमाज) सामुदायिकपणे एकत्रित अदा करणे सक्तीचे केले गेले आहे. मुस्लिमांमध्ये समभाव, एकोपा व समानता निर्माण करणारी ही बाब आहे. ती मुस्लिमांना एकवटून त्यांचा मजबूत संघ निर्माण करते. ते सर्व मिळून एकत्रितपणे एकमेव अल्लाहची उपासना करतात, एकत्रितपणे उठत व बसत असतात तेव्हा त्यांची मने आपोआपच परस्परांशी जुळत असतात आणि आपण सर्व बंधु आहोत ही जाणीव त्यांच्या मनात उत्पन्न होते. यामुळे त्यांच्यात एकाच नेत्याचे आज्ञापालन करण्याची प्रवृत्ती निर्माण होत असते व त्यांना शिस्तबद्ध करीत असते. यामुळेच त्यांच्यात आपापसाबद्दल सहानुभूती निर्माण होते. तसेच त्यांच्यात समानता व एकात्मता निर्माण होते. श्रीमंत व गरीब, लहान-थोर, उच्चपदाधिकारी व कनिष्ठ दर्जाचा शिपाई सर्व एकत्र उभे राहतात. त्यांच्यात कोणी उच्च नसतो, कोणी नीच नसतो.

हे त्या अगणित लाभांपैकी काही आहेत जे तुम्ही नमाज अदा केल्याने अल्लाहला प्राप्त होत नसून तुम्हाला स्वत:लाच ते प्राप्त होत असतात. तुमच्या कल्याणासाठीच अल्लाहने ती सक्तीची केली आहे. नमाज अदा न केल्याने तुम्ही अल्लाहचे काही नुकसान केलेले नसते. म्हणून त्याची गैरमर्जी होत नसते, उलट तुम्ही स्वत:चेच नुकसान करून घेतले आहे. नमाजद्वारा केवढे महान सामर्थ्य अल्लाह तुम्हाला देत आहे व तिचा स्वीकार करण्यापासून तुम्ही तोंड चुकवीत आहात? मुखाने तर, तुम्ही अल्लाहचे ईशत्व, पैगंबराचे अनुयायित्व व पारलौकिक जीवनाचा जाब विचारणे यांचा स्वीकार करीत असता, पण तुमचे प्रत्यक्ष आचरण असे असते की, अल्लाहने व त्याच्या पैगंबराने जे सर्वांत मोठे कर्तव्य तुम्हासाठी ठरविले आहे त्याची पूर्तता केली जात नाही, ही किती लाजीरवाणी गोष्ट आहे. तुमचे हे आचरण पुढे दिलेल्यापैकी एका अवस्थेत निश्चित असते. एक तर नमाज अनिवार्य कर्तव्य असण्याचा तुम्ही इन्कार करता किंवा तुम्ही तिला अनिवार्य कर्तव्य मानता परंतु ते टाळण्याचा प्रयत्न करीत असता. जर अनिवार्य

असण्याचा इन्कार असेल, तर अल्लाह व त्याच्या पैगंबराला तसेच कुरआनला तुम्ही खोटे ठरविता व पुन्हा त्यांच्यावर ‘ईमान’-दृढविश्वास असल्याचा खोटा दावा करीत असता. नमाजला अनिवार्य कर्तव्य मानत असूनही जर तुम्ही ती आचरणात आणीत नसाल तर तुम्ही विश्वासपात्र नाही. जगातील इतर व्यवहाराच्या बाबतीतसुद्धा तुमच्याबद्दल कसलाही भरवसा बाळगला जाऊ शकत नाही.

जर तुम्ही ईशकर्तव्य चुकविण्याची चोरी करू शकता तर माणसांची कामे करताना तुम्ही चोरी करणार नाही, अशी कोण अपेक्षा करू शकतो.

# 'रोजा' (उपवास)

'रोजा' (उपवास) हे दुसरे अनिवार्य कर्तव्य आहे. हा रोजा म्हणजे काय? नमाज ज्या कर्तव्यांची दररोज तुम्हाला पाच वेळा आठवण करून देत असते, त्याच कर्तव्याची आठवण रोजा वर्षातून संपूर्ण महिनाभर सतत करून देत असतो. रमजान महिना येतो व सकाळपासून संध्याकाळपर्यंत तुमचे खाणेपिणे बंद होते. 'सहरी' (उपवास करण्यापूर्वीचा आहार) करीत असताना सूर्योदयापूर्वीची वेळ झाल्यास खाताखाता तुम्ही हात आखडता. त्यानंतर कसलेही पक्वान्न तुमच्यासमोर आहे, कितीही भूक अथवा तहान लागली, मनाची कितीही तीव्र इच्छा झाली तरी सूर्यास्तापर्यंत तुम्ही तोंडात अन्नाचा कणही घालीत नाही. केवळ लोकांसमक्षच खातपीत नाही एवढेच नव्हे तर जेथे कोणीही पाहाणारा समक्ष नसतो अशा एकांतातही पाण्याचा एक थेंब घशाखाली घालणे अथवा अन्नाचा एक कणही गिळणे तुम्हाला शक्य होत नाही. मग ही सर्व बंधने एका विशिष्ट वेळेपर्यंतच असतात. 'मगरीब'ची (सूर्यास्तानंतरची) अजान ऐकू आल्याबरोबर तुम्ही उपवास समाप्त करण्यासाठी फलाहार घेता. हे सर्व काय आहे? यासंबंधी विचार करा. या कृत्याच्या मुळाशी ईशभय आहे. तो सर्वव्यापी व सर्वज्ञानी आहे यावर दृढविश्वास आहे. पारलौकिक जीवन व ईशन्यायालयावर ईमान आहे. कुरआन व पैगंबराच्या आज्ञांचे कडक पालन आहे. कर्तव्याची प्रखर जाणीव आहे. सहनशीलता, सोशीकपणा व संकटांना सामोरे जाण्याच्या कर्तव्यांची उजळणी आहे. ईशप्रसन्नता प्राप्त होण्यासाठी मनाच्या इच्छावासनांना काबूत ठेवणारे बळ आहे. दरवर्षी 'रमजान' महिन्यात संपूर्ण तीस दिवस रोजाद्वारे तुम्हावर संस्कार होतात व तुमच्यात वरील सर्व गुण उत्पन्न होण्याचा प्रयत्न होतो, ज्यायोगे तुम्ही पक्के व परिपूर्ण मुस्लिम बनावे. रोजा या सर्व गुणांनी तुम्हाला अशा उपासनेस पात्र बनवतो जी उपासना एका सच्चा मुस्लिमासाठी त्याच्या जीवनात पार पाडणे अनिवार्य आहे.

पुन्हा असे पाहा की, सर्वश्रेष्ठ अल्लाहने 'रोजा' सर्व मुस्लिमांसाठी एकाच महिन्यात अनिवार्य केला आहे जेणेकरून सर्वांनी मिळून एकत्रितपणे 'रोजा' (उपवास) करावा. प्रत्येकाने स्वेच्छेनुसार वेगवेगळ्या वेळी तो करू नये. असे केल्याने अन्य अगणित फायदेही आहेत. संपूर्ण मुस्लिम वस्तीत सबंध महिनाभर पावित्र्य व मांगल्य ओतप्रोत भरलेले असते. सर्व वातावरण ईमान, ईशभय व कर्तव्यपूर्तीची प्रबळ इच्छा, आचारशुद्धी व नैतिकता यांनी भरलेले असते. अशा वातावरणात दुष्कृत्ये गाडली जाऊन सत्कर्मांना उधाण येते. सज्जन माणसे, सत्कर्म करण्यात एकमेकांना साहाय्य करीत

असतात. दुर्जन दुष्कर्म करण्यात संकोचतात व लाजतात.

निर्धनांना मदत करण्याची भावना धनिकांमध्ये निर्माण होते. ईशमार्गात धनसंपत्ती खर्च केली जाते. सर्व मुस्लिम समान अवस्थेत असतात व असे असणे त्यांच्यात अशी जाणीव निर्माण करते की ते एकाच समूहाचे घटक आहेत. त्यांच्यात बंधुभाव, सहानुभूती व आपसातील एकोपा निर्माण होण्यास हे अत्यंत प्रभावी साधन आहे.

हे सर्व आमच्याच हिताचे आहे. आम्हाला उपाशी ठेवण्यात अल्लाहचा कसलाही लाभ होत नाही. त्याने आमच्याच हितासाठी  रमजान महिन्यातील रोजे आम्हासाठी अनिवार्य ठरविले आहेत. कसलेही योग्य कारण अथवा सबब नसताना जे कोणी हे अनिवार्य कर्तव्य पार पाडीत नसेल तर ते खुद्द स्वत:वरच अन्याय करीत असतात. जे लोक रमजान महिन्यात दिवसा उघडपणे खात-पित असतात, त्यांची स्थिती सर्वांत जास्त लज्जास्पद आहे. असे करून जणू ते असे घोषित करतात की ते मुस्लिम समूहांपैकी नाहीतच. तसेच ते असे दर्शवित असतात की त्यांना इस्लामच्या अनिवार्य कर्तव्याची कसलीही पर्वा नाही. ते इतके निर्ढावलेले आहेत की ज्या अल्लाहस ते मानतात त्याच्या आज्ञा व आदेशही ते सरळ सरळ धाब्यावर बसवितात. त्यांच्या समाजापासून वेगळे होणे ज्यांना सोपे आहे ज्यांना त्यांच्या निर्माणकर्त्या व पालनकर्त्याविरुद्ध बंड करताना थोडीसुद्धा शरम वाटत नाही आणि त्यांच्या धर्माच्या सर्वश्रेष्ठ नेत्याने ठरवून दिलेल्या नियमांचे जाहीर उल्लंघन करतात. अशांकडून कोणता मनुष्य कसली विश्वासार्हता, कसल्या प्रामाणिकपणाची व सदाचाराची, कसली कर्तव्यनिष्ठा व कायदापालनाची अपेक्षा करू शकतो ते दाखवा?

# जकात

तिसरे अनिवार्य कर्तव्य जकात[१] आहे. महान अल्लाहने प्रत्येक धनवान मुस्लिमास हे कर्तव्य अनिवार्य ठरविले आहे की ज्याच्याकडे कमीतकमी साढे बावन्न तोळे चांदी किंवा तितकी रक्कम शिल्लक व बचत सतत एका संपूर्ण वर्षाच्या काळात उरली असेल, तर त्या शिलकीपैकी चाळीसवा भाग त्याने आपल्या एखाद्या गरीब नातेवाईकास किंवा एखाद्या लाचार माणसास, एखाद्या दारिद्र्यपीडितास, एखाद्या नवमुस्लिम, एखाद्या प्रवासी माणसास किंवा एखाद्या कर्जबाजारी माणसास देऊन टाकावा.

अशा तऱ्हेने, अल्लाहने धनवानाच्या संपत्तीमध्ये, गोरगरींबासाठी कमीतकमी अडीच टक्के हिस्सा नियुक्त[२] केला आहे. यापेक्षा जास्त प्रमाणात एखाद्याने दान केले. तर ते उपकारक होईल व त्याचे पुण्य आणखी अधिक असेल.

हा तुमचा वाटा काही अल्लाहला पोहचत नाही. तो तुमच्या कसल्याही दानाचा गरजू नाही, परंतु त्याचे असे फर्मान आहे की, तुम्ही माझ्यासाठी तुमच्या एखाद्या निर्धन बांधवास काही दान केले तर ते दान मला दिल्यासारखे आहे. त्या निर्धनातर्फे मी कितीतरी अधिक पटीने त्याचे फळ तुम्हाला देईन. अर्थातच त्यासाठी अट अशी आहे की दान दिल्यानंतर तुम्ही केलेल्या उपकाराचा उच्चार करता कामा नये, दान घेतलेल्या माणसाला तुच्छ लेखू नये, त्याच्याकडून आभारप्रदर्शनाचीसुद्धा अपेक्षा बाळगू नका. तुम्ही केलेल्या दानकर्माचा लोकांत बोलबाला अगर प्रसिद्धी व्हावी व लोकांनी तुमच्या दानशौर्याचे कौतुक करावे अशी इच्छा बाळगू नका व तसा प्रयत्न करू नका. जर वरील सर्व अमंगळ विचार मनातून काढून टाकून अंत:करण पवित्र राखले व केवळ अल्लाहची

---

१) जकात केवळ रोख रकमेपुरतीच नसून सोने, चांदी, व्यापारी माल व पशुधनासही ती लागू आहे. या सर्व वस्तूमध्ये किती मालमत्तेसाठी किती जकात द्यावी याचे कोष्टक तुम्हाला इस्लामी कायदे पुस्तकात आढळेल. येथे केवळ जकातच्या मागे असलेली उद्दिष्टे,तसेच त्यापासूनचे कल्याण विशद करणे एवढाच हेतू आहे,म्हणून उदाहरणासाठी रोख रक्कमेचे वर्णन दिले गेले आहे.

२) पैगंबर मुहम्मद (स.) यांनी आपल्या वंशाच्या लोकांना म्हणजे सय्यद व हाशमी लोकांना जकात स्वीकारणे निषिद्ध केले आहे, ही गोष्ट लक्षात ठेवण्यासारखी आहे. याचा अर्थ असा की सय्यद व बनी हाशीम यांना जकात देणे तर अनिवार्य आहे परंतु जकात स्वीकारणे त्यांना धर्मसंमत नाही. जी कोणी व्यक्ती एखाद्या गरीब सय्यद अगर हाशमी माणसास मदत करू इच्छित असेल, भेट व देणगी म्हणून तो मदत देऊ शकतो. दानधर्म खैरात किंवा जकात या नावाने तो देऊ शकत नाही.

प्रसन्नता प्राप्त करण्यासाठी स्वत:च्या संपत्तीमधून गोरगरीबांना हिस्सा द्याल, तर अल्लाह त्याच्या अमर्याद संपत्तीमधून तुम्हाला इतके काही देईल जे कधीही संपणार नाही.

महान अल्लाहने जसे नमाज, रोजा (उपवास) आमच्यावर अनिवार्य केले आहेत त्याचप्रमाणे जकातसुद्धा अनिवार्य केली आहे. हा इस्लामचा एक महत्त्वाचा आधारस्तंभ आहे. जकातला आधारस्तंभ यासाठी ठरविले गेले आहे की तिच्यायोगे ईश्वरासाठी त्याग करण्याची व तिला प्राधान्य देण्याची भावना व जाणीव मुस्लिमात निर्माण होते. स्वार्थ, संकुचित मनोवृत्ती व संपत्तीलोलुपता यासारखे दुर्गुण नष्ट होतात. धनाची पूजा करणारा धनासक्त लोभी व कृपण मनुष्य, तसेच पैशावर जीव ओवाळणारा माणूस, इस्लामसाठी अगदी कुचकामी आहे. जो मनुष्य स्वत:चे रक्त आटवून व घाम गाळून मिळवलेली संपत्ती स्वत:च्या गरजेसाठी न वापरता अल्लाहच्या आज्ञेनुसार बलिदान करू शकतो, तोच इस्लामच्या सरळमार्गाने जाऊ शकतो. जकात अशा त्यागाचे धडे मुस्लिमांना गिरवावयास लावते. अल्लाहसाठी जेव्हा संपत्तीचा व्यय करण्याचा प्रसंग येतो तेव्हा संपत्तीला उराशी कवटाळून बसू नये अशी त्याची मानसिकता जकात करून सोडते.

जकातचा ऐहिक फायदा हा आहे की मुस्लिमांनी आपापसात एकमेकांना सहाय्य करावे. कोणीही मुस्लिम विवस्त्र, भुकेलेला, तुच्छ होऊ नये. श्रीमंतानी गोरगरिबांना साहाय्य करावे व गरिबांनी भीक मागत फिरू नये, कोणीही व्यक्तीने त्याची धनसंपत्ती केवळ स्वत:च्या ऐषआराम, शान व लौकिकासाठीच उधळू नये. उलट स्वत:च्या संपत्तीत आपल्या जातीतील विधवांचा, अनाथ व पोरक्यांचा तसेच निराधार व निर्धनाचाही वाटा आहे. हे सतत लक्षात ठेवावे. जे लोक एखादे काम करण्याची क्षमता बाळगतात परंतु केवळ भांडवलाअभावी ते करू शकत नाहीत, अशा असहाय लोकांचाही त्याच्या संपत्तीत काही हक्क व हिस्सा आहे ही गोष्टही लक्षात असावी. उपजत बुद्धिमान असून केवळ दारिद्र्यामुळे ज्यांना शिक्षण घेणे दुरापास्त होते, अशा बालकांचाही त्यात वाटा आहे. अपंगाचाही त्यात वाटा असतो. कोणतेही काम करण्यास असमर्थ असलेल्यांचाही त्यात वाटा असतो. या सर्वांचा हक्क जी व्यक्ती मानीत नाही ती जुलमी आहे. तुमच्या जातीतील हजारो माणसे भाकरीसाठी तडफडत असताना, हजारो कामगार बेकारीमुळे वणवण करीत भटकत असताना, तुम्ही आपल्याजवळ पैशाच्या राशी बाळगून असावे. मोठमोठ्या हवेलीत विलासात व ऐष आरामात असावे, मोटारीत फिरावे यापेक्षा अधिक मोठा जुलूम व अन्याय कोणता असेल? इस्लाम अशा प्रकारच्या स्वार्थांधपणाशी शत्रुत्व करतो. अधर्मींना (काफिर) त्यांची संस्कृती अशी शिकवण देते की

जी काही संपत्ती प्राप्त होते तिचा संचय करून ठेवावा व व्याजापोटी तिची गुंतवणूक करून भोवतालच्या लोकांची मिळकतही आपल्याकडे ओरबाडून घ्यावी. परंतु मुस्लिमास त्यांचा धर्म अशी शिकवण देतो की अल्लाहने तुमच्या गरजेपेक्षा अधिक उपजीविका व मिळकत प्रदान केली तर तिचा नुसता संचय करून ठेवू नका तर समाजातील गरजू बांधवांना ती द्या, जेणेकरून त्यांच्याही गरजा भागवाव्यात व तुमच्याप्रमाणे तेही मिळवते बनावेत.

## हज (पवित्र मक्का यात्रा)

हज हे चौथे अनिवार्य कर्तव्य आहे. आयुष्यभरात फक्त एकदाच ते पार पाडणे अगत्याचे आहे व जो कोणी पवित्र 'मक्का' शहरापर्यंत जाणे-येण्याची क्षमता बाळगतो केवळ त्यावरच हे कर्तव्य अनिवार्य केलेले आहे.

आज ज्या ठिकाणी 'मक्का' शहर वसलेले आहे त्याच जागी हजारो वर्षांपूर्वी आदरणीय पैगंबर इब्राहीम (अ.) यांनी अल्लाहची उपासना करण्यासाठी एक छोटेसे घर बांधले होते. त्यांच्या निष्ठेची व प्रेमाची अशी काही कदर अल्लाहने केली की त्या छोट्याशा घराला अल्लाहने आपले घर घोषित केले. अल्लाहने असा आदेश दिला की ज्या कोणाला आमची उपासना, आराधना करावयाची असेल त्यांनी या घराच्या दिशेने आपले तोंड करूनच ती करावी. पुढे असाही आदेश दिला की मुस्लिम जगातील कोणत्याही भागात व कानाकोपऱ्यात राहणारा असो, त्याची ऐपत असल्यास आयुष्यातून एकदा तरी या घराचे दर्शन घेण्यासाठी यावे व अल्लाहचा अतिप्रिय दास इब्राहीम (अ.) जितक्या प्रेमाने व मनोभावाने या घराला प्रदक्षिणा घालीत असे तशाच प्रेमाने व मनोभावाने या घराला प्रदक्षिणा घालावी. पुढे असाही आदेश दिला,

''तुम्ही जेव्हा आमच्या घराकडे याल तेव्हा तुमची अंत:करणे निर्मळ करा, तुमच्या वासनांना आवर घाला, रक्तपात, अनाचार, अर्वाच्च बोलणे, यापासून दूर राहा. तुमच्या स्वामीच्या दरबारात जितक्या आदबीने व नम्रतेने जाणे आवश्यक असते तशाच पद्धतीने आमच्या घराचे दर्शन करावे. जो पृथ्वी, आकाशाचा धनी आहे व ज्याच्या तुलनेत सर्व मानव क्षुल्लक याचक आहेत, अशा बादशाहच्या सेवेत रुजू होण्यासाठी आपण चाललो आहोत असे समजा. अशा प्रकारची नम्रता धारण करून अगदी अंत:करणापासून जेव्हा तुम्ही आमची उपासना कराल तेव्हा आम्ही आपल्या देणग्यांनी तुम्हाला धनसंपन्न करून सोडू.''

एका अर्थाने विचार केल्यास हज ही सर्वांत महान उपासना आहे. अल्लाहचे प्रेम

जर माणसाच्या अंत:करणात नसेल तर स्वत:ची सर्व कामे व व्यवहार टाकून देऊन त्याच्या सर्व प्रियजनांचा व नातेवाईकांचा विरह सहन करून, इतक्या लांबच्या प्रवासाची दगदग कशासाठी सोशील? म्हणूनच हजयात्रेचा इरादा करणे हाच मुळी अल्लाहच्या प्रेमाचा व निष्ठेचा पुरावा आहे. हज यात्रेसाठी जेव्हा मनुष्य निघतो तेव्हा त्याची अवस्था इतर प्रवासाच्या प्रसंगासारखी नसते. या प्रवासात माणसाचे सर्व लक्ष अल्लाहकडे जास्त असते. त्याच्या मनात ध्यास व उत्कटता वाढत असते. 'काबागृह' जसजसे जवळ येते तसतसे हा प्रेमाग्नी अधिकच उफाळतो. दुष्कृत्ये व पापकृत्ये याबद्दल माणसाचे मन आपोआपच तिरस्कार करू लागते. हातून घडलेल्या पापकर्माबद्दल मनात खजीलपणा निर्माण होतो. भविष्यकाळात आज्ञापालनाची सुबुद्धी व सन्मती प्रदान करण्याची अल्लाहची याचना करीत असतो. जप व अल्लाहचे स्मरण व उपासनेत अधिकाधिक रस वाटू लागतो. नमाजमध्ये असताना अल्लाहसमोर मस्तक टेकण्याचा काळ प्रदीर्घ होऊ लागतो व खूप वेळ तरी मस्तक वर करण्यास मन तयार नसते. कुरआन पठण करताना त्यातून आगळा आनंद मिळू लागतो. रोजा (उपवास) केला असताना त्याची वेगळीच गोडी अनुभवू लागतो. जेव्हा तो अरबस्थानच्या भूमीवर पाऊल ठेवतो तेव्हा इस्लामचा संपूर्ण प्राथमिक इतिहास त्याच्या डोळ्यांपुढे येऊ लागतो. जागोजागी व पावलोपावली अल्लाहवर उत्कृष्ट प्रेम केलेल्यांची व त्यांच्यासाठी प्राण कुर्बान केलेल्यांची चिन्हे व अवशेष दृष्टीस पडू लागतात. तेथील वाळूचा कणकण इस्लामच्या महानतेची साक्ष देत आहे. प्रत्येक कण व दगडगोटे असा गजर करीत आहेत की याच भूमीतून अल्लाहच्या संदेशाचे प्राबल्य वाढले. अशा तऱ्हेने मुस्लिमांची अंत:करणे अल्लाहचे प्रेम व इस्लामवरील प्रेमाने ओसंडू लागतात. त्याचा असा काही चिरकाल टिकणारा ठसा त्यांच्या मनावर उमटला जातो की मरेपर्यंत तो पुसला जात नाही.

धर्मकर्माबरोबरच या जगातीलही अनेक फायदे हजयात्रा करण्यामध्ये कृपाळू अल्लाहने ठेवलेले आहेत. हजच्या कारणाने मक्का शहर हे जगातील सर्व लोकांचे मध्यवर्ती केंद्र केले गेले आहे. एकाच विशिष्ट वेळी अल्लाहचे नामस्मरण करणारे लोक जगातील विभिन्न ठिकाणाहून येऊन तेथे एकत्रित होतात. एकमेकांना भेटतात. आपापसात इस्लामी प्रेम प्रस्थापित होते. मुस्लिम मग तो कोणत्याही देशाचा अथवा कोणत्याही वंशाचा असला तरी सर्व एकच राष्ट्र असून सर्व एकमेकांचे बंधु आहेत, असाच ठसा मनावर उमटतो. या आधारे जर एकीकडे हजयात्रा अल्लाहची उपासना आहे तर त्याच्याबरोबर दुसऱ्या अंगाने ती जगातील एकूण मुस्लिमांची 'कॉनफरन्स'ही आहे, तसेच मुस्लिमांचे विश्वबंधुत्व व एकोपा निर्माण करण्याचे सर्वात मोठे साधन आहे.

# जिहाद : ईमानची कसोटी

अल्लाहकडून तुम्हावर जे अखेरचे अनिवार्य कर्तव्य लागू करण्यात आले आहे ते इस्लामची पाठराखण करणे आहे. हे अनिवार्य कर्तव्य जरी इस्लामच्या आधारस्तंभात मोडत नसले तरी ते इस्लाममधील अत्यंत महत्त्वाच्या अनिवार्य कर्तव्यांपैकी एक आहे. ‘कुरआन’ व ‘हदीस’मध्ये यावर मोठ्या प्रमाणात भर देण्यात आला आहे. इस्लामची पाठराखण व समर्थन म्हणजे काय? हे अनिवार्य कर्तव्य का ठरविण्यात आले आहे? या प्रश्नांचे उत्तर एका उदाहरणाने तुमच्या सहजपणे लक्षात येऊ शकते. कल्पना करा की एक मनुष्य तुमच्याशी मैत्री करतो. परंतु कसोटीच्या प्रत्येक प्रसंगी हे सिद्ध होते की तुम्हाबद्दल त्याच्याजवळ कसलीही सहानुभूती नाही. त्याला तुमच्या लाभहानीबद्दल किंचितही पर्वा नसते. एखाद्या कार्यामुळे तुमची हानी होत असली तरी स्वतःच्या हितापायी ते कार्य तो निःसंकोचपणे करतो. एखादे कृत्य तुम्हास लाभकारक असल्यास त्यापासून तो केवळ एवढ्यासाठीच अलिप्त राहतो की त्यात त्याला स्वतःला कसलाही लाभ नसतो. तुम्हावर एखादे संकट कोसळले तर तुम्हाला कसलीही मदत तो करीत नाही. तुमची निंदा जेथे कोठे होत असेल तर तो तुमच्या निंदकात सामील होतो अथवा कमीतकमी तुमच्याबद्दलची निंदा मूकपणे ऐकतो, तुमचे हितशत्रू तुम्हाविरुद्ध एखादे कारस्थान करीत असले तर त्यांच्याशी तो सामील होतो किंवा किमान तुम्हाला त्यांच्या कारस्थानापासून वाचविण्याचा कसलाही प्रयत्न करीत नाही. आता तुम्हीच सांगा की अशा माणसाला तुम्ही आपला मित्र म्हणाल? खचितच ‘नाही’ असे तुमचे उत्तर असेल, कारण तो जरी तोंडाने तुमच्याशी मैत्रीचा दावा करीत असला तरी वास्तविकपणे त्याच्या अंतःकरणात तुमच्याशी मैत्रीचा लवलेशही नाही. मैत्रीचा अर्थ तर असा आहे की एखादा मनुष्य तुमच्याशी मैत्री करीत असेल तर तुम्हाबद्दल त्याला अंतःकरणापासून विशुद्ध प्रेम हवे. तो तुमचा हितचिंतक, पाठीराखा असावा. प्रसंगी तो तुमच्या उपयोगी पडावा व शत्रूशी सामना करताना त्याने तुमचे साहाय्य करावयास हवे. तुमची निंदा ऐकून व तुमच्याबद्दल वाईट उद्‌गार ऐकून स्वस्थ बसण्याइतपत तो सहनशील नसावा. जर हे सर्व गुण त्याच्यात नसतील तर तो दांभिक आहे, त्याचा मैत्रीचा दावा फोल आहे.

या उदाहरणावरून तुम्ही अनुमान काढू शकता की जेव्हा तुम्ही मुस्लिम असण्याचा दावा करीत आहात तेव्हा तुम्हावर कोणकोणती कर्तव्ये येऊन पडतात? मुस्लिम असण्याचा अर्थ असा आहे, की तुमच्यात इस्लामबद्दल स्वाभिमान आहे. त्याच्यावरील ईमानबद्दल अभिमान आहे. इस्लामबद्दल खरेखुरे प्रेम व आपल्या

ईमानधारक धर्मबांधवाबद्दल तुम्ही खरेखरे हितचिंतक आहात. जगात तुम्ही कसलेही ऐहिक कृत्य करीत असला तरी त्या पाठीमागे इस्लामचे इष्ट व मुस्लिमांचे कल्याण हाच दृष्टिकोन सतत तुमच्या डोळ्यांसमोर असेल. स्वहितापोटी किंवा स्वत:ची कसलीही हानी टाळण्यापोटी तुमच्याकडून असे एखादे कृत्य कदापिही घडू नये जे इस्लामच्या ध्येयधोरणाविरुद्ध किंवा मुस्लिमांच्या कल्याणाविरुद्ध असेल. तसेच इस्लामला व मुस्लिमांना हितकारक असणाऱ्या कृत्यात तुम्ही तन-मन-धनाने सहभागी व्हावे व इस्लामला वा मुस्लिमांना अनिष्ट व हानिकारक असणाऱ्या प्रत्येक कृत्यापासून दूर राहावे. आपला धर्म व धर्मबांधवांची प्रतिष्ठा यांना स्वत:ची प्रतिष्ठा मानली जावी. जसा स्वत:चा अपमान तुम्हाला सहन होत नाही अगदी तसेच इस्लामचा अवमान व अप्रतिष्ठा तुम्हाला सहन होता कामा नये. स्वत:चे हितरक्षण करताना तुम्ही जसे आपल्या वैऱ्याशी साथ करत नाही तसेच इस्लाम व मुस्लिमांशी वैरभाव बाळगणाऱ्यांशीही तुम्ही सहभागी होऊन त्यांची साथ करू नये. स्वत:च्या प्राणाच्या, मालमत्तेच्या व अब्रुच्या रक्षणार्थ सर्व प्रकारचा त्याग करण्यास तुम्ही जसे तयार होता त्याचप्रमाणे तुम्ही इस्लाम व मुस्लिमांच्या रक्षणासाठीही कसल्याही त्यागाची तयारी बाळगावी. स्वत:ला मुस्लिम म्हणविणाऱ्या प्रत्येक माणसामध्ये वरील गुण असणे आवश्यक आहे, नाहीतर त्याची गणना दांभिकामध्ये होऊन त्याचे आचरण त्याच्या तोंडी दाव्याला फोल ठरविल.

इस्लामसमर्थनाचे एक अंग असे आहे ज्याला ‘शरियत’च्या भाषेत ‘जिहाद’ असे म्हणतात. ‘जिहाद’चा शब्दश: अर्थ एखाद्या कृत्यासाठी स्वत:ची सर्व शक्ती पणास लावणे असा आहे. या अर्थाने अल्लाहचा आदेश सर्वव्यापी करण्यासाठी जो कोणी शारीरिक कष्टाने, लेखणीने, धनसंपत्तीने, वाणीने प्रयत्नांची पराकाष्ठा करतो तोही ‘जिहाद’च करीत असतो. परंतु सर्व ऐहिक उद्दिष्टांपासून संपूर्णपणे निर्मळ व केवळ ईशइच्छेपोटी आणि इस्लामच्या वैऱ्याशी जे युद्ध केले जाते त्या युद्धासाठी विशेष करून ‘जिहाद’ शब्द प्रयुक्त झालेला आहे. वरील शेवटच्या ‘जिहाद’ला शरियतमध्ये ‘फर्जे किफाया’ असे नामकरण आहे. ‘फर्जे किफाया’ हे एक असे कर्तव्य आहे जे सर्व मुस्लिमांवर येऊन तर पडते परंतु ते कर्तव्य जर एका समूहाने पार पाडले तर त्या कर्तव्याची पूर्तता करण्याची इतर मुस्लिमांवरील जबाबदारी टळून जाते. खरेतर एखाद्या इस्लामी राष्ट्रावर शत्रूचा हल्ला झाल्यास त्या राष्ट्राच्या प्रत्येक नागरिकावर शत्रूशी ‘जिहाद’ करणे हे नमाज व ‘रोजे’प्रमाणेच एक अनिवार्य कर्तव्य बनते. जर ते राष्ट्र स्वत:चे रक्षण करण्यास असमर्थ असेल तर त्याच्या शेजारी असणाऱ्या देशातील प्रत्येक मुस्लिमांनी

तन-मन-धनाने त्याचे सहाय्य करणे हे अनिवार्य कर्तव्य होते. त्यांची कुमक मिळूनही जर शत्रूचे निवारण होऊ शकले नाही तर सर्व जगातील एकूण मुस्लिमांसाठी, ज्याप्रमाणे नमाज व 'रोजे' हे अनिवार्य कर्तव्य आहे त्याचप्रमाणे त्या आक्रमित राष्ट्राची पाठराखण करणे हेही अनिवार्य कर्तव्य ठरते. हे अनिवार्य कर्तव्य पार पाडण्यात जो चुकारपणा करील तर तो अल्लाहच्या दृष्टीने गुन्हेगार ठरेल. या परिस्थितीत 'जिहाद'चे माहात्म्य नमाज व रोजे यापेक्षाही अधिक होते. कारण ती परिस्थिती 'ईमान'च्या कसोटीचा प्रसंग असते. संकटकाळात जो मनुष्य इस्लाम व मुस्लिमांस साथ देत नाही, त्याचा 'ईमान'च संशयास्पद आहे. तसे झाले तर त्याची नमाज काय कामाची व त्याचे रोजांचे कसले मूल्य? एखादा नतदृष्ट असा असेल की त्या संकटकाळात तो मनुष्य इस्लामच्या व मुस्लिमांच्या शत्रूंना साथ देतो तर तो मनुष्य खात्रीने दांभिक आहे. त्याची नमाज, त्याचा रोजा, त्याची जकात व त्याचा हज हे सर्व काही निरर्थक आहे.

## प्रकरण सहावे

# ‘दीन’ (जीवनधर्म) व ‘शरियत’ (आचारसंहिता)

आतापर्यंत आपणास जी माहिती मिळाली ती पूर्णत: धर्मासंबंधी होती. आता आपण पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या शरियतसंबंधी चर्चा करू या. परंतु अगोदर ‘शरियत’ म्हणजे काय आणि ‘शरियत’ व ‘दीन’मध्ये काय फरक आहे हे जाणून घेणे अगत्याचे आहे.

## ‘दीन’ व ‘शरियत’

मागील सर्व प्रकरणांत आपण हे पाहिले आहे की सर्व पैगंबरांनी इस्लाम धर्माचीच शिकवण दिलेली आहे. इस्लाम धर्मानुसार तुम्ही अल्लाहच्या अस्तित्वावर व त्याच्या गुणवैशिष्ट्यांवर श्रद्धा बाळगावी, तसेच पारलौकिक जीवनात या जगातील सत्कर्माबद्दल मिळणारे इनाम व दुष्कर्माबद्दल मिळणारी शिक्षा या गोष्टीवर अल्लाहच्या सच्चा पैगंबरांनी जी शिकवण दिलेली आहे त्यानुसार तुम्ही ईमान धारण करावे. ईशग्रंथांना मान्य करून स्वत:च्या स्वैर आवडीच्या मार्गाचा परित्याग करावा. या ग्रंथांमध्ये जो मार्ग दाखवून देण्यात आला आहे त्या मार्गाचाच अवलंब करा. अल्लाहच्या पैगंबरांचेच अनुयायीत्व करा व इतर सर्व गोष्टी सोडून त्यांच्याच आज्ञांचे पालन करा. ‘इबादत’ (उपासने) मध्ये अल्लाहखेरीज इतर कोणाचाही समावेश करू नका. त्याच ‘ईमान’ व ‘इबादत’चे नाव ‘दीन’ (जीवनधर्म) आहे. हे सर्व पैगंबरांच्या शिकवणीत समाविष्ट आहे. यानंतर शरियत (धर्मशास्त्र) म्हणजे काय हे पाहू या. ‘शरियत’ म्हणजे उपासना करण्याच्या पद्धती, सामाजिक नियम व कायदे, निषिद्ध व वैध इ. तसेच धर्मसंमत व धर्मअसंमत यांच्या मर्यादा वगैरे. या विविध बाबींसाठी अल्लाहने भिन्नभिन्न काळांत भिन्नभिन्न जातीवंशाच्या व जनसमूहांच्या अवस्थांनुसार आपल्या पैगंबरांकरवी वेगवेगळ्या शरियत-पद्धती पाठविल्या होत्या, जेणेकरून पैगंबरांनी प्रत्येक जातीवंशाला नीती व सभ्यतेची, संस्कृतीची वेगवेगळी शिकवण देऊन त्यांना एका विशाल कायद्याच्या पालनासाठी तयार करीत राहावे. जेव्हा हे कार्य पूर्ण झाले तेव्हा सर्वश्रेष्ठ अल्लाहने पैगंबर मुहम्मद (स.) यांना तो विशाल कायदा देऊन पाठविले. त्या विशाल कायद्याची एकूण कलमे व तरतूदी सर्व विश्वासाठी आहेत. आता ‘दीन’ तर तोच आहे जो आधीच्या पैगंबरांनी शिकविला होता. परंतु मागील सर्व ‘शरियत-पद्धती’ मात्र रद्द करण्यात आल्या आहेत. त्यांच्या ठिकाणी अशी ‘शरियत’ प्रस्थापित केली गेली आहे ज्यामध्ये समस्त मानवजातीसाठी उपासनांच्या पद्धती, सामाजिक नियम, आपापसातील व परस्परातील संबंधाचे व व्यवहाराचे नियम, वैध व निषिद्ध यांच्या मर्यादा सर्वांना सारख्या लागू आहेत.

# शरियतच्या आज्ञा जाणून घेण्याची साधने

पैगंबर मुहम्मद (स.) यांनी दिलेल्या शरियतचे नियम व आदेश जाणण्यासाठी आपल्याकडे दोन साधने आहेत. पवित्र कुरआन व हदीस ही ती दोन साधने होत.

पवित्र कुरआन हा ईशग्रंथ आहे व त्यातील प्रत्येक शब्द अल्लाहकडून आहे हे तर तुम्ही जाणताच. प्रश्न उरला हदीसचा, हदीस म्हणजे पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या उक्ती व कृतीबद्दलची माहिती आहे. पैगंबर मुहम्मद (स.) यांचे संपूर्ण जीवन म्हणजे कुरआनचे प्रत्यक्ष आचरणाने घडविलेले स्पष्टीकरण आहे. पैगंबरत्वाच्या प्राप्तीनंतर सतत तेवीस वर्षांच्या कालावधीपर्यंत ते सदैव शिकवण व उपदेश, मार्गदर्शनाच्या कार्यात मग्न असत. आपल्या वाणीने व आचरणाने ते लोकांना हे दाखवून देत असत की, अल्लाहच्या मर्जीनुसार जीवन व्यतीत करण्याची पद्धत कोणती आहे. त्यांच्या अत्यंत प्रभावी जीवनकालात त्यांचे साथीदार (सहाबा) पुरुष व साथीदार (सहाबीया) स्त्रिया, त्यांचे आप्तेष्ट, तसेच त्यांच्या पत्नी ही सर्व मंडळी पैगंबर मुहम्मद (स.) यांची प्रत्येक उक्ती लक्ष देऊन ऐकत असत, प्रत्येक कृत्याचे लक्षपूर्वक निरीक्षण करीत असत, तसेच त्यांना वेळोवेळी सामोऱ्या येणाऱ्या व्यावहारिक समस्यांबद्दल ते पैगंबराकडून शरियतच्या आदेशाची मागणी करत असत. पैगंबर मुहम्मद (स.) कधी सांगत असत की अमुक काम करू नका व जे लोक त्या वेळी हजर असत ते ही उक्ती ऐकून घेऊन स्मरणात ठेवीत असत. त्याचप्रमाणे पैगंबर मुहम्मद (स.) एखादे कृत्य काही विशिष्ट पद्धतीने करीत असत आणि तसे करताना त्यांना प्रत्यक्ष पाहणारे लोक ती विशिष्ट पद्धत लक्षात ठेवीत असत. ज्यांनी प्रत्यक्ष पाहिले नाही अशा लोकांना ते तंतोतंत वर्णन करून सांगत असत. तसेच पैगंबरांच्या समक्ष कधी एखादा मनुष्य एखादे कृत्य करी तेव्हा पैगंबर कधी स्तब्ध राहात किंवा त्याबद्दल आपली पसंती वा नापसंती व्यक्त करीत असत. हे सर्व हजर असणारे लोक आपल्या स्मृतीत जतन करून ठेवीत असत. असे जे काही पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या साथीदार स्त्री-पुरुषांनी ऐकले, काहींनी ते पाठांतराने मुखोद्गत करून टाकले, काहींनी लिखाण करून त्यांच्या नोंदी करून ठेवल्या आणि ती माहिती कोणाकडून मिळाली यांचीही नोंद ठेवली, या सर्व 'रिवायतीं'ना (निवेदनांना) पुढे पुढे एकत्रीकरण करून त्यांना पुस्तकी स्वरूप देण्यात आले. अशा प्रकारे हदीसचा एक मोठा संग्रह उपलब्ध झाला. हदीसचा संग्रह करणाऱ्यांत प्रामुख्याने इमाम मालिक (रह.), इमाम बुखारी (रह.), इमाम मुस्लिम (रह.), इमाम तिर्मिजी (रह.), इमाम अबू दाऊद (रह.), इमाम निसाई (रह.), इमाम इब्ने माजा (रह.) यांचे ग्रंथ अधिक प्रमाणित मानले जातात.

# ‘फिकाह’ (नियमावली)

कुरआन व हदीस यातील सर्व आदेशांचा अभ्यास व अध्ययन करून काही इस्लाम धर्मश्रेष्ठींनी सामान्य माणसांना सोयीस्कर होईल अशा रितीने खुलासेवार नियमावली तयार केली असून त्या नियमांना ‘फिकाह’ असे म्हणतात. प्रत्येक मनुष्य कुरआनमधील सर्व बारकावे नीट समजू शकत नाही, तसे माणसाला हदीसचेही इतके ज्ञान प्राप्त नसते की त्याने स्वत:च शरियतचे आदेश जाणून घ्यावे. म्हणून ज्या धर्मश्रेष्ठींनी वर्षानुवर्षे अध्ययन व संशोधन करून जी ‘फिकाह’ संकलित करून ठेवली आहे, त्यांच्या उपकाराचे ऋण जगातील मुस्लिम कधीही फेडू शकत नाहीत.

आज जगातील कोट्यवधी मुस्लिम कसल्याही श्रमाविना शरियतच्या नियमाचे पालन करीत आहेत. तसेच अल्लाहचे व पैगंबर मुहम्मद (स.) यांचे आदेश जाणणे कोणालाही अवघड वाटत नाही. हे त्या धर्मश्रेष्ठींनी घेतलेल्या खडतर परिश्रमाचेच फळ आहे.

आरंभीच्या काळात अनेक धर्मश्रेष्ठींनी ‘फिकाह’चे संकलन आपापल्या पद्धतीने करून ठेवले होते, परंतु पुढे फक्त चार फिकाहच अखेरीस उरल्या व जगातील मुस्लिम सर्वाधिक त्यांचेच आज्ञापालन करीत आहेत. त्या चार ‘फिकाह’ खालीलप्रमाणे आहेत.

(१) इमाम अबू हनिफा (रह.) यांची फिकाह. या फिकाहचे संकलन करण्यात इमाम अबू यूसुफ (रह.), इमाम मुहम्मद (रह.), इमाम जाफर (रह.) व तसे आणखी काही श्रेष्ठ धर्मपंडितांचा सल्ला समाविष्ट होता. याला ‘फिकाह हनफी’ असे नाव आहे.

(२) इमाम मालिक (रह.) यांची फिकाह. ही फिकाह ‘मालिकी’ या नावाने प्रसिद्ध आहे.

(३) इमाम शाफई (रह.) यांची फिकाह. याला ‘फिकाह शाफई’ असे म्हणतात.

(४) इमाम अहमद बिन हम्बल (रह.) यांची फिकाह. याला फिकाह ‘हम्बली’ असे म्हटले जाते.

या चारही नियमावलींचे संकलन पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या निधनानंतर २०० वर्षांच्या कालावधीच्या आत झालेले आहेत. या चार फिकाहमध्ये जे काही भेद आहेत ते अगदी स्वाभाविक आहेत. काही वेगवेगळे लोक जेव्हा एखादी घटना अथवा एखाद्या व्यवहाराची सखोल चौकशी करतात किंवा एखादी गोष्ट समजून घेण्याचा प्रयत्न करतात तेव्हा त्यांच्या चौकशीच्या निष्कर्षात व त्यांच्या संकलित माहितीत थोडीफार तफावत

अवश्य असतेच. परंतु वरील चारही धर्मश्रेष्ठी सद्हेतू धारण करणारे व मुस्लिमांचे हितचिंतक होते. म्हणून सर्व मुस्लिम या चारीही धर्मश्रेष्ठींना सत्याधिष्ठित मानतात.

अर्थातच मुस्लिमाने सर्व जीवनव्यवहारांसंबधी कोणतीही एकच फिकाह पद्धत अवलंबली जाऊ शकते. चार विविध पद्धतींचा अवलंब केला जाऊ शकत नाही; ही गोष्ट उघड आहे. म्हणून बहुतेक इस्लामी धर्मपंडितांचे असे मत आहे की मुस्लिमांनी या चार फिकाहपैकी कोणत्याही एकाचाच अवलंब करणे अगत्याचे आहे. याशिवाय इस्लाम धर्मपंडितांचा एक समूह असा आहे ज्याच्या म्हणण्यानुसार कोणत्याही एका विशिष्ट नियमावलीचा अवलंब करणे आवश्यक नाही, ज्ञान व माहिती असणाऱ्या प्रत्येक माणसाला 'कुरआन' व 'हदीस'मधून थेट आदेश प्राप्त करून घ्यावयास हवे. त्यांना 'अहले हदीस' असे संबोधिले जाते. जे विद्येपासून वंचित आहेत त्यांनी ज्या धर्मपंडितावर त्यांची श्रद्धा असेल त्याचे अनुकरण करावे. वरील चार समूहांप्रमाणे हा पाचवा समूहसुद्धा सत्त्याधिष्ठित आहे.

(१) इमाम अबू हनीफा (रह.) - हिजरी सन ८० (इ. स. ६९९) जन्माला आले. मृत्यू हिजरी सन १७१ (इ. स. ७६७) मध्ये झाला. या फिकाहचे अनुयायी तुर्कस्तान, पाकिस्तान, भारत, अफगाणिस्तान, चीन इ.मध्ये आहेत.

(२) इमाम मालिक (रह.) - जन्म हिजरी सन ९३ (इ. स. ७१४), मृत्यू हिजरी सन १७१ (इ. स. ७९८). या फिकाहचे मानणारे मॉरिशस, अल्जेरिया, सुडान, ट्युनिशिया, कुवेत व बहरीनमध्ये आहेत.

(३) इमाम इदरीस बिन शाफई (रह.) - जन्म हिजरी सन १५०(इ. स. ७६७), मृत्यू हिजरी सन २४० (इ. स.८५४). यांचे अनुयायी पॅलेस्टाईन, लेबेनॉन, इजिप्त, इराक, सऊदीअरब, यमन व इंडोनेशियामध्ये आहेत.

(४) इमाम अहमद बिन हंबल (रह.) - जन्म हिजरी सन १६४ (इ. स. ७८०), मृत्यू हिजरी सन २४१ (इ. स. ८५५). यांचे अनुयायी अधिकांश सऊदीअरब, लेबेनॉन व सीरियामध्ये आहेत.

# ‘तसव्वुफ’ (आत्मशुद्धी)

फिकाहचा संबंध माणसाच्या दर्शनी कृतीशी आहे. फिकाह फक्त इतकेच पाहत असते की, तुम्हाला जसा व ज्याप्रकारे आदेश दिला गेला आहे, तो तुम्ही पार पाडला आहे किंवा नाही. तुम्ही तो आदेश पार पाडला असेल तर तुमच्या अंत:करणाच्या स्थितीशी फिकाहला काही कर्तव्य नाही. मनाच्या स्थितीशी संबंध असणाऱ्या गोष्टीला ‘तसव्वुफ’(१) असे नाव आहे. उदाहरणार्थ– तुम्ही नमाज पढता. या उपासनेत फिकाह केवळ इतकेच पाहते की तुम्ही वुजू नीट केला आहे किंवा नाही, काबागृहाकडे तोंड करून उभे आहात की नाही, नमाजचे सर्व अनिवार्य विधी केले किंवा नाही, नमाजमध्ये ज्या सूत्राचे पठन करावे लागते ते तुम्ही केले किंवा नाही, ज्या समयी जितकी ‘रकाअत’ नमाज ठरलेली आहे अगदी त्याच वेळी तुम्ही तितकीच नमाज अदा केली आहे किंवा नाही. इतके सर्व तुम्ही पूर्ण केले तर फिकाहच्या दृष्टीने तुमची नमाज पूर्ण झाली. परंतु उपासना करताना तुमच्या अंत:करणाची स्थिती काय होती, तुमच्या मनाची एकाग्रता अल्लाहकडे होती किंवा नाही, तुमचे मन या जगातील विचारापासून निर्मळ होते किंवा नाही, नमाजमुळे तुमच्या मनात ईशभय, अल्लाहचे सर्वज्ञानी व सर्वव्यापी असण्यावरील विश्वास व केवळ ईशप्रसन्नता प्राप्त करण्याची भावना निर्माण झाली किंवा नाही, या नमाजमुळे तुमची आत्मशुद्धी किती प्रमाणात झाली, तुमचे चारित्र्य कितपत सुधारले, नमाजने तुम्हाला किती प्रमाणात सच्चा व पक्का कृतीशील मुस्लिम बनवून सोडले. वरील सर्व बाबींचा ‘तसव्वुफ’ उहापोह करतो.

नमाजच्या मूळ हेतूशी संबंध असणाऱ्या या सर्व बाबी जितक्या अधिकाधिक प्रमाणात तुमच्यात निर्माण होतील तितक्याच प्रमाणात तुमची नमाज ‘तसव्वुफ’च्या दृष्टीने अधिक परिपूर्ण होईल. या गोष्टींची जितक्या प्रमाणात तुमच्यात उणीव असेल तितक्याच प्रमाणात ‘तसव्वुफ’च्या दृष्टीने तुमची नमाज दोषयुक्त ठरेल. याच तऱ्हेने ‘शरियत’चे जे काही आदेश ज्या स्वरूपात दिले गेले होते त्याच स्वरूपात तुम्ही त्यांचे पालन केले आहे किंवा नाही; फिकाह एवढेच पाहते. तसेच या आदेशांचे पालन करताना तुमच्या अंत:करणात निष्ठा, प्रामाणिकपणा, सद्‌भाव व खरा आज्ञाधारकपणा किती प्रमाणात होता, या बाबींची चिकित्सा ‘तसव्वुफ’ करतो.

---

१) कुरआनमध्ये यालाच ‘तजकिया’ (आत्मशुद्धी व ‘हिकमत’) असे म्हटले आहे. हदीसमध्ये याला ‘एहसान’ असे संबोधले गेले आहे व नंतरच्या लोकांत हीच गोष्ट ‘तसव्वुफ’ या नावाने सुप्रसिद्ध झाली.

या दोहोंमधील फरक खालील उदाहरणावरुन अधिक स्पष्टपणे कळू शकतो. तुम्हाला जेव्हा एखादा मनुष्य भेटतो तेव्हा तुम्ही दोन दृष्टिकोनातून त्याच्याकडे पाहता. एक म्हणजे तो शारीरिकपणे सुदृढ व निकोप प्रकृतीचा आहे किंवा नाही. तो आंधळा, लंगडा, पांगळा तर नाही? देखणा आहे की कुरूप, कपडे नीटनेटके व स्वच्छ आहेत की घाणेरडा आहे. तुमचा दुसरा दृष्टिकोन असा असेल की त्याचे चारित्र्य कशा प्रकारचे आहे? त्याच्या सवयी व गुणवैशिष्ठ्ये कशी आहेत. त्याची बुद्धिमत्ता व व्यवहारी ज्ञान कसे आहे, तो विद्वान आहे की अडाणी, सदाचारी आहे की दुराचारी? वरील पहिला दृष्टिकोन फिकाहचा आहे तर दुसरा दृष्टिकोन तसव्वुफचा आहे.

मैत्रीखातर जेव्हा तुम्हाला एखादा मनुष्य निवडायचा असेल तेव्हा त्याचे व्यक्तिमत्त्व तुम्ही या दोन्ही दृष्टिकोनांतून पडताळून पाहाल. त्याचे अंतरंग तसेच बाह्यरूप चांगले असावे अशीच तुमची इच्छा असेल. त्याचप्रमाणे शरिअतच्या आदेशांचे पालन बाह्यत्कारी व दर्शनी दृष्टीनेही अचूक असावे व मानसिक दृष्टिकोनाने ते निकोप असावे. अशाच प्रकारचे जीवन इस्लाममध्येही अधिक पसंत आहे. ज्याचे बाह्यत्कारी आज्ञापालन बरोबर आहे, परंतु अंत:करणात जर आज्ञाधारकत्व नसेल तर त्याच्या कर्माची उपमा एका देखण्या परंतु मृत माणसासारखी आहे. तसेच ज्या माणसाच्या कर्मात आंतरिक सर्व गुण आहेत, परंतु त्याची दर्शनी कृती अचूक नसेल तर त्याला एखाद्या सभ्य व सदाचारी पण अत्यंत कुरूप व दिसावयास ओंगळ अशा माणसाची उपमा देता येईल.

या उदाहरणावरून तुम्हाला 'फिकाह' व 'तसव्वुफ' यांचा परस्पर संबंधही लक्षात आला असेल. परंतु खेदाची गोष्ट अशी की नंतरच्या काळात विद्येची व चारित्र्याची अधोगती झाली. त्यात अनेक दोष निर्माण झाले. तसेच 'तसव्वुफ'चा निर्मळ झराही गढूळ झाला. मार्ग चुकलेल्यांकडून मुस्लिमांनी, नाना प्रकारची बिगरइस्लामी तत्त्वे शिकून व त्यांना 'तसव्वुफ'च्या नावाखाली इस्लाममध्ये समाविष्ट करून टाकले. अनेक प्रकारच्या चमत्कारिक व विलक्षण श्रद्धा व पद्धतींना 'तसव्वुफ'ची लेबले चिकटवली गेली. त्यांना कुरआन व हदीसमध्ये कसलेही स्थान नाही. नंतर या प्रवृत्तीच्या लोकांनी हळूहळू स्वत:ला शरियतच्या बंधनातूनही विमुक्त करून घेतले. तसव्वुफचा शरियतशी कसलाही संबंध नाही व हा मार्गच वेगळा आहे असे ते म्हणतात. सुफी माणसाला कायदा व नियमांचे बंधन पाळण्याचे कसले कर्तव्य आहे? अशा तऱ्हेचे विचार बहुतेक अडाणी सुफींच्या तोंडून ऐकावयास मिळतात. परंतु वास्तवात हे अगदी चूक आहे. शरियतमधील आदेशाशी कसलाही संबंध नसलेला तसव्वुफ इस्लाममध्ये असण्यास वाव नाही. नमाज,

रोजे, जकात व हजच्या बंधनातून मुक्त होण्याचा कोणाही सुफीचा हक्क नाही. जे सामाजिक नियम, आर्थिक नियम, आचार व व्यवहार, हक्क व कर्तव्ये, वैध व निषिद्ध यांच्या मर्यादा अल्लाहने व त्याचे पैगंबर मुहम्मद (स.) यांनी दाखवून दिले आहेत, त्या नियमांविरुद्ध आचरण करण्याचे कोणत्याही सुफी माणसाला हक्क प्राप्त होत नाही. पैगंबर मुहम्मद (स.) यांचे खरेखुरे अनुयायित्व न करणाऱ्या व त्यांनी ठरवून दिलेल्या पद्धतीचे पालन न करणारा माणूस हा मुस्लिम सुफी म्हणवून घेण्यासच पात्र नाही. खरेतर तसव्वुफ हे अल्लाह व त्याचे पैगंबर मुहम्मद (स.) यांच्यावरील गाढ प्रेम व आसक्तींचेच नाव आहे. हे गाढ प्रेम तर अशी निकडीची मागणी करते की माणसाने अल्लाहच्या व त्याच्या पैगंबराच्या आज्ञांचे पालन करण्यात तसूभरही कसूर करता कामा नये. म्हणून शरियतपासून वेगळी अशी इस्लामी तसव्वुफ नामक कसलीही गोष्ट नाही. उलट शरियतचे आदेश अत्यंत निष्ठापूर्वक व सद्‌भावनेने पाळणे तसेच आज्ञापालनात अल्लाहचे प्रेम व अल्लाहचे भय ओतप्रोत भरून टाकणे; याचेच नाव तसव्वुफ आहे.

## प्रकरण सातवे

# शरियतचे आदेश

या शेवटच्या प्रकरणात आपण शरियतची तत्त्वे व विशिष्ठ आदेश यांचे अध्ययन करू या. यामुळे इस्लामी शरियत मानवी जीवनाला कशा प्रकारे एका सर्वोत्तम शिस्तबद्धतेचा पाईक बनविते, तसेच त्या शिस्तबद्धतेत किती लाभकारक गोष्टींचा व तत्त्वदर्शितेचा समावेश आहे हे आपणास कळून येईल.

## शरियतची तत्त्वे

तुम्ही स्वतःच्या स्थितीचे चिंतन केले तर तुम्हाला असे कळून चुकेल की या भूतलावर येताना तुम्ही अनेक प्रकारच्या शक्ती जन्मतःच घेऊन आलेले आहात. प्रत्येक प्रकारची शक्ती व क्षमतेची अशी हाक आहे की तिचा यथोचित वापर केला जावा. तुम्हाला बुद्धी आहे, निश्चयशक्ती आहे, इच्छाआकांक्षा आहे, दृष्टी, श्रवणशक्ती, चव, स्पर्शज्ञान इत्यादी पंचेंद्रियांची शक्ती, क्षमता आहेत, हातापायात बळ आहे, तिरस्कार व क्रोध आहे, शोक व प्रेम आहे, भय व लोभ, मोह आहे. या सर्वांतील कोणतीही शक्ती व क्षमता अकारण नाही. हे सर्व तुम्हाला याचकरिता दिले गेले आहे की तुम्हाला त्यांची गरज आहे. तुमचा स्वाभाविक प्रकृतीधर्म व नैसर्गिक स्वभावधर्म ज्या गोष्टींची मागणी करीत असतो त्याची पूर्तता करण्यातच तुमचे जीवन व जीवनाची सफलता अवलंबून आहे. हे त्याचवेळी शक्य होईल जेव्हा अल्लाहने प्रदान केलेल्या या सर्व शक्ती तुम्ही उपयोगात आणाल.

नंतर तुम्हाला असेही आढळून येईल की ज्या काही शक्ती व क्षमता तुम्हाला दिल्या गेल्या आहेत त्या सर्वांचा वापर करण्याची साधनेही तुम्हाला दिली गेली आहेत. सर्वप्रथम तुमचे स्वतःचे शरीर आहे; ज्यामध्ये सर्व आवश्यक इंद्रिये व अवयव आहेत. तसेच तुमच्या सभोवतालचे जग आहे व त्यामध्ये हरप्रकारची अगणित साधने विखुरलेली आहेत. तुमच्या साहाय्यासाठी तुमच्याचसारखी अन्य माणसे आहेत. तसेच तुमच्या सेवेसाठी प्राणी, वनस्पती व अवजड वस्तू आहेत. जमीन, पाणी, हवा, प्रकाश व उष्णता आणि याच प्रकारच्या अगणित बाबी आहेत, तुमचे जीवन व्यतीत करण्यासाठी त्यांचा उपयोग करून घ्यावा, यासाठीच अल्लाहने या सर्व गोष्टींची निर्मिती केली आहे.

आता दुसऱ्या एका दृष्टिकोनातून पाहा. तुम्हाला ज्या शक्तिक्षमता दिल्या गेल्या

आहेत त्या हितासाठी आहेत, हानीसाठी नव्हे. त्यांच्या यथोचित उपयोगाचे स्वरूप हेच असू शकते की त्यापासून हानी अजिबातच होऊ नये किंवा जेवढी अढळच असेल तितकीच हानी व्हावी. याखेरीज इतर जितकी स्वरूपे असतील ती चुकीचीच असावीत असा बुद्धीचा संकेत आहे. उदाहरणार्थ, एखादे कृत्य केल्याने तुम्हाला स्वत:च जर हानी होणार असेल तर तेही चुकीचे आहे. तुमच्या शक्ती-क्षमतांचा वापर करून जर तुम्ही असे एखादे कृत्य केले ज्यामुळे इतरांना ते हानिकारक ठरेल तर तेही चूकच आहे. जर आपल्या शक्तिक्षमतांचा वापर तुम्ही अशा रीतीने कराल की ज्यायोगे तुम्हाला उपलब्ध असलेली साधने वाया जातील तर तसे करणेही चूक ठरेल. हानी, मग ती कसल्याही प्रकारची असो, ती टाळलीच पाहिजे, अशीच ग्वाही तुमची विवेकबुद्धी देईल. जर हानी टाळणे अजिबात शक्यच नसेल किंवा त्या हानीच्या पर्याप्त व परिणामस्वरूप एखादे मोठे हित साधले जाणार असेल, केवळ अशाच अवस्थेत हानी सहन केली जाऊ शकते.

आणखी पुढे जाऊ या. जगात माणसांचे दोन प्रकार आढळून येतात. जी माणसे त्यांच्या काही शक्ती-क्षमतांचा वापर अशा तऱ्हेने जाणता सवरता करीत असतात की त्यामुळे त्यांच्या स्वत:च्याच काही इतर शक्तिक्षमतावर अनिष्ट व हानीकारक दुष्परिणाम होतात किंवा दुसऱ्या माणसांवर त्याचे दुष्परिणाम होतात. त्यांच्या हितासाठी बहाल करण्यात आलेली साधने त्यांच्या हातून वाया जातात. ही साधने त्यांना हितकर वापरासाठी दिली गेली असून ती निरर्थक वाया घालविण्यासाठी दिली गेलेली नव्हती. दुसऱ्या प्रकारची माणसे जाणूनबुजून व समजूनसवरुन तर अशी कृत्ये करीत नाहीत, परंतु अज्ञानामुळे त्यांच्या हातून अशा चुका घडतात.

पहिल्या प्रकारची माणसे दुष्ट प्रवृत्तीची असतात. त्यांना काबूत ठेवता येईल अशी कायद्यांची व शिस्तीची आवश्यकता असते. दुसऱ्या प्रकारची माणसे अज्ञानी असल्याने त्यांना अशा शिक्षणाची गरज आहे ज्यामुळे त्यांना स्वत:च्या शक्तीक्षमतांचे ज्ञान होईल.

अल्लाहने जी शरियत पैगंबर मुहम्मद (स.) यांच्याकडे पाठविली आहे ती याच गरजेची पूर्तता करते. ती तुमच्यामधील कोणतीही शक्ती क्षमता नष्ट करू इच्छित नाही. कोणतीही इच्छा आकांक्षा व कोणतीही भावना नष्ट करू इच्छित नाही. जगाचा परित्याग करा, अरण्यात व गिरीकंदात जाऊन राहा. उपाशी राहा, विवस्त्र हिंडा, आत्मक्लेश करून स्वत:ला कष्टात पाडून घ्या आणि जगातील सुख व आराम यांना स्वत:साठी निषिद्ध माना; असे ती मुळीच सांगत नाही. ही ईशनिर्मित शरियत आहे व तोच अल्लाह आहे ज्याने या सृष्टीची निर्मिती माणसासाठी केली आहे. ही चराचर सृष्टी नष्ट करून

टाकणे अगर विद्रूप करणे हे त्या अल्लाहला कसे पसंत पडेल? माणसामध्ये कोणतीही शक्ती अकारण व अनावश्यक ठेवलेली नाही. तसेच भूमीवर व अवकाशातही अशी कोणतीही निरूपयोगी वस्तू निर्माण केलेली नाही जिचा कसलाही वापर केला जाऊ नये. या सृष्टीचा व्यापार चैतन्यमय रितीने चालावा. माणसांनी त्यांच्या प्रत्येक शक्तिक्षमतेचा पुरेपूर उपयोग करावा. जगातील प्रत्येक वस्तूपासून लाभ घ्यावा. तसेच भूमंडलावर व अवकाशात पसरलेल्या सर्व साधनांचा वापर व उपयोग करावा, परंतु वर सांगितलेल्या अज्ञानामुळे व दुष्टपणामुळे स्वत:चीही हानी करून घेऊ नये आणि इतर माणसांच्या हानीलाही कारणीभूत होऊ नये; अशीच अल्लाहची इच्छा आहे. अल्लाहने शरियतचे सर्व नियम व तत्त्वे याच गरजेसाठी निर्माण केले आहेत. जितक्या वस्तू व बाबी माणसाला हानीकारक आहेत, त्या सर्व शरियतमध्ये निषिद्ध ठरविल्या गेल्या आहेत. तसेच ज्या गोष्टी हितकारक व लाभदायक आहेत त्यांना वैध ठरविण्यात आले आहे. जी कृत्ये करून मनुष्य स्वत:ची किंवा इतरांची हानी करतो त्या सर्व कृत्यास शरियतने मनाई केली आहे. माणसांना हितकारक व कोणासही हानिकारक नसणाऱ्या अशा सर्व कृत्यांना शरियत अनुमती देते. जगामध्ये माणसाला सर्व इच्छा, आकांक्षा व गरजांची पूर्तता करण्याचा व स्वहितासाठी हरप्रकारचा प्रयत्न करण्याचा हक्क आहे. या हक्कांचा वापर त्याने अशा तऱ्हेने करावयास हवा की अज्ञानापोटी व दुष्टपणाने त्याने इतरांचे हक्क हिरावून घेऊ नये. उलट शक्य तितके इतरांना साहाय्यक व्हावे; या तत्त्वावर शरियतचे सर्व कायदे व नियम आधारलेले आहेत. ज्या कृत्यात एक बाजू हितकारक व दुसरी बाजू हानीची असेल अशा बाबतीत मोठ्या हितापोटी लहानशी हानी पत्करली जावी व मोठी हानी टाळण्यासाठी लहानसे हित त्यागले जावे अशी शरियतची तत्त्वे व धारणा आहे.

वास्तविकपणे प्रत्येक काळात, प्रत्येक वस्तूचा व प्रत्येक कार्याचा फायदा व तोटा प्रत्येक मनुष्याला ठाऊक नसतो. म्हणूनच ज्यापासून विश्वसृष्टीतील कोणतेही रहस्य दडलेले नाही अशा अल्लाहने मनुष्याच्या संपूर्ण जीवनासाठी एक अचूक नियमावली बनविली आहे. या नियमावलीची कित्येक गुणवैशिष्ठ्ये आजपासून मागील कित्येक शतकांपर्यंत माणसांना आकलन होत नव्हती. परंतु शिक्षण व ज्ञानाच्या प्रगतीमुळे त्यांचे आकलन सुकर झाले आहे. अजूनही बऱ्याच काही हितकारक बाबी लोकांच्या लक्षात येत नाहीत, परंतु शिक्षण व ज्ञान यांची जसजशी प्रगती होत राहील तसतसे त्या बाबी लोकांना उमगतील. स्वत:च्या तोकड्या शिक्षणावर व त्रुटीयुक्त ज्ञानावर जी माणसे विसंबून राहतात ती शतकानुशतके चुका करीत व ठेचा खात राहतात. सरतेशेवटी याच

शरियतच्या कोणत्या ना कोणत्या कायद्याचा अवलंब करण्यास ही माणसे विवश झालेली आहेत. परंतु जे लोक अल्लाहचे पैगंबर मुहम्मद (स.) यांच्यावर दृढ विश्वास ठेवून व विसंबून राहिले ते अज्ञान व अडाणीपणापासून उद्‌भवणाऱ्या हानीपासून सुरक्षित आहेत. त्यांना शरियतच्या हितकारक उद्दिष्टांचे ज्ञान असो वा नसो, कोणत्याही स्थितीत ते केवळ पैगंबर मुहम्मद (स.) वरील विश्वासावर विसंबून असल्याने अशा प्रकारच्या नियमांचे काटेकोरपणे पालन करतात की जे अचूक व निखालस ज्ञानानुसार बनविले गेले आहेत.

# हक्क व कर्तव्याचे चार प्रकार

शरियतनुसार प्रत्येक मनुष्यावर चार प्रकारची कर्तव्ये येऊन पडतात.

(१) अल्लाहसंबंधी कर्तव्य,

(२) त्याचा देह व आत्म्यासंबंधीचे कर्तव्य,

(३) इतर माणसांसंबंधी कर्तव्य व

(४) अल्लाहने त्याच्या अखत्यारीत दिलेल्या व त्यांच्यापासून हित संपादन करावे असा ईशमानस असलेल्या वस्तू व साधनासंबंधीचे कर्तव्य.

ही चार कर्तव्ये नीट समजून घेऊन ती काटेकोरपणे पार पाडणे, हेच सच्चा मुस्लिमाचे महान कर्तव्य ठरते.

शरियत या सर्व कर्तव्यांचे वेगवेगळे विवरण व स्पष्टीकरण करते आणि ते पार पाडण्यासाठी अशा पद्धती निश्चित करते की शक्यतो कोणतेही कर्तव्य दुर्लक्षित होऊ नये.

## अल्लाहसंबंधीची कर्तव्ये

(१) अल्लाहसंबंधीचे माणसाचे सर्वप्रथम कर्तव्य असे आहे की माणसाने केवळ त्यालाच ईश्वर मानावे आणि त्याच्या ईशत्वात अन्य कोणासही सहभागी करू नये. आम्ही मागे सांगितल्याप्रमाणे 'ला इलाहा इल्लल्लाह' म्हणजे 'अल्लाहखेरीज अन्य कोणीही ईश्वर नाही', या ईशवचनावर ईमान धारण केल्याने या कर्तव्याची पूर्तता होते.

(२) अल्लाहसंबंधीचे माणसाचे दुसरे कर्तव्य असे आहे की अल्लाहकडून जे आदेश येतील त्या सर्वांचा मन:पूर्वक स्वीकार केला जावा. हे कर्तव्य, अल्लाहचे पैगंबर मुहम्मद (स.) यांच्यावर ईमान धारण केल्याने पूर्ण होते, तसेच हा हक्क 'मुहम्मदुर्रसूलुल्लाह' (मुहम्मद अल्लाहचे पैगंबर आहेत) यावर ईमान धारण केल्याने अदा होतो. याबाबतीत मागे आम्ही तपशीलाने विवरण केलेलेच आहे.

(३) अल्लाहसंबंधीचे तिसरे कर्तव्य असे की त्याच्या आज्ञांचे पालन केले जावे. ईशग्रंथ पवित्र कुरआन व पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या उक्ती व आचरण (सुन्नाह) संग्रह व नियमांचे पालन केल्याने, हे कर्तव्य पार पडते. याकडेही आम्ही मागे निर्देश केलेला आहे.

(४) अल्लाहसंबंधी चौथे कर्तव्य हे की त्याची बंदगी (उपासना) केली जावी. मागील प्रकरणात निर्देश केल्याप्रमाणे या कर्तव्याची पूर्तता होण्यासाठी काही अनिवार्य कर्तव्ये आहेत. ही कर्तव्ये इतर कर्तव्यांत अग्रगण्य आहेत. म्हणून ते पार पाडण्यासाठी बाकी कर्तव्यांत काही प्रमाणात त्याग करणे आवश्यक आहे. उदाहरणार्थ- नमाज, रोजे, इत्यादी अनिवार्य कर्तव्ये पार पाडताना मनुष्य स्वत:च्या देहासंबंधीच्या व आत्म्यासंबंधीच्या बऱ्याचशा कर्तव्यांचा परित्याग करीत असतो. नमाजसाठी मनुष्य भल्या पहाटे उठून गार पाण्याने हात, पाय, तोंड, स्वच्छ करतो (वुजू), पूर्ण दिवसभरात व रात्री त्याच्या निकडीची कामे अनेकदा बाजूला सारतो. रमजान महिन्यात संपूर्ण महिनाभर भूक, तहान व इच्छावासनांना काबूत राखण्याचे क्लेश सहन करतो. जकातच्या कर्तव्याची पूर्तता करताना स्वत:च्या धनाशक्तीचे अल्लाहवरील आसक्तीत रूपांतर करतो. हज करताना प्रवासाचा त्रास व पैशाच्या खर्चाचा त्रास सहन करतो. जिहादमध्ये स्वत:चे प्राण व धनसंपत्तीचे बलिदान करतो. याच तऱ्हेने इतरांची कर्तव्येही थोड्याफार प्रमाणात त्यागतो. उदा. नमाजासाठी, एक कर्मचारी त्याच्या मालकाचे काम बाजूला ठेऊन स्वत:च्या महान स्वामीच्या उपासनेसाठी जातो. हज करताना एक मनुष्य स्वत:चे सर्व व्यवहार सोडून देऊन पवित्र मक्केचा प्रवास करतो व त्यामध्ये इतरांच्या अनेक कर्तव्यांवर त्याचा परिणाम होतो. जिहादमध्ये मनुष्य केवळ अल्लाहसाठी प्राण घेतो व प्राण देतो. याच तऱ्हेने माणसाच्या अखत्यारीतील बऱ्याचशा लाभकारक वस्तूचेही ईशकर्तव्य पार पाडताना बलिदान केले जाते. उदा. प्राण्याचे बलिदान व धनाचा व्यय.

परंतु महान अल्लाहने स्वत:विषयीच्या माणसांच्या कर्तव्यासंबंधी काही सीमा घालून दिल्या आहेत. अल्लाहचे कर्तव्य पार पाडण्यासाठी इतर कर्तव्यांचा जितका किमान त्याग अटळ आहे, त्यापेक्षा अधिक त्याग केला जाऊ नये. उदा. 'नमाज'. अल्लाहने जी नमाज तुम्हासाठी अनिवार्य केली आहे, ती अदा करण्यासाठी तुम्हाला सर्व प्रकारच्या सवलती ठेवल्या गेल्या आहेत. 'वुजू' करण्यासाठी पाणी उपलब्ध नसल्यास अथवा प्रकृती अस्वस्थ असेल तर 'तयम्मुम' करा. प्रवासात असाल तर नमाज 'कसर' (संक्षिप्त) करा. आजारी असताना नमाज बसून किंवा आडवे होऊन अदा करा. तसेच प्रत्यक्ष नमाजमध्येही जी वचने उच्चारली व पठण केली जातात तीही इतकी काही जास्त प्रमाणात नसतात की त्यासाठी फार वेळ खर्च व्हावा. निवांत वेळ असल्यास, माणसाची

इच्छा असेल तर त्याने सूरह ‘बकरा’सारख्या दीर्घ वचनाचे पठण करावे, परंतु घाईगर्दीच्या वेळी प्रदीर्घ नमाज अदा करण्यापासून रोखण्यात आले आहे. या अनिवार्य नमाजखेरीज एखादी व्यक्ती आणखी काही अतिरिक्त नमाज (नफील) स्वेच्छेने अदा केल्यास त्यापासून अल्लाह प्रसन्न होतो. परंतु अल्लाहची अशी इच्छा नसते की तुम्ही रात्रीची झोप तसेच दिवसाची विश्रांती स्वत:साठी निषिद्ध करून घ्यावी किंवा आपली उपजीविका अर्जित करण्याची वेळ नमाज अदा करण्यात घालवावी अथवा अल्लाहच्या दासांचे न्याय्य हक्क डावलून अपहरण करून नमाजच अदा करत राहावे.

याचप्रमाणे ‘रोजे’ करण्यातही सर्व प्रकारच्या सवलती दिल्या गेल्या आहेत. वर्षात केवळ एक महिना रोजे अनिवार्य केले आहेत, तेसुद्धा प्रवासात व आजारपणात तहकूब (कजा) केले जाऊ शकतात. ‘रोजे’ केलेली व्यक्ती आजारी झाल्यास व जीवाचा धोका असल्यास ती व्यक्ती ‘रोजा’ मोडू शकते. प्रत्यक्ष ‘रोजाचा’ जितका काळ निश्चित केला गेला आहे त्यात एका मिनिटाची ही वाढ करणे बरोबर नाही. ‘सहेरी’च्या शेवटच्या क्षणापर्यंत खाण्यापिण्याची परवानगी आहे. इफ्तारची वेळ झाल्याबरोबर ‘रोजा’ सोडण्याचा हुकूम आहे. अनिवार्य ‘रोजा’व्यतिरिक्त जर एखाद्याने ऐच्छिक (नफ्ल) रोजे केले तर ती अल्लाहच्या अधिक प्रसन्नतेचे कारण ठरेल. परंतु तुम्ही सतत रोजे करत बसावे व जीवनात कोणतेही काम करण्यास असमर्थ होण्याइतपत स्वत:ला अशक्त करून घ्यावे. ही गोष्ट अल्लाहला पसंत नाही.

‘जकात’चेही अल्लाहने कमीतकमी प्रमाण ठरविलेले आहे आणि जकात अशा माणसावरच लागू आहे ज्यांच्यापाशी इस्लामने निश्चित केलेली संपत्ती आहे, याहून जास्त जर कोणाच्या स्वखुशीने ईशमार्गात खर्च केली तर अल्लाह त्यावर प्रसन्न होईल. परंतु तुम्ही स्वत:चे व तुमच्या संबंधितांचे हक्कांना बळी देऊन, स्वत:चे सर्वस्व दान (सदका) मध्ये देऊन टाकून स्वत: दरिद्री होऊन असहाय होऊन राहावे, हे अल्लाहला पसंत नाही. यातही समतोल राखण्याचा आदेश आहे.

आता ‘हज’कडे पाहा! प्रथमत: जे प्रवासखर्चाची कुवत बाळगतात व प्रवासाची दगदग सहन करण्याची क्षमता बाळगतात, केवळ अशा लोकांसाठीच ते अनिवार्य केले गेले आहे. त्यात आणखी एक सवलत अशी ठेवली गेली आहे की आयुष्यभरात एकदा व सोईस्कर असेल तेव्हा जाऊन येऊ शकता. मार्गात युद्ध चालू असेल किंवा अशांत परिस्थिती असून त्यामुळे जीवास धोका होण्याचा संभव असेल तेव्हा हजयात्रेची मनिषा तहकूब करू शकता. त्याचबरोबर माता, पित्याची अनुमतीही आवश्यक असल्याचे

ठरविले गेले आहे जेणेकरून वृद्ध मातापित्यांना तुमच्या गैरहजेरीत काही कष्ट पडू नयेत. या सर्व गोष्टीवरून सर्वश्रेष्ठ अल्लाहने आपल्या हक्कपूर्तीमध्ये इतरांच्या हक्कांची किती प्रमाणात दक्षता घेतली आहे हे कळून चुकते.

अल्लाहच्या हक्काची पूर्तता करताना मानवी हक्कांचे सर्वांत मोठे बलिदान 'जिहाद' करताना होते. कारण त्यात मनुष्य आपले सर्वस्व, म्हणजे प्राण व संपत्तीसुद्धा अल्लाहच्या मार्गात अर्पण करतो. इतरांचेही प्राण, संपत्ती बळी देतो. परंतु आम्ही या अगोदर म्हटल्याप्रमाणे इस्लामचे तत्त्व असे आहे की मोठ्या नुकसानीपासून वाचण्यासाठी छोटे नुकसान सहन केले पाहिजे. हे तत्त्व डोळ्यांसमोर ठेवा व मग पाहा. शेकडो, हजारो, लाखो माणसांची हत्या होण्याच्या कित्येक पट मोठे नुकसान असे आहे की सत्याच्या विरोधात असत्याची वृद्धी व्हावी. अल्लाहचा 'दीन' (ईशधर्म) सत्याचा इन्कार करणाऱ्यांसमोर, अनेकेश्वरत्वासमोर, अधर्मीयांसमोर (काफिर) व अनीश्वरवाद्यासमोर (मुशरिक) (नास्तिक) दबून व नमून राहावा. पृथ्वीवर मार्गभ्रष्टता व अनाचार यांचा प्रसार व्हावा, इत्यादी.

याचकरिता अशा विशाल नुकसानीपासून वाचण्यासाठी सर्वश्रेष्ठ अल्लाहने मुस्लिमांना असा हुकूम दिला आहे की, प्राणाच्या व धनसंपत्तीच्या तुलनात्मक छोटे नुकसान अल्लाहच्या प्रसन्नतेसाठी सहन केले जावे. परंतु त्याचबरोबर हेही सांगून ठेवले आहे की जितके किमान रक्त सांडणे आवश्यक आहे त्यापेक्षा जास्त रक्त सांडू नका. वृद्ध, स्त्रिया, मुले, आजारी व जखमी माणसांवर हत्यार उचलू नका. केवळ अशाच लोकांशी लढा जे असत्याच्या समर्थनार्थ शस्त्र हातात घेतात. शत्रूप्रदेशात अनावश्यक विध्वंस व बरबादी करू नका. शत्रूवर विजय मिळविला तर त्याच्याशी न्यायाने वागा. एखाद्या गोष्टीवर शत्रूशी करार झाला तर त्याचे पालन करा. सत्याशी वैर करण्याचे शत्रूंनी सोडून दिले तर लगेच युद्ध थांबवा. अल्लाहच्या हक्काच्या पूर्ततेच्या मार्गात मानवी हक्काच्या बलिदानाची जेवढ्या प्रमाणात आवश्यकता असते त्यापेक्षा जास्त धर्मपसंत नाही.

# स्वतःच्या देहाचे व आत्म्याचे हक्क

आता दुसऱ्या प्रकारचे हक्क पाहू या. म्हणजे मनुष्याचे स्वतःच्या देहासंबंधीचे व आत्म्यासंबंधीचे हक्क.

मनुष्य त्याच्या स्वतःवरच सर्वांत जास्त अत्याचार करीत असतो, हे ऐकून कदाचित तुम्हाला आश्चर्य वाटेल. खरेतर ही बाब विस्मयकारकच आहे, कारण सकृतदर्शनी तर प्रत्येक मनुष्याची अशीच भावना असते की त्याचे सर्वांत अधिक प्रेम स्वतःवरच आहे. कोणतीही व्यक्ती स्वतःचीच वैरी असल्याचे मान्यही करणार नाही, परंतु यावर थोडेसे विचार-चिंतन केल्यास यातील वास्तविकता तुमच्या दृष्टीस पडेल.

माणसाची एक मोठी कमजोरी अशी आहे की त्याची एखादी इच्छा अधिक प्रबळ बनली की तो तिचा दास बनतो. तिच्या पूर्ततेसाठी तो समजून सवरून किंवा अजाणतेपणी स्वतःचे बरेच नुकसान करून घेतो. तुम्ही पाहता की एखाद्या माणसाला एखाद्या व्यसनाची लत लागते. तो त्या व्यसनासाठी वेडा बनतो व स्वतःच्या प्रकृतीचे नुकसान, आर्थिक नुकसान, प्रतिष्ठेचे नुकसान किंबहुना सर्व प्रकारचे नुकसान सहन करीत राहतो. दुसरा एखादा मनुष्य खाद्यपदार्थांचा व चवीचा इतका लोभी बनतो की कसलेही खाद्य स्वाहा करून टाकतो आणि त्याच्या जीवाचा घात करून घेतो. तिसरा एखादा मनुष्य वैषयिक सुखाचा आसक्त बनतो व अशी कृत्ये करीत असतो, परिणामतः त्यात त्याचा नाशच असतो. चौथा एखादा मनुष्य आध्यात्मिक उन्नतीच्या तोऱ्यात असतो. तो स्वतःच्या प्राणावरच उठतो आणि त्याच्या आत्म्याच्या सर्व इच्छावासना ठेचून टाकतो आणि देहाच्या गरजांची पूर्तता करण्यासही नकार देतो, विवाहापासून दूर पळतो, खाणेपिणे वर्ज्य करतो, कपडे घालण्यास नकार देतो, किंबहुना श्वासोच्छवास करण्यासही तो राजी नसतो, गिरीकंदात जाऊन बसतो आणि हे जग त्याच्यासाठी निर्माण केले नाही असे समजतो.

आम्ही केवळ उदाहरणासाठी मनुष्याच्या अतिरेकप्रियतेचे वर काही नमुने दिले आहेत. वास्तविकपणे अशा प्रकारची अगणित रूपे त्याच्या सभोवताली रात्रंदिवस आढळून येतात.

इस्लामची 'शरियत' मनुष्याच्या कल्याण व सफलतेसाठी आहे. म्हणून ती मनुष्याला सावधान करते की, ''तुझ्यावर तुझ्या स्वतःचेही काही हक्क आहेत.''

शरियत मनुष्याला अशा सर्व गोष्टींपासून रोखते व परावृत्त करते, ज्यापासून

मनुष्याला नुकसान होते. उदा. दारू, अफू, गांजा व अन्य मादक पदार्थ, डुकराचे मांस, हिंस्त्र प्राण्याचे मांस व विषारी जिवाणू, अमंगल प्राणी, रक्त तसेच मृत प्राण्यांचे मांस वगैरे; याचे कारण असे की या वस्तूंचा अनिष्ट परिणाम माणसाच्या आरोग्यावर, चारित्र्यावर, बौद्धिक व आत्मिक बळावर होतो. याउलट शरियत स्वच्छ, निर्मळ व लाभकारक वस्तू मनुष्यासाठी वैध ठरविते व ती मनुष्याला सांगते की निर्मळ व हितकारक अशा वैध वस्तू तू स्वत:साठी त्याज्य मानू नकोस. कारण तुझ्या देहाचाही तुझ्यावर काही हक्क आहे.

शरियत मनुष्याला विवस्त्र होण्यापासून रोखते व त्याला आदेश देते की अल्लाहने तुझ्या देहासाठी जो वस्त्रांचा साज निर्माण केला आहे त्याचा लाभ घे आणि स्वत:च्या देहाचे असे सर्व भाग झाकून घे, ज्या भागाचे प्रदर्शन असभ्यता व निर्लज्जपणा ठरते.

शरियत मनुष्याला उपजीविकेसाठी झटण्याचा आदेश देते व निरूद्योगी न राहण्याचा आदेश देते. भिक्षा मागू नकोस, उपाशी मरू नकोस, अल्लाहने तुला ज्या शक्ती दिल्या आहेत त्याचा वापर कर, असे सांगते. पृथ्वीवर व आकाशात तुझ्या सुखासाठी व पोषणासाठी ज्या वस्तू निर्माण केल्या आहेत त्यांना उचित मार्गाने प्राप्त कर.

शरियत मनुष्याला विषयसुखाची वासना दाबून ठेवण्यापासून रोखते व माणसाला आदेश देते की वैषयिक इच्छेच्या पूर्ततेसाठी विवाह कर.

ती मनुष्याला आत्मक्लेश करण्यापासून परावृत्त करते आणि म्हणते की आराम व सुखकारक गोष्टी व जीवनाचा आनंद स्वत:साठी त्याज्य करून घेऊ नकोस. जर तुला आत्मिक उन्नती, अल्लाहचे सान्निध्य व पारलौकिक जीवनातील सफलता व मुक्ती हवी असेल तर त्यासाठी जगाचा त्याग करण्याची गरज नाही. याच जगात जीवन जगताना सर्व व्यवहार पूर्णत: मन लावून करताना अल्लाहचे स्मरण करणे, त्याच्या अवज्ञेपासून दूर राहणे व त्याने निर्मिलेल्या नियमांचे काटेकोरपणे पालन करणे, हेच या जगातील तसेच पारलौकिक जीवनातील सफलता व मुक्तीचे साधन आहे.

शरियत मनुष्याला आत्महत्येपासून परावृत्त करते व म्हणते, ''तुझे प्राण वास्तविकपणे अल्लाहची मालमत्ता आहे. ती तुला एवढ्यासाठीच दिली गेली आहे की त्याचा वापर तू अल्लाहने निश्चित केलेल्या कालावधीपर्यंत करावा, ती प्राणरूपी मालमत्ता तू वाया दवडावी यासाठी दिली गेलेली नाही.''

# मानवी हक्क

एकीकडे शरियतने माणसाला स्वत:च्या देहाचे तसेच आत्म्याचे हक्क अदा करण्याचा आदेश दिला आहे तर दुसरीकडे त्यावर असेही बंधन घातले आहे की वरील स्वत:च्या हक्कांची पूर्तता करतांना इतर माणसांच्या हक्कावर विपरीत व अनिष्ट परिणाम होईल अशा पद्धतीचा अवलंब करू नये. कारण अशा पद्धतीने जर स्वत:च्या इच्छा आकांक्षाची पूर्तता करण्याचा अवलंब केला तर माणसाचा स्वत:चा आत्माही मलीन बनतो व त्यापासून इतर माणसांनाही तऱ्हेतऱ्हेने अपाय व हानी सोसावी लागते. म्हणूनच शरियतने चोरी, लूटमार, लाचलुचपत, भ्रष्टाचार, अपहार, व्याज घेणे व फसवणूक वगैरे गोष्टी निषिद्ध ठरविल्या आहेत. कारण की अशा मार्गाने माणसाला जो काही लाभ होतो तो इतर माणसांच्या हानीतूनच निष्पन्न होत असतो. असत्य, खोटारडेपणा, निंदानालस्ती, चुगलीचहाडी व खोटा आरोप व खोटा आळ घेणे, या कृत्यांनाही निषिद्ध केले गेले आहे. या सर्व कृती इतर माणसांना हानिकारक असतात. जुगार, सट्टा व लॉटरीलाही निषिद्ध ठरविले गेले. कारण तो एका माणसाचा लाभ आणि हजारो-लाखो लोकांच्या हानीवरच आधारलेला असतो. फसवणुकीचे व्यवहार व अशा प्रकारचे वाणिज्य व व्यापारी करार ज्यात कोणाही एखाद्या व्यक्तीची हानी होण्याचा संभव आहे, अशा करारांनाही निषिद्ध ठरविले गेले आहे. हत्याकांड, दंगली व असे उद्रेक घडवून आणण्यासाठी केली जाणारी कटकारस्थाने यांनाही निषिद्ध केले गेले आहे. कारण एखाद्या माणसाला स्वार्थासाठी  इतर माणसांचे प्राण घेण्याचा व त्यांना उपद्रव पोहोचविण्याचा कसलाही हक्क नाही. व्यभिचार व समलिंगी संभोगही निषिद्ध ठरविले गेले आहेत. कारण अशी कृत्ये करणाऱ्या माणसाचे आरोग्य तसेच त्याच्या नैतिकतेस कीड लागते. त्याचबरोबर अशा कृत्यामुळे संपूर्ण समाज निर्लज्जपणा, दुराचार व असभ्यतेच्या घाणीत लोटला जातो, त्यांच्यामुळे दुर्धर गुप्तरोग होतात. येणाऱ्या पिढ्यांवरही त्याचा अनिष्ट परिणाम होतो, उपद्रव निर्माण होतो, माणसाचे परस्परातील संबंध बिघडून जातात व संस्कृती व सुसंस्कारांचे निर्मूलन होत जाते.

हे निर्बंध शरियतने केवळ यांचसाठी लावले आहेत की एखाद्याने स्वत:च्या इच्छा वासनांची पूर्तता करताना इतर माणसांचे हक्क डावलू नयेत. परंतु मानवी संस्कार व संस्कृतीच्या उन्नतीसाठी एका माणसाने दुसऱ्याला हानी पोचवू नये, एवढेच पुरेसे नाही, उलट त्यासाठी हेही अत्यंत आवश्यक आहे की माणसामाणसांतील परस्पर संबंध अशा प्रकारे जोडले जावेत की ते एकमेकांच्या भल्यासाठी व कल्याणासाठी साहाय्यक

व्हावे. याच गरजेपोटी शरियतने जे नियम निर्धारित केले आहेत त्यांचा केवळ खुलासा आम्ही येथे देत आहोत.

माणसामाणसांतील संबंधाचा प्रारंभ कुटुंबव्यवस्थेपासून होतो. म्हणून सर्वप्रथम आपण त्यावर दृष्टिक्षेप टाकू या. वास्तवत: पती, पत्नी व मुले यांच्यावर आधारलेल्या समूहाला परिवार अथवा कुटुंब असे म्हणतात.

परिवाराबाबतीत इस्लामी कायदा असा आहे की उपजीविका मिळविणे, कुटुंबाच्या गरजा भागविणे आणि पत्नीचे व मुलांबाळांचे रक्षण करणे हे प्रत्येक पुरूषाचे आद्य कर्तव्य आहे.

स्त्रीचे कर्तव्य असे ठरविण्यात आले आहे की पुरुष जी काही मिळकत मिळवून आणील त्यामध्ये घरातील व्यवस्था व कारभार चांगल्या प्रकारे पाहावा आणि पतीला तसेच मुलाबाळांना जास्तीतजास्त सुख होईल असे पाहावे, मुलांना सुसंस्कार घडवावेत.

मुलांचे कर्तव्य असे आहे की त्यांनी वडिलांच्या व आईच्या आज्ञांचे पालन करावे. त्यांचा आदर करावा व मुले जेव्हा मोठी होतील तेव्हा त्यांनी मातापित्यांची सेवा करावी.

अशा प्रकारची कुटुंबव्यवस्था नीटपणे चालू राहण्यासाठी इस्लामने दोन गोष्टींचे आयोजन केले आहे. पहिली गोष्ट म्हणजे पिता-पती यांना कुटुंबप्रमुख निर्धारित केले आहे. कारण ज्याप्रमाणे एखाद्या गावाचा कारभार एक प्रशासक किंवा कारभारी असल्याशिवाय नीट चालू शकत नाही आणि एखाद्या शाळेचा कारभार एका मुख्याध्यापकाशिवाय सुरळीत चालू शकत नाही, त्याचप्रमाणे कुटुंबव्यवस्थासुद्धा कुटुंबप्रमुखाविना नीट चालू शकत नाही. प्रत्येकजण आपल्या इच्छे व मर्जीनुसार वागत असेल, त्या कुटुंबात अकारण कलह पसरेल, विस्कळीतपणा माजेल आणि सुख-समाधान तेथे नावापुरतेही उरणार नाही.

पती महाशय स्वत:च्या मर्जीनुसार एकीकडे जातील तर पत्नी तिच्या इच्छेनुसार दुसऱ्या ठिकाणी जाईल आणि अशा गदारोळाने मुलांचे वाटोळे होईल. अशी सर्व प्रकारची हानी टाळण्यासाठी कुटुंबाचा एक प्रमुख असणे आवश्यक असून तो पुरुषच असू शकतो. कारण तोच कुटुंबाच्या पालनपोषणास व त्याच्या रक्षणास जबाबदार असतो.

इस्लामने आयोजिलेली दुसरी गोष्ट अशी की स्त्रीने घराबाहेरील सर्व कामे पुरुषावर सोपवावीत व कारणाशिवाय घराबाहेर पडू नये. तिने घरातील सर्व कर्तव्ये मन:पूर्वक व एकाग्रतेने पार पाडावीत आणि पतीच्या व मुलांच्या सुखामध्ये कसलीही

बाधा होऊ नये. तिच्या घराबाहेर पडण्यामुळे घरातील सुख-समाधान व मुलांवरील सुसंस्कार व चांगले वळण लावण्यात जी बाधा संभवनीय असते, ती होऊ नये, म्हणूनच स्त्रीला घराबाहेरच्या सर्व कर्तव्यातून व जबाबदाऱ्यांतून पूर्णपणे मुक्त केले गेले आहे. याचा अर्थ स्त्रीने घराबाहेर पाऊलच टाकायचे नाही, असा कदापिही नाही. गरज असताना स्त्रीला घराबाहेर जाण्यास अनुमती आहे. परंतु शरियतचा खरा मानस असा आहे की स्त्रीचे कार्यक्षेत्र प्रामुख्याने तिचे घरच असले पाहिजे व स्त्रीची सर्व शक्ती व क्षमता घरातील सर्व व्यवस्था अधिकाधिक चांगली होण्यासाठीच कारणी लागली पाहिजे.

रक्ताची नाती लग्नसंबंधामुळे अधिकाधिक विस्तार पावतात. या वर्तुळात जी माणसे एकमेकांशी जुळलेली असतात. त्यांचे परस्परसंबंध अबाधित व सुरळीत राखण्यासाठी व त्यांना एकमेकांचे साहाय्यक बनविण्यासाठी, शरियतने वेगवेगळे कायदे केले आहेत आणि ते अत्यंत बुद्धीविवेकाने केले गेले आहे. त्यातील काही कायदे असे आहेत,

(१) ज्या पुरुष व स्त्रियांना नैसर्गिकत: मोकळपणाने व जिव्हाळ्याने आपसात वावरावे लागते, अशा नात्यांमध्ये विवाह निषिद्ध ठरविला गेला आहे. उदा. माता-पुत्र, पिता-कन्या, सावत्र पिता-सावत्र कन्या, सावत्र आई-सावत्र पुत्र, भाऊ-बहीण, एका स्त्रीचे स्तनपान करून वाढलेला मुलगा व मुलगी, काकी-पुतण्या, आत्या-पुतण्या, मामा-भाची, मावशी-भाचा, सासू-जावई, सासरा-सून ही सर्व नाती विवाहबाह्य ठरविल्याने असणाऱ्या अगणित हितकर गोष्टींपैकी एक अशी की, या नात्यातील स्त्री पुरुषांचे परस्पर संबंध अत्यंत पवित्र व निर्मळ असतात. ते अशा सात्विक, निर्मळ व निरलस प्रेमाने एकमेकांशी नि:संकोच मनाने मिळू-मिसळू शकतात.

(२) वरील निषिद्ध ठरविलेल्या नात्यांतील विवाहसंबंधाखेरीज कुळातील अन्य स्त्री-पुरुषांचे विवाह धर्मसंमत ठरविले गेले आहेत, जेणेकरून त्यांच्यामधील परस्परसंबंधात विकास व्हावा. जी माणसे एकमेकांच्या स्वभावाशी व सवयीशी परिचित असतात, त्यांच्यामधील विवाहसंबंध मोठ्या प्रमाणात यशस्वी होतात. अनभिज्ञ व अनोळखी कुटुंबात विवाहसंबंध जुळविण्याने बहुधा कलहाची अवस्था निर्माण होते. म्हणून इस्लाममध्ये 'कुफू' म्हणजे आचारविचार, राहणीमान यांच्यात समपातळी असणाऱ्या व्यक्तींना विवाहसंबंधासाठी तशी समपातळी नसणाऱ्या माणसावर प्राधान्य दिले गेले आहे.

(३) कुळात श्रीमंत-गरीब, सुस्थितीतील व विपन्नावस्थेत असणारी सर्व प्रकारची माणसे असतात. इस्लामचा आदेश असा आहे की प्रत्येक माणसावर सर्वांत जास्त हक्क त्याच्या नातेवाईकांचा आहे. ‘शरियत’मध्ये याचे नाव ‘सिल-ए-रहेमी’ म्हणजे नातेवाईकांशी दयाबुद्धीने केलेले सद्वर्तन असून तिच्या आचरणाबद्दल सक्त ताकीद दिली गेली आहे. नातेवाईकांशी बेमुर्वतपणाचे संबंध असण्याला ‘कता-रहेमी’ दयाबुद्धी ठेचणे असे नाव असून इस्लाममध्ये ते एक मोठे दुष्कृत्य (पाप) आहे. एखादा आप्तेष्ट व नातेवाईक जर गरीब असेल किंवा त्याच्यावर एखादे संकट कोसळले असेल तेव्हा सुस्थितीत असणाऱ्या त्याच्या सर्व नातेवाईकांनी त्याला साहाय्य करणे, हे त्यांचे कर्तव्य ठरते. दानधर्म करतानाही विशेषकरून नातेवाईकांच्या हक्कालाच प्राधान्य दिले गेले आहे.

(४) वारसाकायदाही अशा रितीने केला गेला आहे की एखाद्या माणसाच्या मृत्यूनंतर त्याची जी काही संपत्ती असेल मग कितीही जास्त असो किंवा अल्पशी असो, ती संपत्ती एकाच जागी केंद्रित होऊन एकवटू नये, तर ती मृताच्या नातेवाईकांमध्ये कमीअधिक प्रमाणात विभागली व वाटली जावी. मुलगा, मुलगी, पत्नी, पती, आई, वडील, भाऊ, बहीण हेच माणसाचे सर्वाधिक हक्कदार आहेत. म्हणून वारसाहक्कात सर्वप्रथम या नात्यांचे वाटे निश्चित केले गेले आहेत. या नात्यांतील कोणी अस्तित्वात नसतील तर अन्य नातेवाईकांपैकी जे अधिक निकटचे असतील त्यांना वाटा मिळतो. अशा रितीने एका माणसाच्या मृत्यूनंतर त्याने मागे ठेवलेली धनसंपत्ती व मालमत्ता अनेक नातेवाईकांच्या उपयोगी पडते. इस्लामचा हा वारसाकायदा पूर्ण जगात अप्रतिम असून आता इतर जाती-वंशसुद्धा त्याचे अनुकरण करू लागले आहेत. परंतु खुद्द मुस्लिम लोकच आपल्या अज्ञानामुळे व अडाणीपणामुळे या कायद्याची पायमल्ली करीत आहेत. ही बाब अत्यंत शोचनीय आहे. विशेषकरून आईवडिलांच्या संपत्तीतील मुलींचा हिस्सा त्यांना न देण्याचा रिवाज व शिरस्ता मुस्लिमांत मोठ्या प्रमाणात आढळून येतो. वास्तविकता हा घोर अन्याय आहे व पवित्र कुरआनच्या स्पष्ट आज्ञेच्याविरुद्ध आहे.

कुटुंबानंतर मनुष्याचा संबंध त्याच्या मित्रमंडळीशी, शेजारी लोकांशी व वस्तीतील इतर नागरिकांशी येत असतो आणि त्यांच्याशी त्याला कसला ना कसला तरी व्यवहार करावा लागतो. इस्लामचा आदेश असा आहे की त्याने या सर्वांशी सचोटीने, न्यायाने

व सदाचाराने वागावे. कोणासही उपद्रव पोचवू नये. कोणाचेही मन दुखवू नये. असभ्य व अश्लील शब्द उच्चारण्यापासून दूर राहावे. एकमेकांस साहाय्य करावे, आजारी व रुग्णाची विचारपूस करावी. एखाद्याचे निधन झाले तर त्याच्या अंतयात्रेत सहभागी व्हावे. एखाद्यावर संकट आले तर त्याला सहानुभूती दाखवावी, जे कोणी अत्यंत गरीब, गरजू व अपंग असतील त्यांना गुप्तपणे मदत करावी. विधवांची व अनाथ मुलांची काळजी घ्यावी, भुकेलेल्यांना जेवू घालावे, विवस्त्रांना वस्त्राने झाकावे व बेकारांना काम द्यावे. जर अल्लाहने तुम्हाला धन दिले आहे तर ते केवळ आपल्या चैन-विलासावरच उधळू नये. सोन्या-चांदीची भांडी वापरात आणणे, रेशमी वस्त्रे परिधान करणे व आपला पैसा निरर्थक मनोरंजनार्थ किंवा चैनबाजीत व विलासात व्यय करण्यास मनाई आहे. जी धनसंपत्ती अल्लाहच्या हजारो दासांना उपजीविका पुरवू शकते ती धनसंपत्ती एखाद्या व्यक्तीने केवळ स्वत:वरच उधळू नये. ज्या पैशाने अनेकांचा उदरनिर्वाह होऊ शकतो तो पैसा केवळ एका दागिन्याच्या स्वरूपात तुमच्या देहावर रूळावा किंवा एखाद्या भांड्याच्या रूपात तुमच्या टेबलाची शोभा बनावी अथवा एका गालिचाच्या रूपाने तुमच्या दिवाणखान्यात पडून असावा किंवा दारूच्या आतषबाजीत तो जळून जावा; ही बाब घोर अन्यायजनक आहे. तुमची धनदौलत तुम्हापासून हिरावून घेण्याची इस्लामची इच्छा नाही. जे काही तुम्ही कमावले आहे अगर वारसाहक्काने तुम्हाला प्राप्त झाले आहे; त्याचे धनी तुम्हीच आहात. तुम्हाला तुमच्या धनसंपत्तीचा उपभोग घेण्याचा पूर्ण अधिकार इस्लाम देतो. तुमच्या घरादाराच्या स्वरूपावर तुमच्या कपड्यावर तसेच तुमच्या वाहनावर अल्लाहने प्रदान केलेल्या धनसंपत्तीचे प्रतिबिंब उमटावे, ही गोष्टही धर्मसंमत ठरविली आहे. परंतु इस्लामच्या शिकवणुकीचा खरा हेतू असा आहे की तुमचे जीवन साधेसुधे असावे. आपल्या गरजा अवास्तव वाढवू नये. स्वत:बरोबरच आपल्या नातेवाईकांच्या, मित्रांच्या, शेजाऱ्यांच्या, जातीबांधवाच्या व देशबांधवांच्या तसेच अखिल मानवजातीच्या हक्कांबद्दलही मान राखावा.

या लहान वर्तुळातून बाहेर पडून आता सबंध जगातील सर्व मुस्लिमांना वेढणाऱ्या अशा विशाल वर्तुळावर दृष्टी टाका. या वर्तुळामध्ये इस्लामने असे कायदे व काटेकोर नियम लावले आहेत ज्यामुळे मुस्लिमांनी एकमेकांच्या कल्याणासाठी झटावे व दुराचार निर्माण होण्याची स्थिती शक्यतो उद्‌भवू देऊ नये. उदाहरणार्थ, आम्ही खालील काही गोष्टीं निर्देश करतो.

(१) एकूण मुस्लिमांच्या चारित्र्याच्या रक्षणासाठी व जोपासनेसाठी असा एक नियम

केला गेला आहे की ज्या स्त्री-पुरुषांमधील नाती विवाहनिषिद्ध ठरविण्यात आलेली नाहीत, अशा स्त्री-पुरुषांनी मुक्तपणे एकमेकांशी मिळू-मिसळू नये. स्त्रियांचा समाजसमूह वेगळा असावा, तसेच पुरुषांचाही वेगळा असावा. स्त्रियांनी अधिकांश प्रमाणात गृहजीवनाची कर्तव्ये पार पाडण्यात सतत दक्ष असावे. घराबाहेर पडण्याची गरज असेल तर साज-शृंगार करून बाहेर पडू नये. साधा पेहराव वापरावा व शरीराचा संपूर्ण भाग योग्य रितीने वस्त्रांनी झाकून घ्यावा. हात व चेहरा उघडे करण्याची अनिवार्य गरज नसेल तर तेही वस्त्रांनी झाकून घ्यावेत आणि तशी वास्तव निकड असल्यास ती निकड भागविण्यापुरतेच हात व चेहरा उघडा करावा. त्याचबरोबर पुरुषांनाही असा आदेश दिला गेला आहे की त्यांनी परस्त्रीकडे टक लावून पाहू नये. अचानक परस्त्रीवर दृष्टी गेलीच तर ती वळवावी. दुसऱ्यांदा त्याच परस्त्रीवर दृष्टी टाकणे दोषपूर्ण आहे. परस्त्रीशी गाठभेट करणे त्याहूनही अधिक दोषपूर्ण आहे. आपले चारित्र्य जपणे, हे प्रत्येक स्त्री-पुरुषाचे आद्य कर्तव्य आहे. कामेच्छा व लैंगिक वासनेच्या पूर्ततेखातर अल्लाहने 'निकाह'रूपी जे मर्यादेचे वर्तुळ आखून दिले आहे त्याचे उल्लंघन करण्याची इच्छासुद्धा मनात निर्माण होऊ देऊ नये.

(२) वरीलप्रमाणे मुस्लिमांच्या चारित्र्याची जपणूक करण्यासाठीच आणखी असा नियम केला गेला आहे की कोणत्याही पुरुषाने आपल्या शरीराचा गुडघ्याच्या व नाभीच्या दरम्यानचा भाग तसेच कोणत्याही स्त्रीने आपल्या हाताखेरीज व चेहऱ्याखेरीज शरीराचा अन्य कोणताही भाग इतरांसमोर उघडा करू नये. मग समोरची व्यक्ती कितीही जवळच्या नात्यांतील असो. यालाच शरियतच्या परिभाषेत 'सतर' असे म्हटले आहे व 'सतर' झाकणे हे प्रत्येक स्त्री-पुरुषाचे कर्तव्य आहे. यामध्ये इस्लामचा हेतू असा आहे की समाजामध्ये लज्जाशीलता निर्माण व्हावी व अशा प्रकारच्या निर्लज्जतेचा फैलाव होऊ नये ज्यांच्याद्वारा अनैतिकता व दुराचार यांची निर्मिती होते.

(३) चारित्र्याच्या हानीस कारणीभूत ठरणारे, पाशवी वासनांना उत्तेजित करणारे तसेच पैसा, वेळ व आरोग्य यांचा नाश करणारे मनोरंजनाचे कार्यक्रम व छंद अशा गोष्टीही इस्लामला पसंत नाहीत. मनोरंजन ही बाब आपल्या जागी अत्यंत आवश्यक आहे. माणसातील चैतन्य व कार्यशक्ती निर्माण होण्यासाठी काबाडकष्टाबरोबरच मनोरंजनही अत्यंत गरजेचे आहे. परंतु मनोरंजन मनाला

ताजेपणा व टवटवीतपणा आणणारे असावे आणि मन अधिकाधिक मलीन व घाणेरडे करणारे नसावे. हजारो माणसे एकत्रितपणे गुन्हेगारीच्या काल्पनिक घटना तसेच बेशरमपणाची दृश्ये पाहतात. अशा तऱ्हेची असभ्य व अश्लील मनोरंजने सर्वांच्या चारित्र्याचे अध:पतन होण्यास कारणीभूत ठरतात, मग सकृद्दर्शनी ती दृश्ये कितीही चांगली असोत.

(४) मुस्लिमांतील एकजूट व कल्याणासाठी मुस्लिमांना अशी ताकीद दिली गेली आहे की, त्यांनी आपापसातील फाटाफुटीपासून दूर राहावे, गटबाजीपासून अलिप्त असावे, एखाद्या बाबतीत मतभिन्नता निर्माण झाल्यास शुद्ध मनाने कुरआन व हदीसच्या आधारे ते मतभेद दूर करण्यासाठी योग्य निर्णयांचा प्रयत्न करावा, असा निर्णय होऊ शकला नाही तर आपसात कलह करत बसण्याऐवजी तो निर्णय अल्लाहकडे सोपवावा, सामाजिक कल्याणाच्या कृत्यामध्ये एकमेकांशी सहकार्य करावे, आपल्या नेत्यांचे आज्ञापालन करावे, कलह व भांडणे निर्माण करण्यापासून दूर व्हावे आणि आपसातील कलह व भांडणाद्वारे आपली शक्ती क्षीण करून समाजाला खजिलपणा व नामुष्की आणू नये.

(५) मुस्लिमांना मुस्लिमेतर लोकांकडून विद्या व तंत्रज्ञान प्राप्त करण्याचे व त्यांची उपयुक्त कार्यपद्धती शिकून घेण्याचे पूर्ण स्वातंत्र्य आहे, परंतु जीवन जगताना मुस्लिमेतरांच्या जीवनशैलीची नक्कल करण्यास प्रतिबंध केला गेला आहे. एक समाज दुसऱ्या समाजाची नक्कल त्याच वेळी करीत असतो जेव्हा तो आपला अवमान व आपली न्यूनता मान्य करतो. ही अवस्था गुलामीचा एक निकृष्ट दर्जाचा प्रकार होय. पराभूतपणाची ही जाहीर ग्वाही आहे. याचा शेवटी निघणारा परिणाम असा आहे की इतरांची नक्कल व अनुकरण करणाऱ्या समाजाची संस्कृती अखेर नाश पावते. म्हणून पैगंबर मुहम्मद (स.) यांनी मुस्लिमांना मुस्लिमेतरांच्या संस्कृतीचे अनुकरण व नक्कल करण्यास सक्त मनाई केली आहे. कोणत्याही समूहाची शक्ती व सामर्थ्य त्याच्या वेशभूषेवर व त्याच्या जीवनशैलीवर अवलंबून नसते. याउलट ती शक्ती व सामर्थ्य त्याच्या शिक्षणावर व त्याच्या संघटितपणावर व त्याच्या कार्यशक्तीवर व क्षमतेवर अवलंबून असते, हे साधारण बुद्धीचा माणूसही समजू शकतो. म्हणून शक्ती व सामर्थ्य प्राप्त करण्याची इच्छा असेल तर ज्यापासून बलप्राप्ती होते अशा गोष्टी आत्मसात करा. अशा गोष्टी मुळीच आत्मसात करू नका ज्यामुळे समाज गुलामीच्या

दलदलीत पडतो व सरतेशेवटी इतर संस्कृतीत मिसळून जाऊन स्वत:ची स्वतंत्र अस्मिताच हरवून बसतो.

मुस्लिमेतरांशी वागताना मुस्लिमांना संकुचितपणाची व पक्षपातीपणाची शिकवण दिली गेली नाही. त्यांच्या थोर विभूतींना नावे ठेवण्यास आणि त्यांच्या धर्माचा अवमान करण्यास सक्त मनाई केली गेली आहे. त्यांच्याशी भांडण उकरून काढण्यासही मनाई केली गेली आहे. ते जर मुस्लिमांशी सलोख्याचे व शांततेचे संबंध ठेवतात आणि त्यांच्या हक्कांवर कसलेही आक्रमण करीत नाहीत तर मुस्लिमांनाही त्यांच्याशी सलोखा राखण्याचे तसेच प्रेमाचे व मित्रत्वाचे संबंध ठेवण्याची व न्यायपूर्ण वर्तन करण्याची शिकवण दिली गेली आहे. इस्लामी सभ्यतेची अशी निकडीची हाक आहे की, मुस्लिमांनी सर्वांपेक्षा अधिक प्रमाणात मानवी सहानुभूती व सदाचारांचे आचरणात दर्शन घडवावे. वाकडी चाल, जुलूम-अत्याचार व संकुचित मनोवृत्ती मुस्लिमाच्या प्रतिष्ठेच्या विरुद्ध आहे. उच्चकोटीचा सदाचार, सभ्यता व चांगुलपणाचा एक उत्कृष्ट आदर्श बनावा आणि स्वत:च्या तत्त्वांच्या गुणावर इतरांची मने जिंकावी. केवळ याच ध्येयासाठी मुस्लिमांना या पृथ्वीतलावर जन्माला घातले आहे.

# प्राणिमात्राचे व वस्तुमात्राचे हक्क

आता चौथ्या प्रकारच्या हक्कांचे थोडक्यात विवरण पाहू या. अल्लाहने मानवजातीला अन्य अगणित चराचरावर म्हणजे प्राणिमात्रावर तसेच वस्तूमात्रावर अधिकार बहाल केले आहेत. मनुष्य स्वत:च्या शक्तीने त्यांना आपल्या अधीन करतो. त्यांच्यापासून कामे करून घेतो व त्यांच्यापासून लाभ घेतो. बुद्धिनिष्ठ श्रेष्ठत्वाच्या कारणाने मानवप्राण्यास अशा प्रकारचा उपयोग करण्याचा पूर्ण हक्क आहे. त्याचबरोबर त्या अन्य प्राणिमात्रांचे व वस्तुमात्रांचेही काही हक्क मनुष्यावर आहेत. ते हक्क असे की मनुष्याने त्याचा अकारण व्यय करू नये. कसल्याही आवश्यकतेखेरीज त्यांना इजा, त्रास किंवा अपाय पोचवू नये. स्वत:च्या हितासाठी अनिवार्य अशी त्यांची किमान हानी करावी. तसेच त्यांचा वापर करण्यासाठी अधिकाधिक चांगल्या पद्धती निवडाव्यात.

यासंबंधी शरियतमध्ये विपूल प्रमाणात आदेश वर्णिलेले आहेत. उदा. पशुंची हत्या केवळ त्यांचा उपद्रव व त्यामुळे होणारी हानी टाळण्यासाठी तसेच अन्नासाठीच करण्याची अनुमती दिली गेली आहे, परंतु केवळ क्रीडा किंवा मनोरंजनासाठी त्यांची हत्या करण्यास अवरोध केला गेला आहे.

ज्यांचे मांस अन्न म्हणून उपयोगात येते, अशा प्राण्याची हत्या, त्यांचा गळा सुरीने कापण्याची (जुबह) पद्धत निश्चित केली गेली आहे. प्राण्यांचे उपयुक्त मांस प्राप्त करण्याची ही सर्वोत्तम पद्धत आहे. याखेरीज ज्या पद्धती आहेत त्या जरा कमी क्लेशदायक असल्या तरी मांसाचे कित्येक उपयुक्त गुण त्यामुळे नष्ट होतात. याउलट मांसातील उपयुक्त गुण टिकविणारी दुसरी पद्धत असेल तर ती जुबहच्या पद्धतीहून जास्त क्लेशदायक आहे. इस्लाम ही दोन्ही टोके टाळतो. इस्लामनुसार प्राण्यांचे हाल करून निर्दयपणे त्यांची हत्या करणे नापसंत आहे. विषारी जीवाणू व हिंस्त्र श्वापदाची हत्या करण्याची अनुमती केवळ एवढ्यासाठीच देतो की मनुष्याचा प्राण त्यांच्यापेक्षा अधिक मौलिक आहे. परंतु अशा प्राण्यांनाही हालहाल करून ठार करणे यासाठी संमती नाही. ओझे वाहणारे व प्रवासास उपयुक्त प्राण्यांना भुकेले ठेवण्याची व त्यांच्यापासून अवजड कष्टाची कामे करून घेण्याची तसेच त्यांना निर्दयपणे मारझोड करण्याची सक्त मनाई आहे. पक्ष्यांना अकारण बंदिस्त करून ठेवणेही अप्रिय ठरविले गेले आहे. प्राण्याचेच नव्हे तर वृक्ष, वनस्पतींना अकारण इजा व हानी करण्याची अनुमतीही इस्लाम देत नाही. तुम्हाला त्यांची फळे, फुले तोडून घेता येईल. परंतु वृक्षांचा अकारण नाश करण्याचा तुम्हास कसलाही अधिकार नाही. वृक्ष-वनस्पती तर सजीव आहेत. इस्लाम कोणत्याही निर्जीव वस्तूचाही निरर्थक व्यय धर्मसंमत मानत नाही. तसेच पाण्याची नासाडी करण्यास रोखतो.

# विश्वव्यापी व अनंत शरियत (आचारसंहिता)

आदरणीय पैगंबर मुहम्मद (स.) यांच्याद्वारे पाठविली गेलेली शरियत ही अनंत अशी संपूर्ण जगासाठी व अखिल मानवजातीसाठी आहे. हा शरियतच्या आदेशांचा व नियमांचा एक संक्षिप्त खुलासा आहे. या शरियतमध्ये माणसामाणसांत धर्मश्रद्धा व आचार याखेरीज अन्य कोणत्याही आधारावर भेदाभेद केला गेलेला नाही. ज्या धर्मनियमांत वर्ण, वंश व भूप्रदेशाच्या आधारावर माणसांत श्रेष्ठ व कनिष्ठता ठरविली जाते ते कदापिही विश्वव्यापी असू शकत नाही, कारण एका वंशाचा मनुष्य दुसऱ्या वंशाच्या माणसासारखा होऊ शकत नाही, तसेच संपूर्ण जग एकत्रितपणे एखाद्या भूप्रदेशात सामावू शकत नाही. निग्रोंचा काळा रंग, चिनी माणसाचा पीतवर्ण व यूरोपियनांचा गोरा वर्ण कधी बदलू शकतच नाही. वरील धर्मनियमांच्या उलट इस्लामची शरियत एक विश्वव्यापी स्वरूप धारण करते. ''ला इलाहा इल्लल्लाह मुहम्मदुर्रसूलुल्लाह'' (अल्लाहशिवाय कोणी ईश्वर नाही आणि मुहम्मद (स.) अल्लाहचे पैगंबर व दास आहेत) या वचनावर श्रद्धा धारण करणारा मनुष्य शरियतच्या अनुसार मुस्लिम समाजामध्ये अगदी समसमान हक्कासह प्रवेश करू शकतो. तेथे वर्ण, वंश, भाषा, देश वगैरे कोणत्याही गोष्टीवर विशेषता नाही.

तसेच ही शरियत एक चिरकाल व अनंत अशी शरियत आहे. यामधील नियम एखाद्या विशिष्ट काळासाठी अगर विशिष्ट जातिवंशासाठी निर्मित केले गेलेले नाहीत. तसेच ते रुढीपरंपरांवर आधारित नाहीत. तर उलट मनुष्याच्या उपजत प्रकृतीधर्मावर व उपजत सहज प्रवृत्तीवर ती आधारलेली आहे. मनुष्याची नैसर्गिक उपजत सहज प्रवृत्ती जर सर्व काळात अस्तित्वात आहे तर तिच्यावर आधारित असलेले ते सर्व नियमही अनंत व अक्षय असलेच पाहिजेत.

**- ० - समाप्त - ० -**